૧૨૮૧૭

૩૫૯૪૯
ચારિત્ર
[illegible]
સં. શા.
૧૨૦૮

REFBK-0013817
REFBK-0013817

# खरे दर्शन : खंड दुसरा

## निंदकांना जमालगोटा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... वि: ...
... नों दि ...

लेखक

**नारायण भास्कर खरे**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ...

२ जानेवारी १९६४
(अभ्यंकर पुण्यतिथी)

REFBK-0013817
REFBK-0013817

किंमत ८ रुपये

प्रकाशक :

**विक्रम नारायण सावरकर, एम्. काम्.**

संचालक, पृथ्वीराज प्रकाशन,

सुभाष कुंज, डॉ. मुंजे पथ,

सीताबर्डी, नागपूर १.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक :

पां. ना. बनहट्टी,

नारायण मुद्रणालय,

धनतोली, नागपूर १.

सत्यान्वेषी सत्यप्रेमी
सकल समाजाला
सादर समर्पण

लेखक

मराठा ग्रंथ ...
अनुक्रम ३४८७८ वि: ...
क्रमांक २२०५ नों दि: २२।२८६५

# मनोगत

सध्या मी ८२ च्या घरात असून जराजर्जर अवस्थेत आहे. तरीही मी स्वस्थ बसलेलो नाही. भारतीय राजकारणात दिसून येणाऱ्या त्रुटींचे निराकरण कसे होईल याचे दिग्दर्शन मी तात्काळ माझ्या सडेतोड वृत्तीने लेख लिहून, निवेदने प्रसिद्ध करून किंवा संपादकांना अगर संबंधितांना खुली पत्रे लिहून आजवर केलेले आहे. माझे ते लेख, निवेदने व पत्रे बऱ्याच राजकारणी लोकांना व इतिहासप्रेमियांना आवडली. इतकेच नव्हे तर हे सर्व लेख, निवेदने आणि पत्रे पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यात यावी अशाही त्यांनी मला मोठ्या प्रेमाने सूचना केल्या. मला त्या पसंत पडल्या. माझी ही सर्व सामुग्री माझे चरित्रकार श्री. ज. रा. जोशी यांनी मोठ्या आपुलकीने जतन केलेली होती व तिचा असाच काही तरी उपयोग व्हावा अशी त्यांचीही तळमळ होती. मित्रांच्या ह्या सूचनेचा अव्हेर करणे मलाही इष्ट वाटले नाही, म्हणून मी हे धाडस केले. माझ्या या उपक्रमाचे दोन भाग म्हणजे दोन पुस्तके आहेत. त्यांना मी खरे-दर्शनः खंड १ ला (लेख, पत्रव्यवहार इत्यादि) व खरे-दर्शन : खंड २ रा (निंदकांना जमालगोटा) अशी नावे दिली आहेत. पहिल्या खंडाविषयी विशेष स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाही. कारण त्यात प्रसंगानुरूप लेख, निवेदने व पत्रव्यवहार असा मजकूर आहे.

पण दुसऱ्या खंडाचा प्रकार असा नाही. त्यात काही विशिष्ट व्यक्तींविषयी त्यांनी माझ्याबद्दल लिहिताना माझ्यावर जो जाणूनबुजून अन्याय केला त्याबद्दल मी पुराव्यानिशी त्यांच्या पदरात पुरेपूर माप घालून खरपूस समाचार घेतला आहे. माझे दिवंगत मित्र व श्रेष्ठ नेते कै. नरकेसरी बॅ. अभ्यंकर यांच्या विशुद्ध चारित्र्याबद्दल कुणीही सूज्ञाने आक्षेप घ्यावा असा बुरख्याआडून जो शिंतोडा श्री. पु. बा. काळे यांनी लिहिलेल्या 'अनसूयाबाई आणि मी' या पुस्तकातून उडविला आहे; त्याच्या खरेखोटेपणाची शहानिशा करून काळेमहाशयांना मी माझ्या या दुसऱ्या खंडात चोख उत्तर दिले आहे. वाचकांना ते पटले व काळे महाशयांच्या पुस्तकाने अभ्यंकरांविषयी वाचकांचा जो काही गैरसमज झालेला असेल

तो माझ्या या पुस्तकाने (खंड २ रा) दूर झाला तर माझ्या या वृद्धावस्थेत मी घेतलेल्या परिश्रमाचे चीज झाले असे मी समजेन.

माझ्या या दोन्ही पुस्तकांना (खंड १ ला व खंड २ रा) माझे मित्र श्री. वि. घ. देशपांडे यांनी वेळात वेळ काढून जी थोडक्यात पण मार्मिक प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल मी त्यांचे हार्दिक आभार मानतो. तसेच माझी ही दोन्ही पुस्तके अनुक्रमे श्री. बा. गो. ओगले, संचालक, नक्षत्र प्रेस व श्री. पां. ना. बनहट्टी, संचालक, नारायण मुद्रणालय, यांनी मोठ्या तत्परतेने वेळेवर छापून दिली याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो.

धनतोली, नागपूर
दि. २१ डिसेंबर १९६३

ना. भा. खरे

# प्रस्तावना

डॉ. खरे हे झुंझार राजकारणपटु आहेत तसेच कुशल चिकित्सक आणि वैद्य म्हणून त्यांची ख्याती आहे. शत्रूचा ते जसा निःपात करतात तसा रोग्यांच्या रोगाचा कधी कधी जहाल औषधे देऊन ते नाश करतात. परंतु या जहाल औषधे देण्यामागेही रोग्यांचे भले व्हावे हीच सदिच्छा असते. प्रस्तुत ग्रंथ हा याच प्रकारचा आहे. यात शत्रूवर वार नसून मित्राच्या आजारीपणावर औषध योजना आहे. आणि म्हणूनच ग्रंथाचे **निंदकांना जमालगोटा** असे सार्थ नाव ठेविले आहे.

**भले तरी देऊ कांसेची लंगोटी**
**नाठाळाचे काठी देऊ माथा**

हा डॉ. खरे यांचा बाणा आहे. आणि म्हणून कुणी त्यांच्यावर वार केला तर उसने फेडल्याशिवाय ते कधीच राहत नाहीत. पुष्कळ लब्धप्रतिष्ठित डॉ. खरे यांच्या या तेजस्वी वृत्तीला नावे ठेवतात. माझा मात्र स्वतःचा अनुभव आहे की, डॉ. खरे उदार वृत्तीचे आणि खेळाडू गृहस्थ आहेत. भोंदूपणा त्यांच्या वृत्तीत नाही. दोन द्यावेत, दोन घ्यावेत आणि विसरून जावे अशी त्यांची वृत्ती आहे.

सन १९५६ अगर १९५७ यावर्षी राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी उभे राहण्याचा त्यांचा विचार होता. त्यांच्यासारख्या थोर गृहस्थाने निवडणुकीत यशाची आशा नसता उभे राहू नये असे मला मनापासून वाटत होते. म्हणून मी ग्वाल्हेरच्या संसद आणि विधान सभा सदस्यांना मला विचारल्याशिवाय राष्ट्रपतीच्या नियुक्तिपत्रकावर हस्ताक्षर करू नये म्हणून आदेश दिला होता. यामुळे डॉक्टरसाहेब रागावले आणि त्यांनी हिंदुमहासभेचे त्यागपत्र दिले आणि माझ्या विरुद्ध वक्तव्यही काढले. मी त्यांना पत्र लिहिले की—

You are senior to me in all respects. And it is my privilege and prerogative to apologise and it is your duty and responsibility to forgive.

डॉक्टरसाहेबांचा राग पूर्ण शांत झाला आणि मी नागपुरास गेलो असता ते माझ्या व्याख्यानास अध्यक्ष म्हणून आले. आणि त्यानंतर मी, माझी पत्नी आणि मुलेबाळे डॉक्टरसाहेबांच्या घरी नेहमी जातो आणि त्यांचे आमच्यावर पूर्ववत् प्रेम आहे.

हिन्दुमहासभा सोडण्याचा तर प्रश्नच नव्हता. प्रकृतीमुळे ते दौरे काढत नसले तरी अखिल भारत हिन्दुमहासभेचे ते आज उपाध्यक्ष आहेत.

या ग्रंथात कै. सौ. अनसूयाबाई काळे, श्री. पु. बा. काळे, श्री. माडखोलकर, श्री. पटवर्धन वगैरे एका काळी त्यांचे सहकारी, अनुयायी वा हाताखाली काम केलेल्या व्यक्तींवर टीका आहे. ह्या व्यक्ती आज विद्यमान आहेत आणि कै. सौ. अनसूयाबाईंचीही आठवण लोक अद्याप विसरले नाहीत. त्यांचे यजमान आणि मुलेबाळे आज आपल्यात वावरत आहेत. पुष्कळांना असे वाटते की, ही मंडळी कोणत्याच दृष्टीने डॉक्टरांच्या बरोबरीची नाहीत. त्यांच्यावर वैयक्तिक टीका करून डॉक्टरसाहेब त्यांना अकारण महत्त्व देतात आणि स्वतःचा स्तर विनाकारण खाली आणतात. मलाही प्रारंभी तसेच वाटले. पण पहिले प्रकरण ज्यावेळी मी बारकाईने वाचले त्यावेळी आगळिक डॉक्टरांनी केली नसून विरुद्ध बाजूकडून अन्याय्य टीका झाली आहे आणि स्वतःचे व आपल्या दिवंगत मित्राचे चारित्र्य कलंकित राहू नये म्हणून डॉक्टर खऱ्यांना हे लिखाण करावे लागले आहे हे मला पटले.

वास्तववादी चरित्रचित्रणाच्या नावाखाली श्री. पु. बा. काळे यांनी जो आचरटपणा केला आहे त्याची निंदा करावी तेवढी थोडीच आहे. बॅ. अभ्यंकरां-सारखा थोर देशभक्त मृत्युशय्येवर पडला असता त्याचा आत्मा माझ्या पत्नीच्या चेहऱ्याभोवती घुटमळतो आहे अशी कल्पना काळ्यांच्या मनात आली आणि त्यांनी आपल्या पत्नीस बॅ. अभ्यंकरांना मुका देण्याचा आदेश दिला. आणि पत्नी मेल्यानंतर या घटनेचा उल्लेख तिच्या चरित्रात श्री. काळ्यांनी रंगवून लिहिणे यास आचरटपणाशिवाय दुसरे विशेषण देता येत नाही. या वर्णनाने कै. अनसूयाबाई काळे आणि कै. अभ्यंकर यांच्या चारित्र्यास तर कलंक लागतोच, पण श्री. काळे यांच्या हीन अभिरुचीचाही परिस्फोट होतो. हा मजकूर वृत्तपत्री लिखाणात आलेला नसून एका पुस्तकात आला आहे आणि विदर्भ साहित्य संघात त्याचा फार गाजावाजा झाल्याने डॉ. खऱ्यांना स्वसंरक्षणार्थ आणि आपल्या दिवंगत मित्राची अपकीर्ती होऊ नये म्हणून हे लेखन करावे लागले आहे. वैयक्तिक चिखलफेक केलीच असेल तर टीकाविषयीभूत व्यक्तींनी केली आहे. डॉ. खऱ्यांनी कॅथॉलिक सोपने हा चिखल धुवून काढला आहे एवढेच. डॉक्टरांचे लेखन किती प्रभावी झाले आहे हे वाचकांनीच ठरवावे. ते प्रस्तावना लेखकाचे कार्य नव्हे.

या निमित्ताने चरित्रलेखन करताना विद्यमान अथवा समीपच्या भूत-काळातील व्यक्तींच्या विषयी लिहिताना कोणत्या मर्यादा ठेवाव्यात याचे विवेचन करणे अप्रस्तुत होणार नाही. चरित्र लिहिताना विद्यमान व्यक्तींचे उल्लेख टाळणे अशक्य आहे. परंतु त्यांच्या विरुद्ध लिहितांना भरपूर पुरावा असल्याशिवाय लिहू नये. ' आशुक माशुका 'च्या भानगडी त्यातून पूर्णपणे टाळाव्यात. कुणाच्या मनात

काय होते हे परमेश्वरच सांगू शकेल. त्यावर कल्पनेच्या इमारती बांधण्याच्या भानगडीत कुणीही न पडणे उत्तम. औचित्याच्या मर्यादाही सांभाळावयास हव्यात. लोक फक्त न्यायालयाला अथवा आर्थिक परिणामांना भितात. डॉ. खऱ्यांचे चरित्रकार जोशी यांच्या भाषणाच्या विपर्यस्त वृत्तान्तामुळे बिचारे जोशी नोकरीतून डिसमिस झाले. तरी रिपोर्ट देणारे संभावित आणि त्यांच्यावर टीका करणारे मात्र शिवराळ हा उलटा न्याय आहे.

ह्या जमालगोट्याशिवायही या ग्रंथात साहित्यिकांना आवडणारा बराच मजकूर आहे. स्वतःच "**खट्याळ खरे**" हा मथळा देऊन डॉ. खऱ्यांनी आपल्या आयुष्यातील मनोरंजक किस्से दिले आहेत. सर हाईड गोवन यांनी पहिल्या मंत्रि-मंडळास दिलेल्या मेजवानीची हकीकत वाचकांची करमणूक करील. यात अनेक उर्दू शेर आहेत, महाविद्यालयीन जीवनातील मौजा आहेत. आणि राजकीय क्षेत्रातील वादग्रस्त प्रसंगही आहेत. "कांग्रेसमधील माझे नेतृत्व". या प्रकरणात एका काळचा राजकीय इतिहास आहे. आणि भारत-चीन संघर्ष हे प्रकरण सद्यःस्थितीस अत्यंत उपयुक्त असून डॉ. खरे यांच्या अचूक राजकीय नेतृत्वाचा प्रत्यय देणारे आहे.

या ग्रंथात अनेक वादग्रस्त प्रसंग आहेत. हे पुस्तक वाचून अनेक महत्त्वाच्या व्यक्ती नाराज होतील. परन्तु काळजीपूर्वक हे पुस्तक वाचल्यावर डॉ. खरे यांचा पक्ष न्यायाचा आहे हे कबूल करावे लागेल. डॉ. खरे यांचे आकर्षक आणि रंगी-बेरंगी व्यक्तिमत्वही या पुस्तकात स्पष्टपणे प्रतिबिंबित झाले आहे. डॉ. खरे यांना सत्याची चाड आहे आणि खोट्याची चीड आहे. ते प्रतिपक्षावर कडाडून हल्ला करीत असले तरी अंतःकरणाने उदार आणि वृत्तीने खेळाडु आहेत. उर्दू शेर आणि चित्रमय विशेषणांनी त्यांची भाषणे, लेख आणि वक्तव्ये भूषित असली तरी राष्ट्र-हिताविषयीची त्यांची कळकळ निर्विवाद आहे आणि राजकारणातील त्यांचे मार्गदर्शन साधार माहीतीवर आधारलेले आणि बिनचूक आहे, याचे प्रत्यंतर वाचकांना येईल. वरच्या सालींना उग्र दर्प असणाऱ्या आणि डोळ्यात पिळले असता पाणी आणणाऱ्या परंतु आतून मधुआम्ल स्वादिष्ट रसांनी भरलेल्या रंगदार नागपुरी संत्र्यासारखे डॉ. खऱ्यांचे व्यक्तिमत्व या पुस्तकात प्रकर्षाने प्रकट झाले आहे. वादांची वादळे संपल्यानंतर भविष्यकाळातील प्रामाणिक इतिहासकार डॉ. खरे यांची गणना प्रामाणिक, निस्पृह आणि निर्भय देशभक्तात करील यात संशय नाही.

दिल्ली, **वि. घ. देशपांडे**

दिनांक १७-१२-६३ अध्यक्ष, अ. भा. हिंदुमहासभा

वन्देमातरम्

# प्रकाशकाचे दोन शब्द

माननीय डॉ. ना. भा. खरे, ' खरे दर्शन ' हे पुस्तक लिहीत आहेत, असे कळल्यावर ' पृथ्वीराज ' प्रकाशनाला हे पुस्तक प्रसिद्ध करण्याची संधी मिळावी, अशी आम्ही त्यांना विनंती केली.

डॉक्टर महाशयांनी कोणतीही सबब न सांगता ही विनंती मान्य केली. हार्दिक आभार !

अ. भा. हिन्दुमहासभेचे अध्यक्ष, प्रा. वि. घ. देशपांडे यांनी राजकीय कार्यात व्यग्र असताही प्रस्तावना लिहिली. महाराष्ट्राचे सव्यसाची झुंजार पत्रकार आचार्य प्र. के. अत्रे, संपादक दै. मराठा, यांनी नरकेसरी बॅ. अभ्यंकर पुण्यतिथीला होणाऱ्या या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित रहाण्याचे मान्य केले. अर्थात माननीय डॉ. ना. भा. खरे यांच्याबद्दल उभयतांच्या मनात वसत असलेल्या आदरभावनेमुळेच अल्पावधीत हे शक्य झाले. हा त्रिवेणी संगम घडवून आणल्याबद्दल नियतीला धन्यवाद देणे आवश्यक आहे.

पुस्तकाच्या अंतरंगावर स्वतः लेखक माननीय डॉ. ना. भा. खरे आणि प्रस्तावनाकार प्रा. वि. घ. देशपांडे यांनी पुरेसा प्रकाश टाकला असल्यामुळे त्यासंबंधी अधिक लिहिण्याची आवश्यकता नाही.

हे पुस्तक वेळेवर छापून दिल्याबद्दल नारायण मुद्रणालयाचे श्री. पांडुरंग नारायण बनहट्टी यांचेही आभार मानतो.

सुभाष कुंज,
डॉ. मुंजे पथ,
सिताबर्डी, नागपूर १

' पृथ्वीराज ' प्रकाशनासाठी
**विक्रम नारायण सावरकर**
संचालक

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| मनोगत | पृष्ठे (५) ते (६) |
| प्रस्तावना | पृष्ठे (७) ते (९) |
| प्रकाशकाचे निवेदन | पृष्ठे (१०) |
| अनुक्रमणिका | पृष्ठे (११) ते (१६) |

## खरे–दर्शन : खंड २ रा    पृष्ठे : १ ते २३२

**प्रकरण १ : ' अनसूयाबाई काळे आणि मी 'ची चीरफाड पृष्ठे : १ ते २३**

चुंबन प्रकरणाच्या तळाशी जावयाचे ठरविले १, साहेबापुढे सल्लागार निष्प्रभ ठरले २, काळ्यांची शेखी फोल आहे ३, काळ्यांच्या हिडीस लिखाणाला माडखोलकरांचा पाठिंबा ३, काळे महाशयांचे लोकविलक्षण विधान ४, ठेकेदार काळे व कोषाध्यक्ष बॅ. अभ्यंकर यांचे संबंध ४, घराच्या सौद्यापासून तेढ ५, हा अभ्यंकरांवर सूड तर नव्हे ? ५, काळ्यांची खोटी, विपरीत व विपर्यस्त विधाने ५, जाफर हुसेन प्रकरणाची जाहीर सभा : सभेत दंगल व गोटेफेक : पण कांग्रेसने सभा पार पाडली ! नामदार शरीफ यांची कांग्रेसपक्षाकडे दिलगिरी आणि राजीनामा ६, अध्यक्षांचे प्रास्ताविक भाषण ६, हे पोलीस कशासाठी ? ७, श्री. केदारांचे भाषण ७, मंत्र्यांचे नीतिधैर्य ८, ना. शरीफ यांनी चूक केली ८, सभेत गोंधळाला प्रारंभ ८, सभेत भयंकर गोंधळ ९, दगड, जोडे व धूळ यांचा वर्षाव १०, पोलीसांना बाहेर काढले १०, ना. डॉ. खरे यांचे भाषण ११, ना. शरीफ यांची माफी व राजीनामा ११, यापुढे खबरदारी घेऊ ११, ना. मिश्रा यांचे भाषण १२, मतभेद कोठेच नाही १३, माफी पुरेशी आहे १३, डॉ. परांजपे यांचे भाषण १४, अनपेक्षित प्रकाराने सभा तहकूब १४, काळे खरे की ' महाराष्ट्र ' पत्र खरे ? १५, खोटे आणि खोडसाळ विधान ' काळ्यांना 'च शोभते १६, शुद्ध लोणकढी थाप १६, पं. मिश्राशी संधी करणाऱ्यांना अखेर चकमा १७, काळीनबाईंचे अश्रु व हुंदके यांच्याबद्दल थोडे स्पष्टीकरण १८, वयाच्या ६१ व्या वर्षी बाई लिपस्टिक कां लावू लागल्या ? १९, बाईंची अधिकार-

पदाविषयी दुर्दम्य लालसा १९, मोटारविके काळे माझे राजकीय हितशत्रू २०, माझ्या ८२ व्या वर्षाच्या जराजर्जर अवस्थेत हा प्रपंच कां केला ? २०, माडखोलकर–पटवर्धन ही दुक्कलच काळ्यांची प्रेरक शक्ती २१,' माडखोलकर–पटवर्धनांचा दुष्ट डाव २१, माडखोलकरांच्या मोहक मुखड्याचे गुरुमुखातून झालेले मनोहारी दर्शन २२, श्रीपाद कृष्ण आणि ग. त्र्यं. माडखोलकर २२, गजानन त्र्यंबक माडखोलकर २२, जिथे गुरु भाळले तेथे काळ्यांचा काय पाड! २३, अखेर माडखोलकरांनी काळ्यांना वश केलेच! २३.

**प्रकरण २ : अनसूयेची असूया** **पृष्ठे २४ ते ४०**

गौरकाय मॅक्लेघनबद्दल सौ. काळे यांना आकर्षण २४, काळे महाशयांनाही एका सुंदर परस्त्रीचे आकर्षण २४, 'अनसूयेची असूया' हे शीर्षक कां दिले ? २४, काळीनबाईंचा उणेपणा उजेडात येऊ दिला नाही २५, 'खरे' आणि 'काळे' अंतःकरणाचे सम्यग्दर्शन २५, बाईंची असूया २६, अनसूयाबाईंचे पत्र पहिले २७, पत्र दुसरे इंग्रजीत २८, पत्र तिसरे २९, पत्र चवथे ३०, एक तिरस्करणीय प्रवृत्ती ३२, महत्तराणी होऊ पहाणारी तथाकथित झांशीची राणी ३२, कुठे भगवान श्रीकृष्ण आणि कुठे फडतुस मी ३२, पत्र पाचवे ३३, पत्र सहावे ३४, माझ्या अधिकारपदाचा लाभ घेण्याचा प्रयत्न ३४, दादीबाई देशमुख हिंदु मुलींच्या शाळेतील सभा ३५, मतलबी धोरणाचा हा नमुना पहा ३५, 'सावधान'-मधील काळीनबाईंच्या असूयेचे स्वच्छ दर्शन ३६, कांग्रेसनिष्ठ काळ्यांकडे कांग्रेसद्रोह्याला चांदीच्या ताटात मेजवानी ३७, व्हाइसरायांची घोषणा व कांग्रेसवाल्यांची निराशा ३७, माझी व्हाइसरायच्या कार्यकारिणीत नेमणूक ३७, काळे दंपतीने केलेली कांग्रेसची अप्रतिष्ठा व अवहेलना ३८, माझ्याबद्दलचा आकस ३८, कारस्थानावर प्रकाश टाकणारे डॉ. केदारांचे पत्र ३९.

**प्रकरण ३ : महाराष्ट्रीय मॅकडोनेल्ड** **पृष्ठे : ४१ ते ८०**

उपकारकर्ता व उपकृत मीमांसा ४१, उपकारकर्ते ॲस्क्विथ व उपकृत मॅकडोनाल्ड ४१, तरुण–भारताच्या पुनरुज्जीवनात माझा पुढाकार ४२, Mr. Madkholkar and Dhavle resign ४३, माडखोलकर पटवर्धनांनी उंबरठे झिजविले ४३, मी माडखोलकरांना दुसरी अडणी दिली ४७, माझा तरुण–भारताशी दैनंदिन संबंध नव्हता ५०, श्री. ज. रा. जोशी व श्री. माडखोलकर ५०, गुळचट व हिरवट शत्रू ५२,

परीक्षणाचे परीक्षण ५३, माडखोलकरांचे सपशेल खोटे विधान ५४, स्वतःची प्रौढी मिरविण्याचा प्रयत्न ५५, कुंकू जनसंघाचे पण निष्ठा चव्हाणांच्या चरणी ५६, श्री. बाबुराव धनवटे यांचे माडखोलकरांना पत्र ५६, खोट्या आरोपाचा इनकार केला नाही ५७, अखेर ' महाराष्ट्रा 'कडून सत्यान्वेषण ५७, अनुसूयाबाई काळे आणि मी : तरुण भारतातील जाहिरातीची अवास्तवता ५८, अभ्यंकरांचे संकलित चरित्र आणि मी ६१, बॅ. अभ्यंकर यांचे संकलित चरित्र : डॉ. खरे यांचे ए. श्री. पटवर्धनांना उत्तर ६२, माझ्या मताला दोघा सज्जनांची पुष्टी ६९, कालाय तस्मै नमः ( राजाभाऊ डांगरे यांचा लेख) ६९, मासलेवाईक पत्रे ७१, 'शिखंडी' सहीचा 'तरुण-भारता 'चा वृत्तलेखक ७४, ' तरुण-भारता 'तील मजकूर विपर्यस्त आहे : डॉ. खरे यांचा आक्षेप ७४, मी लिहिले तेच बरोबर : वृत्तलेखकाचे उत्तर ७५, हा वाद बंद ७७, पटवर्धनांचा खोटेपणा व तरुण-भारताचा भ्याडपणा ७७, कै. आप्पासाहेब ढवळे व ' तरुण-भारता 'तील मजकूर : डॉ खरे यांचा आक्षेप बरोबर (म. गं. दातार यांचा लेख) ७७, श्री. दातार रामशास्त्री प्रभुणेच ठरले ७९, ' तरुण-भारता 'कडून त्याच्या जनकाचाच द्वेष ७९, व्यवसायबंधूकडून लगुडप्रहार ८०.

**प्रकरण ४ : कांग्रेसमधील माझे नेतृत्व** **पृष्ठे : ८१ ते ९०**

नागपूरच्या कांग्रेस पक्षातील गटबाजी ८१, १९३२ चे कांग्रेसचे दुसरे आंदोलन ८१, प्रांतिक कांग्रेसमधील दोन गट ८२, पटवर्धनांनी केलेली माझी स्तुति ८२, डॉ. खरे यांची कामगिरी ८३, माझ्याकडे आलेला नेतृत्वाचा वारसा ८४, ते जुने पटवर्धन आणि आजचे नवे पटवर्धन ८४, चिटणीस पार्क स्टेडियम : महात्मा भगवानदीनजी स्टेडियम हे नाव द्या : कार्यकर्त्यांची मागणी ८५, कालाय तस्मै नमः ८५, सुमतिबाई धनवटेंचे माझ्यावर छुपे शिंतोडे ८५, सुमतिबाईंना माझे उत्तर ८६, अमराठी माणसांना अन्याय ८६, ' तरुण-भारत 'कारांचा भ्याड हल्ला ८७, माझे नेतृत्व पटवर्धन-दातारांच्या लेखणीतून पहा ८७, आजकाल पटवर्धनांचा चेहरा दुर्मुखलेला कां ? ८८, ढोंगी कांग्रेसवाल्यांचे नाव चिटणीस पार्कला देऊ नका : विक्रम सावरकर यांचे पटवर्धनाना खुले पत्र ८८.

**प्रकरण ५ : नरकेसरी अभ्यंकर आणि मी** **पृष्ठे : ९१ ते १०८**

टिपटॉप युरोपियन पोषाखात अभ्यंकरांची प्रथम भेट ९१, ' काय डॉक्टर, काही देशबीश आहे की नाही ?' ९१, अभ्यंकरांचा बेडरपणा व मर्दपणा ९१, स्वराज्य पक्षाची कामगिरी ९२, मुंजे अभ्यंकरांचे घनघोर

युद्ध ९२, १९३० च्या शांति-संग्रामातील तुरुंगवास ९२, पटवर्धनांच्या दुष्ट आरोपाला माझे उत्तर ९३, नरकेसरींचे आत्मसमर्थन : ठोशास ठोसा ९३, गोरी तोंडे गोरीमोरी झाली ९४, कांग्रेसचे धिंडवडे निघतील ९४, 'ना स्वीकार ना धिक्कार' ९४, दोस्ती तुटण्याची धमकी ९५, कांग्रेस-श्रेष्ठींची शंका ९५, वर्ध्याचे पाचारण ९५, मध्ये पडण्याचे नाकारले ९५, 'माझा तुम्ही बळी घेता' ९६, गड आला पण सिंह गेला ९६ ९६, अभ्यंकरांचे पहिले स्मारक मीच केले १००, सेठ जमनलाल बजाजांचा कावा १०१, 'आम्ही तुमच्यावर फिर्याद करून रक्कम वसूल करू' १०१, नरकेसरीच्या पुतळ्यास पाहून (कविवर्य आनंदराव टेकाडे यांचे स्वकृत पद्य ) १०२, अभ्यंकर पुतळ्याचे उद्‌घाटन १०२, समारंभाचा कार्यक्रम १०२, अभ्यंकरांची बेदरकार वृत्ती १०४, डॉ. मुंजे याचे भाषण १०५, लोकनायकांचे भाषण १०६, स्वातंत्र्यप्रीती व परवशतेचा तिटकारा १०६, निर्भीड स्पष्टवक्तेपणा १०७, लोकशाही स्वातंत्र्याचा कट्टा पुरस्कर्ता १०७, डेप्युटी कमिश्नरच्या हजेरीसंबंधी खुलासा १०८.

**प्रकरण ६ : भारत-चीन संघर्ष** **पृष्ठे : १०९ ते १३३**

संकट दाराशी आले तरी भारत सत्कार थंडच १०९, Nehru has no answer १०९, नेहरूंचा महाराष्ट्राबद्दलचा आकस ११०, नेहरू, चीन आणि महाराष्ट्र ११०, कम्युनिस्टधार्जिणेपणामुळेच १११, दहा वर्षांपूर्वीचा इषारा १११, नेहरूंचा अदूरदर्शीपणा ११२, एच. व्ही. कामतांची पुस्तिका ११३, भारत विरोधी प्रचार आघाडी ११३, हे त्यांचे खरे पंचशील ११४, अरे ये मऱ्हट्टोंको एक कर दिया तो ११५, महाराष्ट्राबद्दलचा आकस ११६, महाराष्ट्राला झुलविण्याचा छंद ११६, खानेकु चव्हाण-लढनेकु समिती ११७, नवग्रह समितीचे उपद्‌व्याप ११७, आंध्र राजधानीची सोय कशी केली ११८, डांगचा सौदा ११८, नेहरूकृत 'महा'चा उपहास ११९, 'युगधर्मा'तील माझा लेख १२०, ब्रिटिश दूरदर्शिता १२०, भारत की भूल १२१, भारत के नेपाल के मामले में अनुचित हस्तक्षेप १२१, भारत की पराक्रमशून्यता नेहरूजीका कम्युनिझम-प्रेम १२२, गांधीवाद का खोकलापन १२२, चीन की आक्रमणप्रियता १२३, नेहरू-नीतीसे कम्युनिस्टों को प्रोत्साहन १२४, सैनिक कारवाई की जाय १२४, चीनआक्रमित लडाकचे भवितव्य १२५, कॉमनवेल्थची टिंगल १२५, चोरून ठेवलेली बाब १२६, शब्दांत शब्द नाही १२६, खंबीर धोरणाचा उच्चार करताच नेहरूंचे अभिनंदन १२७, लक्ष्मी मेननचा खरपूस समाचार १२८, शिवसांप्रदायिक व्हा १२९, हा असत्य प्रचार

अनुक्रम ३७८२९ वि: चरित्र
क्रमांक ९२०८ (१५) नों दि: २१.२.६९

थांबवा १३०, शंकरराव देवांचा राष्ट्रविरोधी प्रचार १३१, डॉ. खरे यांना नेहरूंचे पत्र १३२, मी वर्तविलेले राजकीय भविष्य १३२, Kashmir problem १३२.

**प्रकरण ७ : खट्याळ खरे** **पृष्ठे १३४ ते १६२**

संकलित केलेल्या माझ्या काही आठवणी १३४, हृदयविकाराचे उपकार १३४, पेशवाई जेवण १३४, चरणसंवाहन १३६, शेराला सव्वाशेर १३७, मागच्यावरही ताण १३९, छान जिरली उर्मटाची १३९, हा तुमचा महात्मा १४०, कुसळ आणि मुसळ १४१, ब्राह्मणद्वेष्ट्याचा मुखभंग १४१, गांधी छाप विजय १४२, भली खोड मोडली १४२, कामिनीकांचन १४३, यह बम्बई है १४५, आगगाडीतील एक प्रसंग १४७, पुन्हा आगगाडी १४८, जिवावरचा प्रसंग १४९, अविस्मरणीय अश्वारोहण १४९, ही जगाची माणुसकी १५०, वाईटातून चांगले १५०, हे म्हणे डॉक्टर होणार १५०, दोन पुढारी मासले १५१, भारतीयांचे सन्मान रक्षण १५४, महिलावर्गाची सोय १५५, नागपूर रेडियो केंद्राच्या निमंत्रणाचे आश्चर्य १५६, आम्हीही खोडकर होतो १५६, चोख उत्तर १६२.

**प्रकरण ८ : किंचित उर्दू शायरी** **पृष्ठे १६३ ते १६८**

**प्रकरण ९ : मी आणि माझे चरित्रकार** **पृष्ठे १६९ ते २१८**

या प्रकरणाचा प्रपंच कां ? १६९, माडखोलकरांचे खवचट वाक्य १६९, जोशीबुवांनी लिहिलेली माझी चरित्रे १६९, मी माझी माहिती केव्हा दिली ? १७०, ढवळे, अन्याय सहन होणार नाही, मी जोशी-बुवांच्या पाठीशी आहे १७०, जोशीबुवांची बडतर्फी व न्यायालयाकडे धाव १७१, तरुण-भारत व त्याच्या संपादकावर न्यायालयाने झाडलेले ताशेरे १७१, जोशीबुवाच काय, कोणालाही माडखोलकर गोत्यात आणू शकतात १७३, ज. रा. जोशी सहाय्यक निधी व माडखोलकर १७३, माडखोलकर तुम्ही अगदी कृतघ्न आहांत १७४, जोशीबुवांना इंडोने-शियातून आलेले पत्र १७५, स्वकीयाकडून झालेला अव्हेर १७६, जोशी-केळकर-चव्हाण पत्रव्यवहार १७६, जोशीबुवांकडून मुख्य मंत्र्यांचे आभार १८२, या पत्रव्यवहाराने माझे मात्र समाधान झाले नाही १८३, आणखीही एक ठळक उदाहरण १८३, जोशीबुवांचे माझ्यावरील दोन लेख १८४ : डॉ. खरे दिल्लीकरांना कधीच भुलले नाहीत १८४, डॉ. खरे

यांचे राजकीय कार्य १८८, दूरदृष्टी कोणाची ? १८९, सिव्हिक गार्ड ड्रिल १८९, मेवो बंडाचा बीमोड १९०, शुद्धीकरण कार्य १९१, ठोशाचे उत्तर १९१, राजबंदींचे प्राणरक्षण १९२, अनुल्लेखाचे बक्षीस १९२, अन्य चहात्यांकडून जोशीबुवांचा गुणगौरव १९४, खरे-केदार चरित्रकार श्री. ज. रा. जोशी यांचा परिचय (ले. प्रा. श्री. भा. वर्णेकर) १९५, खरे–चरित्रकार जोशी (ले. प्रा. सुरेश म. डोळके नागपूर) १९९, देऊळगांवराजाचे वतनदार जोशी २००, जामदारांच्या घरी राहाण्याचे भाग्य २००, 'महाराष्ट्र'त प्रवेश २००, खरे–चरित्र लिहिण्याची सूचना २०१, खरे–चरित्रांतील जिव्हाळा २०२, खरे-चरित्राच्या दुसऱ्या भागाचे अनन्य वैशिष्ट्य २०३, केदार–चरित्राची कामगिरी २०३, चरित्र-लेखक म्हणून गौरव २०४, नोकरीतून दूर व्हावे लागले २०४, 'पुराणिक चरित्राचा जन्म' २०५, मुंबईचे राज्यपाल डॉ. श्रीप्रकाश यांचे डॉ. खरे यांना पत्र २०५, राष्ट्रपतींचे ॲडिशनल प्रायव्हेट सेक्रेटरी श्री. विश्वनाथ वर्मा यांचे डॉ. खरे यांना पत्र २०६, इंडियन कौन्सील फॉर कल्चरल रिलेशन्सच्या लायब्रेरियन मिसेस बी. मित्तर यांचे श्री. जगन्नाथ रामचंद्र जोशी, असि. एडिटर, महाराष्ट्र, नागपूर, यांना पत्र २०७, जोशीबुवांनी जपून ठेवलेली माझी पत्रे २०७, Khare replies to Gracias : Niyogi report on Missionary Work २१५, Gracias' views २१६, तीन पत्रे दिल्लीच्या नॅशनल अर्काइव्हज् खात्यात दाखल २१७, अखेर मीच खरा ठरलो २१८, माझा विजय झाला : आता विराम घेतो २१८.

**प्रकरण १० : काकासाहेब व पुतण्या** **पृष्ठे : २१८ ते २३२**

डॉ. खरे यांनी केलेला रहस्यस्फोट : खडकवासला सैनिक विद्यालय, डॉ. खरे यांचे श्रेय उपटण्याचा काका गाडगिळांचा डाव २२५, हे पंजाबी हे मराठे २२६, ज्यांनी मोगलांचा उच्छेद केला ते बिनलढाऊ २२७, मुंबई सरकारची अनास्था २२८, केसरीतील लेख २२८, पण मी खोटा ठरतो २२९, हा कट तर नाही ? २२९, श्री केसकरांचे स्पष्टीकरण २३०, खडकवासला सैनिकी विद्यापीठ अधिकृत स्पष्टीकरण २३१, जोशीबुवांवर असत्य लिखाणाचा कलंक लागला नाही २३२.

---

# खरे दर्शन : खंड दुसरा

# निंदकांना जमालगोटा

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 93.796

### प्रकरण १ ले

## १. "अनसूयाबाई काळे आणि मी" ची चीरफाड

श्री. पुरुषोत्तम बाळकृष्ण काळे यांनी लिहिलेल्या 'अनसूयाबाई काळे आणि मी' या दंपतीचरित्राचे नागपुरात जुलै १९६२ मध्ये प्रकाशन झाले. या प्रकाशनसमारंभाला मी निमंत्रणावरून उपस्थित होतो. यावेळी जी भाषणे झाली त्यात प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांनी केलेल्या भाषणात कै. नरकेसरी बॅ. अभ्यंकर आणि कै. अनसूयाबाई काळे यांच्या पुस्तकात वर्णिलेल्या चुंबन प्रकरणाचा ओझरता उल्लेख आला. तो ऐकल्याबरोबर माझ्या मनाला चांगलाच धक्का बसला. कारण अभ्यंकरांचा आणि माझा १९१८ पासून तो ता. २ जानेवारी १९३५ म्हणजे त्यांच्या दुःखद निधनापावेतो अगदी घनिष्ठ संबंध होता. ते माझे नातेवाईक, जीवश्च-कंठश्च मित्र, वकील, पेशंट व राजकीय नेते होते. ते नागपुरात असले म्हणजे त्यांची व माझी भेट झाली नाही असा बहुधा दिवस गेला नाही. त्यांच्याही मित्राशी व विरोधकाशी माझा दाट परिचय होता. त्यांच्याशी केलेल्या संभाषणातही अभ्यंकरांचे वर्तन अशा प्रकारच्या चुंबनाच्या वृत्तीचे होते असा प्रवाद कधी ऐकण्यात आला नाही.

### चुंबन प्रकरणाच्या तळाशी जावयाचे ठरविले

प्रकाशन समारंभ संपल्यानंतर मी घरी आलो तो माझ्या पाठोपाठ अभ्यंकरांची कन्या कुमारी सरोजिनी ही माझ्या घरी आली आणि तिने साश्रु नयनांनी, प्रा. कोलते यांच्या भाषणात आपल्या पूज्य पित्याच्या चुंबनाचा जो उल्लेख झाला त्याबद्दल खेद व रोष प्रदर्शित केला. मलाहि प्रा. कोलतेंचे भाषण खटकतच होते. कारण अभ्यंकर यांचे चारित्र्य निर्लेप होते याबद्दल माझी खात्री होती. म्हणून 'अनसूयाबाई काळे आणि मी' हे पुस्तक समग्र काळजीपूर्वक वाचून या चुंबनप्रकर-

णाच्या तळाशी जावयाचे असे मी ठरविले. थोड्याच दिवसात ते दंपती–चरित्र श्री. पु. बा. काळे यांनी डॉ. खरे दंपतीला सप्रेम भेट म्हणून पाठविले. ते मी वाचले. त्यात पान १०४ व १०५ वर पुढील मजकूर आहे.

> "१९३४ च्या डिसेंबर महिन्यात आम्हा उभयतात (श्री. व सौ. काळे) एक अत्यंत नाजुक गोष्ट घडली. नरकेसरी अभ्यंकर त्यावेळी फार आजारी होते. तो त्यांचा शेवटचाच आजार. ते अगदी अंथरुणाला खिळले होते. मधुमेहाच्या व्रणाचे (गॅंगरिनचे) ऑपरेशन करण्याकरिता त्यांना मुंबईला न्यावयाचे ठरले.…अभ्यंकरांची दृष्टि बाईवर (अनसूयाबाईंवर) स्थिर झाली. माझ्या मनात चटकन असा विचार येऊन गेला की, या माणसाचा (अभ्यंकरांचा) आत्मा घुटमळतो आहे. त्याला शांत करण्याचे माझ्या हातात आहे.…मी बाईंना बाहेर बोलावले आणि सांगितले, '**अभ्यंकरांचा आत्मा तुझ्याकरिता घुटमळतो आहे. त्यांना शांत मृत्यू यावा म्हणून तू त्यांना एक मुका दे.**' (जाड ठसा माझा) बाई उत्तरल्या, 'ते तसे नाही. मी त्यांची निराशा केली. त्यांच्या म्हणण्यानुसार मी पूर्णत्वाने राजकारणात पडले नाही व आपल्या मागे नागपूरच्या राजकारणात पूर्ण अंधार आहे, असा विचार आल्यामुळे त्यांना वाईट वाटत आहे."

आपल्या स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल केवढी घमेंड ! आणि अभ्यंकरांच्या इतर सहकाऱ्यांबद्दल केवढी तुच्छता !

## साहेबापुढे सल्लागार निष्प्रभ ठरले

या पुस्तकात श्री काळे यांनी लिहिलेल्या 'माझी भूमिका' पान बत्तीसवरून असे दिसते की, श्री माडखोलकर यांनी हा 'मुक्याचा मजकूर' पुस्तकात देऊ नये अशी सूचना केली व पटवर्धन यांनीहि माडखोलकरांच्या या सूचनेला आपली संमती दर्शविली. माडखोलकरांनी अशी भीती व्यक्त केली की, हा मुक्याचा मजकूर जर पुस्तकात दिला तर अभ्यंकर आणि बाई ह्या दोघांविषयी गैरसमज उत्पन्न होईल. माडखोलकरांच्या आणि त्यांच्या हाताला हात लावणारे 'ज्येष्ठ आणि श्रेष्ठ' सहकारी श्री पटवर्धन यांच्या आक्षेपाला श्री काळे यांनी जे उत्तर दिले, ते त्यांच्याच शब्दात पान बत्तीसवरून येथे उद्धृत करतो.

> "कोणाचाही गैरसमज व्हावा किंवा कोणालाही अन्याय व्हावा, अशी मला इच्छा नाही. अभ्यंकरांच्या आजारातील नाजुक घटने-बद्दल मला येवढेच सांगावयाचे आहे की, तो विचार माझ्या मनात आला असे मी स्पष्ट म्हटलेले आहे; अभ्यंकरांच्या किंवा बाईंच्या

मनात तो आला, असे मी मुळीच म्हटलेले नाही. माझी संस्कृती आणि विचारांची दिशा ही पाश्चिमात्य वळणाची आहे. आसन्नमरण माणसाची इच्छा तृप्त करणे, हे पवित्र कर्तव्य मानलेले आहे; व म्हणूनच फाशी जाणाऱ्याची इच्छा सुद्धा मुद्दाम त्याला विचारून तृप्त केली जाते. अभ्यंकरांच्या आजारातील तो प्रसंग अतिशय गंभीर होता. **मुका देण्यात कोठलेही पाप नाही."** (जाड ठसा माझा)

## काळ्यांची शेखी फोल आहे

श्री काळे यांचे हे म्हणणे चुकीचे आहे. चुंबन हे रतिक्रीडेची पहिली पायरी आहे हे स्पष्ट आहे. संस्कृतमध्ये 'रतेः किमादौ कुरुते मनुष्यः। चुंबति ॥' असे सुभाषित प्रसिद्ध आहे. आणि इंग्रजीमध्येही 'Kissing is a question put to the upper story, whether the lower is to let' अशी चुंबनाची व्याख्या आहे. म्हणून एखाद्या प्रौढ विवाहित पुरुषाने एखाद्या प्रौढ विवाहित स्त्रीचे चुंबन घेणे हे पापातच जमा होते. श्री काळे हे त्यांची स्वतःची संस्कृति पाश्चिमात्य वळणाची आहे, अशी शेखी मिरवतात. ही त्यांची शेखी फोल आहे. पाश्चिमात्य समाजामध्येही अशा विवाहबाह्य प्रणयचेष्टितांना निंद्यच मानले जाते, हे इंग्लंडांत युद्धमंत्री मि. प्रोफ्युमो व कुमारी क्रिस्टिन कीलर यांच्या विवाहबाह्य प्रणयचेष्टितामुळे केवढे वादळ उठले यावरून सिद्ध होते. काळे असेही म्हणतात की, फाशी जाणाऱ्याची इच्छासुद्धा मुद्दाम त्याला विचारून तृप्त करण्याचा प्रयत्न केला जातो. पण ती इच्छा योग्य असेल व नीतिबाह्य नसेल तरच; हे सांगायला काळेसाहेब विसरले. समजा, एखाद्या फाशी जाणाऱ्या बंदीवानाने फाशी जाण्यापूर्वी दुसऱ्या एखाद्या माणसाच्या पत्नीशी 'सोबत' करण्याची इच्छा व्यक्त केली, तर ती पूर्ण करण्यात येईल काय? किंवा ही इच्छा तृप्त करणे हे पवित्र कर्तव्य मानले जाईल काय? अर्थात् नाही.

## काळ्यांच्या हिडीस लिखाणाला माडखोलकरांचा पाठिंबा

म्हणून श्री काळे यांनी तो 'मुक्याचा मजकूर' आपल्या पुस्तकात घालून अभ्यंकरांच्या दिवंगत आत्म्यावर भयंकर अन्याय केला आहे. कारण हा मजकूर वाचून जनमनांत असे किल्मिष निर्माण होते की, आसन्नमरण असताना जर अभ्यंकरांच्या चेहऱ्यावर काळे साहेबांना परस्त्रीच्या (त्यांच्या पत्नीच्या) चुंबनाची अभिलाषा दिसून आली, तर तगडया स्थितीत अभ्यंकरांनी काय काय केले नसेल? या किल्मिषाचे निराकरण करण्यास अभ्यंकर हयात नाहीत. म्हणून काळ्यांचे हे लिखाण अत्यंत हिडीस आणि भ्याडपणाचे आहे. सुदैवाने पान तेहतीसवर 'माझ्या सूचनेमुळे कोणाच्या नालस्तीला जर सवड मिळत असेल, तर ती फक्त माझ्याच,'

असे लिहून अपराधाची त्यांनी कबुली दिली आहे. यासाठी मी त्यांना धन्यवाद देऊन अपराध त्यांच्या पदरात घालतो. याच पानावर काळ्यांनी असेही म्हटले आहे की, माडखोलकरांनी घेतलेल्या आक्षेपाला दिलेले उत्तर जरी त्यांना पटले असे दिसले नाही, तरी त्यांनी ती चुंबनाची घटना गाळण्याचा आग्रह नंतर मला केला नाही. यावरून ती घटना पुस्तकात घालण्यास माडखोलकरांचाहि नैतिक पाठिंबा होता असे म्हटले तर चूक होईल काय ?

## काळे महाशयाचे लोकविलक्षण विधान

याच संदर्भात पान ७० वर काळ्यांनी दुसरे एक विधान केले आहे. ते असे.

"बाईंचे मन परपुरुषावर अथवा माझे मन परस्त्रीवर कधीच गेले नसेल, असे मी म्हणू शकत नाही. पण त्यात लैंगिक वासना नव्हती."

हे काळ्यांचे विधान मोठे विलक्षण आहे. कारण परस्त्रीवर किंवा परपुरुषावर मन गेले की, त्यांत लैंगिक वासना आलीच.

## ठेकेदार काळे व कोषाध्यक्ष बॅ. अभ्यंकर यांचे संबंध

काळ्यांचे हे पुस्तक वाचून असे दिसून येते की, त्यांचे आणि बॅरि. अभ्यंकरांचे संबंध बहुधा कधीच चांगले नव्हते. १९२० साली नागपुरात झालेल्या कांग्रेस अधिवेशनामध्ये काळ्यांकडे वीज पुरविण्याच्या ठेकेदाराचे काम होते. त्याबद्दल पान ६३ वर आपल्या पुस्तकांत काळे म्हणतात.

"कांग्रेस सेशनमध्ये ठेकेदारी केल्यामुळे माझा अनेक सार्वजनिक कार्यकर्त्यांशी जवळून संबंध आला. त्यात बरेवाईट असणारच. मला कँपात वीज नीट पुरवता आली नाही त्याबद्दल मी किती जबाबदार होतो व रिसेप्शन कमिटी किती जबाबदार होती, याबद्दल वाद सुरू झाला. नरकेसरी मोरूभाऊ अभ्यंकरांचा व माझा संबंध या वादातच पहिल्यांदा आला. अभ्यंकरांकडे पैसे देणे होते. पण, माझे काम नीट झाले नाही या सबबीवर ते मला पैसे देण्यास तयार नव्हते. पाणी, जागा वगैरे गोष्टींची तरतूद वेळेवर झाली नाही व म्हणून नवीन एंजिनची ट्रायल वगैरे घेण्यास फुरसतच मिळाली नाही, असे मी म्हणत होतो. वादविवाद संपेना. श्री. माणिकशा मेहता, मॅनेजर ( हे त्यावेळी पॉवर कंपनीचे मॅनेजर होते व अभ्यंकरांचे जानी दोस्त होते ) यांचेकडून माझी केस मी अभ्यंकरांना समजावून सांगितली, पण अभ्यंकर ऐकेनात. शेवटी मी अॅडव्होकेट शिवदासपंत बार्लिंगे

क्रमांक ........................ नों. दि. ..................

यांचेकडून (डॉ. बार्लिग्यांचे वडील) नोटीस देवविली. तेव्हा मोठ्या मिनतवारीने रुपयात बारा आणे मिळाले.

## घराच्या सौद्यापासूनच तेढ

या घटनेवरून किती कटुता निर्माण झाली असेल आणि ती किती काळ टिकली असेल याचा अंदाज करता येतो. ही गोष्ट १९२०-२१ मध्ये घडली. १९२५ मध्ये सौ. अनसूयाबाई काळे यांनी आपल्या पतीच्या मागे घर विकत घेण्याचा लकडा लावला. जे घर त्यांनी विकत घेण्याचे ठरविले त्या घरात अभ्यंकर भाड्याने राहत होते. या घराच्या सौद्यात काय काय काय भानगडी झाल्या त्याचा तपशील येथे देण्याची गरज नाही. त्याचा परिणाम काय झाला, तो त्यांच्या पुस्तकातील पान ६८ वरून त्यांच्याच शब्दात देतो. श्री काळे म्हणतात, 'कांग्रेसनंतर अभ्यंकरांचा आमचा संबंध आला, तो त्या घराच्या सौद्यामुळे आणि तोही भांडणाच्या स्वरूपात."

## हा अभ्यंकरांवर सूड तर नव्हे ?

यावरून असे दिसून येते की, १९२० मध्ये कटुता निर्माण झाली व १९२५-२६ मध्ये अभ्यंकर आणि काळे यांच्यामधील कटुतेला घराच्या सौद्यामुळे खतपाणी मिळाले. म्हणून पान ९६ वर काळे म्हणतात की, 'अभ्यंकर एक 'बुली' आहेत असेच आमचे मत झाले होते.' 'बुली' हा शब्द इंग्रजी आहे. याचा मराठी अर्थ दमदाटी करणारा असा होतो. म्हणून श्री काळे यांना अभ्यंकरांच्या या तथाकथित 'बुली'पणाचा प्रसाद कधीकाळी मिळाला असल्यास त्याचा वचपा काढण्यासाठी काळ्यांनी आपल्या पुस्तकात 'तो मुक्याचा मजकूर' घातला असल्यास नकळे !

## काळ्यांची खोटी, विपरीत व विपर्यस्त विधाने

या पुस्तकात माझ्याबद्दलही अत्यंत खोटी, विपरीत आणि विपर्यस्त विधाने केली आहेत. जाफर हुसेन प्रकरणाबद्दलचे विधान तर भयंकर खोटे आहे व मला वाटते ते केवळ मला नामोहरम करण्यासाठी मुद्दाम करण्यात आले आहे. पान १०८ वर काळे म्हणतात, "जाफरहुसेन हा शिक्षणाधिकारी होता. त्याने वर्ध्यांच्या एका महार बालिकेवर बलात्कार केल्यावरून त्याला शिक्षा झाली होती. मंत्र्यांच्या दोन्ही गटांनी (म्हणजे खरे, गोळे, रामराव व शुक्ल, मिश्र, मेहता या सर्वांनी) शरीफ साहेबांना (म्हणजे कायदामंत्री यांना) जाफरहुसेनला मुदतीपूर्वीच बंधमुक्त करण्यास संमती दिली होती. डॉ. खऱ्यांनीही शरीफसाहेबांना जाफरहुसेनला सोडून देण्यास मान्यता दिली....... ..या प्रकरणामुळे जनतेत खूप

असंतोष वाढला; चिटणीस पार्कांत झालेल्या प्रचंड जाहीर सभेत मुख्य मंत्री डॉ. खरे, गृहमंत्री पं. मिश्रा ( काळ्यांचे हे विधान चूक आहे. पं. मिश्रा स्थानिक स्वराज्य मंत्री होते. यावेळी गृहमंत्रीही मीच होतो.), ॲडव्होकेट केदार यांच्यावर जोड्यांचा अक्षरशः पाऊस पडला. नागपूरच्या जनतेने न्यायप्रियता दाखविली. सभा उधळली गेली आणि मंत्रिद्वयांना तोंड हिरमुसले करून सभेतून पळ काढावा लागला. या सभेला बाईंच्याबरोबर मी हजर होतो. मी ते सर्व दृश्य प्रत्यक्ष पाहिले आहे." काळे जर खरोखरीच या सभेला हजर असतील तर असे म्हणावे लागेल की, यावेळेस त्याचे कान, डोळे आणि डोके यांनी त्यांस दगा दिला होता. किंवा माझ्या विरुद्धच्या आकसाने त्यांनी कदाचित कोणाच्या तरी सांगीवांगीवरून असे विधान केले असावे. या माझ्या विधानाच्या समर्थनार्थ 'महाराष्ट्र' पत्राच्या बुधवार ता. ३० मार्च सन १९३८ च्या अंकातील या शरीफ प्रकरणाबद्दल झालेल्या चिटणीस पार्कातील जाहीर सभेचा साद्यंत वृत्तान्त मुद्दाम मी येथे देतो. यावरून काळे किती खोटे आहेत याची प्रचीती वाचकांना येईल.

## जाफर हुसेन प्रकरणाची जाहीर सभा

### सभेत दंगल व गोटेफेक : पण कांग्रेसने सभा पार पाडली !

### ना. शरीफ यांची कांग्रेसपक्षाकडे दिलगिरी आणि राजिनामा

गेल्या रविवारी सायं. ६॥ वा. चिटणीस पार्कात नगर कांग्रेस कमिटीतर्फे नगराध्यक्ष श्री. ढवळे यांचे अध्यक्षतेखाली जाफर हुसेन प्रकरणाबाबत नागरिकांची प्रचंड जाहीर सभा भरली होती. या सभेत मंत्रिमंडळ जाफर हुसेनच्या सुटकेबाबत खुलासा करणार असल्या-मुळे सभेला अतोनात गर्दी झाली होती. असेंब्लीवरील स्त्रियांचा मोर्चा व मुख्यप्रधान ना. डॉ. खरे यांच्याबद्दल रविवारच्या महाराष्ट्रात ज्या स्त्रियांनी एक पत्रक काढून खुलासा केला होता त्याच स्त्रियांनी एक पत्रक काढून आजच्या सभेला स्त्रियांनी हजर राहू नये असे जाहीर केल्यामुळे सभेत स्त्रियांची उपस्थिती विशेष प्रमाणात नव्हती. व्यास-पीठावर ना. डॉ. खरे, ना. मिश्रा, ना. शरीफ, ना. शुक्ला, ना. गोळे हे मंत्री व श्री. रामप्रसाद तिवारी, श्री. केदार, श्री. जकातदार वगैरे प्रमुख पुढारी बसले होते.

#### अध्यक्षांचे प्रास्ताविक भाषण

आपल्या प्रास्ताविक भाषणात अध्यक्ष म्हणाले, "ज्या कारणाकरिता आजची ही सभा बोलावण्यात आली आहे, ते कारण

सार्वजनिक महत्वाचे असून त्यासंबंधी मंत्रिमंडळाचे म्हणणें जनतेला कळविण्याकरिताच मुद्दाम ही सभा बोलावण्यात आली आहे. आतापर्यंत जाफरहुसेन प्रकरणावर अनेक सभांतून व वर्तमानपत्रांतून बरीच चर्चा झाली असून लोकांची मने संतप्त झाली आहेत. तेव्हा या प्रश्नाचा शांतपणे विचार व्हावा अशी अपेक्षा असणे अपरिहार्य आहे. या प्रश्नासंबंधाने कांग्रेस मंत्र्यांनी जे धोरण स्वीकारले ते ग्राह्य आहे अगर अग्राह्य आहे हे ठरविणे हा आपला प्रश्न आहे. पण मंत्र्यांवर लोक जे आरोप करतात त्यांना उत्तर देण्याचे कांग्रेस दिवाणांनी ठरविले आहे. तेव्हा त्यांचेम्हणणे आपण शांत चित्ताने ऐकून घ्यावे, अशी माझी आपणाला सविनय प्रार्थना आहे. विरोधी पक्षालाही आपली बाजू सभेपुढे मांडण्याची संधी अवश्य देण्यात येईल. पण अर्थातच त्यांच्या भाषणांना काही मर्यादा ठेवावी लागेल.

## हे पोलिस कशासाठी ?

इतक्यात एक गृहस्थ उभे राहून त्यांनी अध्यक्षांना असे विचारले की, "आज या सभेला हे जे इतके पोलिस हजर आहेत ते काय कांग्रेसचे स्वयंसेवक आहेत ? " त्यावर अध्यक्षांनी असा खुलासा केला की, " हे जे पोलिस येथे हजर आहेत त्यांना आम्ही बोलावले नाही. आमच्या कांग्रेस स्वयंसेवक दलाचे स्वयंसेवक तुमच्या समोरच सभेचे नियंत्रण करीत असल्याचे तुम्ही पहाता आहाच." दुसऱ्या एका गृहस्थाने "प्रश्न विचारता येतील काय ?" असे विचारले असता अध्यक्ष म्हणाले, "वक्त्याचे भाषण चालू असता कोणालाही प्रश्न विचारता येणार नाहीत. त्यांचे भाषण संपल्यावर प्रश्न विचारता येतील; पण त्यापूर्वी प्रश्न विचारणाराने आपले प्रश्न लेखी माझ्याकडे पाठविले पाहिजेत व नंतर मग कोणते प्रश्न विचारू द्यावयाचे याचा अखेरचा निर्णय मी ठरवीन." अशा तऱ्हेचा खुलासा करून नंतर अध्यक्षांनी कांग्रेस मंत्र्यांची बाजू मांडण्याकरिता श्री. केदार यांना प्रथम बोलण्याची विनंती केली.

## श्री केदार यांचे भाषण

श्री. केदार आपल्या भाषणांत म्हणाले, "अत्यंत खुनी माणसाला देखील आपली बाजू मांडण्याची कोर्टात परवानगी मिळते. मग, ना. शरीफ व मंत्रीमंडळ यांना त्यांची बाजू तुमचे समोर मांडण्याची तुम्ही परवानगी देणार नाही काय ? " ('हो, हो' चे

आवाज) आम्हाला दोषी ठरविण्याच्या अगोदर तुम्ही आमची बाजू आम्हाला आपले समोर मांडू द्या.

## मंत्र्यांचे नीतिधैर्य

"जाफर हुसेनच्या प्रकरणाने उडालेल्या प्रचंड खळबळीबद्दल थोडे उशीरा कां होईना पण आमचे कांग्रेसमंत्री जनतेसमोर आपली बाजू मांडण्याकरिता आज आले आहेत. हे त्यांना भूषणावह आहे. (टाळ्या) कांग्रेस मंत्र्यांनी हे नीतिधैर्य दाखविल्याबद्दल त्यांना तुम्ही धन्यवाद दिले पाहिजेत. (टाळ्यांचा प्रचंड कडकडाट) गेल्या १७ वर्षांत प्रांतातून कोणत्याही मंत्रीमंडळाची जनतेसमोर येऊन आपल्या चुक्यांचे परिमार्जन करून घेण्याची छाती झाली नाही. जाफर हुसेन दोषी होता हे निर्विवाद आहे. या जाफर हुसेनच्या प्रकरणाकडे जेव्हा आपण पाहातो तेव्हा सामाजिक व कायदेशीर अशा दोनही दृष्टींनी त्याचा विचार करतो.

## ना० शरीफ यांनी चूक केली

"जाफरला सोडण्यात न्यायमंत्री ना. शरीफ यांनी चूक केली हे खास. समाजाची घडी नीट ठेवण्याचे काम पुढाऱ्यांनी मोठ्या दक्षतेने पार पाडले पाहिजे. तेव्हा, भयंकर गुन्हा करणाऱ्या जाफरला मुक्त करण्यात ना. शरीफ यांनी मोठीच चूक केली व त्याबद्दल ते दोषी आहेत. आता कानुनी दृष्टीनेसुद्धा ना. शरीफ यांनी हे कृत्य बरोबर केले काय हे पाहिले पाहिजे. तसे म्हणाल तर कायद्याच्या दृष्टीने ना. शरीफ यांची जाफरला सोडण्यात काहीही चूक नाही. पण नुसत्या कायद्याने काम भागत नाही. त्याने माणुसकीही पाहिली पाहिजे. दयेच्या अर्जाने अपराध्याला सोडण्याचा हक्क राजाला व मंत्र्याला असतो. जाफरला मनुष्यापेक्षा देवानेच भयंकर शिक्षा दिली आहे.

## सभेत गोंधळाला प्रारंभ

कोणत्याही अपराध्याला मंत्री सोडून देतो, त्यावेळी न्याया-लयात ज्या गोष्टी पुढे आल्या नाहीत त्यांचाही विचार, दयेचा अर्ज करणाऱ्या कैद्याला सोडण्याच्या वेळेला राजाला व मंत्र्याला करावा लागतो व तसा त्यांना अधिकारही आहे. (या वेळेला डॉ. रामदास

परांजपे, काटे, जगन्नाथप्रसाद वर्मा वगैरे मंडळी उठून उभी राहिली व त्यांनी 'ही रेप केस आहे' 'ही रेप केस आहे' असा गिल्ला सुरू केला. तेव्हा श्री केदार म्हणाले, दयेचा अर्ज करणाऱ्या अपराध्यास 'रेप केस' हा अपवाद होऊ शकत नाही. यावर काही लोकांनी उपरोधिक आवाज काढले, तेव्हा केदार म्हणाले, तुम्ही आज न्यायाधीश आहात व न्यायाधीशाने निर्णय देण्याच्या मनस्थितीत राहिले पाहिजे. तुम्ही असा गोंधळ केल्यास निर्णय कसा देणार ? कायदेशीर दृष्टीने जेव्हा मी या प्रकरणाकडे पाहतो तेव्हा मला असे दिसते की, जाफरला सोडण्यात ना. शरीफने चूक केली नाही. प्रश्न एवढाच उरतो की, शरीफ साहेबांनी जाफरला सोडते वेळी इतर सहकारी मंत्र्यांचा सल्ला घेतला होता काय ? घेतला नसल्यास का घेतला नाही ? ४०१ कलमान्वये न्याय खात्याच्या मंत्र्याला आपल्या खात्यातील प्रश्नाबद्दल इतर सहकाऱ्यांचा सल्ला घेतलाच पाहिजे असे काही बंधन नाही. या सुमारास सभेत काही लोकांनी पुन्हा गडबड सुरू करून 'ही रेप केस आहे.' असा गिल्ला सुरू केला. तेव्हा श्री केदार म्हणाले, मला माहीत आहे. मागे एका गोंडाच्या मुलीची रेप केस झाली होती व त्या केसमध्ये येथील एका प्रमुख वकीलाच्या मुलाचे अंग होते, तेव्हा हिंदुसभा कोठे गेली होती ? "

## सभेत भयंकर गोंधळ

या वेळी डॉ० रामदास परांजपे, श्री. वर्मा, काटे, ॲ. म. भा. जोशी वगैरे लोकांनी 'त्याला कोर्टाने निर्दोषी ठरविले' असे आवाज काढून "केदारसाहेब आपले शब्द परत घ्या" असा एकसारखा गिल्ला सुरू केला; व सभेत बराच गोंधळ सुरू झाला. तेव्हा अध्यक्ष श्री. ढवळे यांनी लोकांना शांत राखण्याचा आटोकाट प्रयत्न केला. ते म्हणाले, "ना. मंत्र्यांचे म्हणणे ऐकून न घेताच ही सभा उधळून लावण्याचा काही लोकांचा पूर्व संकेत ठरलेला असावा असे मला वाटते, मी यापूर्वीच विरोधी पक्षाला आपली बाजू सभेपुढे मांडण्याची संधी देण्याचे कबूल केले असता अशा तऱ्हेचा गोंधळ करण्यात काय अर्थ आहे ?" तरी पण काही लोकांनी गिल्ला करून आपले शब्द परत घ्या अशी केदारांना सारखी निकड लावली. तेव्हा 'मात्रा झोंबली काय' असा एक आवाज सभेतून आला. अध्यक्षांनी डॉ. रामदास परांजपे यांना खाली बसण्यास सांगितले, तेव्हा 'केदारांनी आपले विधान मागे घेतल्याशिवाय मी खाली बसणार नाही' असे ते म्हणाले.

## दगड, जोडे व धूळ यांचा वर्षाव

सभेत गोंधळ वाढून मारामारी, दगडफेक, धूळ उडविणे, काठ्यांनी एकमेकांना मारणे, चप्पल जोडे फेकणे याचा सुळसुळाट सुरू आला. दगड, जोडे मंत्रीमंडळ बसलेल्या व्यासपीठाच्या रोखाने फेकल्या जात होते. काठ्यांचा उपयोग करणाऱ्या लोकांजवळून इतर काही लोकांनी काठ्या हिसकावून घेऊन त्या व्यासपीठावर अध्यक्षांच्या स्वाधीन केल्या. अशा सुमारे १५–२० काठ्या, काही जोडे व दगड व्यासपीठावर गोळा झाले होते. सभेत दगडफेक सुरू असल्यामुळे व धक्काबुक्की चालू असल्यामुळे ५–६ इसमास बराच मार बसून जखमाही झाल्या. लगेच या जखमी इसमांना सभेबाहेर काढण्यात आले.

व्यासपीठावरून अध्यक्ष व मंत्री लोकांना हात जोडून शांत राहण्याची एकसारखी विनंती करीत होते; परंतु त्यांच्या विनंतीला न जुमानता उलट त्यांच्यावर धूळ व दगडही फेकण्यात येत होते. या दगडफेकीने व्यासपीठावरही मायक्रोफोन फुटण्याचा संभव दिसताच तो डिसकनेक्ट करण्यात आला. हॉर्नला लावलेल्या तारा या दंगलीत तुटल्याच !

## पोलिसांना बाहेर काढले

सभेच्या बाहेरच्या बाजूला काळे व खाकी डगलेवाले बरेच पोलिस हजर होते. सभेतला हा गोंधळ पाहून एक सार्जंट व काही पोलिस आत आले. सिटी मॅजि. व सिटी पो. सुपरिं. हेही हजर होते. अध्यक्षांनी लगेच सिटी मॅजि. ला पोलिस सभेतून काढून घेण्यास सांगून सभेचे आपण पाहून घेऊ असे सांगितले. त्यानंतर पोलिस सभेबाहेर झाले; व कांग्रेस स्वयंसेवकांनी सभेत शांतता प्रस्थापण्याचा प्रयत्न सुरू केला. सुमारे तास दीड तास सभेत दंगामस्ती, किरकोळ मारामाऱ्या व वरील गोंधळ चालू होता त्या गोंधळात "लाऊड स्पीकर्स बंद पडल्यामुळे आपण सभा बरखास्त करतो" असे अध्यक्षांनी जाहीर केले. पण लोक परत जाईनात. अखेर स्वयंसेवकांनी व्यासपीठाभोवतालच्या लोकांना प्रथम बसवून नंतर इतर लोकांनाही खाली बसविले; व दंगा करणाऱ्यापैकी काहींना सभेबाहेर काढून लावले. लोक बसू लागल्यावर लाला अर्जुनसिंग यांनी भाषणास प्रारंभ केला. त्यांनी रामायणातील काही दोहेही म्हटले. ना. डॉ. खरे, ना. मिश्रा, श्री. कलप्पा व इतर मंडळीही लोकांना शांत करीत होतीच. अखेर सभा सुरू करण्याइतकी

शांतता स्थापन झालयावर अध्यक्षांनी ना. डॉ. खरे यांना भाषण करण्याची विनंती केली.

## ना. डॉ. खरे यांचे भाषण

ना. डॉ. खरे नंतर टाळ्यांच्या गजरात भाषण करावयास उठले. ते म्हणाले, " जनतेने मला विश्वासात घ्यावे. मी जनतेचा नम्र सेवक आहे. परवाच्या असेंब्लीवर आलेल्या स्त्रियांच्या मोर्चासंबंधी वर्तमानपत्रात आलेली माहिती एकतर्फी आहे. असेंब्लीत जेव्हा मेळा आला तेव्हा असेंब्लीगृहात महत्त्वाचे काम सुरू होते. काही लोक असेंब्लीच्या व्हरांड्यात येऊन गडबड करू लागले होते. असेंब्ली गृहावर आमचा अधिकार नसून तेथे अध्यक्षांचा चालतो. सरकारचासुद्धा तेथे अधिकार चालत नाही. स्त्रियांच्या शिष्टमंडळाला मी लगेच भेट दिली व माझे काम लवकरच संपेल, तोवर थांबा असे सांगितले. असेंब्ली गृहात त्या वेळी काही महत्त्वाची बिले चालू होती व ती माझीच होती. अशा वेळी ती बिले सोडून मी असेंब्ली गृहाबाहेर कसा राहू शकतो बरे ! " (नाही नाहीचे आवाज).

## ना. शरीफ यांची माफी व राजिनामा

ना. शरीफबद्दल म्हणाल तर त्याने जाफर हुसेनच्या प्रकरणाबद्दल अंतःकरणपूर्वक दिलगिरी प्रदर्शित केली असून शिवाय त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामाही पण आमच्या पक्षापुढे सादर केला आहे. आमच्या अगोदरच्या मंत्रिमंडळांनी १९३३ सालापासून १९३७ च्या जुलैपर्यंत, ज्या ४०१ कलमाचा दुरुपयोग केल्याचा आमचेवर आरोप करण्यात येतो त्याचा एक तक्ताच मी तुम्हाला वाचून दाखवितो. असे म्हणून त्यांनी १९३३ पासून १९३७ पर्यंत निरनिराळ्या फौजदारी गुन्ह्याच्या कित्येक अपराध्यास पूर्वीच्या मंत्रिमंडळाने सोडून दिल्याची माहिती सांगितली. या माहितीत कित्येक गुन्हेगार खुनाच्या, जाळपोळीच्या, घरफोडीच्या, मुली पळवून नेण्याच्या, खोटी नाणी तयार करण्याच्या, चोरीच्या व रेप केसच्या अपराधांचे गुन्हे होते.

## यापुढे खबरदारी घेऊ

श्री. डॉ. खरे यांनी हा तक्ता वाचून दाखविण्यास प्रारंभ केला; तेव्हा काही विरोधकांनी, " हे अप्रस्तुत आहे " अशी ओरड सुरू केली; पण त्यांना इतर लोकांनी गप्प केले. ना. डॉ. खरे पुढे म्हणाले,

"सोडलेल्या गुन्हेगारांचे ह आकडे देऊन मी आमचे समर्थन करीत नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, न्यायाधिशांना न्यायालयात कायदा पाळावा लागतो, व त्याबरहुकूमच त्याला वागावे लागते. मंत्र्याला इतर गोष्टींचाही विचार करावा लागतो. तरी पण ४०१ कलमाचा आपल्याकडून दुरुपयोग केला जाऊ नये म्हणून न्यायखात्याचा एकटा मंत्रीच त्याचा आपल्या अधिकारात यापुढे निर्णय लावणार नाही. तर त्या कलमाचा विचार संबंध कॅबिनेट करील अशी आता आम्ही नवीन योजना केली आहे. (टाळ्या व हिअर हिअरचे आवाज) मग बोला इतकं आम्ही समर्थन केल्यावर तुम्ही शरीफसाहेबांना क्षमा करणार नाही काय ?" (यावेळी सभेतून 'हो, हो,' 'नाही, नाही' चे आवाज) इतके बोलून ना. डॉ. खरे यांनी आपले भाषण संपविले; व ना. मिश्रा हे बोलावयास उठले.

## ना० मिश्रा यांचे भाषण

आपल्या भाषणांत ना. मिश्रा म्हणाले, "नागपूरचे लोक आपल्या मंत्र्यावर देखरेख ठेवू चाहतात हे पाहून मला अत्यंत आनंद होतो. आजच्या सभेला अखिल भारतवर्षात महत्त्व आहे. शरीफसाहेबांच्या कृत्याबद्दल नागपूरचे २५–३० हजार लोक जमा होऊन विचार करतात हे पाहून मला मोठे समाधान होत आहे. मंत्री काय करतात व कसे वागतात हे तुम्ही डोळ्यात तेल घालून त्यांच्यावर सक्त नजर ठेवता हे फार चांगले आहे. आम्हीही आपले सेवक आहोत. आपली आज्ञा आम्हाला पाळलीच पाहिजे व ती आम्ही बरोबर पाळणार. विरोधी लोकांनाही आपली बाजू पुढे मांडण्याला सभाध्यक्षांनी परवानगी दिलीच आहे. ( डॉ. परांजपे यांना अनुलक्षून) ज्यांना तसे विरोधी भाषण करावयाचे असेल त्यांनी येथे आमचे जवळ व्यासपीठावर यावे अशी माझी त्यांना विनंती आहे." त्यानंतर डॉ. परांजपे व्यासपीठावर आले. ते येताच ना. शुक्ला, ना. शरीफ, ना. गोळे यांनी उठून त्यांचे स्वागत केले व ना. मिश्रा यांनी तर त्यांना आलिंगनच दिले. तेव्हा सभेतून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

डॉ० परांजपे व्यासपीठावर आल्यावर ना. मिश्रा यांनी लोकांना डॉ. साहेबांचे भाषण शांत चित्ताने ऐकण्याची विनंती केली. तद्वतच डॉ. परांजपे यांनीही लोकांना आपल्याला विरोधी भाषण करू देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे व लोकांनी दोन्ही पक्षांची भाषणे शांत चित्ताने ऐकून घ्यावीत, अशी विनंती केल्यावर ना. मिश्रा यांनी पुन्हा आपले भाषण चालू केले. ते म्हणाले, "आपण आणि आम्ही गेली ५० वर्षे स्वराज्या-

साठी इंग्रजांशी लढत आहोत. आपल्या देशावर दुसऱ्या देशाने स्वारी केली तर आपण अशीच हुल्लडबाजी कराल काय ? जर ही सभा यापुढे मोडली गेली तर त्याचा दोष मी विरोधी लोकांवर ठेवीन. कांग्रेसचे मंत्रीमंडळ स्थापण्याच्या वेळी जसे लोकांचे आम्हाला पाठबळ होते तसा काही लोकांचा विरोधही होता. जाफरहुसेन प्रकरणाबद्दल आमच्यातील काही कांग्रेसवालेही आम्हाला विरोध करतील. तरी तुम्ही शांततेने विचार करूनच मग आपला निर्णय द्या.

## मतभेद कोठेच नाही !

जाफरच्या प्रकरणाबद्दल तुमच्यात व आमच्यात मतभेद नाही. जाफरने भयंकर पातक केले यात शंका नाही; व त्याबद्दल मतभेदही नाही. त्याला सोडण्यात गुन्हा झाला काय ?—हा दुसरा मुद्दा आहे. याचा आपणाला विचार करावयाचा आहे. जाफरला सोडल्याची बातमी आम्हाला उशीरा कळली. जाफरला शरीफसाहेबांनी आपल्या जिम्मेदारीवर सोडले हे शरीफसाहेब तुम्हाला स्वतःच सांगणार आहेत. गुन्ह्याचा पश्चात्ताप होऊन जाफरने दयेचा अर्ज केला व शरीफसाहेबांनी दया दाखवून त्याला सोडून दिले. त्यांनी त्याला सोडावयास नको होते, याबद्दलही मतभेद नाही. ह्या गुन्ह्याबद्दल ना. शरीफसाहेबांना काय प्रायश्चित्त द्यावयाचे हे आपल्याला ठरवावयाचे आहे. सर्व बाबतीत कांग्रेसची आज्ञा आम्ही अमलात आणू असे निवडणुकीच्या वेळी आम्ही आश्वासन दिले होते. व त्या करारावरच तुम्ही आम्हाला निवडून दिले. तेव्हा वर्कींग कमेटी शरीफसाहेबांना जे शासन करील ते शरीफसाहेब बिनदिक्कत पत्करतील. तुम्ही आपला निर्णय द्या व तो निर्णय आम्ही वर्कींग कमेटीस कळवू. जाफरला पुन्हा पकडणे शक्य नाही. साप गेल्यावर रेघोट्याला झोडपण्यात काय अर्थ आहे ? शरीफसाहेबांना या कृत्याचा पश्चात्ताप होवून त्यांनी माफी मागितली आहे; व राजिनामाही आमच्याजवळ दिला आहे. तेव्हा त्यांच्याबद्दल तुम्ही निर्णय द्या.

## 'माफी पुरेशी आहे !'

थोडेच दिवसापूर्वी शरीफसाहेब आपल्या कांग्रेसमध्ये सामील झाले आहेत. गेली २० वर्षे आम्ही कांग्रेसमध्ये आहोत व आता आम्ही थोडे बहूत रुळलो असून एकाएकी सहसा आमचे हातून अक्षम्य चूक होण्याचा फारसा संभव राहणार नाही. पण अगदी अलिकडेच कांग्रेसमध्ये सामील

झालेल्या शरीफसाहेबांच्या हातून थोडचाबहुत चुका होण्याचा थोडा तरी संभव आहेच. नागपूर ही वऱ्हाड–मध्यप्रांताची राजधानी आहे. तिची इज्जत ठेवणे तुमच्या नागपूरच्या लोकांच्या हाती आहे. हे कर्तव्य तुम्हाला नाकारता येणार नाही. तेव्हा अशा बिकट परिस्थितीत कांग्रेसची नाचक्की होण्याला तुम्ही हातभार लावणार काय ? (नाही, नाही) मग बोला तुम्ही शरीफसाहेबांचा राजीनामा चाहता की माफी ? " (माफी असे आवाज).

ज्यांना शरीफसाहेबांची माफी मंजूर असेल त्यांनी हात वर करावे असे ना. मिश्रा म्हणताच सभेतील बहुतेक लोकांनी हात वर केले. फारच थोडचा लोकांनी यावेळी हात वर केले नाहीत. नंतर ना. मिश्र यांनी " तर मग शरीफ साहेबांना आपण मनापासून माफी करता असे मी समजू काय ?" असे विचारले, तेव्हा सभेतून ' हो, हो 'चा प्रचंड आवाज आला. यानंतर अक्ष्यक्षांनी डॉ. परांजपे यांना आपले विरोधी भाषण सुरू करण्यास विनंती केली.

## डॉ० परांजपे यांचे भाषण

आपल्या भाषणात डॉ. परांजपे म्हणाले, " ना. तिवारींनी मला वचन दिले की, (यावेळी ना. मिश्र पुढे होऊन म्हणाले की, मी तिवारी नसून मिश्रा आहे) तुम्हाला बोलण्याची परवानगी देऊं, पण मला दु:ख वाटते की, त्यांनी माझे भाषण होण्याच्या अगोदरच सभेचा कौल घेतला. (" तुम्ही कौल ध्या " असे आवाज) पोलिसांच्या मदतीने विरोधी लोकांना सभेबाहेर घालवून देण्यात आले आहे. " (नाही, नाही असे आवाज) यावेळी अध्यक्ष श्री. ढवळे यांनी उठून सांगितले की " डॉ. परांजपे यांचे हे विधान खोटे आहे. पोलिसांच्या सहाय्याने विरोधी लोकांची हकालपट्टी केली गेली असे विधान करण्यांत डॉ. परांजपे जाणून बुजून खोटे बोलतात " पुढे डॉ. परांजपे यांनी परवाच्या असेंब्लीवर स्त्रियांचा मोर्चा गेला, तेव्हा ना. डॉ. खरे यांनी शिष्टमंडळाला ताबडतोब भेट दिली नाही असें सांगितले तेव्हा ना. डॉ. खरे यांनी हे विधान खोटे असल्याचे सांगितले. डॉ. परांजपे पुढे म्हणाले, " परक्याशी लढाईचा प्रसंग आला तर तुम्ही आम्ही एक असे ना. मिश्रा म्हणाले, त्यासंबंधी त्यांचे व आमचे एकमत आहे. मीही काँग्रेसला लढाईच्या वेळी मदत केली. "

## अनपेक्षित प्रकाराने सभा तहकूब

या वेळी सभेतून ' नाही, नाही ' असे आवाज आले व सभेत पुन्हा गोंधळ माजण्यास सुरुवात होऊन धक्काबुक्की सुरू झाली. तेव्हा सभा

पुन्हा पांगू लागली. कांग्रेस स्वयंसेवकांनी शांतता निर्माण करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तो साध्य झाला नाही. सभेत मारामारी सुरू झाली. इतक्यात सीताराम गायकवाड नावाचा एक हरिजन व्यासपीठाकडे जात होता. त्याच्याजवळ जंबिया दिसताच एका कांग्रेस स्वयंसेवकाने त्याला धरले व त्याच्याजवळ जंबिया आहे अशी ओरड केली. तेव्हा लगेच त्याला पोलिसांनी अटक केली. या प्रकारे सभेत फारच गोंधळ माजला. तेव्हा प्रक्षुब्ध वातावरणात विशेष हानिकारक प्रकार सभेत घडू नये म्हणून अध्यक्षांनी निरुपायास्तव सभा विसर्जन झाल्याचे जाहीर केले. अशा प्रकारे सुमारे ९॥ वाजताच्या सुमारास ही सभा विसर्जन पावली.

## काळे खरे की ' महाराष्ट्र ' पत्र खरे ?

वर प्रसिद्ध केलेल्या ' महाराष्ट्र ' पत्राच्या रिपोर्टावरून असे दिसून येईल की, व्यासपीठावर नामदार डॉ. खरे, ना. मिश्रा, ना. शरीफ, ना. शुक्ला, नामदार गोळे, हे मंत्री व श्रीरामप्रसाद तिवारी, श्री केदार, श्री जकातकार वगैरे पुढारी बसले होते. श्री काळे यांनी मंत्रिद्वय म्हणजे मी आणि मिश्रा सभेतून पळून गेले असे आपल्या पुस्तकात लिहिले आहे. पण दुसरे मंत्री म्हणजे स्वतः शरीफ, गोळे आणि शुक्ला यांचे काय झाले हे मात्र लिहिले नाही. ते काय हवेत उडून गेले होते ? ' महाराष्ट्रा 'चा रिपोर्ट तर असे म्हणतो की, सुमारे ९॥ वा. च्या सुमारास सभा विसर्जन पावली. म्हणजे तीन तास सभा चालली. याचा अर्थ असा की सभेत भाषणे झाली व कोणीही पळून गेले नाही. काळ्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी व पं. मिश्रा यांच्यासारखे जर सभेतून पळून गेले असते तर वर्तमानपत्रात ठळक शीर्षकाने ती गोष्ट प्रसिद्ध झाली असती. ' महाराष्ट्रा 'ने तर ही गोष्ट अवश्य केली असती. कारण त्यावेळी ते पत्र कांग्रेस पक्षाच्या विरोधी होते. याच ' महाराष्ट्र ' पत्राच्या वरील रिपोर्टात श्री. केदार यांनी म्हटले आहे की, " जाफरला सोडण्यात न्यायमंत्री ना. शरीफ यांनी चूक केली हे खास. समाजाची घडी नीट ठेवण्याचे काम पुढाऱ्यांनी मोठ्या दक्षतेने पार पाडले पाहिजे. तेव्हा, भयंकर गुन्हा करणाऱ्या जाफरला मुक्त करण्यात ना. शरीफ दोषी आहेत. " मी स्वतः आपल्या भाषणात असे म्हणालो की, " नामदार शरीफ यांनी जाफरहुसेन प्रकरणाबद्दल अंतःकरणपूर्वक दिलगिरी प्रगट केली असून आपल्या मंत्रिपदाचा राजिनामाही पक्षापुढे सादर केला आहे......तरीपण ४०१ कलमाचा आपल्याकडून दुरुपयोग केला जाऊ नये म्हणून न्यायखात्याचा एकटा मंत्रीच त्याचा आपल्या अधिकारात यापुढे निर्णय लावणार नाही. तर त्या कलमाचा विचार सबंध कॅबीनेट करील अशी आता आम्ही नवीन योजना केली आहे. " (कंसात टाळ्या व हियर हियरचे आवाज )

## खोटे आणि खोडसाळ विधान 'काळ्यांना'च शोभते

या माझ्या भाषणावरून 'जाफरहुसेनला मुदतीपूर्वीच बंधमुक्त करण्यास संमती दिली होती व मीही मान्यता दिली होती.' हे १०८ पानावर काळ्यांनी केलेले विधान खोटे ठरते. पं. मिश्रा आपल्या भाषणात म्हणाले, सर्व बाबतीत कांग्रेसची आज्ञा आम्ही अमलात आणू असे निवडणुकीच्या वेळी आम्ही आश्वासन दिले होते, व त्या करारावरच तुम्ही आम्हाला निवडून दिले. तेव्हा वर्किंग कमेटी शरीफसाहेबांना जे शासन करील ते शरीफसाहेब बिनदिक्कत पत्करतील. या आश्वासनाप्रमाणेच कांग्रेस श्रेष्ठींनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे काम बंगालचे माजी हायकोर्ट जज्ज सर मन्मथनाथ मुकर्जी यांच्याकडे सोपविले व त्यांच्या निर्णयानुसार अखेरीस ना. शरीफ यांस मंत्रिमंडळातून राजीनामा देऊन बाहेर पडावे लागले. १०८ पानावर काळ्यांनी म्हटल्याप्रमाणे जर सगळ्याच मंत्र्यांचे हात या शरीफ प्रकरणात बरवटले असते, तर सर्वांनाच राजीनामा द्यावा लागला असता. काळ्यांच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही जर सभेतून पळ काढला तर काळ्यांनी 'महाराष्ट्र'मधला साद्यंत वृत्तांत प्रसिद्ध झाल्यावर त्याचा जाहीर रीतीने प्रतिवाद का नाही केला ? घटना घडल्यावर २५ वर्षांनी असे खोटे आणि खोडसाळ विधान करणे हे 'काळ्यांना'च शोभते. 'महाराष्ट्र'त हा रिपोर्ट जेव्हा प्रसिद्ध झाला तेव्हा आजचे काळ्यांचे 'अनसूयाबाई काळे आणि मी' या पुस्तकाला प्रोत्साहन देणारे व जिवलग सल्लागार माडखोलकर हे 'महाराष्ट्र'चे प्रमुख सहसंपादक होते. म्हणून या पुस्तकात माझ्याविरुद्ध खोटा मजकूर येऊ देण्याची जबाबदारी अंशतः आणि अप्रत्यक्ष रीतीने त्यांच्यावरही पडते.

## शुद्ध लोणकढी थाप

पान १०७ वर काळे म्हणतात, "पं. मिश्रांना वचन देऊन डॉ. खऱ्यांनी मुख्यमंत्री होण्यापेक्षा पं. शुक्लांना पार्टी लीडर होऊ देणेच जास्त श्रेयस्कर, असे माझे मत मी बाईतर्फे डॉ. खऱ्यांना कळविले होते." पुन्हा पान १०८ वर काळे म्हणतात, "इतकेच नव्हे तर मी स्वतः डॉ. खऱ्यांना जबलपूरच्या सर्किट हौसमध्ये मुद्दाम भेटून या बाबतीत सावध केले होते." काळ्यांची ही दोन्ही विधाने सपशेल खोटी आहेत. ही विधाने करून काळ्यांनी आपल्या स्वतःकडे 'किंगमेकर'ची भूमिका घेतली आहे. ही भूमिका घेण्यासाठी काळ्यांची काय लायकी होती ? ते कधी राजकारणात पडले नाहीत, त्यांनी कोणतेही राजकीय कार्य केले नाही आणि त्यांना मी राजकारणात कधीच कौडीचीही किंमत दिली नाही. त्यांची पत्नी राजकारणात पडल्यामुळे त्यांच्यात जो अहगंड निर्माण झाला त्या अहंगंडाचा हाच आविष्कार आहे. पं. मिश्रांना मी कोणतेही वचन दिले नाही व त्यांनीही कोणतेही वचन माझ्याकडून मागितले नव्हते. पं. मिश्रा व पं. शुक्ल यांचे आपसात बरे नव्हते,

ही गोष्ट त्याकाळी प्रसिद्ध होती. यामुळे महाकोशलच्या आमदारांमध्ये दोन गट पडले व माझी नेतृत्वपदी आपसुकच निवड झाली. जबलपूरच्या सर्किट हौसमध्ये काळे मुद्दाम मला भेटले आणि मिश्रांच्या बाबतीत त्यांनी मला सावध केले. ही शुद्ध लोणकढी थाप आहे. व राजकारणात मुळीच रस न घेण्याच्या काळे यांच्या प्रकट धोरणाशी विसंगत आहे. खासगी व्यक्ती असताना जबलपूरला मी सरकारी सर्किट हौसमध्ये कधीही मुक्काम केला नाही. पंतप्रधान झाल्यावर मी अवश्य सर्किट हौसमध्ये उतरत असे. (पंतप्रधान झाल्यावर म्हणजे अर्थात पं. मिश्रांना मंत्रिमंडळात घेतल्यावर त्यांच्याविरुद्ध सावधगिरीच्या काळ्यांच्या इषाऱ्याचे प्रयोजन संपल्यावर.) या वस्तुस्थितीमुळे काळ्यांचा सर्किट हौसमध्ये मला भेटल्याचा दावा आपोआपच खोटा पडतो.

## पं. मिश्रांशी संधी करणाऱ्यांना अखेर चकमा

पान १०८ वर काळ्यांनी पं. मिश्रांना 'प्रतिभस्मासूर' म्हटले आहे. पण याच काळे महाशयांनी १९४५ च्या अखेरीस आपल्या 'बाईंना' याच प्रतिभस्मासुराशी संधी करण्यास मोकळीक दिली हे त्यावेळी नरकेसरी स्मारक मंडळाचे कार्यवाह श्री आनंद नीळकंठ उधोजी (भय्यासाहेब उधोजी) यांनी मला पाठविलेल्या स्मरणपत्रावरून स्पष्ट होईल. म्हणून मी त्यांचे ते पत्र मुद्दाम येथे देतो.

प्रिय डॉ. खरे यांस,

सा. न. वि. वि.

आज तुम्हाला एका मजेदार प्रसंगाची हकीकत लिहावीशी वाटते. म्हणून मुद्दाम हे पत्र लिहीत आहे. मला सौ. अनसूयाबाई काळे यांनी मोटार पाठवून मुद्दाम आपल्या बंगल्यावर बोलावून घेतले. व मला आग्रह करून नरकेसरी स्मारक मंडळाची तातडीची सभा बोलावून त्यांचा मंडळाचे सभासदत्वाचा राजीनामा मंजूर करून घ्या असा आग्रह धरला. मी त्यांना एवढी घाई का? डॉ. खरे दिल्लीहून महिना पंधरा दिवसात येतीलच. व ते आल्यानंतर आपण सभा घेऊ व तोपर्यंत राजीनामा देणे स्थगित करावे अशी विनंती केली. पण त्या आपला राजीनामा देण्याचा हट्ट सोडीनात व त्यांनी राजीनाम्याचे पत्र माझ्या स्वाधीन केले. राजीनामा देण्याची घाई का झाली हे नंतर त्यांनी मला सांगितले. ते असे— पंडित द्वारकाप्रसाद मिश्र यांचे म्हणणे असे की तुम्ही नरकेसरी स्मारक मंडळाचा राजीनामा द्या, म्हणजे मी तुम्हाला नागपूरच्या सीटचे तिकीट कांग्रेसकडून मिळवून देतो. मला दोनचार दिवसापूर्वीच असे नक्की

कळले होते की, सौ. विमलाबाई देशपांडे यांना सीट देण्याचे पक्के झाले आहे व सौ. अनसूयाबाईंना कांग्रेसचे तिकीट कधीही मिळणे शक्य नव्हते. मला ही माहिती दादासाहेब शेवडे यांचेकडे मी वामनराव जोशी यांचेबरोबर गेलों असता मिळाली. माझ्या समोरच वामनराव दादा यांनी दादासाहेब शेवडे यांना सांगितले की, 'आपली विमल पक्की. अनसूयाबाईंना आपण चकमा देऊ.' यावरून माझा अंदाज असा होता की, अनसूयाबाईंना पं. मिश्रा हे फसवू पहात आहेत. अर्थात माझा सल्ला अनसूयाबाईंना कधीच पटण्यासारखा नव्हता. म्हणून मी त्यांना राजीनामा देऊ नका असा कधीही आग्रह केला नाही. परंतु त्यांची माझी पैज होती की, त्यांना कांग्रेसचे तिकीट मिळाले तर मी त्यांना शंभर रुपये देईन. जर त्यांना तिकीट मिळाले नाही तर त्यांनी मला शंभर रुपये द्यावे. मला राहावेना म्हणून तुम्हाला आपल्या मंडळाच्या सदस्यांच्या वृत्तीची पारख पटावी म्हणून मुद्दाम हे पत्र लिहीत आहे. क. लो. अ.

आपला

**आनंद निळकंठ उधोजी**

## काळीनबाईंचे अश्रू व हुंदके यांच्याबद्दल थोडे स्पष्टीकरण

शरीफच्या प्रश्नाबद्दल काळ्यांनी आपल्या पुस्तकात पान १०८ वर असे म्हटले आहे की, "बाईंनी हा प्रश्न पक्ष सभेत काढला असता सर्व मंत्र्यांनी त्याला बगल दिली. बाईंना अत्यंत वाईट वाटले. त्यांच्या डोळ्यातून अश्रू गळू लागले." हे विधान अत्यंत विपर्यस्त आहे. या बाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, शरीफचा प्रश्न विचारात घेण्याकरिता पक्ष सभा बोलावण्यात आली. त्या सभेत शरीफच्या कृत्यावर बऱ्याच आमदारांनी प्रतिकूल टीका केली. अर्थात या आमदारांत सौ. अनसूयाबाई काळे ह्या अग्रेसर होत्या. काही वेळ आढेवेढे घेतल्यानंतर न्यायमंत्री शरीफ यांनी जाफर हुसेनचा दयेचा अर्ज आपण एकटयानेच निकालात काढला ही चूक झाली, ही गोष्ट कबूल केली व त्या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त केली. त्याबरोबरच त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामाही सादर केला. तरीही काळीनबाईंचे अश्रू आणि हुंदके थांबेनात. त्यामुळे ॲड्. केदार त्यांच्यावर उखडले. ते म्हणाले, 'शरीफने चुकी कबुल केली, दिलगिरी व्यक्त केली आणि राजीनामाही दिला. तरीही तुमचे समाधान होत नाही व अश्रू आणि हुंदके बंद होत नाहीत याचे आश्चर्य वाटते. आता का शरीफला फाशी द्यावे म्हणता?' केदारांच्या या उद्‌गाराबद्दल काळे आपल्या पुस्तकात मुग्ध का? १९४५ च्या अखेरीस काळीनबाईंनी नरकेसरी स्मारक मंडळाचा राजीनामा देऊन विधान सभेच्या तिकीटाच्या

लोभाने पुन्हा कांग्रेसमधे प्रवेश केला, पण त्यांची फसगत झाली. माझ्या प्रकरणात ज्याप्रमाणे श्री पटवर्धन, दातार, ढवळे इत्यादी माझी म्हणून म्हणविली जाणारी मंडळी कांग्रेसमधून जशी दूर झाली, तशाच मझ्या बाजूच्या म्हणून अनसूयाबाई काळे ह्याही कांग्रेस विधानसभापक्षाला चिकटून राहिल्या तरी बाहेर त्यांची स्थिती पटवर्धन, दातार, ढवळे यांच्यापेक्षा किंचितही भिन्न नव्हती.

## वयाच्या ६१ व्या वर्षी बाई लिपस्टिक का लावू लागल्या ?

१९४६–४७ मध्ये कांग्रेस पक्ष हा अधिकारारूढ झाला. म्हणून जरी यावेळी कांग्रेस पक्षाच्या चुकीच्या धोरणामुळे शेकडो हजारो स्त्रियांवर बलात्कार होऊन स्त्री–पावित्र्याची विटंबना झाली, तरी १९३८ मध्ये शरीफ प्रकरणाच्या वेळी बाईंनी जसे अश्रू गाळले तसे यावेळी गाळले नाहीत व जरी त्यांना तिकीट मिळाले नाही, तरी त्यांनी कांग्रेस सोडली नाही. कारण पुढे अधिकारपद मिळण्याची आशा. काळ्यांनी आपल्या पुस्तकात पान एकतीसवर असे लिहिलेच आहे की, 'बाईंना मानाच्या जागा नको होत्या असे नाही.' याबद्दल बाईंची वृत्ती काय होती हे पुस्तकावरून स्पष्ट होत नाही. कारण काळ्यांनी पान ११८ वर असे म्हटले आहे की, बाईंनी कधीही मानाच्या जागा बळकावण्याचा प्रयत्न केला नाही. पान ११४ वर काळे असे म्हणतात की, (खरे–प्रकरणानंतर) "त्यांना ( बाईंना ) मंत्री होण्यापासून मी परावृत्त केले याबद्दल त्या मरेपर्यंत मला दोष देत होत्या. इतकी त्या मंत्रिपदात जादू आहे. शेवटी शेवटी तर बाईंना मी म्हणत असे, तुम्ही माझे का ऐकले ? तुम्ही स्वतंत्र होत्या, तुम्ही आपल्या इच्छेनुसार का वागल्या नाहीत ?" म्हणूनच मला वाटते, १९५७ मध्ये बाईंची पुन्हा लोकसभा सदस्य म्हणून निवड झाल्यावर त्यांना खूष करण्याकरिता म्हणजे त्यांना मंत्रिपद मिळावे ह्यासाठी काळे महाशय बाईबरोबर कांग्रेस हायकमांडच्या दोनचार सदस्यांकडे गेले. पण प्रत्येक ठिकाणी बाईंची निराशा झाली, असे पान १७१ वरून स्पष्ट होते. याच पानावर श्री काळे पुढे म्हणतात की, बाई लिपस्टिक लावू लागल्या. (यावेळी बाईंचे वय ६१ वर्षांचे होते ) कारण काय असावे बरे ? माझ्या मते याच सुमारास मंत्रिपद मिळालेल्या बाया लिपस्टिक लावणाऱ्या होत्या.

## बाईंची अधिकारपदाविषयी दुर्दम्य लालसा

अनसूयाबाईंना अधिकारपदाची हाव होती याचा मलाही अनुभव आहे. कारण १९३७ च्या जुलै महिन्याच्या १४ तारखेला मी जुन्या मध्यप्रांतात कांग्रेस पक्षातर्फे मंत्रिमंडळ स्थापन केले. त्याच्यापूर्वी पाचसहा दिवस अनसूयाबाईंनी स्त्रीप्रतिनिधी म्हणून त्यांना मंत्रिमंडळात घ्यावे, अशी मला विनंती केली. पक्ष-

सभेने दिलेल्या अनौपचारिक आदेशाच्या विरुद्ध वागणे माझ्याकडून होणार नाही असे सांगून मी त्यांची विनंती अमान्य केली. अर्थात त्यांची निराशा झाली. पण त्यांची अधिकारपदाची लालसा दुर्दम्य होती. म्हणून १९३८ च्या जानेवारी महिन्यात मला पत्र पाठवून ( या पत्राचा ब्लॉक वाचकांना पुढे पहावयास मिळेल ) त्यांनी नागपूर म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होण्याची आपली इच्छा व्यक्त केली. तीही मी पूर्ण केली नाही. यामुळे त्या जरी माझ्याशी वरून गोड वागत असत, तरी आतून रुष्टच होत्या. अशा व्यक्तीला मी आपल्या स्वतःकरिता कोणतीही विनंती करू शकत नव्हतो. अशी लाचारी करणे हा माझा स्वभाव नाही हे नागपूरच्या जनतेला माहीत आहे. असे असताना आपल्या पुस्तकात पान ११२ वर काळे खालील विधान करतात.

> डॉ. खऱ्यांनी त्यावेळी, म्हणजे तात्पुरते सरकार बनविले अगर बनवून बरखास्त केले त्यावेळी, एक स्टेटमेंट काढले होते. त्यावर असेंब्ली सदस्यांच्या सह्या घेण्याकरिता खटपट सुरू झाली. बाईंनी त्यावर सही करण्याचे नाकारले. पुष्कळांनी बाईंना गळ घातली. शेवटी डॉक्टरसाहेबांनी मला आमीष दाखविण्याचा प्रयत्न केला. एक गाडी घेतो म्हणाले.

## मोटार विक्रे काळे माझे राजकीय हितशत्रू

काळ्यांचे हे विधान धडधडीत खोटे आहे. बाई माझ्यावर आतून रुष्ट होत्या आणि त्यांचे यजमान मोटारविक्रे काळे हे तर माझे राजकीय हितशत्रू होते. त्यांना असे प्रलोभन दाखवून आपला अपमान करून घेण्याइतका मी मूर्ख नाही. याशिवाय मी काही लक्ष्मीपुत्र नाही की सहज मोटार घेऊ शकेन. मी मध्यम वर्गीय माणूस आहे. माझ्यापाशी त्यावेळी एक स्वतःची मोटार होतीच. व दुसऱ्या मोटारीची मला जरूरी नव्हती. एक मोटर घ्यायला मध्यम वर्गीय माणसाला काय यातायात पडते व वेळेनुसार कर्जही काढाव लागते याचा मला अनुभव होता. अशा स्थितीत मी प्रलोभन देणे हे अशक्य आहे. म्हणून काळ्यांचे हे विधान मागे उल्लेख केल्याप्रमाणे त्यांच्या अहंगंडाचाच आविष्कार असला पाहिजे.

## माझ्या ८२ व्या वर्षाच्या जराजर्जर अवस्थेत हा प्रपंच कां केला ?

या पुस्तकाचे समग्र परीक्षण करण्याचा माझा इरादा नाही. या पुस्तकात काळ्यांनी माझ्यावर व माझे दिवंगत मित्र नरकेसरी अभ्यंकर यांच्यावर जे खोटेनाटे गंभीर आरोप केले आहेत, त्यांचे खंडण करण्यासाठीच मला माझ्या ८२ व्या वर्षी जराजर्जर अवस्थेत हे प्रस्तुत पुस्तक लिहिण्याचा प्रपंच करावा लागला. काळ्यांनी जर अशी विधाने वर्तमानपत्रात केली असती तर कदाचित् वृद्धपणी मी तिकडे लक्ष दिले

नसते. कारण वर्तमानपत्राचे लिखाण हे क्षणजीवी असते. पण पुस्तकातील लिखाण हे दीर्घकाळ टिकणारे असते. म्हणूनच मलाहि पुस्तकच लिहून काळ्यांनी केलेल्या आरोपांचे निराकरण करावे लागले. हेच या पुस्तकाचे प्रयोजन.

## माडखोलकर-पटवर्धन ही दुक्कलच काळ्यांची प्रेरक शक्ती

आता काळ्यांनी पुस्तक लिहिण्याचे श्रम का घेतले व त्यांना ते लिहिण्याची प्रेरणा कोणी दिली, या विषयाकडे वळतो. या काळ्यांच्या पुस्तकातील पुराव्यावरून हे सिद्ध होते की, ही प्रेरणा त्यांना मुख्यतः श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व अंशतः माडखोलकरांच्या हाताला हात लावणारे श्री. एकनाथराव पटवर्धन यांच्याकडून मिळाली. मुख्यमंत्री श्री. मा. सां. कन्नमवार यांनी काळ्यांच्या पुस्तकाला पुरस्कार लिहिलेला आहे. त्यात पान आठवर ते लिहितात की, 'याचे बहुतांश श्रेय श्री. माडखोलकरांना आहे. त्यांनी आग्रह केला नसता, तर काळे यांच्या मनातील विचार मनातच विरून गेले असते.' श्री. माडखोलकरांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे. त्यात त्यांनी पान चौदावर स्पष्ट म्हटले आहे की, 'माझ्या या आग्रहाच्या पोटी हा चरित्रग्रंथ जन्माला आला असे मी म्हटले तर ते अवास्तव होणार नाही.' काळ्यांनी 'माझी भूमिका' लिहिली आहे. त्यात त्यांनी पान सव्वीसवर खालील विधान केले आहे. 'कै. सौ. अनसूयाबाईंच्या आयुष्यावर मी काही लिहावे व ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावे असा आग्रह बाईंचे मानलेले बंधू व ख्यातनाम साहित्यिक श्री. ग. त्र्यं. ऊर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांचा आज जवळ जवळ दोन अडीच वर्षांपासून चालू आहे. पटवर्धनांबद्दल पान एकोणतीसवर काळे लिहितात, 'पुस्तकाची हस्तलिखित प्रत प्रथम मी श्री. एकनाथपंत पटवर्धन यांना वाचावयास दिली, व हस्तलिखितातील ऐतिहासिक घटना व राजकीय विषयावरील उल्लेख सत्याला धरून आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहाण्यास मी त्यांना विनंती केली. सुटलेल्या गोष्टींचे टिपणही करून देण्यास सांगितले. श्री. पटवर्धन हे बाईंचे राजकीय कार्यातील अतिशय निकटचे सहकारी.'

या सर्व पुराव्यावरून हे सिद्ध होते की, हे पुस्तक प्रस्तुत स्वरूपात लिहून घेण्यास माडखोलकर व पटवर्धन हे जबाबदार आहेत. काळ्यांनीही अशी कबुली आपल्या भूमिकेत पान तीसवर दिलेली आहे.

## माडखोलकर-पटवर्धनांचा दुष्ट डाव

माडखोलकर व पटवर्धन या दोघांनाहि पूर्ण जाणीव होती की, काळे हे माझे राजकीय हितशत्रू आहेत. त्यांनी जर हे पुस्तक लिहिले तर माझ्यावर शिंतोडे उडवून आरोपही करण्यात येतील अशी त्यांची खात्री होती. म्हणूनच या दोघांनीही

चिटणीस पार्क येथील शरीफ प्रकरणाच्या सभेचा खोटा वृत्तांत जाणून बुजून या पुस्तकात येऊ दिला, असे मी ठासून म्हणतो. कारण हे दोघेही माझे राजकीय हितशत्रू बनले आहेत हे पुढील एका प्रकरणात (महाराष्ट्रीय मॅक्डोनल्ड) वाचकांना दिसून येईलच.

## माडखोलकरांच्या मोहक मुखड्याचे गुरुमुखातून झालेले मनोहारी दर्शन

माडखोलकर हे लोकांवर छाप पाडण्याच्या कसबात बरेच तरबेज आहेत. त्यांनी आपले साहित्यिक गुरु श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर यांच्यावर कशी छाप पाडली होती हे १३ सप्टेंबर १९५९ च्या 'आलमगीर' साप्ताहिकाच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या एका पत्रावरून दिसून येईल. ते समग्र पत्र मी खाली देतो.

## श्रीपाद कृष्ण आणि गं. त्र्यं माडखोलकर

संपादक 'आलमगीर' यास,

प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्या "श्रीपाद कृष्ण वाङ्मयदर्शन" या पुस्तकावर श्रीपाद कृष्णांचे एक शिष्य व 'तरुण-भारत' या पत्राचे रसिक संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'तरुण-भारत' च्या रविवार ता. २६-७-५९ च्या साप्ताहिक अंकात विस्तृत परीक्षण केले आहे.

कोल्हटकरांच्या जीवनातील द्वंद्वाची त्यांनी केलेली मीमांसा सखोल आहे. कोल्हटकरांच्या सौंदर्यासक्तीचा त्यांच्या साहित्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम कसा घडून आला हे दाखविण्याच्या ओघात श्री माडखोल-करांनी कोल्हटकरांच्या सान्निध्यात आलेल्या अनेक स्त्रीपुरुषांची यादी दिली आहे. आमच्या मते या यादीतून एक नाव गळलेले आहे व ते केवळ श्री माडखोलकरांच्या मुग्ध सौजन्यामुळे गळलेले आहे याबद्दल आम्हाला तरी शंका नाही. ते नाव म्हणजे

**"गजानन त्र्यंबक माडखोलकर"**

हेच होय. श्री माडखोलकरांसारख्या लोभास व्यक्तिमत्वाच्या शिष्याचा ठसा त्यांच्या कलासक्त गुरूवर किती खोल उमटला होता याची कल्पना आज फारच थोडयांना असेल.

श्रीपाद कृष्ण माडखोलकरांबद्दल नेहमीच कौतुकाने इतरांना आवर्जून सांगत, "त्यांचे भिरभिरे डोळे, अस्थिर दृष्टि, स्निग्ध चेहरा, लवचिक जिवणी व लाडिकपणे बोलण्याची लकब ही सर्व तुम्हालाही आकर्षक वाटतील."

गुरु–शिष्यांचे हे स्निग्ध सान्निध्य त्यावेळी अनेकांनी जवळून पाहिलेले आहे.

कोल्हटकरांच्या काही नाटकातील नायिकांचे व्यक्तित्व कोल्हटकरांचे विद्यालयीन स्नेही श्री. रघुनाथ शंकर रानडे यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून लिहिलेले आहे, असे श्री. माडखोलकर लिहितात.

कोल्हटकरांच्या कलासक्त मनाला उत्स्फूर्त करण्याचे श्रेय श्री. रानडे यांच्याइतकेच श्री माडखोलकरांनाही आहे असे आम्हाला वाटते.

आपला

**के. भि. जोशी**

खामगाव

## जिथे गुरु भाळले तेथे काळ्यांचा काय पाड !

या वरील पत्रावरून असे दिसते की, कोल्हटकरांच्या काही नाटकातील नायिकांचे व्यक्तित्व त्यांनी माडखोलकरांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून लिहिलेले आहे, इतकी छाप माडखोलकरांनी आपल्या कलासक्त गुरूवर पाडलेली होती. अशा माडखोलकरांना श्री काळे यांजवर छाप पाडणे सहज साधले याचे आश्चर्य वाटावयास नको.

## अखेर माडखोलकरांनी काळ्यांना वश केलेच

सौ. अनसूयाबाई आपल्या पतीला नेहमी साहेब म्हणून संबोधीत असत. काळे पान सव्वीसवर स्पष्ट कबुली देतात की, त्यांच्या हातून कोणताही लहानमोठा कारखाना निघाला नाही. तरीही माडखोलकर त्यांना ' उद्योगपती ', ' उद्योगपती ', ' साहेब साहेब ' असे संबोधून त्यांची खुशामत करीत असत. हे त्यांनी दोन अडीच वर्षे करून काळ्यांचे मन वळविले व त्यांच्याकडून पुस्तक लिहून घेतले आणि आपले स्वतःचे ईप्सितही साध्य करून घेतले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों दि: ..................

## प्रकरण २ रे

# अनसूयेची असूया

### गौरकाय मॅक्लेघनबद्दल सौ. काळे यांना आकर्षण

श्री काळे यांनी लिहिलेल्या या दंपती–चरित्राच्या पान तेहतीसवरून असे दिसते की, नागपूरचे त्यावेळचे डेप्युटी कमिश्नर श्री. मॅक्लॅघन यांच्याबद्दल सौ. अनसूयाबाईंच्या मनात आकर्षण निर्माण झाले व त्यांची सलगी वाढू लागली. यामुळे काळे महाशय अस्वस्थ झाले आणि त्यांनी बाईला खुलासा विचारला. बाई म्हणाल्या, 'मॅक्लॅघनचा चेहरा आणि माझ्या भावाचा चेहरा यात फार साम्य आहे. म्हणूनच मी त्याच्याकडे आकर्षिले गेले. या आकर्षणात कामुक भावना मुळीच नाही.' बाईच्या या खुलाशाने काळयांचे समाधान झाले. पण आरंभी या सलगीमुळे पाश्चात्य विचारसरणीचा टेंभा मिरवणाऱ्या काळ्यांच्या मनातही मत्सर किंवा असूया निर्माण झाली. म्हणजे पत्नीसंबंधाच्या मालकी हक्काच्या भावनेने काळ्यांनाही सोडलेले नव्हते. अशाच प्रकारची असूया सौ. अनसूयाबाईंच्या मनातही जागृत झाल्याचे पुस्तकाच्या पान चौतीसवरून दिसते. याबद्दलचा मजकूरच मी येथे उद्धृत करतो.

### काळे महाशयांनाही एका सुंदर परस्त्रीचे आकर्षण

> काळे म्हणतात, कर्मधर्मसंयोगाने बाईप्रमाणेच सामाजिक कार्य करणाऱ्या, बाईइतक्याच बुद्धिमान पण त्यांच्याहून जास्त नीटनेटक्या राहणाऱ्या एका सुंदर स्त्रीकडे मी आकर्षिला गेलो. त्या आकर्षणात कामुक भावना होतीच असे म्हणता येणार नाही. त्यावेळी बाई तुरुंगात होत्या. त्या स्त्रीचा फोटो माझ्या आणि बाईंच्या फोटोबरोबरच आमच्या निजावयाच्या खोलीत मी लावला होता. बाई तुरुंगातून सुटून परत आल्यावर त्यांनी तो फोटो एक दिवस हलकेच उचलून फेकून दिला आणि अशा रीतीने तो फोटो पाहून आपली असूया जागृत झाल्याचे त्यांनी आपल्या कृतीने दाखवून दिले.

### 'अनसूयेची असूया' हे शीर्षक कां दिले ?

माझ्या मते अनसूयाबाईंची ही असूया रास्त होती. पतिपत्नींनी एक-मेकाच्या चारित्र्याची काळजी घेतलीच पाहिजे. काळ्यांनी आपल्या पत्नीच्या

असूयेचा जो उल्लेख केला त्यावरूनच मी या प्रकरणाला ‘अनसूयेची असूया’ हे शीर्षक दिले आहे. त्यात मी अनसूयाबाईंच्या राजकीय असूयेचाच उल्लेख करणार आहे.

## काळीनबाईंचा उणेपणा उजेडात येऊ दिला नाही

माझ्या संग्रही ता. १७-८-३४ पासून तो १५-१२-४४ पावेतो मला आलेली अनसूयाबाईंची पत्रे आहेत. श्री. ज. रा. जोशी यांनी माझ्या मराठी चरित्राचा पहिला भाग ऑगस्ट १९४३ मध्ये लिहून प्रसिद्ध केला. त्यानंतर नोव्हेंबर १९५९ पावेतो माझी हिंदी, मराठी, इंग्रजी चरित्रे, आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली या कोणत्याही पुस्तकात सौ. अनसूयाबाईंची पत्रे दिली नाहीत. ती जर दिली असती तर काळीनबाईंचा थोडाबहुत उणेपणा दिसला असता. उगीच वाकडे वळण घेऊन कोणाचा उणेपणा काढू नये या सद्बुद्धीनेच मी ती पत्रे प्रसिद्ध केली नाहीत. इतकेच नव्हे तर १९४९-५० मध्ये श्री. ज. रा. जोशी यांनी माझ्या मराठी चरित्राचा दुसरा भाग प्रसिद्ध केला त्यावेळी काळीनबाईंची ही पत्रे प्रसिद्ध करण्याची त्यांची इच्छा होती. पण श्री. जोशी यांचे त्यावेळचे मार्गदर्शक श्री. माडखोलकर यांनी ती पत्रे प्रसिद्ध करू नका, यासाठी जोशीबुवांची दाढी धरलेली मी पाहिलेली आहे. म्हणून मीही जोशीबुवांना ती प्रसिद्ध करू नका असे सांगितले. ही घटना माझ्याच घरी घडलेली आहे.

## ‘खरे’ आणि ‘काळे’ अंतःकरणांचे सम्यग्दर्शन

पण ‘अनसूयाबाई आणि मी’ या पुस्तकात माझ्यावर जो विनाकारण घृणित हल्ला करण्यात आला आहे तो पाहिल्यावर माझे मत बदलले आणि सौ. काळे यांची ती पत्रे या प्रकरणात प्रसिद्ध करण्याचे मी ठरविले. म्हणून तेव्हापासून (१९४९) जोशीबुवांजवळ असलेली ती पत्रे त्यांनी मला आता आणून दिली. त्यांपैकी काळीनबाईंची असूया दर्शविणाऱ्या एका पत्राचा ब्लॉकही प्रसिद्ध करण्यात येईल.

‘अनसूयाबाई आणि मी’ या पुस्तकाच्या पान २०५ वर काळे म्हणतात, चिमूर-आष्टीबाबत अनसूयाबाईंना व्हाइसरॉयने मुलाखत नाकारली. पण पान ३०७ वर असे म्हटले आहे की, व्हाइसरॉयचे प्रायव्हेट सेक्रेटरी सर जॉन थॉर्न

यांनी फाशी तहकूब करण्यासाठी स्टे ऑर्डर काढला. ही दोन विधाने विसंगत आहेत. व्हाइसरॉयच्या त्या वेळच्या प्रायव्हेट सेक्रेटरीचे नाव ॲबेल होते व तो प्रांतिक कारभारात ढवळाढवळ करू शकत नव्हता; म्हणून हे विधान विश्वासार्ह नाही. याच पुस्तकाच्या पान २०९ वर खालील मजकूर आहे.

Translation of letter d/ Sewagram 12th March 1945 from Bapu to Bhai Bhulabhai—

This note is being brought by Shrimati Anusuyabai Kale. It concerns the impending execution of some of the accused in Chimur case. This is not a proper case for hanging. Please meet Dr. Khare and do whatever yon can. If your skill cannot find a way out, we will have to wash our hands on the matter but it will not please me to do so. Not a single one of those should be hanged. This was the result of a thing done in momentary excitement and how can it be a case for hanging ? But this is what you and I would say. It is not easy to get the Rulers to believe this but we must make every effort.

महात्मा गांधींचे माझ्या विषयीचे चांगले मत या पुस्तकाच्या पान ११४ वरही थोडे बहुत दिसून पडते. या पानावर गांधीजीने सौ. अनसूयाबाईना ता. १-८-३८ रोजी लिहिलेल्या इंग्रजी पत्राचा फोटो ब्लॉक छापलेला आहे. त्यात खालील वाक्य आहे. " It is good that Dr. Khare has so many admirers. I count myself as one, but I am a discriminating friend and admirer. "

## बाईची असूया

वरील म्हणजे ता. १२ मार्च १९४५ चे पत्र घेऊन सौ. काळे दिल्लीस आल्या व माझ्या घरीच उतरल्या व भुलाभाईला भेटल्या. पण या पत्राचा सुगावा मात्र त्यांनी मला लागू दिला नाही. कारण या पत्रात महात्मा गांधींचे माझ्याबद्दलचे चांगले मत दिसून येते. ही माझ्याबद्दलची असूयाच नाही काय ? मला

अशी माहिती लागली आहे की, महात्मा गांधींचे माझ्याबद्दलचे या पत्रात दिसून येत असलेले चांगले मत जनतेला दिसू नये याच दुर्बुद्धीने हे पत्र आपल्या पुस्तकात काळ्यांनी प्रसिद्ध करावयाचे नाही असे ठरविले होते. पण शेवटी कोणातरी सल्लागाराच्या आग्रहावरून ते पत्र प्रसिद्ध करणे काळेमहाशयांना भाग पडले असावे. ही पत्रे प्रसिद्ध करण्याच्या अथवा न करण्याच्या या हकिकतीवरून वाचकांना 'खरे' आणि 'काळे' यांच्या अंतःकरणाचे सम्यक् दर्शन होईल.

## अनसूयाबाईंचे पत्र पहिले

धनतोली, नागपूर
१७।८।३४

सा. न. वि. वि.

आपण काल मला "असेंब्ली नॉमिनेशनची मिटींग समजून मी मिटींगला गेले" असे म्हणालात याबद्दल मला अतिशय वाईटही वाटले व रागही आला. वास्तविक मुलगा आजारी असताना मी रात्री सभेला जावयास नको होते, पण जाणे हे कर्तव्य समजून मी गेले त्याचा मोबदला आपण मला असा दिला. जॉब हंटिंगची माझी वृत्ती नाही. असेंब्लीबद्दल डॉ. सोनक २। ३ वेळा मला बोलले पण तो फालतू मनुष्य आहे म्हणून मी तिकडे कानाडोळा केला. पण आपणसुद्धा असे बोलू लागलात तेव्हा मी आपल्याला निक्षून सांगते की मी असेंब्लीला उभी राहत नाही व प्रॉव्हिन्शीयल काँग्रेस कमिटीच्या इलेक्शन करताही माझी रहाण्याची इच्छा नाही. एकतर सार्वजनिक कार्य करण्याला ज्या प्रकारची मनोवृत्ती लागते ती माझी पहिल्यापासून नाही. दुसरे, माझी प्रकृती तितकी सदृढ नाही व चार वर्षाच्या अनुभवावरून मुलाबाळांना वाऱ्यावर सोडून त्या मानाने काम केल्याचे समाधानही मला नाही. तेव्हा सर्व कारणामुळे मी यापुढे काही दिवस तरी घरी रहावयाचे ठरविले आहे. आपली बारा वाजता मीटींग आहे म्हणून घाईघाईने पत्र पाठवीत आहे. आता तरी आपल्या व आपल्या इतर मंडळींच्या मनात असलेला संशय दूर होईल अशी आशा आहे. कळावे ही विनंती.

आ. अनसूयाबाई काळे

बाईंच्या या वरील पत्रावरून असे दिसते की, ज्या सभेला त्या गेल्या होत्या ती सभा अभ्यंकरांच्या विरुद्ध असलेल्या त्यावेळच्या पुनमचंद गटाची असावी. म्हणूनच बाईंनी खुलासा केला असे दिसते. ज्या अर्थी बाईंनी मला पत्र लिहून खुलासा केला त्याअर्थी बाई कांग्रेस संस्थेत अभ्यंकरांच्या खालोखाल मला पुढारी मानीत असल्या पाहिजेत. यावेळी अभ्यंकर जिवंत होते. पण त्यांना पत्र न पाठविता बाईंनी मला पत्र पाठविले. या पत्रात त्यांनी स्वतःबद्दल स्पष्ट कबुली दिली आहे की, सार्वजनिक कार्य करण्याला ज्या प्रकारची मनोवृत्ती लागते ती त्यांची पहिल्यापासूनच नाही. इतरही बाबतीत हे पत्र पुरेसे बोलके आहे. तरीही काळ्यांच्या पुस्तकात कांग्रेसचे भरभक्कम कार्य केल्याबद्दल बाईंचा उदोउदो करण्यात आला आहे.

**पत्र दुसरे** इंग्रजीत

(पत्रावर तारीख नाही पण मजकुरावरून असे दिसते की, ते पत्र मी पंतप्रधान झाल्यावर मला पाठविण्यात आले असावे. कारण त्यात काही काम साधण्याकरिता वशिला लावण्यात आला आहे.)

My dear Doctorsaheb,

I went to you sometime back but you were busy inside and I did not like to disturb you.

Mr. Chaube came to me yesterday. He says there are one or two schemes of the Improvement trust pending with the Gt. He is anxious that they should be given consent to and published in the next Gazette. He has already spoken to you about this. He was to see Misra yesterday. I hope you will pay the necessary attention to this matter. What happened to Mr. Jalgaonkar's (?) case the man who was dismissed from Police service ?

Yours Sincerely

sd. **Anasuyabai Kale**

पत्र तिसरे

Dhantoli, Nagpur
11-11-37

Dear Dr. Khare,

Mr. Hemeon has sent me a pay-slip with a note saying that I shall be getting my pay from the 1st of November ! I enquired in the office and came to know that Gupta has been drawing his salary from the time he came in office. Since we both took office at one and the same time I should get my pay also from that time. This Deputy Speakership besides being a useless post as there is very little scope to show ability has been giving me lot of worry and insult. I have not yet signed the pay-slip. My post is as statutory as that of Gupta. Then why this invidious distinction ? I shall decide after hearing from you.

Then again if possible I should like to be nominated on any of the 10 standing committees you are going to have. I know there is no money in it. I am meant by Providence to work free and may be mess at my cost.

By the bye Kolhe and Ramrao together have changed the name of S. V. Gokhale from one of the committees and inserted the name of Jatkar instead ! Kolhe specially is a very aggressive man ! You have to control him from the beginning.

I know you are very busy but I could not decide without consulting you and hence this letter.

Yours sincerely
**Anasuyabai Kale**

या पत्रावरून बाईंची डेप्युटी स्पीकर झाल्याबद्दल असंतुष्टता दिसून येते व अधिक अधिकाराची हावही दिसून येते. तसेच सार्वजनिक कार्य करण्यात धन-तृष्णाही दिसून येते.

## पत्र चवथे

2/1/38

Dear Dr. Khare

I am leaving for Delhi
now. I am told Dhavle
played a mean trick
with regard to my
candidature in the Hari
pura election. I must
get my deposit back
as it is not my fault
I was quite prepared
to face elections
Dhavle to me is never
a straight forward man
I have already told you

I wish to be president
municipality if possible

As regards Kalappa
I have already told
you.

By temperament
I hate intrigue and
recent behaviour
of Dhavle is most
abominable

Yours Sly
Mrs A. Kale

या पत्रावरून असे दिसते की, कोणाविरुद्धही कारस्थान करण्याची माझी इच्छा नाही असे म्हणत म्हणत बाई आपले एक सहकारी ज्यांना त्यावेळी नागपूर

म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष निवडण्याचे घाटत होते असे श्री. गजानन दिवाकर ढवळे यांच्याविरुद्ध कारस्थान करण्यास उद्युक्त झाल्या व त्यांनी नागपूर म्युनिसिपालिटीचे अध्यक्षपद मिळावे अशी इच्छा व्यक्त केली. आपले एक सहकारी ढवळे यांच्या विरुद्ध ही तीव्र असूयाच नाही काय ? त्यांच्या पहिल्या पत्रात त्यांनी असेही म्हटले आहे की, ' जाब हंटिंग 'ची माझी वृत्ति नाही. तेव्हा खरे कोणते ?

## एक तिरस्करणीय प्रवृत्ती

आपला समाज मोठा विचित्र आहे. बाईंनी थोडेसे समाजकार्य केले तो समाज त्यांना झाशीची राणी म्हणू लागला. काळ्यांनी आपल्या पुस्तकात या गोष्टीचा मोठ्या कौतुकाने उल्लेख केला आहे. विद्यमान व्यक्तींना ऐतिहासिक पूज्य विभूतींची उपमा देणे व त्यांच्याशी तुलना करणे योग्य नाही. असे करण्यामुळे त्या पूज्य विभूतींचा अपमान होतो आणि त्यांच्या कार्यांचे अवमूल्यन होते व विद्यमान व्यक्तीला सवंग मोठेपणा प्राप्त होतो. म्हणून ही समाजाची तिरस्करणीय प्रवृत्ति नष्ट झाली पाहिजे. यासाठी या प्रवृत्तीवर मी येथे विदारक टीका करणार आहे.

## महत्तराणी होऊ पहाणारी तथाकथित झाशीची राणी

अनसूयाबाई आणि झाशीची राणी यांच्यात काय साम्य आहे ? अनसूयाबाई चार महिने तुरुंगवास भोगून आल्या म्हणून त्यांची तुलना काय झाशीच्या राणीशी करायची ? हीच तथाकथित झाशीची राणी माझ्या वशील्याने नागपूर म्युनिसिपालिटीची अध्यक्ष म्हणजे 'महत्तराणी' होऊ पहात होती. अशा क्षुद्र मानासाठी तोंड वेंगाडणाऱ्या बाईला झाशीची राणी म्हणणे हा त्या महान पराक्रमी वीरांगनेचा अपमान नाही काय ?

माझा काही बाईबद्दल आकस आहे म्हणून मी अशी तीव्र टीका केली आहे असे कोणी समजू नये. माझे उद्दिष्ट ही प्रथाच नष्ट करण्याचे आहे. म्हणून मी अशा अन्य घटनांचाही समाचार घेत आहे. त्यात मी माझा स्वतःचाही अपवाद करीत नाही.

## कुठे भगवान श्रीकृष्ण आणि कुठे फडतुस मी

महात्मा गांधींना भगवान बुद्धाची उपमा देण्यात येते. माझ्या मते हे नितांत चूक आहे. बुद्ध आणि गांधी यात काहीही साम्य नाही. बुद्धाने फक्त धर्मकारण केले. मग त्याची धार्मिक तत्वे कोणाला आवडोत न आवडोत. त्याने राजकारण कधीही केले नाही व राजकीय सत्तेचा हव्यास कधी धरला नाही. याच्या उलट गांधीने जन्मभर राजकारण केले. त्यांनी धर्मकारण कधीच केले नाही. याशिवाय

त्यांना राजकीय सत्ता आपल्या शिष्यवरांच्या हातात यावी अशी नेहमी तीव्र आकांक्षा असे. एकदा तर ते हिंदुस्थानचा व्हाइसरॉय होण्याचे स्वप्न पहात होते, असे १४ नोव्हेम्बर १९५४ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्रात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या एका जुन्या मुलाखतीवरून दिसून येईल. या मुलाखतीचा उल्लेख मी माझ्या इंग्रजी आत्मचरित्रात केला आहे. गांधींनी राजकारणात बुद्धाच्या अहिंसेचा अतिरेक केला. त्यामुळे देशाचे विभाजन झाले. सारांश, गांधी राजकारणी म्हणूनही आणि धर्मसुधारक म्हणूनही अयशस्वी ठरले. म्हणून त्यांची तुलना बुद्धाशी करणे म्हणजे भगवान बुद्धाचा अपमान होय. माझ्या स्वतःबद्दलही एका वर्तमानपत्राने 'Dr. Khare is like Lord Krishna with just minimum human failings' असे उद्गार काढले आहेत. हेही योग्य नाही. ही तुलना चूक आहे. कुठे भगवान श्रीकृष्ण आणि कुठे फडतुस मी! यशवंतराव चव्हाणांनाही अलीकडे वर्तमानपत्रात प्रती शिवाजी किंवा शिवाजीचा अवतार असे म्हटलेले वाचल्याचे आठवते. यशवंतरावांची तुलना त्या ऐतिहासिक स्वातंत्र्यसंपादक महान पराक्रमी विभूतीशी करणे हा त्या विभूतीचा अपमान नाही काय? असा कोणता पराक्रम यशवंतरावांनी केला आहे? संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळ चालू असताना त्या चळवळीला साथ दिली नाही व द्विभाषिक मुंबई राज्य राबवून नेहरूंना संतुष्ट केले व त्या संबंधात जाहीर घोषणा केली की, 'महाराष्ट्रा'पेक्षा नेहरू मोठे आहेत. हा त्यांचा नेत्रदीपक पराक्रम! कोठे छत्रपती शिवाजी आणि कोठे यशवंतराव? अशा तुलना बंद व्हाव्यात म्हणूनच मी या पुस्तकात एवढा प्रपंच केला आहे.

## पत्र पाचवे

"आनंदभुवन" धनतोली

३।१२।४३

श्री. डॉक्टर साहेब यांस सा. न. वि. वि.

पत्र घेऊन येणारा गृहस्थ माझा पुतण्या आहे. त्याची "संजीवन आर्ट प्रोडक्शन" या नावाची फिल्म कंपनी मुंबईस आहे. त्याचा एक चित्रपट १९४२ साली पूर्ण झाला. पुढे कोडचाकमधून प्रयत्न करूनही फिल्म न मिळाल्यामुळे व ब्लॅक मार्केट मधून फिल्म घेणे शक्य व तत्त्व म्हणूनही अमान्य असल्याने दुसरा चित्रपट निघू शकला नाही. Film Permit सरकारी ताब्यात गेल्यापासून म्हणजे ऑगस्ट १९४३ पासून त्यांनी अर्ज करून प्रयत्न केले पण दाद लागली नाही. या परिस्थितीमुळे त्याचे अतिशय नुकसान झाले आहे. तेव्हा तो फिल्म खरेदीचा लायसेन्स

मिळविण्याकरिता दिल्लीला जात आहे. आपण हे काम माझे समजून त्याला अवश्य मदत करावी. आपल्या शब्दाने त्याची दाद लागून काम होऊन जाईल. वास्तविक मीच आले असते परंतु आपण तेथे असल्याने याची आवश्यकता नाही. आपल्याला त्रास देत आहे पण आपण एवढे काम कराल अशी खात्री आहे. त्याचे काम Civil Supplies and Industries या खात्यात आहे.

कळावे लोभ अ. ही वि.

आपली

**अनसूयाबाई काळे**

## पत्र सहावे

" Anand–Bhavan "
Nagpur 15-12-44

Dear Doctor Saheb,

This is just to introduce to you my son-in-law Mr. Sarwate. He is a qualified electrical Engineer from Bangalore and has got a first class Career throughout. He has had practical training for over nine months. If there is any suitable job going I am sure you will do the needful.

I think he will just fit in, in the new electrical department that is being organised under the post war planning department.

Yours sincerely,

**Anasuyabai Kale.**

## माझ्या अधिकारपदाचा लाभ घेण्याचा प्रयत्न

ही दोन्ही पत्रे म्हणजे १०० टक्के वशिलेबाजीची मागणी आहे आणि माझ्या व्हाइसरॉयच्या कार्यमंत्रीपदाचा लाभ घेण्याची वृत्ती आहे. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, १९३८ च्या जुलै अखेर माझी जेव्हा त्यावेळच्या मध्यप्रांताच्या पंतप्रधानपदावरून पदच्युती झाली त्यावेळेस बाईंनी त्या सभेत मला साथ दिला नाही. त्यांनी आवर्जून सभेचे अध्यक्ष श्री. सुभाषचंद्र बोस यांना त्रिवार सांगितले की, "सभापतीजी, मैं न्यूट्रल हूं". हा तटस्थपणा म्हणजे मतलबीपणा व दोन्ही डगरीवर हात. पण यावरून बाईंनी मला सोडले हे सिद्ध होते. असे असतानाही बाईंनी माझ्या अधिकारपदाचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. याचा अर्थ बाईंना स्वार्थ होता, असूया होती, पण स्वाभिमान नव्हता.

'मोटर घेतो' असा माझ्यावर तथाकथित वशिलेबाजीचा आरोप करणाऱ्या काळे महाशयांनी झाशीची राणी म्हणून कोडकौतुक केलेल्या आपल्या बाईंच्या वशिलेबाजीची ही पत्रे अवश्य पहावी.

## दादीबाई देशमुख हिंदु मुलींच्या शाळेतील सभा

माझ्या पदच्युतीनंतर त्या घटनेचा निषेध करण्यासाठी नागपूरच्या स्त्रियांची सभा सौ. रमाबाई तांबे यांच्या अध्यक्षतेखाली दादीबाई देशमुख हिंदु मुलींच्या शाळेत झाली. या ता. २ आगस्ट १९३८ च्या सभेचा वृत्तांत महाराष्ट्रात आलेला आहे. सभेत खालील ठराव झालाः—

सभेचा ठराव—नागपूरच्या स्त्रियांची ही जाहीर सभा डॉ. खरे यांचे सच्चारित्र्य, स्वार्थत्याग, कांग्रेसनिष्ठा आणि मुख्य प्रधान या नात्याने त्यांनी बजाविलेली अद्वितीय कामगिरी याबद्दल त्यांच्याविषयी नितांत आदर व्यक्त करून त्यांच्यावर आपला विश्वास प्रकट करते व त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करते.

डॉ. खरे यांच्या विरुद्ध वर्किंग कमेटीने ठराव करून त्यांना जबाबदारीच्या कामाला अपात्र ठरविण्यात पूर्ण विचार केला नसून, त्यामुळे हिंदुस्थानातील कांग्रेसप्रेमी जनतेला, डॉक्टरांच्या चहात्यांना व मित्रांना सखेद आश्चर्य वाटत आहे. त्यांना कांग्रेसमधून अजीबात काढून टाकण्याची ही पूर्वतयारी असावी, अशी सकारण शंका येते. व एवढ्याकरिता ही सभा वर्किंग कमेटीचा निषेध करते.

म्हणून या सभेची महाकोशलमध्ये भरणाऱ्या कांग्रेसला अशी स्पष्ट मागणी आहे की तिने डॉ. खरे यांच्या संबंधी नीट चौकशी करून त्यांना मध्यप्रांत–वऱ्हाडातील असेंब्ली कांग्रेस पक्षाचे पुढारी नेमावे.

## मतलबी धोरणाचा हा नमुना पहा

या सभेला सौ. अनसूयाबाई काळे उपस्थित होत्या हे महाराष्ट्राच्या रिपोर्टावरून स्पष्ट होते. हा ठराव सभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आला व तो एकमताने मंजूर झाला. सौ. लीलाबाई ढवळे यांनी मात्र वर्किंग कमिटीच्या निषेधाबाबत फक्त आपला विरोध असल्याचे सांगितले. 'महाराष्ट्रा'तील या हकिकतीवरून असे दिसते की, ज्या अनसूयाबाई १९३८ च्या जुलै महिन्याच्या शेवटी भरलेल्या सभेत तटस्थ राहिल्या, त्यांनी २ ऑगस्ट १९३८ ला भरलेल्या या वरील सभेत माझ्या बाजूने मत दिले. म्हणजे पुन्हा दोन्ही डगरीवर हात! बाईंनी या माझ्या

राजकारणाची प्रशंसा करणाऱ्या ठरावाच्या बाजूने मत दिले. कोणत्याही रीतीने विरोधी सूर काढला नाही. पण त्यांचे यजमान बाईंच्या चरित्रात पान १४५ वर लिहितात की, मी (डॉ. खरे) राजकारणाचा चुथडा केला. चुकूनही कधी राजकारणात न पडलेल्या काळ्यांचे हे विधान विलक्षण धाडसाचेच नाही काय ?

## ' सावधान 'मधील काळीनबाईंच्या असूयेचे स्वच्छ दर्शन

काळीनबाईंच्या असूयेचे व धरसोड वृत्तीचे विनोदप्रचुर वर्णन ' सावधान ' या त्यावेळच्या मराठी साप्ताहिकाने ता. ३ सप्टेंबर १९३८ रोजी काळीनबाईंची काल्पनिक मुलाखत प्रसिद्ध करून केले आहे. ती काल्पनिक मुलाखत जशीच्या तशी येथे देतो. ही मुलाखत जरी काल्पनिक असली तरी तिच्यातून बाईंच्या असूयेचे व धरसोड वृत्तीचे प्रतिबिंब स्वच्छ दिसते.

—हे परमेश्वरा ! तुला दयाघन म्हणताना मला लाज वाटते. काय म्हणून मी तुला दयाघन म्हणायचे ? अरे मी नाना खटपटी लटपटी केल्या, सारे प्रवाद सहन केले. मला आनंदीबाई पेशवे म्हणून हेटाळले त्याचीही मी खंत बाळगली नाही, आणि माझ्या ह्या साऱ्या तपश्चर्येला तू अखेर वांझ ठरवलेस ! त्या तुझ्या चित्रगुप्ताला विचार, आणि सांग, खरंच मी त्या सरोजिनीपेक्षा निपटारी होते ? का त्या विजयलक्ष्मीपेक्षा वाईट होते ? एकीला तू कोकिळा बनवतोस, दुसरीला मंत्री केलेस, मग मीच काय तुझे घोडे मारले होते ?

—हे परमेश्वरा, अखेर तू आमच्या " साहेबा " सारखा पुरुषच ! तू आपल्या जातीवरच जावयाचा ! तुझी करुणा भाकतानासुद्धा मला लाज वाटते, आणि तशी काही गरजही आता नाही ? कारण तुझ्या वामांकी असलेली जगन्माता तुझ्या माथ्यावर चांगलीच मिरी वाटत असेल हे मला पक्के ठाऊक आहे ! तीच मला साथ देईल !

—तर हे देवा, तुझ्यापाशी ह्यापुढे तोंड वेंगाडण्यात मला काहीच लाभ दिसत नसल्यामुळे, मी तुलाही त्या डॉ. खऱ्याप्रमाणेच सोडणार आहे. परंतु जगन्मातेला मात्र माझी अशी प्रार्थना सांग की—

—रेशमी पातळाच्या किंमती उतरोत !

—मोटारीचा व्यापार तेजीने चालो !

—माझ्या अनुतापशून्य अश्रूंचे सामर्थ्य अखंड टिको ! !

—सौ. अनुताई काळे

## कांग्रेसनिष्ठ काळ्यांकडे कांग्रेसद्रोह्याला चांदीच्या ताटात मेजवानी

आपल्या पुस्तकात काळे मोठ्या दिमाखाने म्हणतात की, अनसूयाबाई कांग्रेसनिष्ठ होत्या आणि ११२ पानावर काळे स्वतःबद्दल म्हणतात, 'हा काळे लाख दोन लाख रुपये दिलेत, तरीसुद्धा देशाच्या विरुद्ध म्हणजे कांग्रेसच्या विरुद्ध स्वप्नात सुद्धा काही करणार नाही.' कांग्रेसचा असा अभिमान बाळगणाऱ्या काळे दंपतीने १९४३ मध्ये एप्रिल–मे महिन्यात माझी व्हाइसरॉयच्या कौंसिलवर सदस्य म्हणून नेमणूक झाल्यावर माझ्या अधिकारपदाचा चार्ज घेण्यासाठी मी दिल्लीला जाण्यापूर्वी मला आपल्या घरी मोठ्या थाटाने चांदीच्या ताटातून मेजवानी देऊन माझा गौरव केला. या मेजवानीला त्या वेळच्या माझ्या सहकारी मित्रांबरोबर मी माझे दिल्लीला खाजगी सेक्रेटरी नेमलेले श्री. माधवराव दातारही हजर होते.

## व्हाईसरॉयची घोषणा व कांग्रेसवाल्यांची निराशा

१९३८ च्या आक्टोबरमध्ये माझी कांग्रेसमधून हकालपट्टी झाली. तेव्हापासून मी कांग्रेसविरुद्ध उघड बंड पुकारले व कांग्रेस वर्किंग कमिटी, गांधी आणि गांधीवाद यांच्याविरुद्ध माझ्या लेखणीने आणि वाणीने तीव्र प्रचार सतत चालू ठेवला. दुसरे महायुद्ध १९३९ मध्ये सुरू झाले. १९४० च्या ऑगस्ट महिन्यात व्हाइसरॉयने आपले कौन्सिल वाढविण्याची जाहीर घोषणा केली. व ही घोषणा व्हाइसरॉयनी १९४१ च्या आक्टोबर महिन्यात कार्यान्वित केली व श्री. बापूजी अणे, राघवेंद्रराव इत्यादींची या वृद्धिंगत केलेल्या कौन्सिलवर नेमणूक केली. अर्थात यामुळे काही कांग्रेसवाल्यांची निराशा झाली. पुढे क्रिप्स मिशन आले. पण क्रिप्स मिशनचे आणि कांग्रेसचे काही जमले नाही. यामुळे पुन्हा काही कांग्रेसवाल्यांची निराशा झाली.

## माझी व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत नेमणूक

शेवटी त्राग्याने १९४२ च्या ऑगस्ट महिन्याच्या ९ तारखेला महात्मा गांधीने 'भारत छोडो'चा ठराव पास करून भारत छोडोची जाहीर घोषणा केली. या ठरावामध्येही कांग्रेसचे अंतरकालीन (इंटेरिम) मध्यवर्ती सरकार स्थापित करावे अशी गर्भित सूचना होती. पण ब्रिटिश सरकारने तिकडे लक्ष दिले नाही व गांधीसकट सर्व कांग्रेसवाल्यांना तुरुंगात टाकले व भयंकर दडपशाही करून दोन तीन महिन्यातच चळवळ दडपून टाकली. त्यामुळे कांग्रेसवाले आता आपल्यापुढे काही भविष्य नाही असे समजून तुरुंगातच निराश झाले. याची स्पष्ट कबुली मौ. आझादांनी आपल्या 'इंडिया वुइन्स फ्रीडम' या पुस्तकात दिली आहे. तेव्हा महात्मा गांधीने आपली स्वतःची व वर्किंग कमिटीची तुरुंगातून सुटका व्हावी म्हणून फेब्रुवारी १९४३ मध्ये उपासाचे निर्वाणीचे शस्त्र वापरले. व्हाइसरॉय

लिनालिथगोने काही दाद दिली नाही. पण या उपासाला भिऊन व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे सदस्य श्री. बापूजी अणे यांनी राजीनामा दिला. पण मी एक लेख (एक चमत्कार) प्रसिद्ध करून गांधीजीच्या या उपोषणाची जाहीर टिंगल केली. त्यानंतर माझी बापूजी अणे यांनी राजीनामा देऊन रिकाम्या केलेल्या व्हाइसरॉयच्या कौन्सिलच्या सदस्यपदी नेमणूक झाली.

## काळे दंपतीने केलेली कांग्रेसची अप्रतिष्ठा व अवहेलना

अशा तऱ्हेने हरएक प्रकारे कांग्रेसची अवहेलना करून उच्च पदावर गेलेल्या माझ्यासारख्या बंडखोराचा मेजवानी देऊन गौरव करणे हे कांग्रेसनिष्ठेशी कसे सुसंगत आहे ते मेजवानी देणारे काळे दंपतीच जाणोत ! कारण त्यांनी दिलेले जेवण हे काही लग्नामुंजीचे सामाजिक जेवण नव्हते; तर निखालस राजकीय होते. म्हणून मी असे छातीठोकपणे म्हणतो की, हे जेवण मला देऊन काळे दंपतीने ज्या संस्थेवर देशाइतकीच निष्ठा असल्याची ते शेखी मारतात, त्या संस्थेची अप्रतिष्ठा आणि अवहेलनाच केली; कारण उच्चपदी जाणाऱ्या माणसाशी चांगले संबंध ठेवून त्याच्या अधिकारपदाचा फायदा घेण्याची वृत्ती. हे याच प्रकरणात जी अनसूयाबाईंची संबंधित पत्रे प्रसिद्ध केली आहेत, त्यावरून सिद्ध होते. इतकेच नव्हे तर माझ्या दिल्ली प्रयाणाच्या वेळी अनसूयाबाई माझ्या इतर चहात्यांबरोबर मला निरोप देण्यासाठी नागपूरच्या स्टेशनवर उपस्थित होत्या.

## माझ्याबद्दलचा आकस

तरी पण त्यांच्या मनात माझ्याबद्दल आकस होताच असे यानंतर काही दिवसांनी श्री. भय्याजी उधोजी यांनी मला पाठविलेल्या स्मरण पत्रावरून दिसून येते. म्हणून ते पत्र जसेच्या तसे येथे उद्धृत करतो.

आनंद भुवन
जेलरोड, नागपूर

प्रिय डॉ. खरे यांस सा. न. वि. वि.

आपण फाशी निवारक समितीचा राजीनामा देऊन दिल्लीला गेलात त्यानंतर फाशी निवारक समितीची सर्वसाधारण सभा सौ. अनसूयाबाई काळे यांच्या बंगल्यावर त्यांच्याच अध्यक्षतेखाली हिशेब मंजूर करण्याकरिता भरली होती. मी हिशेबपत्रकात एकूण देणग्यांच्या रकमेत दोन विभाग केले होते. ते असे—डॉ. खरे समितीचे अध्यक्ष असताना आलेली रकम व त्यांनी राजीनामा दिल्यावर, सौ. अनसुयाबाई काळे या समितीच्या अध्यक्ष झाल्यावर जी रकम आली ती. असे दोन विभाग होते.

या सभेत सौ. अनसूयाबाई काळे यांनी असा हट्ट धरला की हे दोन विभाग काढून टाकावेत व एकंदरच रकम दाखवावी. मी पुष्कळ सांगून पाहिले की याची काही गरज नाही. परंतु तुम्ही अध्यक्ष असताना आलेली रकम मोठी होती व बाई अध्यक्ष असताना आलेली रकम लहान होती. व डॉ. खरे एक्झिक्युटीव कौन्सिलर झाले आहेत, त्यांचे नाव दर्शविले तर लोक देणग्या देणार नाहीत, असा मुद्दा पुढे करून त्यांनी हिशेबातले दोन विभाग कापायला लावले व बाईंच्या आग्रहावरून दोन विभाग कापून एकंदरच रकम दाखविण्यात आली. या प्रसंगावरून बाई आपला किती द्वेष करतात हे मला कळले. कळावे.

आपला

(सही मराठीत व इंग्रजीत) **आनंद निळकंठ उधोजी**

**A. N. Udhoji**

## कारस्थानावर प्रकाश टाकणारे डॉ. केदारांचे पत्र

या वरील पत्राशिवाय श्री. टी. जे. केदारांचे ता. १९ जानेवारी १९४६ चे पत्रही अनसूयाबाईंच्या असूयेवर व ‘ तरुण–भारत ’ गटाच्या कारस्थानावर चांगलाच प्रकाश टाकणारे आहे. म्हणून ते येथे देऊन हे प्रकरण संपवितो.

Nagpur

Date 19–1–46

My dear Doctor Saheb,

Yesterday Tarun Bharat has published a letter from one Gopalrao Wagh in which he alleges that though my statement that I did not receive any fees in Asti–Chimur cases before the High Court, I had received fees from clients. I do not understand the motive behind this publication.

It appears that my insistence on the prevention of Capital Punishmeut Society, to publish accounts has resulted in this. A vicious propaganda was carried on against me that I was paid Rs. 20000. So I had to insist on the publication of the accounts. Mrs. Kale had to publicly acknowledge that I was not paid a pie. Some pleaders were paid fees, but their names were not mentioned. I was concerned with that.

Gopalrao Wagh is a candidate for Arvi Tahasil, and in the last election, he was a staunch supporter of R. B. Naidu. I had informed Mr. Karandikar about it and yet the letter was published. It is possible that he was ( Gopalrao Wagh ) sent for. I am however making enquiries.

The facts are that in 1942, when the case was before the special Tribunal at Wardha, I was engaged by some clients who paid me some fees. I was morally and legally entitled to take them. I worked for nearly 25 days at Wardha, and the payment I received was not ¼th of what I normally receive. Still the people are so ungrateful. To Tarun Bharat Gopalrao Wagh should be nearar than myself. This is most surprising. Does Tarun–Bharat intend to help Gopalrao Wagh in his election campaign against me ? Otherwise there is no meaning in the publication.

I am told Mrs. Kale and messrs Patwardhan, Datar and others are annoyed with me, because I did not become willing to contradict the reports appearing in Bhavitavya. But is that a ground to embrace Gopalrao Wagh ?

Then again, I understand why Mrs. Kale should be hurt. She is a woman and can carry on any villifying aginst anybody and when I protect myself what grievance can she have against me ? Of course I never said that she spread the rumour that I was paid Rs. 20000 /. She seems however to have felt that she should be forced to make the statement she did. It is possible she felt that I was a sharer in the credit, which she wanted to monopolise for herself.

Any way my belief that so long as she continues to guide the politics of any group, there is nothing but disaster writ large for that group. You have realised it already.

What more can I say !

Yours V. Sincerely

**T. J. Kedar**

## प्रकरण ३ रे

# महाराष्ट्रीय मॅक्डोनॅल्ड

### उपकारकर्ता व उपकृत मीमांसा

जगाच्या व्यवहारामध्ये दुसऱ्यावर उपकार करणारे लोक दिसतात. म्हणून जगामध्ये उपकार करून घेणारे किंवा ज्यांच्यावर उपकार केले जातात असे लोक असलेच पाहिजेत हे उघड आहे. सुटसुटितपणासाठी पुढील विवेचनात उपकार करणाऱ्याला उपकारकर्ता व ज्याच्यावर उपकार केला जातो त्याला उपकृत अशी मी संज्ञा देतो. उपकार करण्याची क्रिया झाल्यावर उपकारकर्ता आणि उपकृत यांचे संबंध उपकृताच्या मनोवृत्तीवर अवलंबून असतात असे मानसशास्त्रावरून दिसते. काही उपकृत उपकारकर्त्यांशी सदैव कृतज्ञ असतात, काही कालांतराने उदासीन होतात व काही उपकारकर्त्यांचे विरोधी व शत्रूही बनतात. जेवढा उपकार मोठा तेवढे शत्रुत्वही मोठे असे साधारणपणे दिसून येते.

### उपकारकर्ते ॲस्क्विथ व उपकृत मॅक्डोनाल्ड

याचे ठळक उदाहरण इंग्लंडच्या इतिहासातील रॅम्से मॅक्डोनॅल्ड यांचे आहे. हे गृहस्थ १९३० च्या सुमारास ग्रेटब्रिटनचे पंतप्रधान होते. ते पार्लमेंटात मजूर पक्षातर्फे निवडून आले होते. पण मजूर पक्षाचे बहुमत नव्हते म्हणून लिबरल पक्षाचे मि. ॲस्क्विथ यांनी त्यांना मदत करून पंतप्रधानपदी बसविले. हा ॲस्क्विथसाहेबांचा फार मोठा भलेपणा झाला. पण ज्याच्यावर ॲस्क्विथसाहेबांनी एवढा मोठा उपकार केला, त्या रॅम्से मॅक्डोनॅल्डने या उपकाराची परतफेड कशी केली म्हणाल तर, जे शस्त्र म्हणजे पंतप्रधानपद ॲस्क्विथसाहेबांनी मॅक्डोनॅल्ड यांच्या हाती दिले ते शस्त्र ॲस्क्विथसाहेबांनाच नामोहरण करण्यासाठी वापरून.

श्री. ए. जी. गार्डीनर यांनी आपल्या ‘Certain People of Importance’ या पुस्तकात ‘Essay on Ramsay Macdonald’ या शीर्षकाखाली जी हकीकत दिली आहे, तिच्यातून एक लहानसा उतारा येथे देतो. त्यावरून माझ्या वरील विधानाची सत्यता पटेल.

> It is easy to forgive an injury, for there is a flattering sense of grandeur in the gesture. It is

> hard to forgive a benefaction, for a benefaction implies obligation. Mr. Asquith and the liberals committed the grave indecorum of putting Mac-Donald in office. He did not forgive this obligation. He used the weapon that had been put in his hand to destroy the giver.

वर उद्धृत केलेल्या या इंग्रजी उताऱ्याचा मराठीत भावार्थ असा की, आपल्यावर कोणी अपकार केला तर तो आपण सहज विसरून जातो. कारण त्यात आपला मोठेपणा दिसतो. पण आपल्यावर कोणी उपकार केला तर तो विसरणे कठीण आहे. कारण तो उपकार आपल्याला ओझ्याप्रमाणे वाटतो. त्यामुळे उपकारकर्ता डोळ्यात सलू लागतो. ॲस्क्विथसाहेबांनी मॅक्डोनॅल्डला पंतप्रधानपदी स्थापण्याचा भयंकर मूर्खपणाचा उपकार केला. मॅक्डोनॅल्ड ते विसरू शकला नाही. तो उपकार त्याला ओझ्याप्रमाणे वाटला आणि त्याने ॲस्क्विथसाहेबांनी त्याच्या हातात दिलेले शस्त्र देणाऱ्यालाच नामोहरम करण्यासाठी वापरले. मानसशास्त्राप्रमाणे या घटनेचे विश्लेषण असे. उपकृताला उपकारकर्ता आरंभी फार भला भासतो. पण त्याच्या सहवासात आल्यानंतर उपकृत त्याच्या तुलनेने फार कमी दिसतो. म्हणून तो दृष्टीसमोर नकोसा होतो आणि आपला उणेपणा किंवा न्यूनगंड नाहीसा करण्यासाठी उपकृत उपकारकर्त्याला नामोहरम करण्यासाठी उद्युक्त होतो.

मॅक्डोनॅल्डसाहेब जसे ॲस्क्विथसाहेबांशी वागले त्याचप्रमाणे 'तरुण-भारता'चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व त्यांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ सहसंपादक श्री. एकनाथ श्रीपत पटवर्धन हे दोघे माझ्याशी अलीकडे वागत आहेत. हे दोघेही महाराष्ट्रीय आहेत. म्हणूनच या प्रकरणाला 'महाराष्ट्रीय मॅग्डोनॅल्ड' हे शीर्षक दिले आहे.

## तरुण-भारताच्या पुनरुज्जीवनात माझा पुढाकार

१९५५ मध्ये 'माझी गेली बारा वर्षे' या नावाच्या मी लिहिलेल्या माझ्या मराठी आत्मचरित्रात नागपूरचे मराठी साप्ताहिक 'तरुण-भारत' कसे निर्माण झाले, त्याची तपशीलवार हकीकत 'तरुण-भारताचे पुनरुज्जीवन व पुण्याचा खडक-वासला' या प्रकरणात दिली आहे. त्यावरून दिसून येईल की, १९४३ च्या मे महिन्यात मी व्हाइसरॉयच्या कौन्सिलचा कार्यमंत्री झाल्यावर पटवर्धन, माधोराव दातार व माडखोलकर या तिघा मित्रांच्या अत्यंत आपुलकीच्या आग्रहामुळे मी पुढाकार घेऊन 'तरुण-भारत' साप्ताहिकाचे पुनरुज्जीवन करून त्याला दैनिकाचे स्वरूप दिले व त्याचा पहिला अंक २ जानेवारी १९४४ या रोजी निघाला.

यावेळी दुसरे महायुद्ध सुरू होते. त्यामुळे कागदाची दुर्मिळता व पैशाची तंगी असल्याने नागपूरच्या महाराष्ट्र पत्राची या पत्रात—माडखोलकर मुख्य उप-संपादक होते—स्थिती मोठी अडचणीची झाली, हे ता. २७–११–१९४३ च्या ‘नागपूर टाइम्स’ मध्ये प्रसिद्ध झालेल्या खालील बातमीवरून दिसून येईल.

**Mr. Madkholkar and Mr. Dhavle resign**

It is understood that Messers P. D. Dhavle and G. T. Madkholkar assistant editors of "Maharastra" have resigned from that paper, as a result of a general notice issued to the staff by the proprietor. It is also understood Mr. J. R. Joshi sub-editor of "Maharashtra" and biographer of Dr. Khare has already voluntarily proceeded on a long leave without pay on the understanding that he will have a lien on his job.

अशाच प्रकारची बातमी याच तारखेच्या ‘इंडिपेन्डेंट’ या इंग्रजी साप्ताहिकातही आलेली आहे.

## माडखोलकर-पटवर्धनांनी उंबरठे झिजविले

मी व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीचा सदस्य झाल्यावर माझ्या हुद्यामुळे वर्तमानपत्र काढणे सुलभ जाईल या जाणिवेनेच पटवर्धन–माडखोलकर या मित्रद्वयांनी मला आग्रह केला व माझा उंबरठा झिजवला. आग्रह किती आपुलकीचा व निकडीचा होता हे ता. ७–१०–४३ या रोजी श्री. पटवर्धनांनी मला पाठविलेल्या पत्रावरून दिसून येईल. या पत्रात आणखीही मनोरंजक मजकूर आहे. म्हणून ते समग्र पत्रच येथे देतो.

ता. ७–१०–१९४३

डाक्टर साहेब

यांस—

स. न. वि. वि. आपले ता. ४–१०–१९४३ चे पत्र आजच सकाळी मिळाले. मागचे पत्र खूब लांबलचक होते याची जाणीव मलाही होतीच. पण मुद्दा स्पष्ट करण्याच्या दृष्टीने तितके लिहणे अवश्य वाटले. श्री. माडखोलकर, श्री. उधोजी व श्री. दातार यांना पत्र दाखवून नंतर आपणाकडे पाठविले.

आमच्या कामासाठी आपण सर्व प्रयत्नात चूर राहाल या बद्दल आम्हाला संशय नव्हता. परंतु माझ्या मते याही प्रयत्नात **तुटेपर्यंत ताणू नये.** आपण कौशल्याने या कामात यश मिळवाल अशी मला खात्री आहे.

महाविदर्भपरिषदेला पाठविलेला संदेश तेथे शनवारीच मिळाला. टाइम्स मध्ये पूर्ण छापलेला वाचला. ने. ना. डॉ. जयकर यांचे सुरवातीचे व अखेरचे भाषण फारच मुद्देसूद व कळकळीचे झाले. या प्रश्नाची वकीली पुढे जे जे प्रसंग येतील त्यावेळी करण्याचे त्यांनी आश्वासन दिले. माझ्या मते हा एक मोठाच फायदा होय. परिषदेची इतर हकीकत 'महाराष्ट्र' व 'उदय' मध्ये आली आहे. श्री. जोगेंद्रसिंग यांचे पुढील आशयाचे पत्र आले. मी कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना पत्रे पाठविली होती. त्या पैकी कमांडर-इन-चिफ्, जोगेंद्रसिंग व आपण यांच्याकडूनच उत्तरे आली. श्री. जोगेंद्रसिंगच्या पत्राची नक्कल पुढीलप्रमाणे आहेः— Many thanks for yours of the 27th instant. The one thing needful is to stand for the integrity of India. An integrated India and large provinces can only serve the economic needs of our population. See what has happened in Bengal. So please do not press for more divisions.

महाविदर्भाच्या प्रश्नाबद्दल श्री. जोगेंद्रसिंगाचा गैरसमज झालेला दिसतो. तो दूर करण्याचा आपण प्रयत्न करावा. हिंदुस्थानच्या अखंडत्वाच्या विरुद्ध भाषावार प्रांतरचनेची मागणी कोणीही आजपर्यंत केलेली नाही. बंगालला सर्व हिंदुस्थानमधून जी स्वयंस्फूर्तीने मदत झाली आहे हे एक भारताच्या अखंडत्वाचे प्रत्यक्ष उदाहरण होय. असो. महाविदर्भाचा प्रश्न पुढे रेटायचा तर आपण कार्यकारी मंडळात काही करू शकाल तर पहावे. बॅ. जयकरांनी जाहीर सभेच्या भाषणात मागच्या भांडणाचा उल्लेख केला. पं. मोतीलाल नेहरू हे 'महाराष्ट्रीयनांचे कट्टे द्वेष्टे होते' असे त्यांनी स्वानुभवाने सांगितले. 'सडका भाग कापून टाकला पाहिजे' असे ते म्हणाले होते, त्याचबद्दल त्यांनी त्यांचा सडकून समाचार घेतला. लोकनायकांच्या गुणांचे वर्णन केले व यावेळी ते दिल्लीस असणे अवश्य होते. त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा हिंदुस्थानच्या भावी घटनेच्या बनावाच्या वेळी पुष्कळ झाला असता. क्रिप्स मिशनच्या वेळी त्यांनी जी मदत केली तिचे रसभरित वर्णन त्यांनी केले. त्यांच्या सिलोनच्या जाण्याबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली. आपण दिल्लीला आहात. आपण देशभक्त आहात पण बापूजींच्या इतके ज्ञान व अनुभव आपणात नसावे अशी भीती, त्यांनी व्यक्त केली.

मुंबईच्या भाषणाचा उल्लेख केला. ब्रिटिश मुत्सद्दी लोकांच्यावर विसंबून राहू नका असे आपण म्हणाला असे ते म्हणाले, मग आपण कशाला दिल्लीला गेलात ? असा त्यांनी प्रश्न विचारला व त्याचे उत्तर मिळाले नाही ( या वाक्यावर श्रोतृसमाजात हशा झाला). पण एकंदर भाषण सौम्य होते. सर मोरोपंताकडे मेजवानीच्या वेळी मंत्रीमंडळाच्या गोष्टी निघाल्या. एकजण म्हणाले, पं. शुक्लाने आपल्या मुलासच प्रोफेसरी दिली. खापर्डे यांनी लगेच आपणही ( खरेंनी ) आपल्या मुलास मेयो हास्पिटलमध्ये लावले, श्री. राजूरकरांनी लगेच उत्तर दिले की, ती जागा ऑनररी होती. या सर्व प्रकारावरून अजून महाराष्ट्रीयन लोक परस्पराबद्दल उदार अंतःकरणाने विचार करू शकत नाहीत असे दिसते. पुढची परिषद नागपुरास बोलावली आहे.

सेठ खुशालचंदजी बुधवारी व श्री. हरीभाऊ गुरुवारी सायंकाळी सुटले. सावजीबद्दल आपण वाचले असेल. त्याचे बंधू त्यांचे मन वळविण्यास तयार असून त्याने सर्व सोडून पोटापाण्याच्या प्रश्नाकडे लागावे या मताचे आहेत. सेठ खुशालचंदजींच्या मते जबलपूरचे कुंजीलाल डुबे यांचेबद्दल खटपट करावी असे आहे. यामुळे डॉ. डुबे यांच्यावर obligations पुष्कळ राहतील असे त्यांचे मत आहे. श्री. चिंतामणराव तिडके व भोलासिंग यांच्याबद्दलही खटपट करावी अशा सूचना येत आहेत. श्री. शेवडे अजून आले नाहीत. श्री. दामले यांच्याकडील हकीकत कळली नाही. भंडाऱ्यास मुनेश्वर शास्त्री म्हणून एक गरीब भिक्षुक ब्राम्हण आहेत. त्यांच्या घरी या महागाईच्या काळात काय अवस्था असेल याची कल्पना आपण करू शकता. त्यांचीही मुक्तता व्हावयास हवी. एकंदर सर्वच जण त्रस्त झाले असून घरची काळजी त्यांना त्रास देत असते. असो. या गोष्टी आपण तेथे राहून कितपत साधतील हा एक प्रश्नच आहे.

आपण श्री. दातार यांना पाठविलेले पत्र त्यांनी काल मला दाखविले. त्यांच्या प्रश्नाबद्दल उधोजी, भाऊराव व मी चर्चा करून आपणास पत्र पाठविण्याचे करू. त्यांचा प्रश्न मानाने सोडविण्यास सर्वांनी शक्य ती मदत करावयाची आहे. खुद्द त्यांच्याशीही अजून बोलण्यास वेळ मिळाला नाही.

श्री. हरिभाऊ व शेठ खुशालचंद हे सुटून आले आहेत. वर्तमानपत्र व प्रेसच्या कामाला त्यांचा पुष्कळ उपयोग होईल असे काहींना वाटते. देणग्या वगैरे मिळविण्याच्या कामी सौ. अनसूयाबाई काळे यांचा उपयोग व्हावा. प्रेस व वर्तमानपत्राबद्दल ट्रस्ट करण्याचा आपल्या ट्रस्टने जो अधिकार दिला होता त्याची अंमलबजावणी अजून केली नाही. पण निदान दिवाळीच्या मुहूर्तावर

तरी तो स्थापन करावा असा भाऊरावांचा आग्रह आहे. तरी वरील तिघे व सोनी व वाचासुंदर यांना घेण्याबद्दल आपले मत कळवावे. बाबूचे भाऊरावांशी जमेल अशी खात्री देता येत नाही. श्री. दादा वाचासुंदर यांचेही सर्व कार्ड्स् अजून पुढे आले नाहीत. दोघांनाही चरखासंघात आज ६० रुपये दरमहा पगार आहे. श्री. हरिभाऊ, सेठ खुशालचंद व सौ. काळे यांचे इतरांशी कितपत जुळेल हाही एक प्रश्न आहे. श्री. भाऊराव, दातार व मला यांच्याशी जुळवून घेण्यास हरकत वाटत नाही. श्री. रामभाऊ मनोहर यांच्या जवळ अजून हा प्रश्न काढलेला नाही. श्री. भय्याजी उधोजी यांचे जवळ आजच बोललो. त्यांचा विशेष विरोध नाही. आपण आपले स्पष्ट मत कळविण्याची कृपा करावी. चर्चेच्या वेळी त्याचा उपयोग होईल. वर्तमानपत्राचे कार्य मोठे आहे. महिना कागदासह जवळ जवळ कमीत कमी दीड हजार रुपयांचा खर्च येईल. १–२ वर्षं त्याच्यासाठी फार कष्ट करावे लागणार आहेत. या दृष्टीने आपले योग्य तऱ्हेने जुळेल अशा लोकांची मदत घेऊन कार्यक्षेत्र वाढवावे लागेल. सेठजींचा व्यवहारात उपयोग होईल. त्याला विचार करण्यास ८–१० दिवसांचा अवधी दिला आहे. त्यांचाही प्रेस आहे. तो नागपुरास आणून नरकेसरी प्रेस मोठा करून जॉब वर्क मिळवावे व वर्तमानपत्र चालवावे अशी योजना आहे. त्यांना आपली योजना कळविली आहे. श्री. हरिभाऊंची अजून भेट झाली नाही, उद्या कदाचित् होईल.

दामोधरच्या येण्याबद्दल आपण कळविले नाही. आपले कार्याबद्दल कुठपर्यंत आले आहे हे कळण्यास मार्ग नाही. मला वाटते १८ आक्टोबर पर्यंत बहुतेक गोष्टी पुढे ढकलण्यात आल्या असाव्यात.

दसरा झाला. दिवाळीच्या सुमुहूर्तावर कार्याला सुरुवात व्हावी अशी अपेक्षा आहे. मुंबई व पुणे सोडले तर नागपूर वऱ्हाड कडील भागात एकही मराठी दैनिक नाही. हे एक सबळ कारण राहू शकते.

डॉ. सोनक यांची प्रकृती ठीक आहे. अंथरुणावर विश्रांती घेत आहेत. डॉ. गदाधर यांच्या सांगण्यावरून आपणाकडील डॉ. गोरे यांची सर्व मंडळी मलेरियाने आजारी पडली असे समजले. डॉ. गोरे यांची प्रकृती ठीक असावी, अशी आशा करतो. कळावे

डॉ. दळवींनी फरूकारची भेट घेतली. विजेचे जमणार नाही असेच तो म्हणाला.

आपला नम्र

**एकनाथ पटवर्धन**

श्री. नारायराव फडके यांनी परवा मुद्दाम भेटायला बोलावले. नागपूरच्या आसपास ५ मैलांच्या टापूत राहणाऱ्या खेड्यातील लोकांच्या धान्याची व्यवस्था शहरात होत नाही. ती खेडी शहरातली असल्यामुळे त्यांनाही रेशन कार्डे देण्याची व्यवस्था व्हावयास पाहिजे. आठवडी बाजारात त्यांना सरकारी भावाने धान्य मिळत नाही. श्री. नारायणरावांची इच्छा फुड डिपार्टमेंटमधे कुठे तरी ऑनररी घुसण्याची आहे. सेलिंग अगर खरेदी बोर्डावर सभासद म्हणून नेमणूक झाली तर जनतेची चांगली सेवा करता येईल. असे त्यांना वाटते. श्री. कामत यांना आपण त्यांचे बद्दल सांगावे अशी त्यांची अपेक्षा आहे. श्री. कामत हे तेथे येणार आहेतच.

## मी माडखोलकरांना दुसरी अडणी दिली

अशा रीतीने ज्या माडखोलकराची 'महाराष्ट्रा'तील अडणी डळमळीत झाली होती त्या माडखोलकरांना 'तरुण-भारत' काढून मी दुसरी अडणी निर्माण करून दिली. त्याचप्रमाणे या माझ्या उपक्रमाने पटवर्धनांच्या त्यावेळपावेतोच्या रुक्ष आणि विराण आयुष्यात मी हिरवळ निर्माण केली असे म्हणण्याचे कारण 'तरुण-भारत' निर्माण झाल्यावर माडखोलकर त्याचे वैतनिक मुख्य संपादक झाले व पटवर्धन हे माडखोलकरांच्या हाताखाली वैतनिक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ उपसंपादक झाले. हे दोघेही आजतागायत (वीस वर्षे) आपापल्या पदावर आहेत. याचा अर्थ मी 'तरुण-भारत' काढल्यामुळे या दोघांना समाजात मानाचे व धनाचे स्थान प्राप्त झाले.

सुरुवातीच्या काळात माडखोलकर माझ्यावर किती अवलंबून होते व माझ्यावर त्यांचा किती विश्वास होता हे त्यांनी २४-७-४४ या रोजी मला पाठविलेल्या पत्रावरून दिसून येईल. म्हणून त्यांचे ते समग्र पत्र येथे देतो.

२४-७-४४

शांता निवास,<br>
शुक्रवार तलावासमोर,<br>
नागपूर शहर. (सी. पी.)

ना. डॉ. खरे यांचे सेवेसी,

कृ. सा. न. वि. वि. आपण दिल्लीस पोचल्याबरोबर आपल्याला हे पत्र लिहून तसदी देण्याचा प्रसंग मजवर यावा, या बद्दल मला खेद वाटतो. पण, गेल्या आठवड्यातील आपल्या येथील मुक्कामात आपल्या समक्ष जे प्रकार घडले, आणि ज्यामुळे आपल्यालाही अत्यंत उद्वेग आला असल्याचे

आपण स्पष्ट बोलून दाखविले, त्या प्रकारामुळे आपल्याला हे पत्र घालणे मला प्राप्त झाले आहे.

शनिवार ता. २२ रोजी मध्यरात्री ट्रस्टच्या सभेनंतर मी जेव्हा राजीनामा देण्याचा विचार माझ्या मनात वारंवार घोळत असल्याचे आपल्याला सर्वांच्या समक्ष बोलून दाखविले, तेव्हा आपण मला राजीनामा न देता ट्रस्टमध्ये राहून काम करण्याची आज्ञा केली; व ती मी तत्परतेने मान्यही केली.

पण सध्याच्या संशयग्रस्त परिस्थितीत काम करावयाला उत्साह वाटत नाही व भविष्यकाळाबद्दल कोणत्याही प्रकारची सुरक्षितता किंवा शाश्वतीही (Security) दिसत नाही. आपल्याला या परिस्थितीची आता प्रत्यक्ष आणि पूर्ण कल्पना आलेली आहे. तरी आपणाकडून जर मला निश्चित आश्वासन मिळेल, तर इतरांच्या कृत्यांची किंवा वर्तनाची पर्वा करण्याचे मला कारण उरणार नाही; व आपल्या आश्वासनामुळे मला काम करावयाला आपलेपणा आणि खात्री वाटेल. तरी आपण या बाबतीत निःसंदिग्ध आश्वासन देण्याची कृपा करावी.

हे पत्र आज सब ट्रस्टच्या बैठकीत वाचून दाखवून नंतर मी आपल्याकडे पाठवीत आहे.

पत्राचे उत्तर माझ्या खासगी पत्त्यावर पाठवावे अशी विनंती आहे.
क. लो. अ. ही वि.

आपला

**ग. त्र्यं. माडखोलकर**

त्याचप्रमाणे माझ्याकडून कसकशी मदत मागण्यात येत असे हे 'तरुण–भारता'चे संघटक श्री. पटवर्धन यांनी ता. ४ सप्टेंबर १९४४ या रोजी मला पाठविलेल्या पत्रावरून स्पष्ट होईल. तेही पत्र येथे देतो.

नागपूर
ता. ४ सप्टेंबर १९४४

डाक्टर साहेब,

सा. न. वि. वि. आपली पत्रे पावली. श्री. माडखोलकर यांना आलेली पत्रेही वाचण्यात आली व मला आलेली पत्रे तरुण–भारत ट्रस्टच्या सभासदांना वाचण्यास दिली.

आपण उद्धव शास्त्रीबद्दल रदबदली केली परंतु त्यात यश आले नाही. त्यांच्या पत्नीची प्रकृती ठीक रहात नाही. आपण मुंबई सरकारला त्यांच्या-

बद्दलचे लिहिलेले पत्र उद्धवरावना दाखविण्यात आले व त्याचे उत्तर त्यांनी आपणाला धाडले असे त्यांच्याकडून त्यांच्या पत्नीला रीतसर पत्र आले आहे. आपणाला ते पत्र मिळाले असेल असे धरून चालण्यास हरकत नाही.

दुसरे, हिंदुस्थान सरकारकडील सिव्हिलसप्लाईज, ब्रॉडकास्टिंग, रेलवे बोर्ड, पोस्ट–तारखाते, पोस्टवार योजना वगैरे खात्याच्या जाहिराती मिळविण्याबद्दल काय खटपट करावी याबद्दल मार्गदर्शन करावे.

शहरातील कामाची घडी नीट बसविण्याचा प्रयत्न सुरू आहे. साप्ताहिक तरुण भारत काढण्याच्या दृष्टीने सोमवारचा तरुणभारत काढण्याचा इरादा आहे. कोजागिरी पौर्णिमा ता. २ आक्टोबर पासून अंक सुरू करण्यास परवानगी मिळावी म्हणून हिंदुस्थान सरकारकडे अर्ज केला आहे. अजून त्यांच्याकडून उत्तर आले नाही.

राजधानीचा रागरंग समजण्याचा काही मार्ग दिसत नाही.

निंबोलीच्या जोशींना श्री. रामभाऊ मनोहर यांनी पत्र पाठविले आहे. त्यांच्याकडून काय उत्तर येते ते पाहू.

हिंदुस्थान सरकारची प्रकाशने ( Publications ) अजून तरुण भारताकडे येऊ लागली नाहीत. त्याबद्दल काय करावे हे कळवावे.

नोव्हेंबर मध्ये मध्यवर्ती असेंब्लीची बैठक आहे त्या वेळी तरुण-भारताच्या प्रतिनिधीला पास मिळावा अशी मागणी करावयाची आहे. आपला हक्क आपण नोंदवून घ्यावा हा मूळ उद्देश आहे. तरी आपण कळवाल त्या वेळी योग्य अधिकाऱ्यांकडे अर्ज येथून पाठवू. हेच पत्री सर्वत्र मंडळीस नमस्कार. कळावे.

आपला

**ए. श्री. पटवर्धन**

सध्या संस्थेची आर्थिक चणचण जास्त भासत आहे. डॉ. दळवी हे नरकेसरी स्मारक संस्थेला ( Trust ला ) मुलांच्या दवाखान्यासाठी काही रक्कम आपल्या स्वाधीन करण्याच्या विचारात आहेत. 'मुलांचा–दवाखाना' अभ्यंकरांचे स्मारकासाठी चालवावा अशी त्यांची योजना आहे. त्यांची योजना तयार झाल्यावर ती आपणाकडे धाडण्यात येईल. यात पैशाची नवीन जबाबदारी संस्थेवर राहणार नसून दवाखाना ट्रस्टने चालवावा अशी डॉ. दळवींची इच्छा दिसते.

**ए. श्री. पटवर्धन**

## माझा 'तरुण–भारता'शी दैनंदिन संबंध नव्हता

'तरुण–भारता'च्या व्यवस्थेशी माझा प्रत्यक्ष दैनंदिन संबंध काहीही नव्हता. कारण मी व्हाइसरॉयच्या कौन्सिलचा सदस्य असल्याकारणाने माझा मुक्काम नवी दिल्ली येथे असे. मी फक्त येऊन जाऊन नागपूरला असे. १९४५ च्या मे महिन्यात व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्ये खटपट केली व व्हाइसरॉय आणि कमांडर इन चीफ या दोघांनाही मी राष्ट्रीय सैनिक विद्यालयाचे महत्त्व पटवून दिले. साधक-बाधक चर्चेनंतर व व्हाइसरॉयने सर्व संभाव्य जागांची पहाणी केल्यानंतर हे राष्ट्रीय सैनिक विद्यालय पुण्यांजवळ खडकवासला येथे स्थापन करण्याचा निर्णय हिंदुस्थान सरकारने घेतला.

## श्री. ज. रा. जोशी व श्री. माडखोलकर

श्री. ज. रा. जोशी यांनी माझ्या मराठी चरित्राचा पहिला भाग १९४३ मध्ये प्रसिद्ध केला. त्या कार्यात त्यांना माडखोलकरांची मदत झाली. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीतील माझ्या कामगिरीचे वर्णन करण्यासाठी माझ्या मराठी चरित्राचा दुसरा भाग लिहिण्याची जोशीबुवांना इच्छा झाली. माझ्याकडून माहिती घेण्यासाठी ते काही दिवस दिल्ली, अलवर इत्यादि ठिकाणी येऊन राहिले व त्यांनी मार्गदर्शना-साठी माडखोलकरांनाही पत्र लिहिले. जोशीबुवांच्या त्या पत्राला माडखोलकरांनी ता. २७–६–४७ या रोजी उत्तर पाठविले. त्या उत्तराचा ब्लॉकच येथे देतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९३८
शाखा

# संयुक्त महाराष्ट्र परिषद

मुंबई :: पुणें :: नागपूर

तरुण भारत कचेरी
नागपूर शहर, ता. २८.६.५८

श्री जगन्नाथराव जोशी यांस,

स न आपलें ता. १५ चे पत्र मी ता. २५ रोजी दौऱ्याहून परत आल्यावर मिळाले. डॉक्टर साहेबांच्या चरित्र लेखनाच्या बाबतींत आपल्याला मजकडून शक्य ते सर्व सहाय्य मिळेल हें मी आपणास पूर्वीच सांगितले आहे डॉक्टरांच्या चरित्राच्या या भागांत जरी खरे प्रकरणासारखे वादग्रस्त कांड नसले तरी त्यांच्या विधायक कामगिरीच्या दृष्टीने त्यांच्या आयुष्याचा हा भाग सर्वांत महत्वाचा होय. द. आफ्रिका, एकंदर कॉमनवेल्थ खातें पार्लमेंटरी शिष्टमंडळांना त्यांनी सादर केलेल्या सामुदायिक आणि वैयक्तिक कैफियती, लष्करी ॲकॅडमीची योजना हीं मुख्य अंगें विधायक आहेत. याबाबतींत जे अंतर्गत झगडे झाले असतील त्यांचे वर्णन व डॉक्टरांच्या कर्तबगारीचा वृत्तांत ही दोन्ही साधार मुद्देसूद.

आणि संयमाची मर्यादा पाहून दिली पाहिजेत. त्याचप्रमाणे फाशी निवारण्याच्या बाबतीतील हे त्यांचे अंतर्गत कार्य महत्त्वाचे आहे. तेहि साधार लोकांपुढे आले पाहिजे. त्यांचा पत्रव्यवहार हे मुख्य साहित्य व भाषणे आणि मुलाखती हे त्यामानाने गौण साहित्य मी समजतो. सरकारी पत्रव्यवहार आणि सरकारी घोषणा या सर्वांत महत्त्वाच्या. तसेच, अंतर्गत झगड्यांची माहिती ही त्यांच्याशी समक्ष बोलून व त्यांच्या संमतीने टिपणी तयार करून काळजीपूर्वक लिहिली पाहिजेत.

माझ्या सूचना थोडक्यांत वरीलप्रमाणे आहेत. हस्तलेखीत तयार झाल्यावर ते मी काळजीपूर्वक वाचीन आणि योग्य त्या सुधारणाहि सुचवीन.

बाकी विशेष नाहीं.

आपला

ग. त्र्यं. माडखोलकर

### गुळचट व हिरवट शत्रु

माडखोलकरांची सही असलेल्या वरील पत्रावरून हे स्पष्ट होईल की, लष्करी ॲकॅडमीची योजना माझी आहे, याची जाणीव त्यांना पूर्णपणे होती. असे असताना १९५५ च्या फेब्रुवारी महिन्यात ‘ तरुण-भारता ’त असे प्रसिद्ध करण्यात आले की, पुण्याजवळ खडकवासला येथे हिंदुस्थानचे मुख्य लष्करी विद्यालय स्थापन करण्याचा निर्णय श्री. काकासाहेब गाडगीळांनी घेतला, डॉ. खरे यांनी नाही. ही गोष्ट चुकीची आहे असे माडखोलकर व पटवर्धन या दोघांनाही माहित होते. तरी पण या

दोघांनी हा चुकीचा मजकूर 'तरुण-भारता'त येऊ दिला. याचे कारण माडखोलकर माझे 'गुळचट शत्रू' झाले व ज्यांच्या आयुष्यात मी हिरवळ निर्माण केली ते पटवर्धन माझे 'हिरवट शत्रू' बनले. अशी चुकीची माहिती 'तरुण-भारता'त प्रसिद्ध होऊ देण्यात या दोघांचाही हेतू माझा नैतिक वध करून म्हणजे नामोहरम करून आपला स्वतःचा न्यूनगंड नाहीसा करण्याचा होता. कारण ही चुकीची माहिती जर खरी ठरली असती तर मी आपल्या चरित्रकाराला लष्करी ॲकॅडमी-बद्दल खोटी माहिती पुरवून आपला स्वतःचा खोटाच बडेजाव मिरविला असे सिद्ध झाले असते. पण मी खरीच माहिती दिली होती हे त्यावेळचे केंद्रीय वार्तामंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर यांच्या पत्राने सिद्ध झाले. म्हणून 'तरुण-भारत'कारांना माघार घेऊन आपले चुकीचे विधान परत घ्यावे लागले. पण माझ्या विरुद्ध प्रचार करण्याची खुमखुमी मात्र गेली नाही. माडखोलकरांच्या हातात मी दिलेले 'तरुण-भारता'चे शस्त्र माझ्या विरुद्ध वापरणे सुरूच राहिले. हे त्यावेळेस नागपुरास प्रसिद्ध होत असलेल्या 'मन्वंतर' नावाच्या साप्ताहिकाच्या ता० २६-१०-५६ च्या अंकावरून दिसून येईल. म्हणून त्या अंकात प्रसिद्ध झालेले 'परीक्षणाचे परीक्षण' मुद्दाम येथे होतो.

## परीक्षणाचे परीक्षण

डॉ. खरे यांनी लिहिलेल्या 'माझी गेली बारा वर्षे' या पुस्तकाचे परीक्षण 'तरुण-भारता'च्या दि. १४ आक्टोबर १९५६ च्या अंकात आले आहे. ते परीक्षण जरी लांबलचक असले तरी ते विशिष्ट दृष्टिकोणाने लिहिले आहे, असे दिसून येईल. कारण डॉ. खरे यांनी निरनिराळ्या ठिकाणी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जी घवघवीत कामगिरी बजावली आहे तिच्याबद्दल गौरवाच्या शब्दांचा अभावच या परीक्षणात दिसून येतो. ती कामगिरी नाकारता येतच नाही. कारण तिचा उल्लेख कांग्रेस सरकारने प्रसिद्धिलेल्या संसद सदस्यांच्या जंत्रीमध्येही सापडतो. पण डॉ. खरे यांच्या कार्याबद्दल प्रतिकूल उद्‌गार मात्र या परीक्षणात ठिकठिकाणी सापडतात.

माननीयांचे उद्‌गार या प्रकरणाबद्दल परीक्षणकाराने ते प्रकरण म्हणजे आपलीच बढाई मिरविण्याच्या भावनेने लिहिले आहे असे ध्वनित केले आहे. पण त्याचे हे विधान विसंगत आहे. ग्रंथपरीक्षक म्हणतो, डॉ. खरे यांचे भाषण आणि आचरण हे १९३८ पासून आज पावेतो अनेक बाबतीत वाद-विषय होऊन बसले आहे. असे जर आहे तर माननीयांचे उद्‌गार हे प्रकरण घालून समाजातील निरनिराळ्या पातळीतल्या लोकांनी डॉक्टरांबद्दल काय काय उद्‌गार काढले आहेत हे जनतेसमोर मांडणे क्रमप्राप्तच नाही काय? शिवाय डॉक्टरांनी केवळ स्तुतीपरच उद्‌गार दिलेले नाहीत, निंदागर्भ उद्‌गारही त्या

प्रकरणात देण्यात आले आहेत. यावरून डॉ. खरे यांचा निःपक्षपातीपणाच दिसून येतो आणि परीक्षकाचा आक्षेप फोल ठरतो.

ग्रंथपरीक्षक म्हणतो, 'लोकात मान्यता पावलेल्या व वरिष्ठ सत्ताधारी अशा व्यक्तींनी डॉ. खरे यांना सार्वजनिक जीवनातून उठवून लावण्याची फार शिकस्त केली.' तरीही तो पुढे असे म्हणतो की, 'डॉ. खरे यांनी लोकनायक अणे यांच्या राजीनाम्यामुळे रिकाम्या झालेल्या दिल्लीच्या व्हाइसरॉय कौन्सिल वरील जागेवर जावयास नको होते.' डॉक्टरांना जर सार्वजनिक जीवनात भाग घेण्याचा मोका पुन्हा आला तो त्यांनी साधावयास नको होता असे म्हणण्यास काय कारणे आहेत ती मात्र परीक्षकाने दिली नाहीत. परीक्षकाला असे म्हणायचे आहे काय की शिवाजीने वाघनखे वापरायलाच नको होती. त्याने अफझुलखानाच्या कट्यारीस बळी पडावयास पाहिजे होते. म्हणजेच तो देशभक्त ठरला असता ! डॉ. खरे यांनी अण्यांच्या पश्चात व्हाइसरॉयच्या कौन्सिलची जागा स्वीकारल्याबद्दल 'तरुण–भारता'त प्रतिकूल टीका यावी ही कृतघ्नपणाची कमाल आहे. कारण ती जागा स्वीकारल्यामुळेच 'तरुण–भारता'चा पुनर्जन्म झाला ही गोष्ट दुनिया जाणते. ही टीका म्हणजे एखाद्या पुत्राने लग्न होऊन पोरेबाळे झाल्यानंतर आपल्या बापाला, 'बाबा, तुम्ही लग्नच करावयास नको होते' असे म्हणण्यासारखे आहे.

डॉ. खरे आणि गांधी यांच्यामध्ये झालेल्या संभाषणाबद्दल कै. डॉ. केदार यांनी दिलेले सच्चेपणाचे सर्टिफिकेट हे परीक्षकाला मान्य आहे. पण इतरांशी झालेल्या अशा संभाषणाबद्दल असेच कोणाचे सर्टिफिकेट नाही याबद्दल परीक्षकाने नाक मुरडले आहे. पण अशा झालेल्या गुप्त मुलाखतीत जर दुसरे कोणी हजर नसेल तर त्याला डॉ. खरे काय करणार ? केवळ येवढ्यामुळे डॉ. खरे यांच्यासारख्या सच्चेपणाबद्दल गाजलेल्या व्यक्तीबद्दल अविश्वास दर्शविणे हे 'तरुण–भारता'च्या डॉ. खरे यांच्या उपरोक्त पुस्तकाचे परीक्षण करणाऱ्या लेखकालाच शोभते. सुभाषचंद्र बोस यांच्याशी जी अत्यंत रहस्यमय मुलाखत झाली तिचा स्फोट करणे हे अनुचित तर नाहीच, पण मर्दपणाचे खास आहे. १९५० मध्ये जेव्हा श्री. ज. रा. जोशी यांनी लिहिलेल्या डॉ. खरे यांच्या चरित्राचा दुसरा भाग प्रकाशित झाला, तेव्हा त्या समारंभाचे अध्यक्ष असलेल्या कै. रामभाऊ रुईकर यांनी आपल्या भाषणात या सुभाष बोस आणि डॉ. खरे यांच्या मुलाखतीबद्दल जे उद्‌गार काढले होते त्यांच्याशी ग्रंथपरीक्षक परिचित नसावा असे दिसते.

## माडखोलकरांचे सपशेल खोटे विधान

१९५८ च्या ऑगस्ट महिन्याच्या १२ तारखेला सौ. अनसूयाबाई काळे यांचा दुःखद मृत्यु झाला. 'तरुण–भारत'मध्ये ता. १३ ऑगस्ट रोजी त्यांच्यावर

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि: ........



पहिल्या पानावर मृत्यूलेख प्रसिद्ध झाला. त्यात पुढील विधान आहे, " १९३७ साली आणि नंतर पुन्हा १९४२ साली त्या प्रांतिक कायदेमंडळात निवडून आल्या; व १९४२ साली कायदेमंडळाच्या उपाध्यक्ष **निवडल्या गेल्या .**" हे विधान सपशेल खोटे आहे व मला अनुल्लेखाने मारण्यासाठीच ते करण्यात आले आहे अशी शंका मी व्यक्त करतो. ही गोष्ट जगजाहीर आहे की १९४२ मध्ये दुसरे महायुद्ध जोरात सुरू होते व प्रांतिक राज्यकारभार ९३ कलमाच्या आधाराने गव्हर्नरच पहात असे. तेव्हा १९४२ साली निवडणुकी झाल्याच नाहीत व त्यामुळे १९४२ साली कायदे-मंडळाचा उपाध्यक्ष निवडण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. म्हणूनच हे विधान सपशेल खोटे आहे असे मी म्हणतो. वस्तुस्थिती अशी आहे की, १९३७ साली अनसूयाबाई आणि मी कांग्रेसतर्फे नागपूर-कामठी मतदार संघातून प्रांतिक कायदेमंडळावर निवडून आलो व मी मध्यप्रांताचा पंतप्रधान निवडला गेलो. पक्षाच्या सभेने मला स्पीकर व डेप्युटी स्पीकर ( अध्यक्ष व उपाध्यक्ष ) च्या पदासाठी उमेदवार नियुक्त करण्याचा अधिकार दिला. त्या अधिकारान्वये मी अध्यक्षपदासाठी श्री. घनश्याम सिंह गुप्त यांस नियुक्त केले, व उपाध्यक्षपदासाठी अनसूयाबाईंना नियुक्त केले आणि पक्षाने त्यांना निवडून दिले. या घटनेमध्ये त्यांचे वैशिष्ट्य काहीच नाही. उलट, त्यांनी ११-११-३७ रोजी मला जे पत्र पाठविले आहे आणि जे दुसऱ्या प्रकरणात प्रसिद्ध केले गेले आहे, त्यात त्यांनी असे म्हटले आहे, " This Deputy Speakership besides being a useless post—as there is very little scope to show ability—has been giving me lot of worry and insult. " यावरून हे स्पष्ट होते की अनसूयाबाईंनी या पदावर निवडून येण्यासाठी कोणताच प्रयत्न केला नाही व ध्वन्यर्थाने त्यांना मंत्रिपद हवे होते. काळ्यांनीही आपल्या पुस्तकात माझ्या या विधानाचे समर्थनच केले आहे. 'तरुण-भारत 'कारांनी मला अनुल्लेखाने मारण्याचे कारण प्रस्तुत काळी त्यांचे स्लोगन किंवा घोषवाक्य 'काळीनबाईका बोलबाला और डॉ. खरे का मूंह काला ' असे त्यांनी ठरविले असावे असे दिसते.

**स्वतःची प्रौढी मिरविण्याचा प्रयत्न**

ता. १७-१२-६१ च्या 'तरुण भारता 'त 'महाराष्ट्रा 'च्या संपादक-पदासाठी 'बोलणी ' या शीर्षकाखाली माडखोलकर आणि त्यावेळचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यात झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आहे. माडखोल-करांनी ता. २३-९-६१ रोजी यशवंतरावांना लिहिलेल्या पत्रात खालील मजकूर आहे. " आज मी स्वतंत्र संपादक असल्यामुळे माझ्याशी सर्व पक्षांचे कार्यकर्ते, कांग्रेस नेते आणि मंत्री हे अगदी मोकळेपणाने बोलतात. मुख्य मंत्र्यांना आज निरनिराळ्या बाबतीत माझा जो उपयोग या विशिष्ट परिस्थितीमुळे होत आहे, तो उपयोग मी

'महाराष्ट्रा'चा संपादक झाल्यावर होईल, असे मला वाटत नाही. 'तरुण-भारत' हे मी **स्वतः पुढाकार घेऊन काढलेले** आणि अत्यंत बिकट परिस्थितीत यशस्वी केलेले पत्र आहे. (जाड ठसा माझा) ते सोडणे मला शक्य नाही." माडखोलकरांचे 'मी स्वतः पुढाकार घेऊन काढलेले' हे विधान धडधडीत खोटे आहे व मला अनुल्लेखाने मारण्यासाठी आणि यशवंतरावांजवळ स्वतःची प्रौढी मिरविण्यासाठीच केले आहे हे याच प्रकरणात प्रसिद्ध झालेल्या पटवर्धनांच्या ता. ७-१०-४३ व ता. ४ सप्टेंबर १९४४ च्या पत्रावरून व स्वतः माडखोलकरांच्या ता. २४-७-४४ च्या पत्रावरून सिद्ध होते.

## कुंकू जनसंघाचे पण निष्ठा चव्हाणांच्या चरणी

'तरुण-भारत' हे पत्र जनसंघाचे आहे हे उघड गुपीत आहे. म्हणून आज मी स्वतंत्र संपादक आहे हे माडखोलकरांचे विधान खोटे आहे. त्याचप्रमाणे जनसंघ हा उघड उघड कांग्रेसविरोधी पक्ष असल्यामुळे त्या पत्राचा उपयोग जनसंघविरोधी कांग्रेसपक्षाचे मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण यांना निरनिराळ्या बाबतीत माडखोलकर होऊ देतात हे त्यांचे विधान किती अप्रामाणिक आहे हे सिद्ध होते. म्हणजे कुंकू जनसंघाच्या नावाने आणि निष्ठा कांग्रेसचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या चरणी!

## श्री. बाबुराव धनवटे यांचे माडखोलकरांना पत्र

या पत्रव्यवहारातील माडखोलकरांनी केलेले असत्य विधान केवळ मीच उघडकीस आणले असे नाही; तर ता. २२ डिसेंबर १९६१ च्या 'महाराष्ट्र' पत्रावरून असे दिसते की, श्री. बाबुराव धनवटे यांनीही माडखोलकरांच्या असत्य विधानांचा इन्कार केला आहे. यासंबंधात श्री. बाबुराव धनवटे यांनी श्री. भाऊसाहेब माडखोलकर, संपादक, 'तरुण-भारत' यांस जे पत्र पाठविले आहे ते याच तारखेच्या 'महाराष्ट्रात' प्रसिद्ध झाले आहे. त्यातील संबंधित भाग मी येथे उद्धृत करतो.

श्री. भाऊसाहेब माडखोलकर,
संपादक, तरुण भारत यांस.
स. न. वि. वि.

दि. १७ डिसेंबर १९६१ च्या तरुण भारताच्या अंकात आपण दि. २३-९-६१ ला मा. मुख्य मंत्र्यांना लिहिलेले पत्र प्रसिद्ध केले असून, त्यात दि. १९-९ ला तुमचे माझे आपण महाराष्ट्रात येण्याबद्दल जे बोलणे झाले त्याचा वृत्तांत म्हणून काही मजकूर दिला आहे. त्या पत्रातील "मजकूर

माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे." असा श्री. पु. बा. काळे यांचा शेराही आहे. परंतु हे पत्र प्रसिद्ध होईपर्यंत मला त्याबद्दल काही कल्पना नव्हती. फक्त आपण व मी अशा दोघातच जे बोलणे झाले त्याच्या सत्यासत्यतेबद्दल किंवा बिनचुकपणाबद्दल फक्त आपण व मीच काय ते बोलू शकतो. तेव्हा मा. मुख्य मंत्र्यांना ते पाठविण्यापूर्वी त्याच्या बिनचुकपणाबद्दल खात्री करून घेण्यासाठी मी उपलब्ध असता आपण ते मला दाखवावयास हवे होते असे म्हणणे गैरवाजवी होणार नाही. आपण तसे न करता त्याच्या बिनचुकपणाबद्दल काळेसाहेबांचे सर्टिफिकेट घेण्याचा मार्ग पत्करलेला पाहून मला आश्चर्य वाटले.... (तरुण भारत) सोडणे मला शक्य नाही असे किंवा मी महाराष्ट्रात येत नाही असेही आपण मला स्पष्ट सांगितले नव्हते....

मला उत्तर देण्यापूर्वी आपण ज्यांचा सल्ला घेणार होता त्यात आपण काळेसाहेबांचे नाव घेतले होते. म्हणून दुसरे दिवशी त्यांची भेट झाली असता मी 'महाराष्ट्रा'त येण्याबद्दल आपणाला विचारले असल्याचे त्यांना सांगितले होते. एवढाच या प्रश्नाच्या चर्चेत माझा व काळेसाहेबांचा संबंध आला आहे.

## खोट्या आरोपाचा इन्कार केला नाही

श्री. बाबुराव धनवटे यांच्या या पत्रावरून असे दिसते की, त्यांचे आणि माडखोलकरांचे बोलणे होत असताना श्री. पु. बा. काळे हजरच नव्हते. तरीही माडखोलकरांनी त्या बोलण्याच्या सत्यतेबद्दल श्री पु. बा. काळे यांचा हवाला दिला आहे. धनवटे यांनी स्पष्टपणे केलेल्या खोटेपणाच्या आरोपाचा स्पष्ट इन्कार माडखोलकरांनी 'महाराष्ट्रा'त अथवा 'तरुण–भारता'तही केला नाही. यावरून हा खोटेपणाचा आरोप माडखोलकरांना मान्य आहे असाच निष्कर्ष निघतो.

## अखेर 'महाराष्ट्रा'कडून सत्यान्वेषण

जे श्री. पु. बा. काळे, श्री. बाबुराव धनवटे व श्री. माडखोलकर यांचे बोलणे चालू असताना हजर नसतानाही, ज्यांचा हवाला श्री. माडखोलकरांनी आपण केलेल्या विधानांच्या सत्यतेसाठी दिला आहे त्याच काळ्यांचा दोन अंडीच वर्षे अनुनय करून माडखोलकरांनी त्यांच्याकडून 'अनसूयाबाई आणि मी' हे पुस्तक लिहविले. त्या पुस्तकाची भडक जाहिरात 'तरुण–भारता'त आलीच पाहिजे. त्याप्रमाणे ती ता. ९ सप्टेंबर १९६२ च्या 'तरुण–भारता'च्या अंकात पहिल्याच पानावर आली आहे. त्या जाहिरातीतही मला अनुल्लेखाने मारण्याचा पुन्हा प्रयत्न करण्यात आला आहे. कारण तिचे शीर्षक 'चिमूर–आष्टी प्रकरणी अनसूयाबाई यांचे नाव भारताच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावे' असे आहे. ही जाहिरात वाचल्याबरोबर मी 'तरुण–भारता'मध्ये ताबडतोब विचारणा

केली तेव्हा मला कळविण्यात आले की, या जाहिरातीबद्दल कोणत्याही तऱ्हेचा प्रतिवाद प्रसिद्ध केला जाणार नाही. म्हणून मी ताबडतोब फोन करून 'महाराष्ट्रा'चे संपादक श्री. बाळासाहेब ढवळे यांना विनंती केली की त्यांनी 'महाराष्ट्रा'त मी पाठवीत असलेला मजकूर प्रसिद्ध करावा. ती माझी विनंती त्यांनी मान्य केली आणि अशा तऱ्हेने सत्यान्वेषणाला मदत केली याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. माझा 'महाराष्ट्रा'त ता. १३ सप्टेंबर १९६२ रोजी प्रसिद्ध झालेला तो मजकूर जसाच्या तसा मुद्दाम येथे देतो.

**"अनसूयाबाई काळे आणि मी"** महाराष्ट्र १३ सप्टेंबर १९६२

## तरुण भारतातील जाहिरातीची अवास्तवता

९ सप्टेंबरच्या 'तरुण भारता'च्या अंकात पहिल्याच पानावर 'अनसूयाबाई काळे आणि मी' या पुस्तकाची जाहिरात छापली आहे. तिचे शीर्षक 'चिमूर आष्टीप्रकरणी अनसूयाबाई यांचे नाव भारताच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावे' असे आहे. ही जाहिरात इतर सामान्य जाहिरातींना अपवाद नाही. कारण हे शीर्षक अतिशयोक्ती करणारे आणि अवास्तव आहे.

चिमूर–आष्टी प्रकरणात जे यश मिळाले त्यात अनसूयाबाई काळे, भय्यासाहेब उधोजी, वीर हरकरे इत्यादि कार्यकर्ते व नानासाहेब केदार, रामभाऊ मनोहर, घाटे, रामचंद्रराव पाध्ये, मनोहरपंत बोबडे इत्यादी वकील आणि न्या. मू. पुराणिक व न्या. मू. नियोगी यांचाही आपापल्यापरी वाटा आहे. तसेच 'तरुण भारत' व 'महाराष्ट्र' या वृत्तपत्रांचाही वाटा आहे. 'तरुण भारता'ने चिमूर–आष्टी प्रकरणाबद्दल जो प्रचार केला तो त्यावेळचे मध्यप्रांताचे गव्हर्नर सर हेन्री ट्विनॅम यांना झोंबला आणि त्यांनी "मी 'तरुण–भारता'ला बंद करण्याचा हुकुम देतो" असे पत्र मला दिल्ली येथे पाठविले. या वेळेस म्हणजे १९४५ या वर्षी मी व्हाईसरॉयच्या कौन्सिलचा सदस्य होतो. म्हणूनच त्यावेळी 'तरुण–भारता'चा अपमृत्यू टळला. पण तेच 'तरुण–भारत' १९५५ पासून आपल्या जनकाच्या राजकीय मृत्यूची वांछा करू लागले. कारण १९५५ च्या आगस्टमध्ये मध्यप्रांतातील दीर्घकाल मुख्यमंत्री असलेले पंडित रविशंकर शुक्ल यांच्या ७९व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे गुणगान करीत असताना 'तरुण–भारता'ने झोकून दिले की, डॉ. खरे यांचा राजकीय अस्त झाला. माझा राजकीय अस्त झाला नाही हे माझा प्रस्तुतचा लेखच सिद्ध करील.

'अनसूयाबाई काळे आणि मी' या पुस्तकाच्या जाहिरातीचे शीर्षक कसे अतिशयोक्त आणि अवास्तव आहे हे मी त्या पुस्तकातील उतारे देऊनच सिद्ध करतो. या पुस्तकाच्या २०१ पानावर श्री. एकनाथ श्रीपत पटवर्धन लिहितात, "७ फेब्रु. १९४३ रोजी डॉ. खरे यांच्या बंगल्यावर नागपुरातील कार्यकर्त्यांची सभा होऊन 'फाशी निवारक समिती'ची स्थापना करण्यात आली. सर्वानुमते डॉ. खरे हे या समितीचे अध्यक्ष ठरले व कार्याध्यक्ष म्हणून सौ. अनसूयाबाई काळे यांचीही याच बैठकीत नियुक्ती झाली. फाशी निवारक समितीचा अध्यक्ष या नात्याने डॉ. खरे हे समितीच्या कार्याकरिता लागणारा निधी जमविण्याच्या उद्योगास तत्परतेने लागले.

पुढे डॉ. खरे यांनी, व्हाइसरायच्या एक्झिक्युटिव्हचे सदस्य या नात्याने त्या कामाची ता. ७ मे १९४३ रोजी स्वीकृती करण्याच्या ११-१२ दिवस आधी (२५ एप्रिल १९४३ रोजी), फाशी निवारक समितीची बैठक बोलावून त्या संस्थेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व अध्यक्षपदाची माळा त्यांनी सौ. अनसूयाबाई काळे यांच्या गळ्यात टाकली."

या हकीकतीवरून हे उघड दिसते की, मीच सौ. अनसूयाबाई काळे यांचे मन फाशी निवारक समितीचे अध्यक्ष पद स्वीकारण्यासाठी वळविले व फेब्रु. १९४३ पासून २५ एप्रिल १९४३ पावेतो निधीही जमविला.

याच पुस्तकाच्या २०७ पानावर पटवर्धन लिहितात "अखेरीस जनतेच्या दडपणामुळे म्हणा किंवा अन्य काही कारणामुळे म्हणा, ता. २९ जानेवारी १९४५ रोजी नामदार गव्हर्नरांनी १५ पैकी ८ आरोपींची फाशी रद्द केली."

"ता० ३० जानेवारी १९४५ रोजी (बाकीच्या) सात जणांची फाशी रद्द करा अशी, फाशी निवारक समितीचे अध्यक्ष सौ. अनसूयाबाई काळे यांनी व्हाईसरॉयला तार केली. समितीचे कार्यवाह वीर हरकरे यांनी महात्माजींची भेट घेतली. त्यानंतर पुन्हा व्हाईसरॉयकडे अर्ज करण्यात आले. पण ते फेटाळले गेले व ६ ऑगस्ट (१९४५) ही आरोपींना फाशी देण्याची तारीख निश्चित ठरली. मध्यंतरी दोनदा कायद्याच्या टेक्निकल मुद्यावर फाशी स्थगित झाली होती."

पान २०८ व २०९ वर लिहिले आहे की, ता. १२ मार्च १९४५ रोजी अनसूयाबाई काळे आणि ए. श्री. पटवर्धन हे वर्ध्याला जाऊन गांधीजींना भेटले. त्या भेटीत गांधी म्हणाले, "डॉ. खरे यांनी मागे प्रयत्न केला तेव्हा केस सबज्युडीस आहे असे व्हाईसरॉय म्हणाले होते, पण आता त्यांनी व्हाईसरॉयला पुन्हा म्हणावयाला हरकत नाही. ते उद्या येणार आहेत तेव्हा त्यांना आपण

जरूर सांगावे. तुम्ही जरी म्हटले नाही, तरी ते आपणहून प्रयत्न करतीलच." (अधोरेखा माझी आहे) यावरून गांधीजींचा माझ्या राष्ट्राभिमानावर किती विश्वास होता, ते दिसून येईल.

पान २१० वर पटवर्धन लिहितात, "डॉ. खरे हे जरी यावेळी व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य होते तरी तेही चिमूर–आष्टी प्रकरणातील फाशीच्या आरोपितांना सोडविण्याच्या बाबतीत अत्यंत प्रयत्नशील होते. मे १९४५ मध्ये हिटलरचा पराभव झाल्यामुळे इंग्रजांच्या तर्फे 'विजय दिन' साजरा व्हावयाचा होता या निमित्ताने डॉ. खरे यांनी ता. ९ मे १९४५ रोजी त्यावेळचे हंगामी व्हाईसरॉय सर जॉन कॉल्व्हील यांना एक (confidential) पत्र पाठविले. त्यात त्यांनी या विजयोत्सवाचे प्रसंगी वर्किंग कमिटीच्या सभासदांना व इतर सुरक्षाबंदींना मुक्त करावे, तसेच चिमूर व आष्टी प्रकरणी व याच प्रकारच्या इतर प्रकरणात झालेल्या फाशीच्या शिक्षा बदलून कमी कराव्या," असे स्पष्ट लिहिले आहे.

सरजॉन कॉलव्हिल यांनी, ता. १२ मे १९४५ रोजी डॉ. खरे यांना लिहिलेल्या उत्तरात '...चिमूर-आष्टी व तत्सम इतर प्रकरणी झालेल्या शिक्षांविषयी माझ्याही मनात बरेच दिवस विचार घोळत आहेत. विजयोत्सवाचे प्रसंगी या शिक्षा कमी करणे श्रेयस्कर होईल किंवा नाही याविषयी मन साशंक आहे. परंतू कायद्याची गुंतागुंत उकलेपर्यंत थांबणे अनेक कारणामुळे श्रेयस्कर ठरेल...मी केवळ अल्पावधीकरिता ॲक्टिंग गव्हर्नर–जनरल असल्यामुळे मीच आपल्या सूचनेचा विचार करणे योग्य होणार नाही' असे कळविले."

अनसूयाबाई काळे यांनी केलेले सर्व प्रयत्न असफल होऊन ता. ६ ऑगस्ट १९४५ ही फाशीची तारीख ठरली. असे असताना ता. १६ ऑगस्ट १९४५ रोजी फाशी माफ केल्याचे व्हाईसरॉय साहेबांनी जाहीर केले. हे कसे घडले हे मी माझ्या इंग्रजी आत्मचरित्रात साधार दिलेच आहे. ता. ५ जून १९४५ रोजी स्थिरपद व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल हे विलायतेवरून परत आले. हंगामी व्हाईसरॉय जॉन कॉलव्हिल यांनी १२ मे १९४५ या तारखेच्या पत्रात मला वचन दिल्याप्रमाणे माझे ९ मे १९४५ चे पत्र वेव्हेल साहेबांपुढे ठेवलेच असले पाहिजे. त्यानंतर मी लॉर्ड वेव्हेल साहेबांशी चर्चा करून त्यांचे मन दोन्ही बाबतीत वळविले. कांग्रेस वर्किंग कमेटीच्या सदस्यांची मुक्तता १५ जून १९४५ रोजी जाहीर झाली व पुढे जपानच्याविरुद्ध जय मिळाल्याचे निमित्त होऊन चिमूर–आष्टी बंदींची फाशीही माफ करण्यात आली. म्हणून पान १३४ वर पु. बा. काळे लिहितात, "या सात जणांचे

प्राण वाचविण्यात डॉ. खरे यांचा फार मोठा हिस्सा आहे.... डॉ. खऱ्यांनी यावेळी व्हाईसरॉय अथवा त्यांचे सहकारी यांची मुळीच खंत बाळगली नाही. हेही येथे नमूद करणे आवश्यक आहे."

या सर्व हकिकतीवरून हे स्पष्ट होईल की, चिमूर–आष्टीच्या प्रकरणात आरंभही माझ्याकडून झाला आहे व शेवटचा यशस्वी टोलाही मीच हाणला आहे. म्हणून भारताच्या इतिहासात अनसूयाबाई यांचे नाव जर सुवर्णाक्षरांनी लिहावयाचे असेल तर माझे नाव प्लॅटिनम या धातूच्या अक्षरात लिहिले पाहिजे. कारण प्लॅटिनम हा धातु सोन्याहून टणक आहे आणि सोन्यापेक्षा पाच पट मौल्यवान आहे. पण माझे मत असे आहे की, हे काही करण्याची गरज नाही. कारण भारताच्या हजारो वर्षांच्या विस्तीर्ण आणि विशाल इतिहासात या इवल्याशा गोष्टीला काय महत्त्व आहे ?

नागपूर, १३ सप्टेंबर १९६२. **ना. भा. खरे**

### अभ्यंकरांचे संकल्पित चरित्र आणि मी

दरम्यान मला अभ्यंकर सेवा मंडळाकडून अभ्यंकरांच्या संकल्पित चरित्रामध्ये घालण्यासाठी त्यांच्याबद्दल मला असलेली माहिती मी द्यावी असे पत्र आले. त्या पत्राला मी जाहीर उत्तर दिले. ते ता. ९ सप्टेंबर १९६२ च्या 'महाराष्ट्रा'त प्रसिद्ध झाले आहे. ते असे.

## नरकेसरी अभ्यंकर यांचे संकल्पित चरित्र

### डॉ. ना. भा. खरे यांचा खुलासा

अभ्यंकर सेवा मंडळाच्या काही कार्यकर्त्यांच्या मार्फत माझे दिवंगत नेते व मित्र नरकेसरी अभ्यंकर यांचे चरित्र लिहिले जात आहे असे कळते. माझा व कै. नरकेसरी अभ्यंकरांचा १५–१६ वर्षांवर फार घनिष्ट संबंध होता. आमची दाट खाजगी व राजकीय मैत्री होती. म्हणून माझ्याकडे त्यांच्या चरित्रासाठी, मी माहिती द्यावी असे पत्र आले आहे. तशी माहिती मी देणार होतो. पण पूर्ण विचारांती मी ठरविले आहे की तशी माहिती देणे युक्त होणार नाही. कारण नुकतेच 'अनसूयाबाई आणि मी' या नावाचे पुस्तक जे प्रसिद्ध झाले आहे त्यातील १०४ व १०५ पानावर कै. नरकेसरी अभ्यंकरांची बदनामी करणारा मजकूर छापण्यात आला आहे. त्या पुस्तकाच्या पान तीस वर लेखकाने स्पष्ट लिहिले आहे की ते पुस्तक ज्या स्वरूपात प्रसिद्ध झाले आहे त्याला श्रीयुत माडखोलकर आणि पटवर्धन हे जबाबदार आहेत

आणि हेच कै. नरकेसरी अभ्यंकरांच्या चरित्रलेखनाच्या उपक्रमात प्रमुख आहेत. म्हणून माझे असे मत आहे की अशा लोकांसाठी उपयोगी होण्याकरिता माहिती देणे म्हणजे माझ्या दिवंगत मित्राचा व नेत्याचा अपमान आहे. तो मी करू इच्छित नाही. म्हणून माहिती देऊ इच्छित नाही. माझ्या नकाराने जनतेत गैरसमज निर्माण होऊ नये यासाठी माझ्या या जाहीर पत्रकास प्रसिद्धी देऊन मला उपकृत करावे.

'महाराष्ट्रा'त प्रसिद्ध झालेले हे माझे पत्र वाचून अभ्यकरांच्या बदनामीला अप्रत्यक्षपणे कारणीभूत झालेले श्री. पटवर्धन यांचा मनःक्षोभ झाला आणि त्यांनी ता. १३ सप्टेंबर १९६२ च्याच 'महाराष्ट्रा'त 'बॅरि. अभ्यंकर यांचे संकल्पित चरित्र; श्री. पटवर्धन यांचा खुलासा' या शीर्षकाखाली मजकूर प्रसिद्धिला व त्यात माझ्यावर अनेक आरोप केले. त्या आरोपांना मी जे उत्तर दिले ते ता. १७ सप्टेंबर १९६२ च्या महाराष्ट्रात 'बॅरि. अभ्यंकर यांचे संकल्पित चरित्र : डॉ. खरे यांचे ए. श्री. पटवर्धनांना उत्तर' या मथळ्याखाली प्रसिद्ध झाले आहे. माझ्या या उत्तरात पटवर्धनांच्या प्रत्येक मुद्याला स्पष्ट उत्तर असल्यामुळे श्री. पटवर्धनांचे ते विस्तृत पत्र येथे देऊन मुद्दाम या पुस्तकाची जागा अडवीत नाही. माझे उत्तरच खाली देतो.

## बॅ. अभ्यंकर यांचे संकल्पित चरित्र

### डॉ. खरे यांचे ए. श्री. पटवर्धनांना उत्तर

संपादक 'महाराष्ट्र' यास, स. न. वि. वि.

आपण १३ सप्टेंबर १९६२ च्या अंकात पहिल्याच पानावर 'नरकेसरी अभ्यंकर यांचे संकल्पित चरित्र : श्री. ए. श्री. पटवर्धन यांचा खुलासा' या मथळ्याखाली जो लेख प्रसिद्ध केला आहे, त्याबद्दल आपले आणि श्री. पटवर्धनांचेही आभार मानतो. कारण यामुळे खरी बाजू जनतेसमोर यावयास अवसर मिळाला. श्री. पटवर्धनांनी माझ्यावर जे आरोप केले आहेत त्यांचे निराकरण व त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्याबद्दलचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

'अनसूयाबाई आणि मी' या ग्रंथातील १०४ व १०५ पानातील मजकुराबद्दल श्री. पटवर्धन व माडखोलकर यांच्याविषयी जे विधान मी ता. ९-९-६२ च्या 'महाराष्ट्रा'त केले आहे ते चुकीचे नसून अगदी बरोबर आहे. कारण ग्रंथकर्त्यांनेच आपल्या प्रस्तावनेत पान तीसवर असे म्हटले आहे की, हे पुस्तक ज्या स्वरूपात प्रसिद्ध झाले आहे, त्यासाठी श्री. माडखोलकर, श्री. पटवर्धन व

प्रा. सुरेश डोळके हे जबाबदार आहेत ( अधोरेखा माझी आहे ). प्रा. डोळके यांनी त्याच पुस्तकात आपल्या सहीने स्पष्ट खुलासा केला आहे की, मी पुस्तकातील मजकुराबद्दल व त्यातील विधानाबद्दल जबाबदार नाही. फक्त भाषेबद्दल आहे. ग्रंथकर्त्यांने माडखोलकर आणि पटवर्धन यांच्या जबाबदारीबद्दल असे ठासून विधान केले असताना प्रा. डोळक्याप्रमाणे त्या ग्रंथातच या दोघांनी स्पष्ट इन्कार का केला नाही ? यांनी मौन का पाळले ? म्हणून 'मौनं संमतिलक्षणम्' असेच मानले पाहिजे. म्हणून मी केलेले विधान बेतालही नाही व भलत्याच संदर्भावर आधारलेलेही नाही.

माझे विधान द्वेषबुद्धीने प्रेरित होऊनही केलेले नाही. मी त्यांचा द्वेष कशाला करू ? पटवर्धन आणि माडखोलकरांजवळ असे काय आहे की मी त्याबद्दल त्यांचा द्वेष करावा ? त्यांनी इतका मोठेपणा आपल्या अंगी आहे असा भ्रम बाळगू नये. उलट, मी असं म्हणेन की, १९५५ च्या फेब्रुवारी महिन्यापासून तेच दोघे माझा द्वेष करू लागले आहेत त्याला कारण माझा 'तरुण-भारत' काढण्याचा मूर्खपणा ! मी ते काढल्यामुळे माझे कित्येक वजनदार आणि प्रतिष्ठित मित्र माझेकडे येऊन प्रत्यक्ष म्हणू लागले होते की, मी हे 'तरुण-भारत' काढण्याचा उद्योग आपल्या मित्रांची वर्णी लावण्याकरिता केला. अर्थात हे खरे नाही, पण बोलणाऱ्याचे तोंड कोण धरणार ? हा लोकप्रवाद माडखोलकर आणि पटवर्धन यांच्या कानावर गेला असलाच पाहिजे. अशा रीतीने त्यांची प्रतिष्ठा माझ्या तुलनेने घटल्यामुळे त्या दोघांनाही चीड येणे साहजिकच आहे. म्हणून त्यांनी मनोमन निर्णय केला असला पाहिजे की, याचा वचपा काढण्यासाठी डॉ. खरे यांची प्रतिष्ठा घटवून त्यांना नामोहरम करावयाचे. यासाठी ज्या 'तरुण भारता'चे मुख्य संपादक माडखोलकर आहेत, आणि त्यांचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सहाय्यक संपादक पटवर्धन आहेत, त्या 'तरुण भारता'त १९५५ च्या फेब्रुवारी महिन्यात असे प्रसिद्ध करण्यात आले की पुण्याजवळ खडकवासला येथे हिंदुस्थानचे मुख्य लष्करी विद्यालय (नॅशनल डिफेन्स ॲकाडमी) स्थापन करण्याचा निर्णय श्री. काकासाहेब गाडगिळांनी घेतला, डॉ. खरे यांनी नाही. गंमत अशी की ही गोष्ट चुकीची आहे असे या दोघांनाही माहीत होते. याचा प्रतिवाद करून चूक दुरुस्ती करावी म्हणून जो लेख 'तरुण-भारता'कडे पाठविण्यात आला, तो त्याने छापला नाही. उलट दोन तीन दिवसांनी दिल्लीहून ताजे बातमीपत्र आल्याचे भासवून 'तरुणभारता'ने ते विद्यालय स्थापण्याचा निर्णय काकासाहेब गाडगिळांनीच घेतला असे ठासून प्रतिपादिले. यामुळे मी त्यावेळचे केंद्रीय वार्तामंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर यांना पत्र पाठवून ह्या विद्यालयाच्या स्थापण्याबद्दलच्या

निर्णयाची अधिकृत माहिती बोलावली. ती त्यांनी तत्परतेने पाठविली याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. कारण त्यांच्या तत्परतेमुळे माझ्यावर खोटी बढाई मारण्याचा आरोप येऊन मी नामोहरम होऊ शकलो नाही. डॉ. केसकरांच्या पत्रावरून हे सिद्ध झाले की, ते विद्यालय स्थापण्याचा निर्णय १९४५ च्या मेमध्ये घेण्यात आला. यावेळेस हिंदुस्थान सरकारचा सदस्य मीच होतो, काकासाहेब गाडगीळ नव्हते. यामुळे 'तरुणभारता'ला तोबा करून आपली चुकी दुरुस्त करणारा लेख छापावा लागला. त्यामुळे मला खोटे पाडून नामोहरम करण्याचा 'तरुण-भारता'चा डाव फसला, पण त्याची खुमखुमी मिटली नाही. या नामोशीमुळे 'तरुणभारता'ची माझ्याबद्दलची द्वेषभावना अधिकच बळावली आणि आपले ईप्सित साध्य करण्यासाठी संपादक-द्वय अन्य मार्ग शोधू लागले.

या विद्वान संपादकद्वयाच्या सुदैवाने श्रीमती काळे यांचे चरित्र लिहिण्याची स्फूर्ती श्री. 'काळेसाहेबां'ना झाली आणि त्या चरित्र लेखनाचे कुशल मार्गदर्शनही या संपादकद्वयाने केले याची कबुली स्वतः श्री. काळे यांनीच दिली आहे. या संधीचा फायदा घेऊन त्या चरित्रग्रंथांत माझ्याबद्दल अवास्तव विधाने करून माझ्याबद्दलच्या द्वेषाग्नीत अधिक तेल ओतण्यांत आले. याची दोनच उदाहरणे देतो. चिटणीस पार्कांत शरीफ प्रकरणाची जी प्रसिद्ध सभा झाली, त्या सभेबद्दल काळीण बाईंबद्दलच्या पुस्तकात असे विधान करण्यात आले आहे की, त्या सभेतून मंत्रीद्वय (मी व पं. मिश्रा) पळून गेले. त्या सभेला स्वतः श्री. पटवर्धन हजर होते व सभेचा वृत्तांत 'महाराष्ट्र' पत्रातून सविस्तर व ताबडतोब यावा, अशी खास व्यवस्था त्या वेळचे महाराष्ट्राचे ज्येष्ठ उपसंपादक श्री. माडखोलकर यांनी केली होती. त्याप्रमाणे तो आलाही आहे. असे असताना माझ्याविरुद्ध 'पळून गेले' असे असत्य विधान जे या पुस्तकात करण्यात आले आहे, त्याचा इन्कार या दोघाही मार्गदर्शकांकडून झाला नाही. यावरून हे स्पष्ट होते की, या दोघांचा अंतरीचा हेतू दीर्घकाल टिकणाऱ्या वाङ्मयात माझी नालस्ती करणारी विधाने छापली जावी, असाच असला पाहिजे. याच पुस्तकात एके ठिकाणी 'खरे प्रकरणा'ला उद्देशून असे विधान करण्यात आले आहे की, डॉ. खरे यांनी मध्यप्रांताच्या राजकारणाचा चुथडा केला. यासंबंधी त्यावेळच्या 'महाराष्ट्रा'त गांधी, गांधीवाद, पंडित मंत्री व कांग्रेसचे राजकारण याबद्दल इतके टिंगलखोर व रेवडी उडविणारे लिखाण केले आहे की त्याची बरोबरी दुसरा कोणी करू शकणार नाही. त्यावेळी माडखोलकरांच्या माझ्यावरील असलेल्या आत्यंतिक प्रेमामुळेच हे लिखाण 'महाराष्ट्रा'त आले असावे.

पण या पुस्तकाची प्रस्तावना लिहिताना मात्र माडखोलकरांनी ‘ चुपकी ’ साधली आहे. कारण हेच की, डॉ. खरे यांची बदनामी करणारा मजकूर दीर्घकाल टिकणाऱ्या वाङ्मयात रहावा. माझी १९३८ मधे पंतप्रधान पदावरून पदच्युती झाली. नंतर थोड्याच महिन्यात पटवर्धनांचीही नागपूर म्युनिसिपालिटीच्या उपाध्यक्ष पदावरून उचलबांगडी झाली. त्यामुळे पटवर्धनांनी नागपूरच्या स्थानिक स्वराज्याचा चुथडा केला असे जसे म्हणता येणार नाही त्याचप्रमाणे माझी पदच्युती झाल्यानंतर मी मध्यप्रांताच्या राजकारणाचा चुथडा केला असेही म्हणता येणार नाही. असे असताना मार्गदर्शक पटवर्धन–माडखोलकर मात्र चूप! कारण डॉ. खऱ्यांचा दीर्घद्वेष दुसरे काय ? या द्वेषामुळे पटवर्धनांचा इतका तोल सुटला आहे की ता. ९–९–६२ च्या ‘ महाराष्ट्रात ’ माझे पहिले पत्र प्रसिद्ध झाल्यावर दुसऱ्याच दिवशी मला फोन करून पटवर्धनांनी आपली स्वतःची तुलना पतिव्रतेशी करून मला बाजारबसवीची उपमा दिली. पण यामुळे माझी करमणूक होऊन मी उलट फोनवरून ठीक आहे, ठीक आहे म्हणून पटवर्धनांची गंमत केली.

आश्चर्याची गोष्ट अशी की, श्री. काळे यांनी आपल्या पुस्तकात असा स्पष्ट खुलासा केला आहे की, श्री. पटवर्धन हे बाईंचे राजकारणातील दीर्घकाळ सहकारी असल्यामुळे या पुस्तकात ( अनसूयाबाई आणि मी ) राजकारण-विषयक आलेला भाग त्यांच्या टाचणावरून व त्यांच्याच सल्ल्याने घातला आहे. यावरून स्पष्ट होते की माझ्याबद्दलची या पुस्तकातील असत्य विधाने पटवर्धनांचीच आहेत. ती जबाबदारी ते टाळू शकत नाहीत. हीच गोष्ट माडखोलकरांनाही लागू होते. कारण तेही पुस्तकाचे प्रेरक व मार्गदर्शक आहेत.

पटवर्धन आपल्या पत्रात असे म्हणतात की, डॉ. खरे यांना अभ्यंकरांचे चरित्र प्रसिद्ध करण्यालायक नाही असे तर वाटत नाही ना ? पटवर्धनांचा असे लिहिण्याचा हेतू केवळ लोकांची मने माझ्याविषयी कलुषित करण्याचा आहे. असे मला कसे वाटेल ? कारण मी १९३९ या साली नागपुरात स्वखर्चाने त्यांचा ( अभ्यंकरांचा ) पुतळा उभारून त्यांच्याबद्दलच्या माझ्या भावनांना मूर्तस्वरूप दिले आहे. याशिवाय ‘ पुरुषार्था ’सारख्या प्रसिद्ध मासिकात अभ्यंकरांच्या चरित्रात्मक गौरवास्पद असा लेख लिहून मी माझे कर्तव्य पार पाडले आहे. माझ्या त्या लेखाला मी मथळाच असा दिला की, ‘ गड आला पण सिंह गेला ’. याशिवाय ‘ तरुण भारता ’तही मी अभ्यंकरांबद्दल गौरवात्मक लेख लिहिला आहे. तो तर पटवर्धनांच्या पहाण्यात आलाच असला पाहिजे. अशी वस्तुस्थिती असताना पटवर्धन माझ्याबद्दल गैरसमज पसरवितात. त्याला कारण खरे–द्वेष व मी लोकांच्या मनांतून उतरावा ही इच्छा.

या संदर्भात माझी व अभ्यंकरांची दाट राजकीय व खाजगी मैत्री होती, अशी जाहिरातबाजी मी केल्याचा आरोपही पटवर्धन माझ्यावर करतात. पण हा त्यांचा आरोप बालिश आहे. आमची अशी मैत्री होती हे पटवर्धनांनाही माहीत आहे व नागपूरच्या जनतेलाही माहिती आहे. तेव्हा जाहिरातबाजीची गरज काय आणि त्यापासून मला लाभ तरी कोणता !

अभ्यंकरांच्या चरित्राविषयी अनास्था दर्शवून मी आपल्या स्वतःच्या चरित्राचे इंग्रजी व मराठी भाग प्रसिद्ध करवून घेतले व तिसऱ्या भागाची जोरदार तयारी सुरू असल्याचा आरोपही पटवर्धनांनी माझ्यावर केला आहे. अभ्यंकरांच्या चरित्राबद्दल अनास्था माझ्याकडून होऊ शकत नाही, हे पुतळ्या-बद्दलच्या मजकुरावरून सिद्ध होईल. याशिवाय मी ठासून सांगतो की, मी माझे कोणतेही चरित्र प्रसिद्ध करून घेण्यासाठी कोणतेही पाऊल स्वतः टाकले नाही. माझे चरित्र प्रसिद्ध करून घेणे हे जर पाप असेल तर ते पहिल्याने १९४३ मध्ये पटवर्धन व त्यांचे व माझे मित्र असलेले श्री. माधवराव दातार या दोघांनी केले आहे. कारण त्या दोघांनी 'डॉ. खरे यांची भाषणे व निवेदने' या नावाचे चरित्रात्मक इंग्रजी पुस्तक माझ्या कोणत्याही चरित्राच्या अगोदर प्रसिद्ध केले आहे. या पुस्तकाला श्री. गजाननराव ढवळे यांनी लिहिलेले माझे शब्दचित्रही जोडले आहे. यामुळे या पुस्तकाला चरित्रविषयक पुस्तक अशी संज्ञा प्राप्त व्हावयास हरकत नाही. हे पुस्तक प्रसिद्ध करावे असे मी कधीही सुचविले नाही. हा निर्णय त्या दोघांचाच आहे.

१९४३ मध्ये अभ्यंकरांचे निधन होऊन जवळजवळ नऊ वर्षे झाली होती. या बऱ्याच दीर्घ कालात पटवर्धनांना 'बॅरिस्टर अभ्यंकरांची भाषणे व निवेदने' या नावाचे पुस्तक प्रसिद्ध करण्याची बुद्धी का झाली नाही ? अभ्यंकरांची भाषणे माझ्यापेक्षा जोरदार असत हे कोणीही मान्य करील. असे असताना पटवर्धनांना ही बुद्धी सुचली नाही म्हणून त्यांच्या अभ्यंकरनिष्ठेला बाध येतो असे म्हणता येत नाही. तद्वतच मी अभ्यंकरांच्या चरित्राबद्दल कांही हालचाल केली नाही म्हणून माझ्याही अभ्यंकरनिष्ठेला बाधा येऊ शकत नाही. अभ्यंकरांच्या निधनानंतर जवळजवळ २७ वर्षांनी पटवर्धनांनी अभ्यंकरांच्या चरित्रलेखनाचा प्रपंच सुरू केला. याला कारण एकच ते म्हणजे सौ. काळे यांच्या चरित्राच्या आडून जसा डॉ. खऱ्यांवर हल्ला करता आला, तसाच अभ्यंकरांच्या चरित्रातूनही करता यावा. कारण याही चरित्राची प्रेरक शक्ती पटवर्धन आणि माडखोलकर हीच आहे.

श्री. ज. रा. जोशी यांनी माझे मराठी चरित्र लिहिले आहे. त्यांनाही कधी मी माझे चरित्र लिहा असे सांगितले नाही. ते जेव्हा पहिल्याने माझ्या

चरित्रासाठी माझ्या बालपणची व शिक्षणाची माहिती घेण्यासाठी माझ्याकडे आले, तेव्हा मी त्यांना धुडकावून लावले. ते जेव्हा दुसऱ्यांदा येऊन असे म्हणाले की, 'महाराष्ट्र' कचेरीतील माझे सहकारी श्री. भाऊसाहेब माडखोलकर आणि माझे मित्र श्री. एकनाथराव पटवर्धन यांनी 'चरित्रलेखनाची अवघड जबाबदारी अंगावर घ्यावयास मला प्रोत्साहन दिले' तेव्हाच मी श्री. जोशी यांस माहिती देण्यास कबूल झालो. श्री. जोशी यांचे हे वाक्य त्यांनी लिहिलेल्या 'कां ?' या शीर्षकाच्या मजकुरातील १५ व्या पानावरून उद्धृत केले आहे. म्हणून या चरित्राबद्दलही जबाबदार पटवर्धन आणि माडखोलकरच ठरतात. मी नाही.

१९५५–५६ मध्ये मी हिंदी–मराठी आत्मचरित्रे 'माझी गेली बारा वर्षे' या शीर्षकाखाली लिहिली आहेत. हेही पाऊल माझे नाही. मुंबईला ग. म. जोशी प्रकाशन अशी एक संस्था आहे. त्यांची माझी मुळीच ओळख नव्हती. तरीही त्यांनी मला पत्र पाठवून असा ग्रंथ लिहिण्यासाठी मला विनंती केली व माझ्या लेखनाच्या मेहनतान्याबद्दल चेकही पाठविला, म्हणून मला लिहावे लागले, हा का माझा दोष आहे ? माझ्या इंग्रजीबद्दलही अगदी नेमकी अशीच परिस्थिती आहे. पण लेख फार लांब होऊ नये म्हणून तपशील देत नाही. माझ्या मराठी चरित्राच्या तिसऱ्या भागाबद्दल म्हणाल तर ती सूचना करणारे पत्र मला साहित्यसम्राट नरसोपंत केळकर यांचे सुपुत्र प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. यशवंत नरसिंह केळकर यांच्याकडून त्यांनी माझे इंग्रजी आत्मचरित्र वाचल्यानंतर आले आहे. हे वाचून पटवर्धनांचा जळफळाट होईल. पण त्याला मी काय करू ?

मी जो अभ्यंकरांच्या चरित्र–लेखनाच्या बाबतीत सहकाराच्या भूमिकेपासून असहकाराच्या भूमिकेवर आलो हे गूढही नाही व कोलांटी उडीही नाही. ता. १६ मार्च १९६२ या रोजी श्री. माधवराव दातार यांच्या घरी मला जो अल्पोपहार देण्यात आला, त्यावेळी अभ्यंकरांचे चरित्रलेखन करण्याचे ठरले हे सत्य आहे. त्या चरित्रासाठी माहिती देण्याचे मी कबूल केले हेही सत्य आहे. त्यानंतर मला तशी विनंती करणारे श्री. दातारांचे पत्र आले हेही बरोबर आहे. पण ता. २५ ऑगस्ट १९६२ रोजी 'अनसूयाबाई आणि मी' या पुस्तकाच्या प्रकाशनसमारंभाची जी सभा झाली, त्या सभेनंतर मनू पालटला. त्या सभेत प्राचार्य कोलते यांनी जे भाषण केले त्यामुळे मनात विकल्प निर्माण झाला. त्यानंतर एक दोन दिवसांनी श्री. काळे यांचेकडून 'अनसूयाबाई आणि मी' हे पुस्तक मला भेट म्हणून आले व मी चाळले तेव्हा मला आक्षेप घेण्यासारखे लिखाण माझ्याबद्दल दिसून आले त्याबद्दल मी श्री. काळे यांच्याकडे तक्रार करणारे पत्र पाठविले. त्या पत्राची माहिती लगेच

पटवर्धनांना झाली. यावरून एखाद्या कटात सामील झालेल्या माणसाप्रमाणे यांचे संबंध अत्यंत निगडित आहेत हे सिद्ध होते. मी काळे यांना अभ्यंकरांच्या बदनामीबद्दल विचारले नाही. याचे कारण मी वकील नाही, म्हणून १०४–१०५ पानावरचे अभ्यंकरांबद्दलचे लिखाण अभ्यंकरांना बदनामीकारक आहे किंवा नाही हे मला ठरवता आले नाही. अशा परिस्थितीत श्री. दातार यांजकडून माहिती देण्याबद्दल मला दुसरे पत्र आले. म्हणून मी ता. ६ सप्टेंबर १९६२ रोजी श्री. दातारांना घरी बोलावून माहिती देण्याचे कबूल केले. पण ता. ७ सप्टेंबर रोजी मला कर्णोपकर्णी असे समजले की, ते १०४ व १०५ पानावरील लिखाण अभ्यंकरांना निश्चित बदनामी करणारे आहे, असे मत एका सेवानिवृत्त हायकोर्ट जज्जाने व्यक्त केले आहे. यानंतर ता. ८ सप्टेंबरला सकाळी एक वृद्ध व अनुभवी वकील 'अनसूयाबाई आणि मी' हे पुस्तक घेऊन माझ्याकडे आले व त्यांनी माझी कायद्याच्या दृष्टीने खात्री करून दिली की, ते १०४–१०५ पानावरील लिखाण अभ्यंकरांना नक्कीच बदनामी-कारक आहे, व त्याबद्दल खटलाही होऊ शकेल. यामुळे मी. तावडतोब असह-काराचा लेख लिहून 'तरुण–भारता'कडे पाठविला. 'तरुण–भारता'चे सहसंपादक पटवर्धन हे अभ्यंकर सेवामंडळाचे पण सभासद आहेत. म्हणून माझा निर्णय त्या मंडळालाही आपोआप कळेल असे मला वाटले. म्हणून तो निर्णय स्वतंत्रपणे त्या मंडळाला पाठविण्याची गरज मला वाटली नाही. 'तरुण–भारता'मध्ये माझे असहकाराच्या निर्णयाचे पत्र छापले जाणार नाही असे मी हेरले. कारण थोड्याच दिवसापूर्वी श्री. रामभाऊ मनोहर यांच्या खुलासा मागणाऱ्या पत्राला उत्तर देताना 'तरुण–भारत'ने असे छापले आहे की या वादाला यापुढे स्थान मिळणार नाही. म्हणून मी ताबडतोब महा-राष्ट्राचे संपादक श्री. बाळासाहेब ढवळे यांना फोन करून ते पत्र छापण्याची विनंती केली व त्याची एक प्रत त्यांच्याकडे पाठविली. ती त्यांनी ता. ९–९–६२ 'महाराष्ट्रा'च्या अंकात छापली. याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. यावरून 'तरुण–भारता'ने समजावे की म्हातारीने कोंबडा झाकला तरी सूर्य उगवल्याशिवाय रहात नाही.

आपल्या पत्रात शेवटी पटवर्धनांनी आपल्या पातिव्रत्याच्या तोऱ्यात राजीनामा देण्याची स्टंटबाजी केली आहे. ते फक्त माझ्यावर खापर फोडण्यासाठी आहे. त्याला कोणी फसणार नाही. माझे सहकार्य जर पाहिजे असेल, तर काळे, पटवर्धन आणि माडखोलकर यांनी अभ्यंकरांची बदनामी केल्याबद्दल ज्या जनतेचे अभ्यंकर मान्यवर पुढारी होते त्या जनतेची जाहीर माफी मागावी व १०४ आणि १०५ पानावरच्या मजकुराला कागद चिकटवूनच उर्वरित पुस्तके विकण्याचा किंवा वाटण्याचा प्रबंध करावा.

मी असे म्हणेन की, कांग्रेसच्या इज्जतीसाठीही कांग्रेसवाल्यांनी मी वरील परिच्छेदात सुचविलेल्या गोष्टी घडवून आणण्यासाठी चंग बांधावा. कारण नरकेसरी अभ्यंकर हे त्यांचेही मान्यवर नेते होते.

आता यापुढे या प्रस्तुत वादाबद्दल कोणतेही, कोठेही, केव्हाही, कितीही आणि काहीही लिहिले तरी त्याची मी दखल घेणार नाही. कारण त्या लिखाणामुळे माझे काहीही वाकडे होणार नाही व तो दैनंदिन मानसिक ताण माझ्या वार्धक्याला व अशक्त प्रकृतीला सोसवणारही नाही.

नागपूर, १६-९-१९६२ **ना. भा. खरे**

## माझ्या मताला दोघा सज्जनांची पुष्टी

पटवर्धनांना मी दिलेल्या ह्या उत्तरात असे म्हटले आहे की, 'अनसूयाबाई आणि मी' ह्या पुस्तकात जी अभ्यंकरांची बदनामी झाली आहे, त्याबद्दल पटवर्धन आणि माडखोलकर यांनी जनतेची जाहीर माफी मागावी. कारण अभ्यंकर जनतेचे पुढारी होते. या माझ्या मताचे समर्थन 'महाराष्ट्र'चे संपादक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी या पुस्तकाचे जे समीक्षण केले आहे त्यातही दिसून येते. हे समग्र समीक्षण ता. २३ सप्टेंबर १९६२ च्या 'महाराष्ट्र'त प्रसिद्ध झाले आहे. त्याचे शीर्षकच मुळी 'विचार व संयमाचा अभाव दर्शविणारा बालमनाचा निदर्शक ग्रंथ' असे आहे. त्यातील संबंधित उतारा येथे देतो.

> '…या घटना दिलेल्या स्वरूपातच देण्याचा एवढा अट्टाहास श्री. काळे यांनी का केला या प्रश्नाचे उत्तर मात्र श्री. काळे यांनी स्वतः केलेले समर्थन वाचूनही मिळत नाही. आणि या ग्रंथाची प्रेरक शक्ती (माडखोलकर व पटवर्धन) हा भाग त्यातून काढण्याच्या कामी एवढी दुबळी कशी ठरली याचाही बोध होत नाही.'

अशाच प्रकारचे मत कांग्रेसच्या राजकारणात पुनमचंद गटाचे समर्थक व अभ्यंकरांचे विरोधक 'अभ्यंकरांशी प्रसंगी फुटीनेही वागलो, आपसात लढलो, भिडलो' असे म्हणणारे श्री. राजाभाऊ डांगरे यांनीहि १९ सप्टेंबर १९६२ च्या 'महाराष्ट्र'त 'कालाय तस्मै नमः' या शीर्षकाखाली लेख लिहून व्यक्त केले आहे. त्यांचा तो लेख येथे देण्यात खास स्वारस्य आहे म्हणून तो समग्र येथे उद्धृत करतो.

### कालाय तस्मै नमः

### ले.—राजाभाऊ डांगरे

कै. अनसूयाबाई काळे यांचे यजमान श्री. पी. बी. काळे यांनी नुकतेच 'अनसूयाबाई आणि मी' या मथळ्याचे एक पुस्तक लिहून प्रसिद्ध केले आहे.

त्या पुस्तकातील एका विधानाबद्दल फार वाद माजला ही गोष्ट निर्विवाद आहे. मी दवाखान्यात बिमार असल्यामुळे त्या पुस्तकाच्या प्रसिद्धी समारंभाला हजर राहू शकलो नाही परंतु वर्तमानपत्रांतून त्या विधानासंबंधी जे वाचले व आज शहरात सर्वतोमुखी जी चर्चा चालू आहे व पुढेही चालू राहणार आहे त्याबद्दल मलाच नव्हे तर प्रांतातील प्रत्येक प्रतिष्ठित व्यक्तीला वाईट वाटल्याशिवाय राहणार नाही.

या प्रांतात असा कोण माणूस आहे की, ज्याला कै. अनसूयाबाई माहीत नाहीत. त्यांची सामाजिक व राजकीय कामगिरी व कर्तबगारी सर्वांनाच कबूल करावी लागेल. तरीपण श्री. पी. बी. काळे यांनी पुस्तकरूपाने त्यांच्या बहुविध कर्तबगारीची, स्वभावाची व वागणुकीची वगैरे बारीकसारीक माहिती जनतेला कळावी या स्तुत्य हेतूने प्रयत्न केला आहे. याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

श्री. पी. बी. काळे हे लेखक नाहीत असे मी म्हटले तर त्यांना अन्याय होईल असे काही नाही. हे पुस्तक त्यांनी काही प्रसंग व आठवणी संकलित करून श्री. भाऊराव माडखोलकर व श्री. ए. श्री. पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली लिहून घेतले. आपली पत्नी सर्वच बाबतीत असामान्य होती हे भासविण्याच्या भावनेच्या भरात श्री. काळे यांनी एक भयंकर विधान केले. ते खरोखरच चमत्कारिक आहे. ते शुद्ध आहे की नाही हे जरी मला समजत नसले तरी ते लोकविरुद्ध आहे एवढे मात्र खास. या विधानामुळे कै. अनसूयाबाईंच्या चरित्राला व चारित्र्याला काय उजाळा मिळाला असेल हे फक्त श्री. काळेच समजू शकतात; पण त्यामुळे एका जनमान्य नेत्याच्या चारित्र्याला कलंक मात्र लागलेला आहे हे निश्चित.

आज कै. नरकेसरी अभ्यंकर म्हणजे आमचे प्राणप्रिय मोरूभाऊ अभ्यंकर या महान माणसाची महानता माहित नसणारा माणूस मिळणार नाही. तब्बल एक तप त्यांचा आणि माझा प्रेमाचा व जिव्हाळ्याचा संबंध होता. आम्ही एकजुटीने काम केले आहे. प्रसंगी फुटीनेही वागलो. आपसात लढलो. भिडलो. परंतु आपापली मर्यादा सांभाळून एका झुंजार वीराशी झुंजण्यात आम्हाला समाधान वाटले. कारण ते एक जानी दोस्त व दाणा दुष्मन होते. केवळ काही वादाच्या मुद्याच्या पलीकडे आम्ही गेलो नाही. आणि आज आम्ही पावशतकानंतर देखील त्यांच्या पुतळ्यापुढे नियमित नम्रपणे नतमस्तक होतो. यातच कै. मोरूभाऊंचा मोठेपणा आहे असे मी मानतो.

मी साहित्यिक नसल्यामुळे साहित्यिकाच्या दृष्टीतून या पुस्तकाचे परीक्षण करू शकत नाही. या पुस्तकातील वादग्रस्त वाक्य कायद्याच्या कक्षेत कितपत बसू शकते व कायद्याचा हात कुठवर पोहचू शकतो हा मुद्दाही मी हाताळू इच्छित

नाही कारण मी वकील नाही. परंतु एक सामान्य पण सार्वजनिक कार्यकर्ता म्हणून या पुस्तकातील विधानाने कै. अभ्यंकरांच्या सार्वजनिक व सर्वमान्य शीलाला संपूर्णतया काळिमा लागला आहे. असे माझे स्पष्ट मत आहे.

कै. अभ्यंकर हे केवळ अभ्यंकर घराण्याचीच मालमत्ता नसून एक सार्वजनिक संपत्ति Public Property होते. आणि आम्ही या प्रांतातील सर्व लोक, त्यांचे शत्रू व मित्र ( Friends and Foes ) देखील, त्या संपत्तीचे विश्वस्त ( Trustees ) आहोत. आमचा वाद जो होता तो ती संपत्ती कोणत्या कामी किती प्रमाणात व कशी खर्च व्हावी येवढाच. पण आहे त्या संपत्तीचा सामान्यपणे दुरुपयोग होत असलेला पाहून मन दुःखाने विव्हळ झाल्याशिवाय राहात नाही.

आणि हा दुरुपयोग कोण करतो ? त्यांचे दुष्मन ? छेः ! छेः ! त्यांचे जानी दोस्त, जिवाचे जिवलगच करीत आहेत. मोरूभाऊ मरेपर्यंत ज्यांनी त्यांच्या मानधनावर सर्व प्रकारची मौज मारली तीच मौज आता श्री. काळ्यांच्या काळ्या विधानाला कारणीभूत होऊन अभ्यंकरांच्या अमर कीर्तीला कलंकित करीत आहेत.

कै. अभ्यंकरांच्या स्वर्गस्थ आत्म्याला हे पाहून काय वाटत असेल ? ज्यांनी आपल्या पहाडी आवाजाने या प्रांतात कांग्रेस विरोधाचा पहाड पालथा पाडला, गांधी विरोधाची गंदगी धुऊन काढली, आपल्या सिंहगर्जनेने कांग्रेस विरोधकांची कोल्हेकुई बंद पाडली, आपल्या निःस्वार्थी वागणुकीने स्वार्थी साथीदारांची साथ सोडली आणि राजकारणात व समाजात एक सार्वजनिक नीतिमत्ता निर्माण केली, त्या नीतिमान माणसावर त्यांच्या जिवंतपणी नव्हे तर मेल्यावर देखील पंचवीस वर्षाने त्यांच्याच डाव्या, उजव्या समजल्या जाणारांकडून त्यांचेवर अनैतिकतेचे आरोप करून त्याला लोकात बदनाम करण्याची कारवाई केली जावी हे महान आश्चर्य आहे. अशा वेळी 'God, save me from my friends' 'ईश्वरा, माझ्या मित्रांपासून माझे रक्षण कर' ही उक्ती खरी असल्याचे प्रत्यंतरास येते. असा विपरीत काळ आला आहे. म्हणून मी म्हणतो की कालाय तस्मैः नमः ।।

**मासलेवाईक पत्रे**

'महाराष्ट्र' मध्ये पटवर्धन आणि मी यांच्यामध्ये जो अत्यंत कडवट वाद प्रसिद्ध झाला, त्यामुळे याच्यापुढे माझ्याशी मुळीच संबंध नको असे वाटून पटवर्धनांनी ता. १५–९–६२ रोजी टिळक स्मारक ज्ञानमंदिराच्या सेक्रेटरीपदाचा राजीनामा दिला. कारण या संस्थेचा अध्यक्ष मी होतो. पण पुढे कशी कळ फिरली कोण जाणे,

ता. ८ नोव्हेंबर १९६२ रोजी पटवर्धनांनी मला पत्र पाठवून दिलेला राजीनामा परत घेतल्याचे कळविले. मीही त्यांना त्याच दिवशी उत्तर पाठवून त्यांच्या या पत्राचे स्वागत केले. ही दोन्ही पत्रे मासलेवाईक आहेत म्हणून ती 'इतिहास' म्हणून येथे देतो.

(पटवर्धनांचे मला आलेले पत्र)

नागपूर, ता. ८ नोव्हेंबर १९६२

स. न. वि. वि.

मी आपणाला हे जे पत्र लिहित आहे ते वर्तमानपत्रात प्रसिद्धीसाठी नाही, हे प्रथमच सांगून टाकतो. 'अनसूयाबाई आणि मी' या पुस्तकाचे प्रकाशनानंतर आपण प्रथम 'महाराष्ट्र' वर्तमानपत्रात माझ्यावर जे जाहीर आरोप केले त्यांना मी प्रथम टेलिफोनवरून व नंतर महाराष्ट्रातून जाहीर उत्तर दिले. यानंतर खुलासे प्रतिखुलासेही जाहीरपणे झाले आहेत. यानंतर काही दिवसांनी नागपूर टाइम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या एका पत्रात आपण अप्रत्यक्षपणे मला चिमटा घेतला होता. त्या चिमटा घेणाऱ्या मजकुराला धरून मी आपणाला खरमरीत पत्र लिहिण्याच्या विचारात होतो. अर्थात आपणही आपल्या पद्धतीने पत्राची चांगली संभावना केली असती, याची जाणीव मला आहे. या वादाचा एकदाचा निकाल लावून टाकावा असा माझा विचार होता. पण तो विचार मी आता सोडून दिला आहे. या वादाचा सोक्षमोक्ष करावयाचा म्हणजे मला त्याच्यासाठी वेळ द्यावा लागला असता. पण तो आता न देण्याचे मी ठरविले आहे.

चीनच्या लढ्यामुळे आपसातील वादाला प्राधान्य देणे मला योग्य वाटत नाही. म्हणून मी या वादात पुढे न पडण्याचा निर्णय घेतला आहे. तो आपणाला कळविण्याचीही कांही आवश्यकता नव्हती. कारण हा माझा स्वयंस्फूर्त निर्णय असून तो एकतर्फी आहे. आपल्या वागण्यावर तो अवलंबून नाही. माझ्या वागण्याची आपल्याला पर्वा नाही याची जाणीव मला आहे.

झाले गेले विसरून जाणे उभयतांना शक्य नाही, हेही मी जाणतो. परंतु 'झाले गेले' ते लक्षात ठेऊनही एका विशिष्ट प्रकारे मनुष्य वागू शकतो हेही मी अनुभवत आहे. या दृष्टीनेच मी वागण्याचा प्रयत्न करणार आहे.

माझा निर्णय कळविण्याचे मुख्य कारण म्हणजे टिळक स्मारक ज्ञान मंदिराचे कार्य होय. अभ्यंकर सेवा मंडळ व अभ्यंकर चरित्र समिती यांच्या सदस्यत्वाचा मी राजीनामा दिला व टिळक स्मारक ज्ञान मंदिराच्या सेक्रेटरीच्या जागेचा राजीनामा देऊन आपणच कार्यकारी मंडळाची सभा बोलावून पुढील

कार्यवाही करावी असे सुचविले होते. अजूनपर्यंत कार्यकारी मंडळाची सभा बोलावण्यात आलेली दिसत नाही. या संस्थेचे पुढचे काम अडू नये म्हणून मी सभा बोलावण्यास तयार आहे हे आपणास या पत्राचे द्वारे कळवीत आहे. तरी ही सभा केव्हा व कोठे बोलवावी हे कळविण्याची व्यवस्था करावी. माझ्या मताने ही सभा टिळक स्मारक ज्ञान मंदिरातच भरविणे योग्य होईल. पण त्या विषयी माझा आग्रह नाही हे मी स्पष्ट करू इच्छितो. मध्यंतरी जे प्रकरण झाले ते टिळक स्मारक ज्ञान मंदिराच्या आड देणार नाही असा मी माझ्याकडून कसोशीचा प्रयत्न करणार आहे. तरी सभेविषयी योग्य ती सूचना द्यावी कळावे.

आपला

ता. ८-११-६२ **ए. श्री. पटवर्धन**

ता. क. श्री. दातार यांना मी या पत्राचा मसुदा दाखविला आहे.

( मी पटवर्धनांना दिलेले उत्तर )

८-११-६२

सा. न. वि. वि.

तुमचे आजच्या तारखेचे पत्र मिळाले. 'तरुण-भारता'च्या डाक-बुकात ते मिळाल्याबद्दल सही केलीच आहे. आपणा दोघामधील वादाचा निकाल लावून टाकावा अशी तुमची वृत्ती झाली होती, असे तुम्ही पत्रात लिहिले, त्याबद्दल मला बरे वाटले. पण लागलीच तुमची वृत्ति बदलली असेही तुम्ही लिहिले त्याबद्दल आश्चर्य वाटले. पुढे तुम्ही असेही कळविले आहे की, "चीनच्या लढ्यामुळे आपसातील वादाला प्राधान्य देणे मला योग्य वाटत नाही." मी तुम्हाला नम्रपणे कळवू इच्छितो की, आपल्या वादाचा चीनच्या लढ्यावर परिणाम होण्याइतके आपण दोघेही मोठे नाही. मग तुम्हाला स्वतःला काय वाटत असेल ते असो.

तुम्ही या वादात पुढे न पडण्याचा स्वयंस्फूर्त निर्णय घेतला आहे हे मला कळविल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. कोणत्याही वादाची मलाही खुमखुमी नाही हे मी तुम्हाला सांगितले पाहिजे असे नाही, हे तुम्ही स्वयंस्फूर्तपणे जाणले पाहिजे असे मला वाटते. मी अनेक वाद केले, पण हौस किंवा सुख म्हणून नाही, केवळ आपद्धर्म म्हणून करावे लागले. असो.

झाले गेले लक्षात ठेवूनही मनुष्य चांगला वागू शकतो हे मला मान्य आहे. म्हणूनच तुम्ही टिळक स्मारक ज्ञानमंदिराच्या सेक्रेटरीपदाचा राजीनामा दिला तेव्हा मी ता. १५-९-६२ च्या पत्रात माधवराव दातारांना लिहिले होते की, टिळक स्मारक ज्ञानमंदिराच्या बाबतीत मी सभेत पटवर्धनांशी

चांगला वागेन, आपसातील मनोमालिन्याचा कोणताही परिणाम होणार नाही, हे तुम्हाला दातारांनी कळविले असेलच.

आज तुम्ही त्या संस्थेची सभा बोलावण्यास तयार आहा हे वाचून फार बरे वाटले. सभेच्या जागेबद्दल माझा कोणताही आग्रह नाही. तुम्ही कोठेही बोलावू शकता. पण सोईच्या दृष्टीने माझ्या घरी बोलावली तर बरे होईल. फक्त एक आठवड्याची आगाऊ सूचना असावी.

आपला पूर्व मित्र

**ना. भा. खरे**

ता. क.

तुमच्याप्रमाणेच माझीही इच्छा आहे की हे माझे उत्तर वर्तमानपत्रात प्रसिद्ध होऊ नये. मी कोणालाही दाखवून लिहिले नाही.

## 'शिखंडी' सहीचा 'तरुण-भारता'चा वृत्तलेखक

मला वाटते पटवर्धनांच्या वरील पत्रात दिसून येत असलेली कटुवाद करण्यासंबंधी उपरति लौकरच विसरून गेली. कारण ४ मे १९६३ च्या 'तरुण-भारता'च्या अंकात कै. आप्पासाहेब ढवळे यांचा अल्पपरिचय देतांना पटवर्धनांनी माझ्यावर हल्ला केला. या त्यांच्या हल्ल्याला ता. ८-५-६३ च्या 'तरुण-भारता'त मी उत्तर दिले. त्याच ८ तारखेच्या 'तरुण-भारता'त पटवर्धनांचेही माझ्या उत्तराला प्रत्युत्तर प्रसिद्ध झाले आहे. त्याच्याखाली फक्त वृत्तलेखक अशी 'शिखंडी' सही आहे. पण मी ठासून म्हणतो की, हा वृत्तलेखक म्हणजे पटवर्धनच. दुसरा कोणी असूच शकत नाही. आपले 'ज्येष्ठ आणि श्रेष्ठ' सहकारी पटवर्धन यांचा खोटेपणा उघडकीस येऊ नये म्हणून त्यांचे मित्र, संपादक 'तरुण-भारत' यांनी पटवर्धनांच्या पत्राखाली ता. ८-५-६३ च्या अंकात 'या वादाला यापुढे स्थान मिळणार नाही' असा शेरा मारून माझी मुस्कटदाबी केली. असा शेरा मारणे म्हणजे पोरकटपणा आणि हलकटपणा आहे. जसे एकाद्या वात्रट पोराने रस्त्यावरील एखाद्या वाटसरूला दगड मारून दार लावून आपल्या घरात बसावे. ता. ८-५-६३ च्या 'तरुण-भारता'त आलेला हा सर्व पत्रव्यवहार येथे देण्यात येत आहे.

## 'तरुण भारता'तील मजकूर विपर्यस्त आहे

### डॉ. खरे यांचा आक्षेप

श्री संपादक, 'तरुण भारत' यांस

ता. ४ मे १९६३ च्या आपल्या 'तरुण भारता'च्या अंकात पान ३ वर 'कै. आप्पासाहेब ढवळे यांचा अल्प परिचय' या मथळ्याखाली पुढील मजकूर प्रसिद्ध झाला आहे.

"...डॉ. खरे यांची भाषणे व निवेदने यांचे जे पुस्तक प्रसिद्ध झाले, त्याला श्री. आप्पासाहेबांनी प्रस्तावना लिहिली आहे. तीत स्पष्ट म्हटले आहे की, डॉ. खरे यांची निवेदने किंवा भाषणे प्रसिद्ध करणे म्हणजे त्यांच्या मतांना मान्यता देणे नव्हे. त्यांचे म्हणणे काय आहे हे लोकांसमोर यावे येवढाच हेतू हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा आहे. सारांश, आप्पासाहेब हे भाषण करण्यात व लिहिण्यात फार काटेकोर व दक्ष असत."

हे उपरोल्लेखित पुस्तक नरकेसरी प्रेसमध्ये छापून श्री. माधवराव दातार आणि एकनाथराव पटवर्धन या मित्रद्वयांनी ता. २ एप्रिल १९४३ रोजी प्रसिद्ध केले आहे. हे पुस्तक इंग्रजीमध्ये आहे. या पुस्तकाला श्री. आप्पासाहेब ढवळे यांनी पेन पिक्चर ' या शीर्षकाखाली इंग्रजीत प्रस्तावना लिहिली आहे, ती मी चूक होऊ नये म्हणून तीनचार वेळा समग्र वाचली. त्यात जागोजागी माझ्याबद्दल प्रशंसोदगार काढले आहेत. पण त्या प्रस्तावनेत "डॉ. खरे यांची निवेदने किंवा भाषणे प्रसिद्ध करणे म्हणजे त्यांच्या मतांना मान्यता देणे नव्हे" अशा अर्थाचा किंवा लोकांचा तसा समज निर्माण होईल अशा प्रकारचा मजकूर आप्पासाहेबांच्या या इंग्रजी प्रस्तावनेत कोठेही नाही. म्हणून मी ठासून म्हणतो की ४ मे १९६३ च्या 'तरुण भारता'त पान ३ वर प्रसिद्ध झालेले वरील वाक्य सपशेल खोटे आहे व माझ्यावर ते जाणूनबुजून अन्याय करणारे आहे. माझी मते जी आहेत ती मी कोणालाही खूष करण्यासाठी किंवा वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठी बदलणार नाही. मी ज्यांना अलिकडे आवडत नाहीसा झालो आहे अशा माझ्या मित्रांनी माझ्याबद्दल वाटेल ते लिहावे, पण खोटे लिहू नये, एवढीच त्यांना माझी नम्र विनंती आहे.

नागपूर, ४-५-६३ **ना. भा. खरे**

## मी लिहिले तेच बरोबर

### वृत्तलेखकाचे उत्तर

श्री संपादक 'तरुण भारत' यांस,

डॉ. खरे यांचे पत्र आपण मला दाखविलेत याबद्दल मी आपला आभारी आहे. डॉ. खरे यांच्याविषयीच्या पुस्तकात 'आमच्या वाचकांना' या शीर्षकाखाली श्री. म. ग. दातार आणि श्री. पटवर्धन यांनी सुरुवातीला काही लिहिले आहे. वरील मित्रद्वयांनी आपल्या मजकुरात पुढील वाक्य लिहिले आहे :—

"It is not our business to justify every word or action of Dr. Khare but we find that there is a great

deal of misunderstanding in many of his statements and so we thought that whatever has been said by him be brought together in print." अर्थात् डॉ. खरे यांच्यावर 'जाणूनबुजून'च काय नकळत देखील अन्याय करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. पण 'तरुण भारता'ला पत्र लिहिण्यात मात्र डॉ. खरे यांनी श्री. अप्पासाहेब ढवळे यांच्यावर जाणूनबुजून जरी नसला, तरी नकळत का होईना, अन्यायच केला आहे, असे म्हणावे लागते. श्री. अप्पासाहेब ढवळे हे डॉ. खरे यांचे निव्वळ स्तुतिपाठक होते असा ग्रह डॉक्टरसाहेबांच्या पत्रावरून कोणत्याही अजाण माणसाचा होण्याचा संभव आहे. आप्पासाहेब ढवळे यांच्यातील काटेकोरपणा व दक्षता हे गुण काढून घेण्यासाठी जणू काही त्यांनी इतक्या घाईने पत्र लिहिले असावे पण माझ्या वृत्तलेखनातील श्री. आप्पासाहेब ढवळे यांची स्तुति म्हणजे काही डॉ. खरे यांची निंदा नव्हे. पण डॉ. खरे यांना मात्र तसेच वाटत आहे, असे दिसते.

'मित्रद्वया'च्या वरील मजकुरानंतर 'पेन पिक्चर' या शीर्षकाखाली श्री. आप्पासाहेब ढवळे यांनी डॉ. खरे यांचे स्वभावचित्रण करणारा मजकूर इंग्रजीत लिहीला आहे. हा मजकूर प्रस्तावना आहे असे डॉ. खरे आपले खुलाशात म्हणतात. या मजकुरात डॉ. खरे यांचे गुणवर्णन करताना श्री. आप्पासाहेब ढवळे म्हणतात की, 'I may be wrong—I hope I am wrong, but I have felt and felt long that Dr. Khare unlike the late Mr. Abhyankar has not been able to capture the imagination of the masses.'

डॉ. खरे यांना श्री. ढवळे यांनी लिहिलेल्या मजकुरात त्यांच्या विषयी जागोजागी प्रशंसोद्गार दिसणे स्वाभाविक आहे. पण त्या लेखाचा शेवट करणाऱ्या परिच्छेदात श्री. आप्पासाहेब ढवळे म्हणतात,

"Such is Dr. Khare. I have tried to depict him as I saw him. Perhaps mine may be a wrong angle of vision." या वाक्यामध्ये श्री. आप्पासाहेब ढवळे यांचा काटेकोरपणा व दक्षताच दिसून येते आणि तेच मी, आप्पासाहेब ढवळे यांच्या अल्पपरिचयात म्हटले आहे.

ता. ४ मे च्या 'तरुण भारता'च्या वृत्तांतातील उद्देश स्पष्ट आहे. आप्पासाहेब ढवळे यांचे गुणग्रहण करणे एवढाच तो उद्देश आहे. अर्थात् तो मजकूर खोटा आहे, हा डॉ. खरे यांचा आरोपच धादांत खोटा आहे, हे वरील इंग्रजी उताऱ्यावरून स्पष्ट दिसेल. श्री. आप्पासाहेब हे लिहिण्यात दक्ष व काटेकोर होते, हे त्यांच्या वरील वेचक इंग्रजी वाक्यावरून कोणालाही पटेल.

पण डॉ. खरे यांचे समाधान कोण करू शकेल ? त्यांना आपल्यावर कोणी ना कोणी अन्यायच करीत सुटला आहे असेच सारखे वाटते. त्यांच्या या वाटण्याला कोणाचा काय इलाज ?

आपला
**वृत्तलेखक**

**★ हा वाद बंद**

ह्या वादाला यापुढे स्थान मिळणार नाही.

— **संपादक** 'तरुण भारत'

## पटवर्धनांचा खोटेपणा व तरुण-भारताचा भ्याडपणा

पटवर्धनांचा हा विपर्यास व खोटेपणा त्यांचे जिवश्चकंठश्च मित्र श्री. म. गं. दातार यांनाही सहन झाला नाही. पण 'तरुण-भारता'ने दार बंद केले म्हणून त्यांनी ता. ११ मे १९६३ च्या 'महाराष्ट्रा'त पटवर्धनांचा खोटेपणा उघडकीस आणणारा लेख प्रसिद्ध केला. तो लेख व त्याच्यावरील संपादकाची टीका येथे देतो. म्हणजे वाचकांना पटवर्धनांच्या खोटेपणाचा व 'तरुण-भारता'च्या भ्याडपणाचा प्रत्यय येईल.

# कै. आप्पासाहेब ढवळे व 'तरुण भारता'तील मजकूर

## डॉ. खरे यांचा आक्षेप बरोबर

लेखक : **म. गं. दातार**

ता. ४ मेच्या तरुणभारतात कै. अप्पासाहेब ढवळे यांच्या मृत्यूबद्दल व त्यांचा 'अल्प परिचय' या सदराखाली जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे त्याला अनलक्षून डॉ. खरे यांनी त्या पत्राचे ता. ८ चे अंकात जो आक्षेप घेतला आहे, त्याला तरुण भारताच्या 'वृत्त लेखका'ने प्रति उत्तर देऊन व संपादकांनी हा वाद संपला असे जाहीर केल्यामुळे, माझा थोडासा संबंध ह्या प्रकरणी असल्यामुळे हा खुलासा नाइलाजाने करावा लागत आहे.

वस्तुतः मृत्युलेखामध्ये शक्यतोवर विवादास्पद गोष्टी टाळणेच योग्य असते. पण अप्पासाहेबांच्या परिचयात्मक लिखाणात त्यांचे गुणवर्णनाबरोबर दुसऱ्याला चिमटा घेण्याचा मोह वृत्तलेखकाला टाळता आला नाही व त्यामुळे डॉ. खरे यांनी त्यांचे स्वभावानुसार आक्षेप घेण्यात मुळीच दिरंगाई केली नाही. Speeches and statements of Dr. N. B. Khare हे पुस्तक जुन्या नरकेसरी प्रेसमध्ये सन १९४३ मध्ये मी प्रसिद्ध केले व त्या पुस्तकाचे 'to our Readers' ह्या प्रस्तावनादाखल लिखाणात पहिल्या पानावरील ४ थ्या प्यारेग्राफमध्ये 'It is not our business to

justify every word or action of Dr. Khare' हे विधान आहे. पण हे विधान कै. आप्पासाहेब ढवळे यांनी A Pen Picture ह्या संदर्भात लिहिलेल्या मजकुरात तरुण--भारताचे वृत्तलेखकाने घुसडून डॉ. खरे यांचेवर अन्याय केला आहे. असे मला वाटते. हे विधान आमचे (मी व पटवर्धन) आहे. आप्पासाहेबांचे नव्हे. हे स्पष्ट करण्यासाठी हे लिहावे लागत आहे.

ह्या अनुषंगाने थोडेसे 'तरुण भारता'च्या संपादकीय नीतीबद्दल लिहावेसे वाटते. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत काही आक्षेप येणे अपरिहार्यच असते. लोकशाहीचा व स्वतंत्र वृत्तीचा बाणा बाळगणाऱ्या वृत्तपत्रांनी तर आपल्या पत्रात वादग्रस्त प्रश्नावर उलटसुलट टीका प्रतिटीका करण्यास भरपूर वाव द्यावयास हवा. पण एक दोन असल्या प्रकारचे लेख आल्याबरोबर हा वाद बंद झाला आहे असा संपादकीय खाक्या तरुण भारतात अलीकडे फार दिसून येतो. काही दिवसांपूर्वी नागपूर नाट्य मंडळाने केलेल्या 'बेबंदशाही' नाट्यप्रयोगाबद्दल श्री. गुप्ते यांनी टीकात्मक लेख तरुण भारतात लिहिला. पण संपादकीय विभागास तो पचला नसावा व म्हणून लगेच गुप्ते यांचे टीकेला उत्तर देऊन वाद बंद करण्यात आल्याचे जाहीर झाले. मीही सदहू प्रयोगाबद्दल आपले मत तरुण भारताकडे पाठविले होते. पण 'वाद बंद' ह्या सबबीखाली ते प्रसिद्ध झाले नाही. महाराष्ट्रातही सदहू प्रयोगाबद्दल रास्त टीका आल्याचे मला कळते. पूर्वीच्या काळी वादविवाद, चर्चा ह्यांना, वृत्तपत्रे इतकी नव्हती तरी, वाव मिळत असे. अगदी जुन्या वेळचे आद्य श्रीशंकराचार्य व मंडनमिश्र यांचे वादविवाद प्रसिद्ध आहेत. तेव्हा दैनिक वृत्तपत्रांनी वादांची एवढी धास्ती घेण्याचे कारण दिसत नाही.

असो. जाता जाता स्व. अप्पासाहेबांविषयी आपली श्रद्धांजली अर्पण करणे मी माझे कर्तव्य समजतो. त्यांचे मृत्यूची बातमी फार उशीरा कळली त्यामुळे त्यांचे दहनसंस्काराला मी जाऊ शकलो नाही.

नागपूरनगर कां. क. चा ४–५ वर्षे चिटणीस असता अप्पासाहेब हे एका वर्षी नगर कां. चे अध्यक्ष होते व त्याच वेळी प्रथम म्युनिसिपालटीमध्ये कांग्रेसने बहुमताने प्रवेश केला. त्यावेळी अप्पासाहेबांचे मार्गदर्शन व समजूतदारपणाचा सल्ला आम्हा मंडळींना मिळत असे. अप्पासाहेबांचे स्मारक होवो किंवा न होवो पण त्या सुमारास डॉ. खरे यांनी कै. अभ्यंकरांचा पुतळा स्वखर्चाने देऊन आप्पासाहेबांनी तो बसविण्यालायक म्युनि. ची जागा देऊन अभ्यंकर सेवा मंडळाला उपकृत केले आहे. त्या पुतळ्याचे फलकावर अप्पासाहेब ढवळे यांचे नांव असल्यामुळे, नरकेसरींप्रमाणेच ते अप्पासाहेबांचेही

एक प्रकारे स्मारक आहे असे मला वाटते. श्री. आप्पासाहेबांना मी आदरयुक्त श्रद्धांजली अर्पण करतो.

वस्तुतः 'तरुण भारता'तील लेखाने खरा अन्याय झाला आहे तो कै. गजाननराव ढवळे यांना व 'टु अवर रीडर्स'च्या लेखकांना, डॉ. खरे यांना नव्हे. कारण सदर लेखकाने कै. ढवळे यांनी जे लिहिले नाही ते त्यांच्यावर लादले आहे व ज्यांनी लिहिले त्यांना त्याचे 'श्रेय' नाकारले आहे. ही स्पष्ट दिसणारी चूक लेखकानें प्रांजळपणे कबूल करण्यात कमीपणा नाही. वीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचा स्मरणाने हवाला देताना अशी चूक होऊ शकते कारण स्वतः लेखकालाही त्याचे विस्मरण होऊ शकते. पण चूक लक्षात आणून दिल्यावर ती प्रांजलपणे कबूल न करण्याचा अट्टाहास त. भा. तील लेखकाने केला आहे. व 'वाद बंद' करून संपादकांनी त्यावर पांघरूण घातले आहे. आणि हा कै. ढवळे यांना अन्याय झाला आहे, हे उघड आहे.

—संपा. महाराष्ट्र

### श्री. दातार रामशास्त्री प्रभुणेच ठरले

पटवर्धनांचा खोटेपणा उघडकीस आणून आणि माझे समर्थन करून म. गं. दातार यांनी रामशास्त्री प्रभुण्यांप्रमाणे कार्य केले आहे. त्यांच्या या सत्यनिष्ठेबद्दल मी त्यांची प्रशंसा करतो व त्यांना धन्यवाद देतो. पटवर्धनांनी ८-५-६३ च्या 'तरुण-भारता'त माझ्यावर हल्ला करून माडखोलकरांना प्रिय असलेलेच कार्य केले आहे. म्हणूनच माडखोलकरांनी 'तरुण-भारता'चे दरवाजे बंद करून पटवर्धनांना संरक्षण दिले. या घटनेचे दोन पंक्तीमध्ये कविताबद्ध वर्णन करतो.

मुखी घास जो घालि तयाच्या ('खरे'च्या) हस्ता चावावे।
रोजीसाठी गजाननाला (माडखोलकरला) मोदक वाहावे (खूष ठेवावे)॥

### 'तरुण-भारता'कडून त्याच्या जनकाचाच द्वेष

ता. ३ फेब्रुवारी १९६३ च्या 'तरुण-भारता'च्या अंकात विजयालक्ष्मी पंडित यांचे वक्तव्य सारांशरूपाने प्रसिद्ध झाले आहे. ते असे. "आजवर आपण अहिंसेची बरीच चर्चा केली. पण बदललेल्या परिस्थितीत नव्या पिढीवर शौर्य व धैर्य वाढविणारे संस्कार केले पाहिजेत." या तारखेच्या पूर्वी म्हणजे ता. २३-१-६३ या रोजी सुभाष बोस जयंतीच्या निमित्ताने मी म्हणालो, "गांधी कल्टचा त्याग करा व शिवाजी कल्टचा अंगीकार करा." विजयालक्ष्मीबाईंचे म्हणणे आणि माझे म्हणणे यांचा अर्थ एकच नाही काय? पण 'तरुण-भारता'ने विजयालक्ष्मींना प्रसिद्धी दिली. कारण त्या महाराष्ट्राच्या राज्यपाल आणि माझा 'तरुण-भारता'-च्या म्हणण्याप्रमाणे राजकारणातून अस्त झालेला. म्हणून मला ब्लॅकआौट केले. 'तरुण-भारता'ने असे करणे म्हणजे जनकाचा द्वेषच नाही काय? याबद्दल

'तरुण-भारता'ला मी त्याच्या घरचाच अहेर करतो. तरुण भारताने ता. १५-७-६३ च्या अंकांत एका संपादकीय स्फुटात असे म्हटले आहे की, 'बापाला बाप म्हणावयास जो तयार नाही तो शेजाऱ्याला काका काय म्हणणार आहे ?'

## व्यवसायबंधूकडून लगुडप्रहार

तरुण-भारतकाराची ही अधिकारपदी असणाऱ्या व्यक्तींची खुशामत करण्याची वृत्ती पाहूनच त्यांचे व्यवसायबंधू 'मराठा' पत्राचे संपादक आचार्य प्र. के. अत्रे यांनी ता. ३ जून १९६३ च्या 'मराठा'च्या अंकात 'कंडमवाराचा केकाटणारा कुत्रा' या शीर्षकाखाली अग्रलेख लिहिला आहे. त्यातील काही उतारे येथे देणे योग्य होईल. मूळ लेखात जरी 'कंडमवार' हा शब्दप्रयोग केला आहे तरी ते शब्द न वापरता मी मुख्य मंत्र्यांचे कन्नमवार हे जे खरे नाव आहे त्या नावानेच त्यांचा या उताऱ्यातून उल्लेख करतो. कारण माझ्या या लिखाणाचे लक्ष्य कन्नमवार नाहीत.

> नागपूरच्या 'तरुण-भारत' या दैनिकाचे संपादक श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर हे महा उपद्व्यापी गृहस्थ आहेत. स्वार्थसाधूपणा आणि संधिसाधूपणा यांच्या व्यतिरिक्त त्यांच्या जीवनात कशालाही स्थान नाही. अलीकडे चार-दोन समित्यांवर मुख्यमंत्री कन्नमवार यांनी त्यांची 'वर्णी' लावल्याबरोबर एखाद्या पाळीव कुत्र्याप्रमाणे माडखोलकरांनी आपल्या धन्याची बाजू घेऊन आमच्यावर भुंकण्याचे कार्य आरंभिले यात आम्हाला मुळीच आश्चर्य वाटत नाही. ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी, इतरांची करून टवाळी... ... ... 'तरुण भारत'कारांना चार तुकडे चघळायला मिळताच, धृतराष्ट्राने दुर्योनाच्या साऱ्या अपराधाकडे आंधळेपणाने दुर्लक्ष केले, तसे ते कन्नमवारांच्या सर्व खुळचट व खोडसाळ गोष्टी पोटात घालायला तयार झाले ही त्यांची लाचारी किळसवाणी आहे. पण **प्रश्न 'तरुण-भारत'कारांसारख्या कुटाळखोर, लुच्च्या, लाचार, पगडीपालटू, पोटभरू, लुडबुड्यांच्या सोयी-गैरसोयीचा नसून साऱ्या महाराष्ट्राच्या मोठेपणाचा, अब्रूचा हा प्रश्न आहे. महाराष्ट्राचा विदर्भ हाही एक महत्त्वपूर्ण घटक असल्याने, महाराष्ट्राची अस्मिता तीच विदर्भाचीही अस्मिता आहे.** महाराष्ट्र हा इतरांच्या दृष्टीने हास्यास्पद ठरला तर त्यात विदर्भाचीही नाचक्कीच आहे.

ज्याप्रमाणे पटवर्धनांचे वर्णन मागे दोन काव्यपंक्तींने केले आहे त्याचप्रमाणे माडखोलकरांचे वर्णनही खालील दोन काव्यपंक्तीने करण्याचा मोह मला आवरत नाही.

मुखीं घास जो घालि तयाच्या (खरेच्या) हस्ता चावावे ।
स्वार्थासाठी चव्हाण-कन्नमवारां आळवावें ॥

★ ★

प्रकरण ४ थे

# कांग्रेसमधील माझे नेतृत्व

कांग्रेस संस्थेमध्ये गटबाजीचा दोष हा आजचाच केवळ नाही. हा पुरातन आहे. याचा पुरावा 'अनसूयाबाई आणि मी' या पुस्तकाच्या ९६ पानावर सापडतो. तो असा :

### नागपूरच्या कांग्रेसपक्षातील गटबाजी

१९३० सालचे कायदेभंगाचे आंदोलन गांधी-इर्विन तहामुळे बंद झाले खरे, पण नागपूरमधील कांग्रेसपक्षात नवीनच भांडणे सुरू झाली. साधारणतः इतवारी आणि धंतोली अथवा विलायती, न शिकलेले किंवा रेल्वे लाइनच्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील असे दोन गट नागपुरातील कांग्रेसपक्षात पडले. पुनमचंदजी रांका, राजाभाऊ डांगरे, मामा पुराणिक, पन्नालाल देवडिया, राम लांजेवार, भोलासिंग नायक, बजरंग ठेकेदार, चैतन्यदास अगरवाल वगैरेंचा एक गट तयार झाला आणि या गटाला कांग्रेससूत्रे आपल्या हातात घेण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. या गटाला वर्ध्याहून प्रोत्साहन मिळत असे. त्यांनी डॉ. खरे, बाई, माधवराव कानेटकर, पी. एम. नायडू, विद्वद्रत्न दप्तरी, पटवर्धन, दातार, छगनलाल भरुका आणि मुख्यतः बॅरिस्टर अभ्यंकर यांना एका गटात गोवले आणि त्यांच्याविरुद्ध प्रचार सुरू केला.

काळीन बाईंच्या चरित्रलेखकाला १९३० च्या पूर्वीचीही कांग्रेसमधील मुंजे-अभ्यंकर गटबाजी आठवली नाही याचे आश्चर्य वाटते.

### १९३२ चे कांग्रेसचे दुसरे आंदोलन

१९३० च्या कांग्रेसच्या आंदोलनानंतर कांग्रेसने १९३२ मध्ये दुसरे आंदोलन सुरू केले. या आंदोलनात बॅरि. अभ्यंकर पुन्हा तुरुंगात गेले. या आंदोलनात अभ्यंकरांच्याच इशाऱ्यामुळे आंदोलन व्यवस्थित चालू रहावे यासाठी मी तुरुंगात गेलो नाही. तुरुंगामध्ये अभ्यंकर आजारी पडल्यामुळे शिक्षेची मुदत संपण्यापूर्वीच १९३३ साली त्यांची तुरुंगातून सुटका झाली. याच सुमारास महात्मा गांधींनीही प्रथम हरिजन कार्यावर जोर देण्याचे ठरवून त्या कार्यासाठी अखिल हिंदुस्थानात दौरा करण्याचे ठरविले व ता. ८ नोव्हेंबर १९३३ रोजी नागपूरपासूनच या अखिल

भारतीय दौऱ्यास सुरुवात केली. यावेळी नागपूर प्रांतिक कांग्रेसमधील दोन गटात किती तीव्र भांडण होते ते 'अनसूयाबाई आणि मी' या पुस्तकाच्या पान १०० वरून दिसून येईल. म्हणून तेथील संबंधित उतारा मी येथ देतो.

## प्रांतिक कांग्रेसमधील दोन गट

या सुमारास नागपूरमधील सर्व कांग्रेस पुढारी बंधमुक्त झाले होते, पण कांग्रेस संस्थेवरील बंदी उठली नव्हती. पुनमचंद राकांना आता सेनापती आवारीची जोड मिळाली. त्यांनी अभ्यंकर आजारी आहेत याचा सारासार विचार न करता अभ्यंकरांच्या पक्षपाती लोकांना त्रास देण्यास सुरुवात केली. से. आवारी नगर कांग्रेसचे अध्यक्ष होते. डॉ. खरे हरिजन सेवा संघाचे मराठी मध्यप्रांताचे अध्यक्ष होते. महात्माजींच्या सभेचे अध्यक्षस्थान कोणी स्वीकारावयाचे यासंबंधी दोघात तंटा सुरू झाला. तंटा विकोपाला गेला. पण अखेरीस हरिजन सेवा संघाची सभा असल्यामुळे, डॉ. खऱ्यांनीच अध्यक्षस्थान सुशोभिवले व पुनमचंद गटाला नमते घ्यावे लागले.

### पटवर्धनांनी केलेली माझी स्तुति

१९३२ साली आंदोलन चालविण्यासाठी कांग्रेसने युद्धमंडळे स्थापन केली होती. त्या युद्धमंडळातही पुनमचंद गट आणि अभ्यंकर गट यांच्यामध्ये किती तीव्र कटुता होती व एकमेकाच्या कामात अडथळा निर्माण करण्याचा किती कसोशीने प्रयत्न होत असे, हे श्री. ए. श्री. पटवर्धन, त्यावेळचे सेक्रेटरी, प्रांतिक कांग्रेस कमिटी नागपूर, यांनी ता. २३-१०-३५ या तारखेच्या 'निःस्पृह'च्या अंकात 'हिम्मत असेल तर या जादा अंकातील आरोपांना उत्तर द्या! सेठ पुनमचंदजींचा जळफळाट' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केलेल्या विस्तृत लेखावरून सिद्ध होते. म्हणून त्या लेखातील काही महत्त्वाचे संबंधित उतारेच येथ देतो. कांग्रेसच्या आंदोलनाला अनेक मोठमोठ्या लोकांनी आर्थिक मदत केली होती. पण त्यांनी अशी शर्त घातली होती की, त्यांची नावे जाहीर होऊ नये. आणि कांग्रेसने त्यांना तसे वचन दिले होते. म्हणून ३२-३३ सालचे कांग्रेसचे हिशोब प्रसिद्ध केले गेले नाहीत. पुनमचंदनी याबद्दल खुलासा मागितला. तो खुलासा करण्यासाठी सभा बोलावली. त्या सभेत काय घडले ते पटवर्धनांच्या या लेखातील एका उताऱ्यावरून दिसून येईल. तो उतारा असा.

…याच प्रकरणाचा खुलासा करण्यासाठी बोलावलेली रेशीम ओळीतील सभा धिंगामस्ती करून उधळून टाकून अभ्यंकरावरती लाठी चालविण्यापर्यंत आपण पाळी आणलीत व ही गोष्ट सेठजी आपण वर्धेस राजेंद्रबाबूसमोर

मोठ्या ऐटीने कबूलही केलीत व त्यांनी तुम्हाला violence केल्याबद्दल सर्वांच्या समक्ष दोषही दिला. चिटणीस पार्कात याच कामासाठी जेव्हा दुसरी सभा अभ्यंकरांनी बोलाविली तेव्हा तुम्हाला मुद्दाम पाचारण करण्यात आले होते. पण तुम्ही त्यावेळी मुद्दाम टाळाटाळ केली व आला नाही. **या सर्व गोष्टी डॉ. खरे यांचे द्वेषाचे धुंदीत आपण विसरला असाल...** ( जाड ठसा माझा ).

आता पुनमचंदजीचा हा जळफळाट का झाला, यावर प्रकाश टाकणारा पटवर्धनांच्या याच लेखातील पुढील उतारा पहा.

...... डॉ. खरे यांच्या डोळ्यात कुसळ आहे की काय याचा जनता निर्णय करीलच, पण पुनमचंदजींच्या डोळ्यातले मुसळ मात्र चांगलेच त्रासदायक आहे हे त्यांच्या अनुभवास येत असावे. याशिवाय त्या जळफळाटाची मीमांसा लागणे शक्य नाही. पुनमचंदजीचे एक साथीदार महात्मा भगवानदीन हे १९३२ च्या युद्धमंडळाचे खजिनदार होते. त्यांच्याही पाशी युद्धमंडळाचे काही पैसे होते. बॅ. अभ्यंकरांनी त्यांनाही ते पैसे माझ्या हवाली करण्यास जेलमध्ये मुकदम्याच्या वेळी सांगितले. तेव्हा त्यांनी आपल्या मुलाला बोलावून सांगितले की, "तुम्हारे पास जो रुपया बकाया हो वो और खर्च हुवा हो उसकी रसीदें पटवर्धन के हवाले कर दो" त्या मुलानेही 'अच्छा' म्हणून सांगितले. परंतु त्यानंतर बरेच दिवस वाट पाहिली तरी त्याने पैसे व व्हाउचर्स आणून दिले नाहीत. तेव्हा त्याला एक दिवस डॉ. खरे यांच्या दवाखान्यात घेऊन गेलो. त्याचेपाशी पैसे व हिशेब मागितले. तो म्हणाला, "क्या करे, पिताजीने आपके सामने तो पैसे देनेको कहा लेकिन आप जानेके बाद मुझे अकेले को बुलाकरके कहा, पैसा वैसा कुछ मत देना." धन्य पितापुत्राची ! या रुपयांनी एखाद्या स्थानिक महात्म्याच्या वजनात भर घातली की एकाद्या त्यागमूर्तीच्या त्यागाला उजळा दिला देव जाणे !

## डॉ. खरे यांची कामगिरी

सेठजी, आपण ज्यावेळी पैसे देण्याची टाळटाळ केली व बेजबाबदारपणे मागे सर्वांना पैशाच्या दृष्टीने अंधकारात ढकलले; शिवाय आपल्या एका मित्राने सत्याग्रह संग्रामाकरिता दिलेले ८०० रुपयेहि गुपचूप ठेवून घेतलेत. अशा वेळी नागपुरात दीड दोन वर्षे तुमच्या लोकांच्या शिव्याशापाची स्वतःच्या चमडी व दमडीची पर्वा न करता कॉंग्रेसच्या कामाची जबाबदारी कोणी स्वीकारली होती हे जगजाहीर आहे. इतकी झीज सोसूनही हरिजन चळवळीचे वेळी एक हजार रुपयाची देणगी डॉ. खरे यांनी दिली आहे. काम अडले

असता हिंमतीने ज्यांनी कामाची जबाबदारी स्वीकारली, इतकेच नव्हे तर ऑ. इं. काँग्रेसकडून इतर प्रांताप्रमाणे त्यांच्याकडे दूत येऊन चळवळीला पैसे देऊ केले असता ते ज्यांनी मर्दपणे नाकारले व त्याला बजावले की, मध्यवर्ति ऑफीसच्या पैशाच्या मदतीने चळवळ चालविणारे आम्ही लोक नाही. असे करण्यात आम्हाला मानहानी वाटते. अशा डॉ. खऱ्यांना निव्वळ ते मोटारीत बसतात व राहण्यास बंगला धंतोलीवर आहे म्हणून नावे ठेवण्याचा आपण जो सपाटा लावला आहे त्याचा परिणाम डॉ. खरे यांचेविरुद्ध न होता आपली किंमत मात्र जनता काय करील याचा विचार करणे इष्ट नाही काय ?

## माझ्याकडे आलेला नेतृत्वाचा वारसा

अभ्यंकरांचा दुःखद मृत्यु ता. २ जानेवारी १९३५ रोजी झाला. त्यानंतर त्यांच्या नेतृत्वाचा वारसा माझ्याकडे आला व पुनमचंद गटाच्या शत्रुत्वाचाही वारसा माझ्याकडे आला. पुढे मी प्रांतिक कांग्रेस कमिटीचा अध्यक्ष निवडला गेलो. मी अभ्यंकर गटाचा असल्या कारणाने पुनमचंदजीचा सहाजिकच जळफळाट झाला. कारण प्रां. कांग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदावर त्यांचा डोळा होता. म्हणून ज्यांनी पटवर्धनांच्याच म्हणण्याप्रमाणे अभ्यंकरावरती लाठी चालविण्यापर्यंत पाळी आणली, त्यांनी द्वेषपूर्ण वृत्तीने माझ्यावर आरोप केले असल्यास नवल काय ! त्या आरोपांना उत्तर देण्यासाठीच प्रांतिक कांग्रेस कमिटीचे सेक्रेटरी श्री. पटवर्धन यांनी हा लांबलचक लेख लिहिला आहे. त्यात पुनमचंद गटाच्या लोकांनी युद्धमंडळाला म्हणजे ३२–३३ च्या कांग्रेसच्या चळवळीसाठी मिळालेल्या रकमा कशा दडवून ठेवल्या व त्यामुळे त्या रकमांचा उपयोग चळवळीसाठी करता आला नाही याचा उल्लेख केला आहे. अशा परिस्थितीत मी त्यावेळी अभ्यंकरांच्या इशाऱ्यामुळे तुरुंगात न गेल्यामुळे कांग्रेसच्या चळवळीसाठी पैसा पुरवू शकलो. यावरून अभ्यंकरांचा इशारा किती योग्य होता व त्यांना माणसांची कशी अचूक पारख होती हे दिसून येईल.

## ते जुने पटवर्धन आणि आजचे नवे पटवर्धन

पटवर्धनांचा हा लेख अभ्यंकरांच्या मृत्यूनंतर म्हणजे ता. २३ आक्टोबर १९३५ रोजी 'निःस्पृहा'त प्रसिद्ध झाला आहे. त्यात पटवर्धनांनी १९३२–३३ साली मी केलेल्या कांग्रेसकार्यांची तोंड फाटेपावेतो स्तुती केलेली आहे. पण काय आश्चर्य ! तेच पटवर्धन १९६२–६३ साली माझे शत्रू बनले व त्यांनी वर्तमानपत्रात माझी निंदा लेखणी तुटेपावतो केली. पण तेवढयाने त्यांचे समाधान झाले नाही. म्हणून ते अगदी हिरवट झाले व त्यांनी मला फोन करून 'बाजारबसवी' अशी उपाधी प्रदान केली. ज्यांनी आपल्या १९३५ मधील लेखात भगवानदिनजीवर युद्धमंडळाचे खजीनदार असताना युद्धमंडळाचा पैसा अडवून ठेवण्याचे आरोप केले,

तेच पटवर्धन १९६३ मध्ये भगवानदिनजींचे पूजक झाले असे ता. १६-७-६३ च्या 'तरुण–भारत'च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातमीवरून दिसते. ती बातमी महत्त्वाची आहे म्हणून येथे देतो.

### चिटणीस पार्क स्टेडियम
## महात्मा भगवानदीनजी स्टेडियम हे नाव द्या
### कार्यकर्त्यांची मागणी

नागपूर ता. १५

नागपूरच्या कार्यकार्त्यांची सभा त्यागमूर्ति श्री. पूनमचंदजी राका यांच्या अध्यक्षतेखाली भरली. या सभेस ॲड. वखरे, ॲड शेरलेकर, श्री. मंगलचंदजी खंडेलवाल, श्री. वसंतराव आपटे, श्री. म. गं. दातार, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. लक्ष्मणराव झाडे, श्री. उदाराम पहेलवान, श्री. राम अंबूलकर, श्री. नागरमल चौधरी, श्री. बाबा कठाळे प्रभृती मंडळी उपस्थित होती. या सभेत स्व. भगवान-दीनजी यांचे स्मारक करण्याचा प्रश्न निघाला. म. भगवानदीनजी यांनी चिटणीस पार्कात अनेक सभा गाजविल्या होत्या, म्हणून त्या ठिकाणी जे स्टेडियम महानगरपालिकेने बांधले आहे. त्याला 'म. भगवानदीनजी स्टेडियम' हे नाव द्यावे व तेथे त्यांचा पुतळा उभारण्यात यावा असा ठराव शेख बाबा गांधी यांनी मांडला व तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**कालाय तस्मै नमः**

या बातमीवरून असे म्हणावे लागेल की, नरकेसरी अभ्यंकरांबद्दल निस्सीम निष्ठा बाळगणारे पटवर्धन अभ्यंकरांवर लाठी चालविण्यापावेतो पाळी आणणाऱ्या पुनमचंदच्या गटात जाऊन मिळाले ! कालाय तस्मै नमः !!

**सुमतिबाई धनवटेचे माझ्यावर छुपे शिंतोडे**

मी आपल्या नेतृत्वाची कधी घमंड बाळगली नाही व तोराही मिरवला नाही. आपल्यावर ज्या कामाची जबाबदारी पडेल ते काम आपल्या शक्तिनुसार व बुद्धिनुसार पार पाडणे ही माझी वृत्ति. असे असताना 'तरुण–भारता'ने ता. २४–११–६२ च्या अंकात सौ. सुमतिदेवी धनवटे यांचा जो लेख छापला आहे त्यात माझ्या नेतृत्वावर छुपे शिंतोडे उडविण्यात आले आहेत. त्या लेखातील माझ्या विधानाला पोषक असा भाग मुद्दाम येथे देतो.

जुन्या मध्यप्रदेश राज्यात कै. अभ्यंकरांनंतर **विदर्भाचे नेतृत्व सदैव अमराठी माणसाच्या हाती राहात गेले. त्यामुळे सामाजिक कार्य-**

**कर्त्यांत जी धार, जी चमक व जे वैशिष्ट्य कै. अभ्यंकरांच्या वेळी विदर्भात आढळून आले होते, त्याचे दर्शन पुन्हा झाले नाही.** विदर्भाच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनात एक तऱ्हेचे शैथिल्य निर्माण झाले. **अमराठी माणसांनी हे जाणून बुजून केले की ते नकळत झाले, हा वादाचा मुद्दा क्षणभर बाजूला ठेवू या.**

## सुमतिबाईंना माझे उत्तर

सौ. सुमतिबाईंच्या या लेखाला उत्तर देणारा लेख मी तरुण-भारताकड पाठविला. तो २६-११-६२ च्या 'तरुण-भारता'त आला आहे. तोही येथे देतो.

### अमराठी माणसांना अन्याय

श्री. संपादक, 'तरुण भारत' यांस,

वि. वि. शनिवार ता. २४-११-६२ च्या 'तरुण भारता'च्या अंकात सौ. सुमतिदेवी धनवटे यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात पुढील विधान करण्यात आले आहे—" जुन्या मध्यप्रदेश राज्यात कै. अभ्यंकरांनंतर विदर्भाचे नेतृत्व सदैव अमराठी माणसांच्या हाती रहात गेले." हे विधान ऐतिहासिक दृष्ट्या चूक आहे. कसे ते पहा. अभ्यंकर ता. २ जानेवारी १९३५ रोजी कैलासवासी झाले. त्यांच्यानंतर मी मराठी मध्यप्रांत म्हणजे नागपूर, वर्धा, भंडारा व चांदा या चार जिल्ह्यांच्या प्रदेशाच्या प्रांतिक कांग्रेस कमिटीचा अध्यक्ष निवडला गेलो; व त्यांच्या जागी केन्द्रीय विधान सभेचा सदस्यही बिनविरोध निवडला गेलो.

१९३६ मधे जेव्हा सार्वजनिक निवडणुकी झाल्या, त्याच्या पूर्वी जुन्या मध्यप्रदेशातील विदर्भ, नागपूर अथवा मराठी मध्यप्रान्त व महाकोशल या तीनही प्रदेशात प्रांतिक कांग्रेस कमिट्यांनी एकमुखाने मला पार्लमेंटरी कामकाजाचा व इलेक्शनचा मुख्य नेमले. त्यामुळे या तीनही प्रदेशातील कांग्रेस उमेदवारांची यादी मुक्रर करून मी या तीनही याद्या सरदार पटेलांकडे अन्तिम मंजुरीसाठी पाठविल्या व शेवटी कांग्रेसला तीनही प्रदेशात घवघवीत यश मिळवून दिले. त्यामुळे मी मुख्य प्रधान निवडला गेलो. हे यश माझ्या नेतृत्वामुळेच मिळाले. मी मराठी माणूस आहे व माझी १९३८ मध्ये पदच्युती होईपर्यंत मी महाकोशलचाही नेता होतो, या इतिहासाकडे डोळेझाक करणे म्हणजे अमराठी माणसांना अन्याय होय.

नागपूर आपला

२४-११-६२ **ना. भा. खरे**

## ‘ तरुण-भारत ’काराचा भ्याड हल्ला

याशिवाय माझ्याच कारकिर्दीमध्ये १९३८ च्या जानेवारी महिन्याच्या सुमारास नागपूरची म्युनिसिपालिटी पहिल्याप्रथम कांग्रेसने काबीज केली व पटवर्धनच तिचे एक उपाध्यक्ष निवडले गेले. सौ. सुमतिबाई धनवटेना दिलेले माझे समर्पक उत्तर ‘ तरुण-भारत ’काराना झोंबले. म्हणून त्यांनी ता. २७-११-६२ च्या ‘ तरुण-भारता ’त ‘ मराठी माणूस ’ या शिखंडी सहीखाली माझ्यावर भ्याड हल्ला केला व त्यात असे ध्वनित केले की, माझे कांग्रेसनेतृत्व कुचकामी होते व औट घटकेचे होते (मी जानेवारी १९३५ पासून जुलै १९३८ पावेतो म्हणजे साडेतीन वर्षे कांग्रेसचा नेता होतो.) व ते लौकरच ‘ आउट ’ झाले. माझ्यावर मी व्हाइसरॉय-च्या कौन्सिलचे सदस्यत्व पत्करले म्हणून सरकारशी मिळाल्याचाही आरोप करण्यात आला. पण ‘ तरुण-भारत ’ हे विसरले की, माझ्यामागून कांग्रेस नेत्यांनीही तीच पदे स्वीकारली. आणि व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्ये नेहरू पटेल यांनी व्हाइसरॉयच्या व्हेटोचे किंवा लगामाचे जाहीर रीतीने रडगाणे गाइले. पण मी दक्षिण आफ्रिकेच्या बाबतीत व्हाइसरॉयला आपला व्हेटो परत घ्यायला लावला.

१९४३ एप्रिल महिन्यात दातार आणि पटवर्धन या दोघांनी ‘ स्पीचेस अँड स्टेटमेन्टस ऑफ डॉ. एन. बी. खरे ’ हे इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध केले आहे. त्यात, To our readers या शीर्षकाखाली पुढील मजकूर आहे. तो असा.

> ..There has been printed also at the end ‘the Civic Guard Act’ (Bill) a measure which Dr. Khare had in view while in office as the Premier of the Province, just to show that if party feuds had not spoilt the even trend of events—Dr. Khare's constructive statesmanship would have borne fruit and the nation at large would have been immensely benefited....

## माझे नेतृत्व पटवर्धन-दातारांच्या लेखणीतून पहा

या उताऱ्यात माझे कांग्रेसमधील नेतृत्व कसे होते हे दातार पटवर्धनांचीच लेखणी सांगते. हे लेखकद्वय आणखी असेहि म्हणतात की,

> Dr. Khare is not merely a soda-bi-carb Doctor as his enemies in public life called him but has in him the makings of a man of letters with originality of putting his thoughts in carping satire and penetrating humour.

## आजकाल पटवर्धनांचा चेहरा दुर्मुखलेला का ?

यानंतर मी मराठी हिंदी आणि इंग्रजी भाषेमधून आत्मचरित्रे लिहिली व नेहरू आझाद यांच्या इंग्रजी चरित्र आत्मचरित्रांवर इंग्रजीतून विस्तृत परीक्षणे लिहून ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली. यामुळे पटवर्धनांचे भाकित खरे झाले; पण ते पटवर्धनांना आवडले नाही. म्हणून त्यांचा चेहरा आजकाल दुर्मुखलेला दिसतो.

पटवर्धनांचा चेहरा दुर्मुखलेला दिसतो त्याला आणखी एक कारण मुंबईच्या 'मराठा' पत्रात प्रसिद्ध झालेले हिंदुसभेचे कार्यकर्ते श्री. विक्रम सावरकर यांनी त्यांना लिहिलेले खुले पत्र हेही असावे. हे पत्र ३१ जुलै १९६३ च्या 'मराठा'त प्रसिद्ध झाले आहे. ते येथे देतो.

## ढोंगी कांग्रेसवाल्याचे नाव चिटणीस पार्कला देऊ नका

### विक्रम सावरकर यांचे पटवर्धनांना खुले पत्र

नागपूर, दि. २९—येथील चिटणीस पार्कला महात्मा भगवानदीन नाव देण्याचे जे प्रयत्न चालले आहेत त्यासंबंधी श्री. विक्रम सावरकर यांनी तरुण भारताचे सहसंपादक श्री. ए. श्री. पटवर्धन यांना एक प्रकट पत्र पाठविले असून त्यात ते लिहितात—

"दोन-चार दिवसांपूर्वी एका स्नेह्याच्या दुकानात जुन्या वृत्तपत्राचा गठ्ठा आढळला. त्या गठ्ठयातील वृत्तपत्रे कुतूहल म्हणून चाळत असता, दि. २३ आक्टोबर १९३५ च्या 'निःस्पृह' साप्ताहिकाच्या अंकात आपला एक लेख आढळला. लेखाचा मथळा होता, 'सेठ पुनमचंदजीचा जळफळाट' आणि लेखक म्हणून आपले नाव होते. नावाच्या पुढे 'सेक्रेटरी, नागपूर प्रां. कांग्रेस कमिटी' असे लिहिले होते. म्हणजे तो लेख संपूर्णपणे अधिकृत आणि विशेष महत्त्वाचा मानला पाहिजे. आपण नागपूर प्रां. कांग्रेस कमेटीचे सेक्रेटरी असताना दि. २३ आक्टोबर १९३५ च्या निःस्पृह साप्ताहिकाच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या आपल्या त्या लेखातील एक उतारा पुढीलप्रमाणे आहे.

"डॉ. खरे यांच्या डोळ्यात कुसळ आहे की काय, याचा जनता निर्णय करीलच पण पुनमचंदजीच्या डोळ्यातील मुसळ मात्र चांगलेच त्रासदायक आहे हे त्यांच्या अनुभवास येत असावे. याशिवाय त्या जळफळाटाची मीमांसा लागणे शक्य नाही. पुनमचंदजीचे एक साथीदार महात्मा भगवानदीन हे १९३२ च्या युद्धमंडळाचे खजिनदार होते. त्यांच्यापाशी युद्धमंडळाचे काही पैसे होते. बॅ. अभ्यंकरांनी त्यांना ते पैसे माझ्या हवाली करण्यास जेलमध्ये मुकादम्याचे वेळी सांगितले, तेव्हा त्यांनी आपल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों दि:


मुलाला बोलावून सांगितले की, 'तुम्हारे पास जो रुपया बकाया हो वो और खर्च हुवा हो उसकी रसीदे पटवर्धन के हवाले कर दो.' त्या मुलानेही 'अच्छा' म्हणून सांगितले. परंतु त्यानंतर बरेच दिवस वाट पाहिली तरी त्याने पैसे व व्हाउचर्स आणून दिली नाहीत. तेव्हा त्याला एक दिवस डॉ. खरे यांच्या दवाखान्यात घेऊन गेलो. त्याच्यापाशी पैसे व हिशेब मागितले. तो म्हणाला, 'क्या करू ? पिताजीने आपके सामने तो पैसे देने को कहा, लेकिन आप जाने के बाद मुझे अकेलेको बुलाकरके कहा–पैसा वैसा कुछ मत देना' धन्य पितापुत्रांची ! या रुपयांनी एखाद्या स्थानिक महात्म्याच्या वजनात भर घातली की एखाद्या त्यागमूर्तीच्या त्यागाला उजळा दिला, देव जाणे !"

१९३५ मध्ये महात्मा भगवानदीनजीवर वरीलप्रमाणे आपण प्रकट रीत्या लेखी आरोप केलात आणि आता १९६३ मधे त्याच महात्मा भगवानदीनजींचे आपण प्रकट रीत्या पूजक झाल्याचे दि. १६ जुलै १९६३च्या दैनिक तरुण भारताच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातमीवरून दिसते !

त्या बाबतीत असे स्पष्ट लिहिले आहे की चिटणीसपार्क स्टेडियमला महात्मा भगवानदीन स्टेडियम हे नाव द्यावे व तेथे त्यांचा पुतळा उभारावा. या योजनेला इतर अनेक सर्वोदयवादी लोकांबरोबर आपली संमती प्रसिद्ध झाली आहे, याचे मोठे आश्चर्य वाटते ! आपली ही संमति म्हणजे विसंगती, अप्रामाणिकपणा आणि भ्रष्टाचाराला उत्तेजन दर्शवीत नाही काय ?

हा प्रश्न सार्वजनिक महत्त्वाचा असल्याने आपल्याला हे खुले पत्र लिहिले आहे. आपण या प्रश्नासंबंधी प्रकट खुलासा करावा, ही विनंती.

या खुल्या पत्रात श्री. विक्रम सावरकरांनी श्री. एकनाथ श्रीपत पटवर्धन यांना एका महत्त्वाच्या सार्वजनिक प्रश्नाबद्दल खुलासा करण्यासाठी जाहीर आव्हान दिले आहे. हे पत्र सावरकरांनी पटवर्धनांना परत पावतीच्या रजिस्टर पोस्टाने पाठविले होते. ते त्यांना मिळाल्याबद्दल पटवर्धनांच्या सहीची पावती सावरकरांनी मला दाखविली आहे. प्रश्न सार्वजनिक राजकीय महत्त्वाचा असल्या कारणाने पटवर्धनांना पाठविलेल्या खुल्या पत्राची एक नक्कल सावरकरांनी 'तरुण–भारता'त प्रसिद्धीसाठी त्याचे संपादक श्री. माडखोलकर यांनाही त्याच वेळी पाठविली होती. पण पटवर्धनांनी आव्हान स्वीकारले नाही. कारण या बाबतीत परिस्थिती अशी आहे की पटवर्धन आव्हान स्वीकारण्याची हिंमत दाखवूच शकत नाहीत. पटवर्धनांनी भगवानदीनच्या पुतळ्याच्या बाबतीत मी चांगलाच फसलो आहे असे उद्गार आपल्या एका अंतेवासियाजवळ काढल्याचे विक्रम सावरकरांनीच मला सांगितले. माडखोलकरांनीही आपल्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सहकाऱ्याची फजीती होऊ नये

म्हणून त्या खुल्या पत्राची नक्कल तरुण-भारतात प्रसिद्ध केली नाही व सत्य दडपून टाकले. असे करण्यात माडखोलकरांनी एका महत्त्वाच्या सार्वजनिक प्रश्नात जनतेची वंचनाच केली आहे. यामुळे माडखोलकरांकडून वृत्तपत्राच्या नीतीला हरताळ फासला गेला हे उघड आहे. तरुण-भारताच्या ह्या दोघाही म्हाताऱ्यांनी कोंबडा झाकला तरी सत्याचा सूर्य उगवल्याशिवाय राहिला नाही. सावरकरांनी तरुण-भारताने त्यांचा अपेक्षाभंग केल्यामुळे पटवर्धनांना लिहिलेले हे खुले पत्र 'मराठा'कडे प्रसिद्धीसाठी पाठविले आणि 'मराठा'ने ते तत्परतेने प्रसिद्ध करून सत्याला तोंड फोडले. 'मराठा' पत्रात प्रसिद्ध झालेल्या या खुल्या पत्राकडे मी नागपूरचे महापौर श्री. त्रिंबक गोपाळ देशमुख यांचे लक्ष वेधले व त्याबरोबरच नागपूर कांग्रेसमधील १९३०-३२ सालच्या गटबाजीची हकीकतही त्यांना थोडक्यात कळविली. या माझ्या पत्राला त्यांनी २६-८-६३ रोजी उत्तर पाठविले. त्यातील संबंधित भाग येथे उद्धृत करून हे प्रकरण संपवितो.

...'आपले २३-८-६३ चे पत्र मिळाले. भूतकाळामधील आपण लिहिलेले कथन वाचून मौज वाटली. आमच्या पिढीला ते लक्षात ठेवण्यासारखेच आहे. पुतळे वगैरे व्हायचे नाहीत, याबद्दल निश्चिंत असा.

असाच कृपालोभ असावा.'

नम्र

(सही) त्रिं. गो. देशमुख

★ ★

## प्रकरण ५ वे

# नरकेसरी अभ्यंकर आणि मी

### टिपटॉप युरोपियन पोषाखात अभ्यंकरांची प्रथम भेट

१९१६ मध्ये मी सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन नागपूर येथे डॉक्टरीचा खाजगी धंदा सुरू केला. इंग्रजी राज्याची चीड आल्यामुळेच मी नोकरी सोडली व नागपूरला धंदा करीत असतानाच शक्य होईल ते राष्ट्रकार्य करण्याचा विचार करू लागलो व मार्गही शोधू लागलो. अशा परिस्थितीत एके दिवशी अभ्यंकर त्यांचा खांदा दुखत होता म्हणून माझ्या दवाखान्यात आले. त्यांचा पोषाख अगदी टिपटॉप युरोपियन व बोलणेही बॅरिस्टरीच्या ऐटीचे व रेकत आवाजात. यामुळे त्यांच्याविषयी पहिल्याने माझ्या मनात प्रतिकूल ग्रहच निर्माण झाला. पण पुढे जसजसे संघटन वाढू लागले तसतसे ते महान देशाभिमानी आहेत याची खात्री पटू लागली.

### ‘ काय डॉक्टर, काही देशबिश आहे की नाही ? ’

एके दिवशी त्यांनी बोलता बोलता मला सहज प्रश्न केला, ‘ डॉक्टर काही देशबिश आहे की नाही ? की नुसता पैसाच पहाणार ? ’ मी त्यांना उत्तर दिले, ‘ देशबिश जरूर आहे. म्हणून तर सरकारी नोकरी सोडली. पण देशकार्य मात्र माझा धंद्याचा जम बसल्यावरच सुरू होईल. ’ अभ्यंकरही म्हणाले, ‘ ठीक आहे. तुम्ही आमच्या राष्ट्रीय मंडळाचे सभासद व्हावे. डॉ. मुंजे, निळकंठराव उधोजी इत्यादी मंडळी त्या राष्ट्रीय मंडळात मार्गदर्शन करतात.’ अभ्यंकरांचे म्हणणे मी कबूल केले व त्यांच्याबरोबर राष्ट्रीय मंडळात जाऊ लागलो. पुढे १९१८ च्या इन्फ्लुएन्झाच्या साथीच्या तडाख्यात माझी द्वितीय पत्नी निवर्तली व माझे तिसरे लग्न १९१९ च्या मे महिन्यात नागपूर येथेच झाले. माझी तृतीय पत्नी अभ्यंकरांच्या पत्नीची चुलत बहीण म्हणून मैत्रीला नातेसंबंधाचीही जोड मिळाली.

### अभ्यंकरांचा बेडरपणा व मर्दपणा

१९१९ च्या अमृतसर येथे भरलेल्या कांग्रेसच्या अधिवेशनाला अभ्यंकर व मी दोघेही गेलो होतो. त्यावेळेस रेल्वेच्या प्रवासात अभ्यंकरांचा साहेब लोकांशी वागण्यांत बेडरपणा व मर्दपणा दिसून आला. त्यामुळे त्यांच्याबद्दल माझ्या मनात अतिशय आदराची भावना निर्माण झाली. १९२० मध्ये नागपूर येथे कांग्रेसचे अधिवेशन झाले. स्वागत समितीच्या कार्यकारिणीचे आम्ही दोघेही सभासद होतो.

अभ्यंकर निधिसमितीचे प्रमुख होते व मी वैद्यकीय समितीचा प्रमुख होतो. वास्तविक पाहता डॉ. मुंजेच स्वागत समितीचे अध्यक्ष व्हायचे पण त्यांनी कांग्रेस निधीला अधिक पैसा मिळेल या आशेने सेठ जमनालाल बजाज यांना स्वागत समितीचे अध्यक्ष होऊ दिले. पण डॉ. मुंजांचा अपेक्षाभंग झाला. कारण सेठजींनी डॉ. मुंजे यांच्या अपेक्षेप्रमाणे कांग्रेस अधिवेशनाला पैसे दिले नाहीत.

## स्वराज्य पक्षाची कामगिरी

राष्ट्रीय मंडळाच्या सभेत डॉ. मुंजे व अभ्यंकर यांच्यात जो वादविवाद होत असे, त्यावरून मला दोघांच्या स्वभावातील फरक दिसून आला. अभ्यंकर हे झुंजार, सडेतोड व तडफदार आणि डॉ. मुंजे हे धिमे व धुमे. पुढे कांग्रेसमध्येही गया कांग्रेसनंतर मतभेद निर्माण झाले आणि देशबंधू दास आणि मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली गांधीजीच्या असहकाराला विरोध करण्यासाठी स्वराज्य पक्ष स्थापन झाला व मुंजे, अभ्यंकर, मी इत्यादी राष्ट्रमंडळातील आम्ही सर्वच सदस्य या स्वराज्य पक्षात सामील झालो. १९२३ साली स्वराज्य पक्षाने कौन्सिल निवडणुकी लढविल्या व मध्यप्रांतात स्वराज्य पक्षाचे निर्णायक बहुमत झाले. डॉ. मुंजे व मी प्रांतिक विधान सभेत नागपूर–कामठी मतदार संघातर्फे निवडून आलो व अभ्यंकर केंद्रीय असेंब्लीत निवडून आले. तेथे अभ्यंकरांचे घणाघाती वक्तृत्व व देशाभिमान फार गाजला. मध्यप्रांतात स्वराज्य पक्षाने मंत्र्यांचा पगार नाकारून कौन्सिलचे काम बंद पाडले.

## मुंजे-अभ्यंकरांचे घनघोर युद्ध

१९२५ च्या कांग्रेसच्या कानपूर अधिवेशनानंतर मंत्रिमंडळे स्वीकारण्याच्या प्रश्नावर स्वराज्य पक्षामध्येच दुफळी झाली व मंत्रिमंडळे राबवावी या मताचा पुरस्कार करणारा प्रतिसहकार नावाचा पक्ष स्थापन झाला. या पक्षाने १९२६ मध्ये निवडणुकी लढविल्या व ठिकठिकाणी कांग्रेसचा पराभव केला. याच प्रति-सहकार पक्षात मुंजे व राष्ट्रीय मंडळाचे बहुतेक सभासद सामील झाले. पण अभ्यंकर, दादासाहेब उधोजी आणि मी कांग्रेस स्वराज्य पक्षातच राहिलो. नागपूर येथे केंद्रीय असेंब्लीच्या निवडणुकीसाठी मुंजे आणि अभ्यंकर यांच्यात अटीतटीचा सामना झाला. अर्थात माझी सर्व मदत अभ्यंकरांना होती. या निवडणुकीत अभ्यंकरांचा पराभव झाला.

## १९३० च्या शांतिसंग्रामातील तुरुंगवास

१९३० मध्ये कांग्रेसने कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू केली व अभ्यंकर व मी दोघेही तुरुंगात गेलो. १९३२ मध्येही कांग्रेसने चळवळ सुरू केली. त्या

चळवळीत अभ्यंकर पकडले गेले व मी बाहेर राहिलो. अभ्यंकरांना मधुमेहाचा रोग होता आणि ते तुरुंगात फार आजारी व अशक्त झाले. मी त्यांची तुरुंगात भेट घेतली तेव्हा मला दिसून आले की, प्रकृतिस्वास्थ्यासाठी अभ्यंकरांना बंधमुक्त केलेच पाहिजे. म्हणून मी तुरुंगातून तडक त्यावेळचे गृहमंत्री राघवेंद्रराव यांच्या बंगल्यावर गेलो व त्यांना अभ्यंकरांच्या आजाराचे गांभीर्य समजावून सांगितले. त्यांनीही मोठ्या सौहार्दतेने अभ्यंकरांची प्रकृती तपासण्यासाठी मेडिकल बोर्ड बसवितो व त्यांना मुक्त करतो असे वचन दिले. ते त्यांनी पाळले व अभ्यंकर शिक्षेची मुदत संपण्यापूर्वीच अंदाजे १९३३ च्या ऑगस्टमध्ये बंधमुक्त झाले. पण त्यांची प्रकृती ढासळली ती ढासळलीच. अशा परिस्थितीत कांग्रेस हायकमांडच्या अत्यंत आग्रहाने किंवा वाटल्यास दुराग्रहाने म्हणा, अभ्यंकरांना १९३४ च्या केंद्रीय असेंब्लीच्या निवडणुकीत डॉ. मुंजे यांच्या विरोधात उभे राहावे लागले. यावेळी सत्याग्रह केल्यामुळे जनमनात कांग्रेस भरली होती व मुंजांच्या विरुद्ध मीही प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अभ्यंकर निवडून आले. पण असेंब्लीत जाण्यापूर्वीच २ जानेवारी १९३५ या रोजी मुंबईत डायबेटिक गँगरीनमुळे त्यांचा दुःखद व अकाल मृत्यू झाला व माझ्या मनाला फार दुःख झाले. पुढे निवडणुकीत अभ्यंकरांच्या जागी मी बिनविरोध निवडून आलो

**पटवर्धनांच्या दुष्ट आरोपाला माझे उत्तर**

आमचा दोघांचा असा जिव्हाळ्याचा संबंध असतांना त्यांचा मोठेपणा मला सहन होत नाही म्हणून मी अभ्यंकरांच्या चरित्रलेखनाला विरोध करतो असा दुष्ट आरोप आमचे दोघांचे मित्र पटवर्धन यांनी माझ्यावर केला. त्याला मी उत्तर दिलेच आहे. त्या उत्तरात मी १९४५ च्या ‘ तरुण भारता ’च्या वार्षिक अंकातील ‘ नरकेसरींचे आत्मसमर्पण ’ या माझ्या लेखाचा उल्लेख केला आहे व १९५८ च्या ‘ पुरुषार्थ ’ मासिकाच्या ‘ वीरगाथा ’ अंकातील ‘ गड आला पण सिंह गेला ’ या माझ्या लेखाचाही उल्लेख केला आहे. म्हणून ते दोन्ही लेख लागोपाठ येथे देतो :

## नरकेसरींचे आत्मसमर्पण

### ठोशास ठोसा

नरकेसरी अभ्यंकर निर्भय वृत्तीचे आणि जशास तसे या न्यायाने वागणारे होते, हे खाली दिलेल्या हकीकतीवरून कळून येईल. १९१९ च्या अमृतसर कांग्रेसनंतर कै. नारायणराव वैद्य, अभ्यंकर व मी नागपूरला परत येण्याकरता एक सेकंड क्लासचा कम्पार्टमेंट रिझर्व करून निघालो. वाटेत रात्रीचे वेळी एका स्टेशनवर दोन युरोपिअन गृहस्थ आमच्या डब्यात शिरण्याचा प्रयत्न करू लागले. माझी झोप उघडली; व मी त्यांच्यापाशी

बाचाबाची करू लागलो. मी त्यांना सांगितले की, डबा ' रिझर्व ' असल्या-कारणाने तुम्हाला येथे बसता येणार नाही. त्यांना माझे म्हणणे पटले नाही किंवा पटवून घेण्याचा त्यांचा इरादा नव्हता; व ते जबरदस्तीने डब्यात घुसण्याचा प्रयत्न करू लागले. अर्थात हुस्ताहुस्ती सुरू झाली.

## गोरी तोंडे गोरीमोरी झाली

त्या आवाजाने अभ्यंकर जागे झाले व "खरे, काय गडबड आहे?" म्हणून त्यांनी मला प्रश्न केला. ते दाराजवळ आले व त्यांच्या सर्व प्रकार लक्षात आला. दारासमोर हमाल युरोपिअनांचे सामान डोक्यावर घेऊन उभा होता. त्याला व त्याच्या साहेबाला शिवी हासडून अभ्यंकरांनी त्या सामानाला एक जोराने लाथ मारली. सामान फलाटावर आदळून ट्रंक उघडली गेली; व आतील वस्तु बाहेर उडाल्या. हा प्रकार पाहून ते युरोपियन आश्चर्याने स्तिमितच झाले. लागलीच त्यांनी गार्डाला बोलावून आणून तक्रार केली. गार्डाने पाहिले, डबा रिझर्व आहे, म्हणून तो म्हणाला की, "मी काही करू शकत नाही." त्याबरोबर त्या साहेबांची तोंडे गोरी होतीच ती गोरीमारी झाली; व अभ्यंकरांनी त्यांना सुनाविलेच की, ' माझ्या देशबांध-वांना तुम्ही असेच वागविले असते. ' साहेब बिचारे चुरमुरे खात चालते झाले.

## कांग्रेसचे धिंडवडे निघतील

अभ्यंकरांनी कांग्रेसकरता अक्षरशः आत्मसमर्पण केले. ती हकीकत अशी १९३२-३३ च्या कांग्रेस चळवळीनंतर १९३४ साली पाटणा येथे प्रमुख कांग्रेसवाल्यांची सभा भरली होती. त्या सभेत पुनरपि कौन्सिल प्रवेशाचा पुरस्कार करण्यात आला होता; व गांधीजीही त्या मताचे होते. अभ्यंकरांना त्या वेळी हे मत पटत नव्हते. म्हणून गांधीजींना छातीठोक विरोध करून त्यांनी खणखणीत शब्दात बजाविले की, या गोष्टीने कांग्रेसचे धिंडवडे निघतील. आणि झालेही तसेच.

## ' ना स्वीकार, ना धिक्कार '

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे १९३४ मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवड-णुकी लढवाव्या असे कांग्रेसने ठरविले. अभ्यंकरांचे मत विरुद्ध होते; व त्यांची प्रकृति मधुमेहाने जर्जर आली होती. डॉ. मुंजे हे नागपूर विभागातर्फे हिंदुमहा-सभेचे उमेदवार म्हणून निश्चितच उभे राहणारच होते. त्यांना विरोध करावयास कांग्रेसतर्फे मी उभे रहावे, असा मनोदय अभ्यंकरांनी व्यक्त केला. मी उभा राहण्यास तयार नव्हतो. कारण कांग्रेसचे जातीय निवाड्याच्या बाबतीतले

" ना स्वीकार, ना धिक्कार " हे धोरण मला मान्य नव्हते. अभ्यंकरांनी माझे मन वळविण्याचा एक महिनाभर प्रयत्न केला.

## दोस्ती तुटण्याची धमकी

अखेरीस ते अगदी जिकिरीस आले; व त्यांनी मला बजाविले की, आता मी अगदी निर्वाणीचा खलिता देतो की, जर तू उभा राहिला नाहीस, तर आपली दोस्ती तुटेल. मलाही राग आला व मी त्यांना उलट उत्तर दिले की, अशी धमकी देणे निंद्य आहे. एक दोन दिवसांनी माझा राग मावळला; व मी विचार केला की, जर मी उभा राहिलो नाही, तर डॉ. मुंजे यांच्या विरुद्ध स्वतः अभ्यंकरांनाच उभे राहावे लागेल. त्यांची प्रकृती जर्जर झालेली आहे. म्हणून त्यांच्यावर हा बोजा पडणे बरे नाही. असा विचार करून मी उभा राहण्याकरता संमती दिली. अभ्यंकरांनाही आनंद झाला व त्यांनी माझे नाव जाहीरही करून टाकले. परंतु विधिघटना निराळीच होती.

## कांग्रेसश्रेष्ठींची शंका

कांग्रेसश्रेष्ठींना माझे नाव पसंत पडले नाही. त्यांना वाटले, डॉ. मुंजे यांच्या विरुद्ध मी जरा तोकडा पडेन. तसे त्यांनी अभ्यंकरांना कळविले. अभ्यंकरांनी त्यांना उलट कळविले की, मी खात्रीपूर्वक निवडणुकीत यशस्वी होईन. पण कांग्रेसश्रेष्ठींची खात्री पटेना. पत्रोपत्री या प्रश्नाचा निकाल लागू शकत नव्हता.

## वर्ध्याचे पाचारण

म्हणून एके दिवशी सरदार पटेल वर्धा येथे आले असताना अभ्यंकरांना वर्ध्याचे पाचारण आले. मलाही त्यांच्याबरोबर जावे लागले. तेथे पटेलांनी अभ्यंकरांना स्वतःच उभे राहण्याची गळ घातली. अभ्यंकरांनी पुष्कळ नाही हो म्हटले. शेवटी महात्मा गांधीही मध्ये पडले व अभ्यंकरांचा नाइलाज झाला.

## मध्ये पडण्याचे नाकारले

शेवटी त्यांनी पाच मिनिटे विचार करण्यास मागून घेतली व ते आणि मी एकीकडे जाऊन बसलो. त्यांनी मला सांगितले की तू मधे पड व कांग्रेसश्रेष्ठींना सांग की अभ्यंकर आजारी आहेत, जर्जर झाले आहेत व वैद्यकीय दृष्ट्या त्यांना ही निवडणुकीची दगदग झेपणार नाही, धोका होईल. मी त्यांना म्हटले की, हाच विचार करून मी उभा राहाण्यास संमती दिली; व माझे नावही जाहीर झाले आहे. आता जर मी तुमच्या करता रदबदली केली, तर मी स्वार्थाकरता स्वतःच्या उमेदवारीकरता असे करतो, असे कांग्रेसश्रेष्ठी समजतील. तेव्हा

मी आता मधे पडावयास तयार नाही. मी तसे करणे योग्य होणार नाही. माझा नाइलाज आहे.

## ‘ माझा तुम्ही बळी घेतां ’

मी असे म्हणताक्षणीच अभ्यंकरांनी कपाळावर हात मारून घेतला व म्हणाले की, “ आता माझी शंभर वर्षे भरली, मी काही या दगदगीतून वाचत नाही. मला बळीच जावे लागणार.” नंतर, ‘ त्यांनी तुम्ही माझा बळी घेता, ’ असे बजावून उभे राहण्यास संमती दिली. निवडणूक यशस्वी झाल्याबरोबर त्यांचा आजार बळावला व ते दिवंगत झाले. अशा रीतीने त्यांनी कांग्रेसकरिता आत्म-समर्पण केले. असो. कांग्रेसश्रेष्ठींनी आग्रह धरला नसता तर फार बरें झाले असते. कदाचित् प्रांतात ज्या घटना पुढे घडल्या त्या घडल्या नसत्या. पण विधिघटना कोण चुकविणार ?

दिल्ली, १६-१२-४४

# गड आला पण सिंह गेला

हा मथळा पहाताच अरे, ही तर स्वातंत्र्याचे द्रष्टे व उद्गाते छत्रपती शिवप्रभू यांचे एकनिष्ठ सांगाती नरवीर तानाजी मालुसरे यांची वीरकथाच असावी असे कोणालाही वाटणे स्वाभाविक आहे. पण महाराष्ट्रभूमी ही सदैव वीरांचीच भूमी राहिलेली आहे व पुढेही ती तशीच राहणार यात तिळमात्र शंका नाही. शिवछत्रपती आणि वीर तानाजी यांचा वारसा घेऊन या महा-राष्ट्रभूमीत गेल्या तीनशे वर्षांत एकापेक्षा एक सरस असे अनेक स्वातंत्र्यवीर जन्मास आले आणि आपल्या कृतीने अमर झाले. अशाच एका स्वातंत्र्याच्या पाइकाची वीरकथा थोडक्यात मी येथे देत आहे.

नरकेसरी बॅरिस्टर मोरूभाऊ अभ्यंकर यांचे नाव माहित नाही असा मनुष्य गोंदियापासून गोव्यापर्यंत सुशिक्षित समाजात तरी सहसा आढळणार नाही. त्यांना दिवंगत होऊन दि. २ जानेवारी १९५८ रोजी २३ वर्षे पूर्ण झाली असली तरी त्यांची स्मृती आजही जनमनात अगदी ताजी आहे. याचे कारण मोरूभाऊंचे कर्तृत्वच तेवढे थोर व चित्ताकर्षक आहे. मोरुभाऊंचा जन्म वर्धा जिल्ह्यात धनोडी गावी इ. स. १८८६ साली झाला. नागपूरकर भोस-ल्यांच्या राजवटीत बंगालवरील स्वारीच्या वेळी फौजी कारवाईत त्यांच्या वाडवडिलांनी चांगलाच पराक्रम गाजविल्यामुळे भोसले सरकारकडून पुढे त्यांना धनोडी गाव इनाम मिळाला. अशा पराक्रमी पुरुषांचा वारसा घेणाऱ्या मोरुभाऊ अभ्यंकरांतही तेच गुण उत्कटत्वाने दिसून यावेत यात आश्चर्य नाही. अशा

या तेजस्वी पूर्वेतिहासामुळेच पारतंत्र्यात असलेल्या आपल्या जन्मभूमीला स्वतंत्र करण्याची तीव्र लालसा मोरुभाऊत निर्माण झाली. ‘प्रसादचिन्हानि पुरः फलानि’ अशीच देशाचे पारतंत्र्य नष्ट करण्याच्या कामी पुढे मोरुभाऊंच्या हातून भव्य कामगिरी झाली.

वर्धा, भंडारा व नागपूर या गावी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण संपवून १९०९ साली बॅरिस्टर होण्यासाठी ते इंग्लंडला गेले. स्वतंत्र वातावरणाच्या त्या भूमीत आपल्या देशाच्या पारतंत्र्याचे शल्य त्यांना अधिकच बोचू लागले. स्वाभिमान व निर्भयता हे त्यांचे उपजत गुण तेथे अधिक प्रखर बनले. त्यातच विठ्ठलभाई पटेलांसारख्या बाणेदार पुरुषाच्या सहवासाचा लाभ. मग काय विचारता! आपल्याला पारतंत्र्यात ठेवणाऱ्या इंग्रजापेक्षा कोणत्याही बाबतीत आपण कमी नाही, याची प्रात्यक्षिके लंडन शहराच्या भरवस्तीत करून दाखविण्याचा मोरूभाऊंनी क्रम सुरू ठेवला. रोज पोषाख करून शहराच्या चौकाचौकातून जोड्यांना ‘पॉलीश’ करणाऱ्या इंग्रज माणसाच्या पुढे मोठ्या दिमाखाने आपला पाय ठेवून त्याच्याकडून ते पॉलिश करून घेत. हिंदुस्थानला पारतंत्र्यात ठेवणाऱ्या इंग्रजाकडून आपल्या जोड्यास पॉलिश करून घेण्यात एक प्रकारचे मानसिक समाधान मोरुभाऊ मानून घेत. इंग्रजांना डिवचण्यात किंवा त्यांचा पाणउतारा करण्यात मोरूभाऊंच्या मनाला उल्हासच वाटायचा. १९१२ मध्ये बॅरिस्टर होऊन ते स्वदेशी परत आल्यावर प्रथम मुंबईला त्यांनी बॅरिस्टरी केली. नंतर ते नागपूरला प्रॅक्टिस करू लागले. एकदा एका खटल्यासाठी मोरूभाऊ खामगावला गेले. पहिल्या वर्गाचे तिकीट काढून ते डब्यात चढू लागले. त्याच डब्यात खामगावचेच मि. बोर्न नावाचे एक आय. सी. एस. अधिकारी अगोदरच बसलेले होते. त्यांनी मोरूभाऊंना मज्जाव केला. इतकेच नव्हे तर डब्याच्या दारात दोन्ही पाय आडवे करून ते बसले.

मोरूभाऊंच्या स्वाभिमानाला तो प्रकार म्हणजे आव्हानच होते. त्यांनी तात्काळ मि. बोर्न यांचे पाय दूर सारून डब्यात प्रवेश केला व मोठ्या ऐटीने त्याच्या समोरच्या बर्थवर बसले व मोठ्या बाणेदारपणाने त्याला सवाल केला की, तुझ्या डब्यात तर मी येऊन बसलो. तुला आता काय करायचे असेल ते खुशाल कर. बोर्नसाहेब त्यावेळी तर गप्प बसले. पण पुढे त्यांनी या प्रकाराबद्दल चीफ कमिश्नरकडे (त्यावेळी मध्यप्रांतात गव्हर्नर ऐवजी चीफ कमिश्नर हा सर्वोच्च अधिकारी होता) तक्रार केली. त्या तक्रारीचा बोर्नसाहेबांना नुसता प्रतिकूल निकाल मिळाला नाही; तर उलट त्यांनी अभ्यंकरांची माफी मागावी असा सल्ला मिळाला.

अशाच तऱ्हेचा दुसरा एक प्रकार १९१९ साली घडला. त्या साली स्वतः मोरूभाऊ, मी आणि नागपूरचेच एक कट्टर टिळक अनुयायी कै. नारायणराव वैद्य असे तिघे जण अमृतसरच्या कांग्रेसला गेलो होतो. कांग्रेसचे अधिवेशन संपून आम्ही नागपूरला परत येताना मध्यरात्रीच्या सुमारास एक युरोपियन गृहस्थ आमच्या अगाऊच रिझर्व केलेल्या डब्यात शिरण्याचा प्रयत्न करू लागला. मोरूभाऊ त्यावेळी वरच्या बर्थवर झोपले होते. मी जागा होतो. त्या युरोपियन गृहस्थास डब्यात शिरण्यास मी मज्जाव केला. तेव्हा त्याच्यात व माझ्यात बाचाबाची सुरू झाली. त्यामुळे मोरूभाऊ जागे झाले आणि म्हणाले, काय हो खरे, काय गडबड आहे!

मी त्यांना तो प्रकार सांगितला. तेव्हा ते मोठ्या त्वेषाने बर्थवरून उतरून डब्याच्या दाराजवळ आले व डब्यात सामान ठेवण्याचा प्रयत्न करू नको असे त्यांनी त्या युरोपियन गृहस्थास निर्वाणीने सांगितले. पण मोठ्या तोऱ्याने त्या गृहस्थाने आपले सामान डब्यात ठेवण्याचा अट्टाहास सोडला नाही. तेव्हा मोरूभाऊंनी त्या सामानाला अशी जोराची ठोकर मारली की, रेल्वे प्लॅटफॉर्मवर ते सबंध सामान इतस्ततः पसरले गेले. तेव्हा त्या युरोपियन गृहस्थाने त्याबद्दल स्टेशनमास्तरकडे तक्रार केली. पण त्याच्या त्या तक्रारीची, नियमात ती कोठेही बसत नसल्यामुळे स्टेशनमास्तरने दखल घेतली नाही.

अमृतसर कांग्रेसनंतर मोरूभाऊ अभ्यंकरांच्या राजकीय कर्तृत्वाला वऱ्हाड मध्यप्रांतात चांगलाच उठाव मिळत गेला. डॉ. मुंजे, लोकनायक अणे आणि मोरूभाऊ अभ्यंकर हे तिघेही लोकमान्य टिळकांचेच शिष्य. पुढे लोकमान्यांच्या निधनानंतर देशस्वातंत्र्याच्या आंदोलनात मोरूभाऊंनी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीही आपल्या देशसेवेच्या कार्यात अंतर पडू दिले नाही. याच्या उलट कांग्रेसकडून हिंदूंच्या न्याय्य हक्कांची पायमल्ली होते या आपल्या प्रामाणिक समजुतीमुळे डॉ. मुंजे तिच्यापासून दूर दूरच गेले. याचा परिणाम म्हणजे सहकार्याने आणि परस्पराविषयीच्या प्रेमादराने देशसेवा करणाऱ्या या दोघा टिळक अनुयायात मतभिन्नता होऊन त्यांचे राजकीय प्लॅटफॉर्मही भिन्न झाले.

दोघेही एकमेकांचे प्रतिस्पर्धी बनले. १९२६ च्या केंद्र असेंब्लीच्या निवडणुकीत दोघांचा अटीतटीचा सामना होऊन अभ्यंकरांना त्यात अपयश आले, तरीही पुढील १९३४ सालच्या निवडणुकीत कांग्रेस श्रेष्ठींनी पुन्हा अभ्यंकरांचीच डॉ. मुंजे यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार म्हणून या प्रांतातून निवडणूक केली. पण प्रकृतीच्या कारणावरून अभ्यंकरांनी आपल्या ऐवजी माझे नाव डॉ. मुंजे यांचे प्रतिस्पर्धी म्हणून सुचविले. व त्याप्रमाणे ते जाहीरही करण्यात

आले. पण डॉ. मुंजे यांच्यासारख्या जबरदस्त प्रतिस्पर्ध्यापुढे मी कमी ठरेन असे कांग्रेस श्रेष्ठींना वाटले व त्यांनी अभ्यंकरांनाच उभे राहण्याचा आग्रह केला. तेव्हा एके दिवशी मला बरोबर घेऊन अभ्यंकर वर्धेला गेले. तेथे कांग्रेस श्रेष्ठींना त्यांनी मी डॉ. मुंजे यांच्या विरोधात यत्किंचितही कमी पडणार नाही असे पटवून दिले. पण त्यांचा तो दावा कांग्रेस श्रेष्ठींना रुचला नाही व त्यांनी अभ्यंकरांनाच निवडणुकीसाठी उभे राहण्याचा आदेश दिला.

कांग्रेसश्रेष्ठींचा तो आदेश ऐकून 'तर मग आता माझे मरणच ओढवले' असे अभावितपणे अभ्यंकरांच्या तोंडून उद्गार बाहेर पडले. तरी पण अधिक प्रयत्न करून पहावा म्हणून अभ्यंकर मला घेऊन एका खोलीत गेले व मला म्हणाले, 'हे पहा डॉक्टर, तुम्हाला माहितच आहे, माझी प्रकृति कशी आहे ती. तुम्हीच आता कांग्रेसश्रेष्ठींजवळ माझ्याबद्दल रदबदली करून मला या संकटातून वाचवा.' त्यावर मी त्यांना म्हटले, 'हे पहा तुम्ही माझे नाव अगोदरच जाहीर केले नसते तर मी जरूर रदबदली केली असती. परंतु आता अशा परिस्थितीत जर मी तसे करीन, तर माझ्याच स्वार्थाचा कांग्रेसश्रेष्ठींना संशय येईल. यासाठी तुमच्या प्रकृतीची मला जाणीव असूनही माझ्याकडून तुम्ही म्हणता तशी कामगिरी होणार नाही.' यावर अधिक काही न बोलता रात्री १० च्या सुमारास काळोखातच मोटारीने वर्ध्याहून नागपुरास येण्यास आम्ही निघालो. काही अंतरावरच पुढील अनर्थांची भयसूचक घंटा म्हणूनच की काय, एका प्राणघातक अपघातातून मोठ्या शिताफीने आमची मोटार बचावली, नाहीतर पुलाच्या काठावरील एकदोन इंच अंतरावरून जर का ती खाली ओढयात कोसळली असती तर मोटारी-बरोबर आमचाही चक्काचूरच झाला असता. पुढे नागपूरला आल्यावर आपल्या बंगल्यात पाय ठेवताच अभ्यंकरांनी आपल्या पत्नीला झोपेतून उठवून तेवढ्या रात्री स्वयंपाक करायला लावला. भोजनाच्या वेळी ते आपल्या पत्नीला म्हणाले, 'रमा, माझी प्रकृति नादुरुस्त असताना सुद्धा मीच निवडणूक लढवावी असा खुद्द महात्माजी व सरदार पटेलांचा आग्रह पडला. त्या संकटातून वाचविण्याची मी या डॉ. खऱ्यालाही विनंती केली. पण तेही माझ्या विनंतीला मान देण्यास तयार नाहीत, तेव्हा त्या दिव्याला तोंड देण्याशिवाय मला गत्यंतर नाही. मला माहीत आहे की आता ही निवडणूक माझा प्राण घेणार.'

त्यानंतर निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू झाला. एके दिवशी चांद्याला प्रचारासाठी अभ्यंकर गेले असता त्याचवेळी डॉ. मुंजे यांच्या प्रचारासाठी लो. ना. बापूजी अणेही तेथे आले होते. त्यांचा व अभ्यंकरांचाही मुक्काम

चांद्याचे लोकाग्रणी व एकनिष्ठ टिळकभक्त श्री. बाबासाहेब देशमूख यांच्याकडेच होता. निवडणूक प्रचारात जरी अणे अभ्यंकरांच्या विरोधात असले तरी त्यांच्या प्रेमात मात्र यत्किंचितही अंतर पडलेले नव्हते. अभ्यंकरांच्या त्या वेळच्या प्रकृतीकडे पाहून अण्यांनी अभ्यंकरांना प्रकृतीची काळजी घ्यावी, डॉ. खरे तुमच्या पाठीशी आहेत, तरी जास्त मेहनत करू नका, असे मोठ्या आपुलकीने सांगितले. अभ्यंकरांची लोकप्रियता यावेळी जरी कळसास पोचली होती, तरी डॉ. मुंजे यांच्यासारख्याशी सामना द्यावयाचा आहे; मागच्या निवडणुकीत त्यांनी आपला पराभव केला होता, ही गोष्ट दृष्टीआड न करता प्रयत्नांची मोरूभाऊंनी पराकाष्ठा केली.

पुढे मतदान होऊन मतमोजणी झाली. त्यात अभ्यंकरांना मोठे स्पृहणीय यश प्राप्त झाले. अशा रीतीने सबंध हिंदुस्थानभर गाजलेल्या त्या निवडणुकीत विजयश्रीने मोरूभाऊ अभ्यंकरांच्या गळ्यात माळ घातली खरी, पण ती विजयश्री त्यांना पचली नाही. निवडणुकीची दगदग व पुढील स्वागत समारंभांनी ते नुसते हैराण झाले. त्यातच पायाच्या अंगठ्याचे दुखणे विकोपाला जाऊन अगोदरच मधुमेहाची बिमारी असल्यामुळे अंगठ्याच्या त्या बिमारीने भेसूर स्वरूप धारण केले. अखेर ऑपरेशन करण्याकरिता त्यांना मुंबईस नेले. पण ऑपरेशन झाल्यावर दुसऱ्याच दिवशी या भूतलावरील त्यांच्या स्पृहणीय कामगिरीपेक्षाही इथल्यापेक्षाही अधिक महत्त्वाची कामगिरी त्यांच्या हातून करून घेण्यासाठी की काय कोण जाणे, परमेश्वराने त्यांना स्वर्गलोकी नेण्यासाठी यमराजास आज्ञा केली. दि. २ जानेवारी १९३५ रोजी मोरूभाऊ असेंब्लीचे प्रथम अधिवेशनही न पाहता आमच्यातून स्वर्गलोकी निघून गेले.

निवडणुकीचा गड त्यांनी जिंकला, पण त्यापायी स्वतःचे मात्र त्यांनी बलिदान केले. म्हणूनच कर्तव्यपूर्तीसाठी आत्मबलिदान करणाऱ्या शूर योद्धयाचे गुणगान करणाऱ्या या लेखास मी 'गड आला पण सिंह गेला' हा जो मथळा दिला, तो किती सार्थ आहे याची वाचकांना सहज कल्पना येईल.

## अभ्यंकराचे पहिले स्मारक मीच केले

या दोन लेखांपैकी एक १९४५ मधला आहे व दुसरा १९५८ मधला आहे. यावरून माझा अभ्यंकरांसंबंधीचा जिव्हाळा किती खोल व सतत होता हे दिसून येईल. मग पटवर्धन काहीही समजोत, त्याची मला पर्वा नाही. या जिव्हाळ्यामुळेच

मी १९३९ मध्ये नागपुरात टौनहालजवळ स्वखर्चाने अभ्यंकरांचा पुतळा बसवून त्यांचे पहिले स्मारक उभारण्याचे श्रेय संपादन केले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## सेठ जमनालाल बजाजांचा कावा

या पुतळ्याची हकीकतही जराशी मनोरंजक आहे. म्हणून ती मुद्दाम येथे देतो. अभ्यंकरांच्या दुःखद मृत्यूनंतर मी कांग्रेसमध्येच होतो व मध्यप्रांताचा मुख्य प्रधानही झालो. माझे वर्धेला जाणेयेणेही असे. वर्धेला गेलो म्हणजे सेठ जमनालालनाही भेटत असे. एका भेटीत त्यांनी कांग्रेसतर्फे अभ्यंकरांचे स्मारक करण्याचे ठरविले आहे असे सांगितले. ते म्हणाले, 'तुम्ही अभ्यंकरांचे घनिष्ठ मित्र होता. त्यांच्या स्मारकाकरिता तुम्ही कांग्रेसला किती रकम देऊ शकाल सांगा. मी म्हटले, 'मी काही तुमच्याप्रमाणे श्रीमंत मनुष्य नाही. मी हाताने पोटाला मिळविणारा मध्यमवर्गीय मनुष्य आहे. तरी मी तीन हजार रुपये देईन. एका मुठीने नाही. पण सवडीसवडीने.' ते म्हणाले, 'ठीक आहे. तुम्ही माझ्या वहीत कांग्रेसला अभ्यंकरांच्या स्मारकासाठी तीन हजार रुपये देण्याचे वचन दिले आहे असे लिहून द्या व खाली सही करा.' त्याप्रमाणे मी केले. पुढे १९३८ च्या जुलै महिन्यात माझ्यावर भयंकर अन्याय होऊन माझी पदच्युती झाली व आक्टोबर महिन्यात शिस्तभंगाच्या कारवाईने माझी कांग्रेसमधूनही हकालपट्टी झाली. त्यानंतर केव्हा तरी एके दिवशी सेठ जमनालाल नागपुरात आले असताना माझ्या घरी आले व म्हणाले, की तुम्ही आता सर्व व्यापातून मुक्त झाला आहात. म्हणून अभ्यंकरांच्या स्मारकाचे कार्य करण्याची सर्व जबाबदारी तुम्हीच उचला व वचन दिल्याप्रमाणे तीन हजाराची रक्कम माझ्या दुकानी जमा करा.

## 'आम्ही तुमच्यावर फिर्याद करून रक्कम वसूल करू'

मी हे ऐकून स्तिमितच झालो व म्हणालो, 'शेटजी मी इतका मूर्ख नाही. ज्या कांग्रेसने माझ्यावर इतका अन्याय व अपमान केला त्या कांग्रेसतर्फे मी कोणतेही काम करणार नाही व त्या कांग्रेसला मी माझा पैसाही देणार नाही.' सेटजी म्हणाले, 'असे कसे होईल? तुम्ही दिलेले लेखी वचन माझ्या वहीत आहे. आम्ही तुमच्यावर फिर्याद करून रकम वसूल करू.' मी म्हणालो, 'ते लेखी वचन म्हणजे काही प्रामेसरी नोट नाही. म्हणून तुमची फिर्यादीची धमकी व्यर्थ आहे. पण मी एवढे सांगतो की, मी संकल्प सोडला आहे त्याप्रमाणे माझ्या आवडीप्रमाणे मी स्मारक उभारीनच. पण ते खाजगी राहील. त्याचा कांग्रेस संस्थेशी कोणताही संबंध राहाणार नाही.'

( रविवार ता. ८ जानेवारी १९३९ च्या महाराष्ट्र 'तून)

## नरकेसरीच्या पुतळयास पाहून

[ कै. नरकेसरी अभ्यंकर यांच्या पुतळयाच्या अनावरण प्रसंगी कविवर्य **आनंदराव टेकाडे** यांनी म्हटलेले स्वकृत पद्य. ]

हा उभा अचेतन वीर केसरी चैतन्या द्याया ॥ ध्रु० ॥
स्वतंत्रतेची उज्ज्वल ज्योति
हृदयी ज्याचे नित्य जागती
तो असा जन्मुनी धन्य होतसे चैतन्या द्याया ॥ १ ॥
पारतंत्र्यि जरि राही नियती
रोमरोमिं तरि निर्भय वृत्ति
तो असा जगा बेगुमान बघतो चैतन्या द्याया ॥ २ ॥
परवशतेची मनोमलिनता
झडुनी लाभो तया ओजता
नव विपद-खड्ग झेलण्या उभा हा चैतन्या द्याया ॥ ३ ॥
परवशतेला पदी तुडविले
स्वातंत्र्यामधि मन रंगविले
तो तसाच भारत म्हणुनि उभा हा चैतन्या द्याया ॥ ४ ॥
मृत वाटे तरि अमर जहाला
स्व-जनभक्तिने कंठी धरिला
नरवीर केसरी फणीन्द्रपुरिं हा चैतन्या द्याया ॥ ५ ॥

**व न्दे मा त र म्**

(रविवार ता. १ जानेवारी १९३९ च्या महाराष्ट्रातून)

## अभ्यंकर पुतळयाचे उद्घाटन

### सोमवार ता० २ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता

कै. नरकेसरी अभ्यंकर यांच्या पुतळयाचे उद्घाटन, त्यांच्या ४ थ्या पुण्यतिथीला, सोमवार ता. २ जानेवारी १९३९ रोजी, महालावरील जागेत ( नर्सिंग टॉकीज समोर ) लोकनायक बापूजी अणे यांचे हस्ते अभ्यंकर सेवा-मंडळाचे विद्यमाने होणार आहे

**समारंभाचा कार्यक्रम**

सायं. ५ वाजता अध्यक्षांचे हस्ते टिळक पुतळयाला हार अर्पण करून तेथून पुतळयाच्या नियोजित जागेपर्यंत अध्यक्षांची मिरवणूक व तेथे त्यांचे

स्वागत [ मिरवणुकीत फक्त त्या कामासाठी बोलावण्यात येणारे भाग घेतील. बाकी सर्व समारंभाचे जागी बसले राहतील. ]

मास्टर अंभईकर यांचे, आपल्या पथकातील मंडळीचे साथीत वंदेमातरम् राष्ट्रगीत व कविवर्य आनंदराव टेकाडे यांचे 'नरकेसरी' कविता–गायन.

डॉ. ना. भा. खरे यांचे स्वागतपर भाषण; व मंडळाचे अध्यक्ष डॉ. दळवी यांचे प्रास्ताविक भाषण.

पुतळ्याचे अनावरण; व लोकनायक अणे यांचे अध्यक्षीय भाषण.

नगराध्यक्ष श्री. ढवळे यांचे आभार प्रदर्शनाचे भाषण; व समारोप.

वि. सू. (१) समारंभाचे जागी लाउडस्पीकर्स लावण्यात येतील. (२) स्त्रियांची बसण्याची खास सोय करण्यात येईल. (३) ज्यांना पुतळ्याला हार घालावयाचे असतील त्यांनी नावे कळवावी. (४) व्यक्तिशः निमंत्रणे ज्यांना मिळाली नसतील त्यांनी हे निमंत्रण समजून समारंभास हजर राहण्याची कृपा करावी. (५) समारंभ यशस्वी रीतीने पार पाडण्याचे कामी सर्वतोपरी मदत करावी अशी सर्वांना विनंती आहे.

**पां. वि. सावरकर**

**म. गं. दातार**

चिटणीस, अभ्यंकर सेवा मंडळ

खामगावच्या टिळक विद्यालयातील तरुण शिल्पकार श्री. पंधे ( गुरुजी ) यांनी कै. नरकेसरी यांचा कांक्रीटचा ८ फूट उंचीचा पुतळा तयार केला असून, तो डॉ. खरे यांनी खरेदी करून अभ्यंकर सेवामंडळास दिला आहे. हा पुतळा नागपुरास पाताळेश्वरासमोरील जागेवर बसविण्यात आला असून, त्याचे उद्घाटन उद्या लो. ना. बापुजी अणे यांच्या हस्ते होणार आहे. श्री. पंधे यांच्या शिल्पशाळेत छायाचित्र घेतले ते वर दिले आहे. पुतळ्याशेजारी शिल्पकार श्री. पंधे हे उभे आहेत.

( बुधवार ता. ४ जानेवारी १९३९ च्या महाराष्ट्रातून )

## नरकेसरी अभ्यंकर यांच्या पुतळ्याचे उद्घाटन

### चालू राजकारणात स्पष्टोक्तीची गरज !

### लोकनायक अणे यांचे मार्मिक भाषण

अगाऊ जाहीर झाल्याप्रमाणे येथील अभ्यंकर सेवा मंडळातर्फे महालमधे नरसिंग टॉकिजच्या समोर उभारण्यात आलेल्या कै. नरकेसरी अभ्यंकर यांच्या

उभ्या पुतळ्याचा अनावरण समारंभ लोकनायक बापूजी अणे यांच्या हस्ते परवा सोमवार ता. २ रोजी सायंकाळी म्हणजे कै. अभ्यंकरांच्या चतुर्थ श्राद्ध दिवशी झाला. समारंभास सुमारे १५ ते २० हजार लोकसमुदाय जमला होता व नगर कांग्रेस कमेटीच्या काही हिरवटलेल्या लोकांनी जरी या समारंभास गालबोट लावण्याचा उपद्व्याप केला तरी समारंभ अत्यंत यशस्वी झाला. या प्रसंगी डॉ. मुंजे, कु. फत्तेसिंगराज भोसले, अॅ. बोबडे, नागपूरचे डे. कमिश्नर श्री. मॅकलेघन्, नगराध्यक्ष श्री. ग. दि. ढवळे, श्री. ए. श्री. पटवर्धन, वीर हरकरे, सावनेरचे श्री. बाबुराव हरकरे, चांद्याचे कां. आमदार श्री. रामप्रसाद दुबे, आमदार अग्निभोज, आमदार उधोजी, डे. स्पीकर सौ. अनुसयाबाई काळे, डॉ. अभ्यंकर, न्या. नियोगी, श्री. समिउल्लाखान, श्रीमंत बाळासाहेब चिटणवीस, विद्वरत्न के. ल. दप्तरी, डॉ. हरदास, श्री. शंकरगीर, डॉ. बुचे, डॉ. सोनक, नगर कां. क. चे उपाध्यक्ष श्री. लक्ष्मणराव शेर्लेकर, अॅ. पाध्ये, अॅ. देव, श्री. मामासाहेब ब्रह्मराक्षस, अॅ. वझलवार, कै. नरकेसरींच्या पत्नी श्रीमती रमाबाई अभ्यंकर, श्री. भास्करराव नियोगी, ना. गोखले शिक्षणमंत्री, श्री. खोलकुटे, दंडिगे म्युनि. सभासद, श्री. रा. बा. फुले, रा. रामभाऊ श्रोती, श्री. दामुअण्णा देशमुख, रा. ब. ताराचंद, श्री. रामजी पहेलवान व गोपालभय्या म्यु. सभासद, डॉ. टुली, रा. सा. रामस्मरण, श्री. चॅटर्जी म्यु. सेक्रेटरी, श्री. शिरपूरकर सिटी इंजि., डॉ. अणे ( वणी ), श्री. घुडे ( कारंजा ) प्रभृती प्रमुख नागरीक हजर होते.

सुरवातीस अनाथ विद्यार्थीगृहाचे श्री. कायरकर व कवी आनंदराव टेकाडे यांनी प्रसंगासाठी खास तयार केलेली गीते म्हणून दाखविली. त्यानंतर मास्टर विनायक अंभईकर व त्यांचा ऑर्केस्टा यांनी ‘ वन्देमातरम् ’ हे राष्ट्रगीत म्हटल्यावर डॉ. खरे भाषण करण्यास उभे राहिले. जमलेल्या नागरिकांचे अभ्यंकर सेवा मंडळातर्फे हार्दिक स्वागत करून डॉ. खरे म्हणाले,

## अभ्यंकरांची बेदरकार वृत्ती

“ आजच्या प्रसंगी मी कै. अभ्यंकरांविषयी काही सांगण्याचा प्रयत्न करणे हास्यास्पद आहे. हा पुतळा कोणत्या परिस्थितीत उभारला जात आहे, हे नागपूरकरांस माहित आहेच. मी फक्त एक दोन गोष्टींचाच उल्लेख करणे अवश्य समजतो. कै. नरकेसरी अभ्यंकरांचे विशेष गुण म्हणजे निर्भय, बेडर व बेदरकार वृत्ती. हे तिन्ही गुण कै. नरकेसरी अभ्यंकर यांच्या अंगी पूर्णांशाने भरले होते. अन्यायाची व अपमानाची त्यांना मोठी चीड येत असे. अशा थोर व पराक्रमी पुरुषाचा पुतळा अभ्यंकर स्मारक मंडळाने इतक्या लवकर उभारला ही गोष्ट त्याला भूषणास्पद आहे. कै. अभ्यंकरांप्रमाणे, ढोंगबाजी,

बुवाबाजी व झब्बुशाही यांचा नायनाट करण्यासाठी अभ्यंकर सेवा-मंडळाचे कार्यकर्ते पुढे येतील अशी मला आशा आहे. कै. अभ्यंकर हे मरे-पर्यंत कांग्रेसमन होते. तसे सद्भाग्य मला लाभले नाही. पण कॉंग्रेसने जरी मला काढून टाकले तरी मी आपणाला कॉंग्रेसमनच म्हणवितो. व मरेपर्यंत मी कॉंग्रेसमन म्हणूनच राहीन. ( टाळ्या ) मात्र मी प्रोटेस्टंट कांग्रेसमन आहे. अन्यायाविरुद्ध लढण्याचे कार्य अभ्यंकर आजन्म करीत आले व त्यांची स्मृती नागपूरच्या नागरिकांना रहावी म्हणून हा पुतळा उभारण्यात येत आहे. अन्यायाविरुद्ध लढण्याची स्फूर्ती मला कै. अभ्यंकरांकडूनच मिळाली व त्यांची पाखर माझ्यावर सदैव राहो अशी माझी प्रार्थना आहे. आजच्या प्रसंगी आम्हा दोघांचे मित्र डॉ. मुंजे हे हजर आहेत. त्यांनी व्यासपीठावर येऊन दोन शब्द सांगावे अशी मी त्यांना विनंती करतो."

## डॉ. मुंजे यांचे भाषण

त्यानंतर डॉ. मुंजे यांचे भाषण झाले. ते म्हणाले, "आजच्या प्रसंगी काय बोलावे यासंबंधी माझ्या मनात अनेक प्रकारचे भाव उत्पन्न होतात. आम्ही अनेक वर्षे एके ठिकाणी काम केले, व आयुष्याने लहान असूनही मोरूभाऊ आमच्या पूर्वी निघून गेले. म्हणून दुःख होणे साहजिक आहे. या भावना कितीही दाबून ठेवल्या तरी रहावत नाही. दुःखात सुख म्हणजे आपण मित्रमंडळींनी त्यांचा पुतळा या मुख्य ठिकाणी उभारला व त्यांची आठवण नागपूरकरांना कायमची करून दिली हे आहे. कै. अभ्यंकरांनी आपल्या प्रांताचे नाव हिंदुस्थानात सर्वत्र गाजत ठेवले, तशा प्रकारचे कार्य करून आपल्या प्रांताचे नाव सतत गाजत ठेवणारा दुसरा इसम झाला नाही. अशा थोर पुरुषाबद्दल आपला आदर व्यक्त करून मी शिर नमवितो. त्यांचे शरीर जरी या जगात नसेल तरी परमेश्वरी कृपेने कीर्ती-रूपाने ते चिरंतन राहोत, अशी प्रार्थना करून मी आपले भाषण संपवितो."

त्यानंतर डॉ. दळवी यांचे भाषण झाले. त्यात त्यांनी अभ्यंकर सेवा मंडळाने केलेल्या कार्यांची थोडक्यात माहिती सांगून पुतळा बनविणारे शिल्पकार श्री. पंधे यांचा परिचय करून दिला. श्री. पंधे यांनी अभ्यंकरांजवळून आपण जो राजकारणाचा धडा घेतला त्यामुळे हा पुतळा बनविण्याची स्फूर्ति आपणास झाली असे सांगितले.

त्यानंतर सेवा मंडळाचे एक चिटणीस श्री. सावरकर यांनी श्री. रामराव देशमुख, स्वातंत्र्यवीर सावरकर, ना. भरूका, महाराष्ट्राचे संपादक श्री. गोपाळराव ओगले प्रभृतीकडून आलेले संदेश वाचून दाखविले.

त्यानंतर लोकनायकांच्या हस्ते टाळ्यांच्या गजरांत पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. पुतळ्याच्या आजूबाजूस व समारंभाचे जागी इतरत्र रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांची रोषणाई केली असल्यामुळे यावेळचा देखावा फार नयन-मनोहर दिसत होता.

## लोकनायकांचे भाषण

त्यानंतर लो. ना. बापूजी अणे यांचे भाषण झाले. ते म्हणाले, " हे काम करण्याला, आपण मनात आणले असते तर हिंदुस्थानात कोणीही मोठा पुढारी आपल्याला मिळाला असता. असे असता आपण माझीच निवड का केली याबद्दल मला एकच कारण सुचू शकते. ते म्हणजे अशा वार्षिक श्राद्धाचे प्रसंगी दररोज तर्पण करणारा व श्राद्धसंकल्प सांगणारा ब्राह्मण आपल्याला पाहिजे होता. लो. टिळकांच्या दोन पुतळ्यांचे मी मागे अनावरण केले. नुकताच मोर्शीला कै. दादासाहेब खापर्डे यांच्या पुतळ्याचे अनावरण मी करून आलो. त्याच परंपरेतले माझे मित्र कै. अभ्यंकर यांच्या पुतळ्याचे आज मी उद्घाटन केले.

" कै. अभ्यंकरांसारखे पुरुष कोणत्याही राष्ट्रातील लोकांच्या आदरास पात्र व्हावे यात आश्चर्य नाही. यावज्जन्म सेवा व शक्य तितका स्वार्थत्याग ज्यांनी केला त्या नरकेसरींचे स्मारक करण्याचा ज्यांनी प्रयत्न केला त्यांचे मी आभार मानतो. हे स्मारक उभारून त्यांनी या शहराचीच नव्हे तर साऱ्या प्रांताची सेवा केली आहे. लोककार्य करण्याची सवय नरकेसरींना लहानपणासून लागली होती. नामांकित वकील व बॅरिस्टर म्हणून लौकिक असताही सार्व-जनिक खटल्यात ते एक पैचाही मोबदला न घेता काम करीत असत. असे काम ते फक्त आपल्या प्रांतातच करीत असत असे नाही तर एका सार्वजनिक खटल्यासाठी ते दिल्लीला देखील महिनो-गणती जाऊन राहिले होते. अशा रीतीने काम करीत गेल्यामुळेच स्वतः अंगावर घेऊन कार्य करण्याची त्यांची वृत्ती वृद्धिंगत झाली.

## स्वातंत्र्यप्रीति व पारतंत्र्याचा तिटकारा

" नरकेसरी अभ्यंकरांच्या आंगच्या दोनचार गुणांचाच मी आजच्या प्रसंगी निर्देश करणार आहे. स्वातंत्र्यप्रीति व पारतंत्र्याचा तिरस्कार हा त्यांच्या स्वभावातला पहिला गुणविशेष होता. मध्यवर्ती असेंब्लीत त्यांनी जी भाषणे केली त्यातील प्रत्येक शब्दात व वाक्यात त्यांची स्वातंत्र्यप्रीति व आपल्या सत्तेचा ज्यांना उन्माद चढला आहे अशा परकीयांबद्दलचा तिरस्कार दिसून येतो. याच गुणात त्यांच्या कार्यक्षमतेची प्रेरणा आहे.

" कर्तव्यनिष्ठा हा त्यांचा दुसरा गुण होता. असेंब्ली निवडणुकीत त्यांची इच्छा नसताही व शरीरप्रकृती क्षीण असताही केवळ आपण ज्या संस्थेचे सदस्य तिचा हुकूम पाळण्यासाठी म्हणून ते उभे राहिले. प्रकृतीची व प्राणाचीही पर्वा न करता ते निवडणूक लढले व त्याच कामापायी अखेर त्यांच्या प्राणाची आहुती पडली.

## निर्भीड स्पष्टवक्तेपणा

" निर्भीड स्पष्टवक्तेपणा हा दुर्मिळ गुण आजच्या काळात हजारातून एखाद्यात सापडणारा गुण त्यांच्या अंगी चांगला बाणला होता. अशक्य वाटणारा विचार देखील ते मोठमोठ्या लोकांच्या समोर बेधडकपणे सांगत असत. पाटणा येथे कायदेमंडळात प्रवेश करण्याच्या प्रश्नावर त्यांनी जे भाषण केले—ते स्वतः जरी संस्थेची शिस्त म्हणून निवडणुकीस उभे राहिले तरी कायदेमंडळ प्रवेशाच्या विरुद्ध मताचे होते, त्याची आठवण साऱ्या हिंदुस्थानातील कांग्रेस कार्यकर्ते कमीत कमी ६ म. पर्यंत विसरले नाहीत व आजही ते भाषण पुष्कळांच्या स्मरणात असेल. स्पष्टवक्तेपणाचा थोडासा अतिरेक झाला तरी चालेल पण तो नसण्यात जे राष्ट्राचे नुकसान आहे ते अपरिमित आहे. असा निर्भीडपणे विचार मांडणारा खंदा वीर या प्रांतातून नाहीसा झाला याबद्दल दुःख होते. ते जरी इतक्या निर्भीडपणाने बोलत असत तरी अंतःकरण शुद्ध असल्यामुळे त्यांचे प्रतिपक्षीयाबद्दल मित्रत्वाचे भाव टिकून राहात असत.

## लोकशाही स्वातंत्र्याचा कट्टा पुरस्कर्ता

" सर्व प्रकारचा स्वार्थत्याग करीत असताना व लढयात भाग घेताना एक ध्येय कै. अभ्यंकरांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवले होते. ते म्हणजे या देशात लोकशाही स्वातंत्र्य प्रस्थापित करणे. १९२० सालापूर्वी लो. टिळकांजवळून त्यांनी लोकशाही स्वातंत्र्याची दीक्षा घेतली. त्या लोकशाही स्वातंत्र्याची आज काय परिस्थिती झाली आहे इकडे लक्ष दिले तर अभ्यंकरांच्या निधनाने देशाचे किती अपरिमित नुकसान झाले आहे याची आपणास कल्पना येईल. मतदार, कौन्सिलातील प्रतिनिधी व मंत्रीमंडळे यांचे जे अन्योन्य संबंध असावयास पाहिजेत ते आज नष्ट झाले आहेत; व ज्यांचा कायदेमंडळाशी काहीही संबंध नाही अशा बाहेरच्या लोकांच्या एका संस्थेच्या तंत्राने कारभार सुरू आहे. अशा वेळी स्पष्ट व निर्भीड शब्दात आपल्याला काय वाटते हे सांगणारा अभ्यंकरांसारखा इसम आमच्यात राहिला नाही या गोष्टीची बोचणी मला सारखी लागून राहिली आहे. अभ्यंकर म्हणजे मानधनाची मूर्ति होते. ते खरे

नरकेसरी होते. आज केसरी म्हणून मिरविणारे लोक मानधनपणापासून किती दूर आहेत व लहान लहान गोष्टीसाठी कसे तत्वच्युत झाले आहेत हे मी पाहतो, तेव्हा ते चित्र पहा व हे चित्र पहा असे म्हणावेसे वाटते. 'अधमा धनमिच्छन्ति, धनमानां च मध्यमाः, उत्तमाः मानमिच्छान्ति, मानो हि महतां धनं' असे एक संस्कृतमध्ये सुभाषित आहे. मान हेच धन असे समजणाऱ्या महान कोटीतील व्यक्तींपैकी कै. अभ्यंकर हे होते. त्यांचे अनुकरण करण्याची बुद्धी आपणास होवो व माझी ही तिलांजली त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्यास पोहोचो अशी आशा व्यक्त करून मी आपले भाषण संपवितो." (टाळ्या)

त्यानंतर अभ्यंकर सेवामंडळातर्फे नगराध्यक्ष श्री. ढवळे यांनी समारंभ यशस्वी करण्याचे कामी ज्यांनी ज्यांनी मदत केली व श्रम घेतले त्या सर्वांचे आभार मानल्यावर ७॥ चे सुमारास समारंभ संपला. पुतळा बसविण्याच्या कामावर देखरेख करणारे सिटी इंजि. श्री. शिरपुरकर यांचे व नसिंग टॉकिजचे मालक श्री. जगाराव नायडू यांनी खेळ बंद ठेवून नुकसान सोसल्याबद्दल त्यांचे त्यांनी आभार मानले.

सभेत शहर गटाचे काही विघ्नसंतोषी कॉंग्रेसवाले पाताळेश्वराचे देवळाचे बाजूस उभे राहून गोंगाट करीत होते. नगर कां. ने आपला सवता सुभा उभारून 'सच्च्या कांग्रेसवाल्यास' समारंभात भाग घेण्यास मनाई केली होती.

पुतळ्याच्या उद्घाटन प्रसंगी नागपुरांतील निरनिराळ्या प्रसिद्ध व्यक्ती व संस्था यांतर्फे पुतळ्यास शंभरावर पुष्पहार अर्पण करण्यात आले होते.

## डेप्युटी कमिश्नरच्या हजेरीसंबंधी खुलासा

नागपूरचे डेप्युटी कमिश्नर श्री. मॅकलेघन हे या समारंभाला हजर असलेले पाहून मला आश्चर्य वाटले. समारंभ संपल्यानंतर मी त्यांना एकीकडे नेऊन तुम्ही कसे काय हजर राहिलात असा त्यांना प्रश्न केला. तेव्हा ते उत्तरले, "आम्हाला सी. आय. डी. कडून अशी खबर मिळाली की, या समारंभात काही कांग्रेसवाल्याकडून तुमच्यावर हल्ला होण्याचा संभव आहे. म्हणून माझ्या कार्यक्षेत्रात शांतताभंग होऊ नये यासाठी जबाबदारीची जाणीव ठेवून मी येथे आलो आहे."

★ ★

## प्रकरण ६ वे

# भारत—चीन संघर्ष

### संकट दाराशी आले तरी भारत सरकार थंडच

अनेक वर्षे सतत केलेल्या अहिंसेच्या व विश्वबंधुत्वाच्या प्रचाराने असो किंवा विश्वयुद्ध पेटेल आणि जगाचा नाश होईल ह्या भीतीने असो, भारत सरकार कोणाही देशाला शत्रू मानायला तयार नव्हते असे म्हटले पाहिजे. कारण १९५० मध्ये कम्युनिस्ट चीनने तिबेट गिळंकृत केले तरीही भारत सरकार थंडच राहिले. तिबेट कम्युनिस्ट चीनच्या हाती पडल्याने त्याच्या भौगोलिक निकटवर्तित्वाने भारताच्या सुरक्षिततेलाही धोका आहे हेही भारत सरकारने ध्यानात घेतले नाही. परकीय लोकांचेही हेच मत होते, असे २३ नोव्हेंबर १९५९ च्या 'हितवाद्'च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या म्याक्स लर्नर या नावाच्या 'न्यूयॉर्क पोस्ट'च्या स्तंभलेखकाच्या नेहरूशी झालेल्या मुलाखतीवरून दिसते. म्हणून ती मुलाखतच येथे देतो :

**Nehru Has No Answer !**

NEW YORK, Nev. 22.—Max Lerner, columnist for the New York Post, reported today from New Delhi that the Indian Prime Minister Mr. Nehru had no answer to the question why the young people of India had so little of the idealism of his own generation.

Lerner wrote : "Nehru is Prime Minister, Foreign Minister, Party leader, teacher, father of the nation. Yet somewhere he and India are failing.

I tried to put my finger on it in the last five minutes of the interview he gave me. I asked why there was so little in the India of today of the ferment and fire it had in the days of the struggle for Independence, so little also of the excitement I recalled during the years of our own new deal.

I asked why the young people of India today seem to have so little interest in politics, so little of the idealism that his own generation had.

"He agreed with the general drift of what I said, yet he had no answer to it except a sense of sadness about it" Lerner added.

As I think it over, what India has lost is the sense of an enemy to be overcome, a heaven to be reached.

"Once the enemy was the British and their imperialism, but that enemy is gone and now Nehru refuses—in India's hour of dire need—to recognise Communist China as the enemy, and India's freedom from fear as the goal!".—Reuter.

### नेहरूंचा महाराष्ट्राबद्दलचा आकस

नेहरूंचा महाराष्ट्राबद्दलचा आकस अनुभवून व शत्रुत्व करणाऱ्या चीनबद्दलचा निष्क्रिय थंडपणा पाहून मला राहवले नाही. म्हणून मी आपले विचार ता. २४ जानेवारी १९६० च्या 'आलमगीर' मध्ये 'नेहरू, चीन आणि महाराष्ट्र' या लेखात व्यक्त केले आहेत. तो समग्र लेख येथे देतो.

## नेहरू, चीन आणि महाराष्ट्र

आज साम्यवादी चीनने भारतावर केलेल्या आक्रमणाविरुद्ध नेहरू गोंगाट आणि गर्जना करू लागले आहेत. पण नेहरूंच्या या गर्जनेवर विश्वास बसणे कठीण आहे. कारण नेहरू आजही असे म्हणतात, की साम्यवादामध्ये तात्त्विक दृष्ट्या तसे काही वाईट नाही. नेहरूंचे जर पूर्वचारित्र्य पाहिले तर त्यांच्या ह्या उद्‌गाराबद्दल आश्चर्य वाटायला नको. नेहरूंनी लिहिलेले आत्मचरित्र आणि 'सोव्हिएट रशिया' ही दोन पुस्तके जर नजरेखालून घातली तर असे दिसून येईल की, नेहरूंनी लेनिनच्या क्रांतीनंतर १९२० मध्येच आपला आत्मा साम्यवादरूपी सैतानाला विकला आहे. आणि तेव्हापासून नेहरूंनी संधी येईल तेव्हा आपल्या सर्व शक्तीनिशी साम्यवादाचीच तळी उचलून धरली आहे. म्हणूनच त्यांच्या गर्जना नुसत्या कोरड्या धमक्या वाटतात. अजूनही त्यांनी आक्रमक चीनच्या विरुद्ध कोणतीही कृती केलेली नाही!

## कम्युनिस्ट धार्जिणेपणामुळेच

हिंदी राष्ट्रीय सभेच्या ( काँग्रेस ) राजकारणामध्येही साम्यवादी तट्टूला नेहरूंनीच वाट मोकळी करून दिली. वरवर हिंदी कम्युनिस्ट पक्षाचा धिक्कार करून त्यांचे प्रचारवाङ्मय नेहरूंनी हिंदुस्थानात मुबलक रीतीने येऊ दिले आहे. या कम्युनिस्टधार्जिण्या वृत्तीमुळेच नेहरूंनी भारतावर झालेले चीनचे आक्रमण पाच वर्षेपावेतो जनतेपासून लपवून ठेवले. जेव्हा अन्य मार्गाने जनतेला या गोष्टीचा सुगावा लागला आणि जनतेत क्षोभ निर्माण झाला, तेव्हाच त्यांनी चिनी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी भारत सरकारच्या पाठीमागे खंबीरपणे उभे रहा अशी जनतेची अजीजी केली. पण नेहरू स्वतःच किती खंबीर आहेत याचाच संशय मनात निर्माण होतो. कारण चाऊ एन् लायने एक गोडसे पत्र पाठविले आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाने असा ठराव केला की सरहद्दीचा प्रश्न लडाकमध्ये देवाण घेवाण करून करून सोडवावा, तोंच नेहरूंनी जाहीर केले की दोन्ही पक्षांनी लडाकमधून माघार घ्यावी, म्हणजे तडजोडीने बोलणे करायला बरे पडेल. याचा अर्थ जो लडाकचा प्रदेश आमचा आहे असे आम्ही ठासून म्हणतो, तोहि सोडून द्यायला आम्ही तयार ! याला शरणागती म्हणायचे नाही तर काय म्हणायचे ? मॅकमोहन रेषेप्रमाणे तामादेम ठाणे आमचे नाही असे वाटल्याबरोबर भारत सरकारने ते सोडून दिले. पण लाँगजू ठाणे जे नक्कीच भारत सरकारचे आहे, ते मात्र चीन मुळीच सोडून देण्यास तयार नाही. याचा अर्थ देवाणघेवाणीमध्ये द्यायचे आम्ही आणि घ्यायचे चीनने ! म्हणजे आम्ही लढणार लढणार अशी भूमिका उठवून लढण्याचे कारण न पडताच चीनला खूष करून प्रश्न मिटवावा असे हे दुटप्पी आणि दुहेरी कारस्थान आहे.

## दहा वर्षांपूर्वीचा इषारा

दहा वर्षांपूर्वी चँक कै शेकचा पराभव करून जेव्हा चीनमध्ये कम्युनिस्ट राजवट स्थापन झाली, तेव्हाच कम्युनिस्ट राजवटीची प्रदेश बळकावण्याची नीती प्रत्ययाला आली. त्यावेळेस १९५० मध्ये कम्युनिस्ट चीनने तिबेट गिळंकृत केले आणि आता १९५९ मध्ये तिबेटी लोकांचा वंशविच्छेद करून ते पचवून चीनने ढेकर दिला. १९५० मध्ये डिसेंबर महिन्यात पुणे येथे हिंदु महासभेचे वार्षिक अधिवेशन झाले. याच वेळेस नेपाळ हे केवळ हिंदु राज्य होते म्हणून मौलाना आझादांच्या मसलतीने भारत सरकारने नेपाळच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप सुरू केला. त्या वेळेस मी पुण्याच्या अधिवेशनात माझ्या

अध्यक्षीय भाषणात गंभीर इषारा दिला होता की "नेपाळमध्ये जरी राणाशाही असली आणि लोकशाही नसली तरी नेपाळच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याची ही योग्य वेळ नव्हे. मी जरी राणाशाहीचा तरफदार नसलो आणि नेपाळात लोकशाही असावी असेंच माझे मत असले, तरीही मी हा इशारा देत आहे. कारण अशा हस्तक्षेपाने नेपाळात जो गोंधळ आणि अस्वस्थता निर्माण होईल, त्यामुळे शेजारच्या तिबेटामधून साम्यवाद नेपाळात वाटचाल करील आणि भारताची सर्व हिमालयीन सरहद्द धोक्यात येईल." जरी कांग्रेसच्या वर्तमानपत्रांनी त्यावेळेस राणाशाहीचा पुरस्कर्ता म्हणून माझी निर्भर्त्सना केली, तरी माझे त्यावेळचे ते राजकीय भविष्य आज खरे ठरलेले आहे.

## नेहरूंचा अदूरदर्शीपणा

ब्रिटिशांनी आमच्या पूर्वजांशी तहनामे करून आम्हाला गुलाम बनविले, ब्रिटिशांशी भारताने हिंसक, अहिंसक इ. सर्व प्रकारचा लढा करून ते तहनामे धुडकावून लावले आणि भारताचे स्वातंत्र्य प्रस्थापित केले. पण ब्रिटिशांनी चीनशी तहनामा करून चीनचे तिबेटवरील सार्वभौमत्व मान्य केले होते ते मात्र आम्ही तत्परतेने कोणती तक्रार न करताना मान्य केले. म्हणजे तिबेटच्या गुलामीला मान्यता दिली. यामुळे भारत सर्व मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठी उभा आहे, ही नेहरूंची घोषणा खोटी ठरली नाही काय ? आणि या कृत्याने नेहरूंचे पंचशील गर्भातच जिरले नाही काय ? या वेळेस भारततर्फे तिबेटमध्ये जो प्रतिनिधी होता, तो ब्रिटिश होता. तो ब्रिटिश प्रतिनिधी आपल्या कारस्थानामध्ये अडथळे आणील म्हणून धूर्त चाऊ-एन-लायने नेहरूंची खुशामत करून त्या ब्रिटिश प्रतिनिधीला परत बोलावण्याची विनंती केली. ती अदूरदर्शी नेहरूंनी मान्य केली. या ब्रि. प्रतिनिधीचे नाव ह्यू रिचर्डसन असे होते. या रिचर्डसनसाहेबाने तिबेट सोडण्यापूर्वी नेहरूला असा धोक्याचा इषारा देऊन ठेवला होता की, भारताची तिबेटमध्ये असलेली फौज काढून घेणे हे कृत्य भारताला घातकी ठरेल. पण नादान नेहरूंनी या इषाऱ्याकडे दुर्लक्ष केले आणि हिंदी चीनी भाई भाईच्या नशेत आपले सैन्य तिबेटातून परत बोलावले. इतकेच करून नेहरू थांबले नाहीत तर भारताची तिबेटमधील टेलिग्राफ टेलिफोनची सुसज्जित व्यवस्थाही चीनला बहाल केली !! याशिवाय चीनच्या भारतावरील आक्रमणाची बातमी भारतीय जनतेपासून, संसदेपासून, राष्ट्रपतीपासून आणि आपल्या सहकाऱ्यापासूनही गुप्त ठेवली. हा विश्वासघात नाही काय ? सीमा-रक्षणाची त्यांनी काळजी घेतली नाही. नेहरूंनी आपल्या हेरखात्याकडेही लक्ष दिले नाही. कारण भारताच्या हद्दीतून चीनने जरी रस्ते बांधले आणि हद्दीजवळ विमानतळ बांधले, तरी सरकारला

पत्ता लागला नाही, असे नेहरू सांगतात ! याचा अर्थ असाच करावा लागेल की भारताचे हेरखाते एक तर झोप घेत होते किंवा नेहरू असत्य बोलतात !

## एच. व्ही. कामतांची पुस्तिका

चीनचा प्रश्न संसदेपुढे आल्यापासून एक अत्यंत विसंगत, चमत्कारिक आणि काळजी निर्माण करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. विरोधी पक्षाचे सदस्य चीनबद्दल माहिती पुरवतात आणि सरकार या माहितीची हेटाळणी करून संसदेपुढील तो प्रश्न उडवून लावते आणि नंतर लौकरच विरोधी पक्षाने चीनबद्दल दिलेली माहिती बरोबर असल्याची कबुली देते. अशा घटना संसदेत घडलेल्या आहेत. उदा. अक्साई चीनच्या बर्फमय निर्जन प्रदेशात चीनने रस्ता बांधला ही गोष्ट सरकारने फार उशीरा कबूल केली व लडाकजवळ चीनने विमानतळ बांधल्याचे आपल्यास माहितच नाही असे पं. नेहरू म्हणाले. याबद्दल ते असेही म्हणाले की "मी स्वतः माझ्या डोळ्याने पाहिलेले नाही, त्यासंबंधी मी काय सांगणार ?" या हास्यास्पद उत्तरावरून नेहरूंची राज्यकारभार करण्याची नालायकीच सिद्ध होत नाही काय ? भारत सरकारच्या या निष्काळजीपणाने आणि हयगयीने जी चिंताजनक परिस्थिती निर्माण झालेली आहे, आणि तिच्यापासून जो धोका उत्पन्न झाला, तो नागपूर प्रांतात प्रसिद्ध असलेले, भूतपूर्व आय. सी. एस. श्री. हरि विष्णु कामत यांनी जनतेपुढे मांडण्याचे श्रेय घेतले आहे. त्यांनी गेल्या उन्हाळ्यात नेपाळ, भूतान, गंगटोक, सिकीम, कॉलिमपाँग इत्यादि हिमालयीन सरहद्दीवरील गावी दौरा करून रहस्यस्फोट करणारी एक पुस्तिका लिहून प्रसिद्ध केली आहे. या पुस्तिकेचे नांव "कॅम्युनिस्ट चायना कॉलोनायझेस तिबेट, इन्व्हेड्स इंडिया" असे आहे. या पुस्तिकेवरून व अलीकडे भारत सरकारने प्रसिद्ध केलेल्या श्वेतपत्रिकेवरून हे उघड दिसते की, भारताच्या उत्तर सीमेवरील परिस्थिती फार गंभीर आहे.

## भारतविरोधी प्रचार आघाडी

चीनने या सीमेवर भारतविरोधी प्रचाराची एक सुसज्ज आघाडी उघडली आहे. याशिवाय सरहद्दीपलीकडे भारतीयांना चीनची सुसज्ज सेनाही दिसते. याचा परिणाम असा झाला आहे की, त्या टापूतील जनतेचा धीर सुटू लागला आहे. कॉलिमपाँगमध्ये तर काही दुकानदार भारतीय नाणेही स्वीकारण्यास काकू करतात, असे श्री. कामत यांच्या पुस्तिकेवरून दिसते. या एकंदर तयारीवरून आणि घटनांवरून असा निष्कर्ष काढायला हरकत नाही की, लडाक, नेपाळ, सिकीम, भूतान व ईशान्य सीमा विभाग इत्यादि भूभागावर केवळ धाकाने आपले वर्चस्व स्थापन करण्याचा चीनचा संकल्प असावा. या भूभागातील

बऱ्याच लोकात नेहरूंनी जसा तिबेटला धोका दिला तसाच धोका ते आपणासही तर देणार नाहीत ना, असा संशय निर्माण झाला आहे. या सर्व बनावावरून चीनचा आपल्या अधिराज्याखाली हिमालयीन संघराज्य स्थापन करण्याचा मनसुबा आहे असे वाटते. अर्थात् ही गोष्ट काही सहज होणार नाही. तिला काही काळ लागेल आणि घनघोर संघर्ष करावा लागेल यात वाद नाही, पण या संघर्षात नेहरू कितपत टिकतील याबद्दल त्यांच्या पंचशीलच्या घोषणेमुळे संशय निर्माण होतो. आणि असे वाटते की, त्यांची संसदेमध्ये केलेली बडबड विराटपुत्र उत्तर ' बालिश बहु बायकांत बडबडला ' याप्रमाणे तर ठरणार नाही ना आणि शेवटी पुढील विडंबन केलेल्या आर्येत वर्णन केल्याप्रमाणे परिणाम तर होणार नाही ना ?

नेहरू म्हणे चऊला, पाया पडतो गडे मला सोड ।
जोड दिली दुखवु नको, गांधि करतळस्थ हा फोड ॥

## हे त्यांचे खरे पंचशील

आता पावेतो केलेल्या निवेदनात शत्रुस्थानी असलेल्या व आक्रमण करणाऱ्या साम्यवादी चीनबद्दल नेहरूंचे धोरण कसे नरम, फसवे, बोटचेपे आणि लाडीगोडीचे आहे त्याचे दिग्दर्शन केले. याच्यापुढे भारताचाच भूभाग असलेला व स्वकीय असलेला जो महाराष्ट्र प्रदेश त्याबद्दल नेहरूंचे धोरण कसे घातकी, अपमानकारक आणि कुरघोडी करणारे आहे त्याचा उहापोह करतो. नेहरूंना आपल्या पंचशील तत्त्वाचा फार गर्व आहे. पण चीनच्या संबंधात नेहरूंचे पंचशील कसे गर्भातच जिरले ते मी दाखवून दिले आहे. बुद्धाच्या पंचशील तत्त्वांचे नेहरूंनी विडंबनच केलेले आहे. आणि त्यांच्या वागणुकीत आणि वापरात त्या तत्त्वांचा अधःपात झालेला आहे. यामुळे नेहरूंचे पंचशील म्हणजे व्यवहारात खाली अनुक्रमाने सांगितलेल्या पाच गोष्टी होत. (१) विश्वासघात, (२) भ्रष्टाचार, (३) मुस्लीम तुष्टीकरण, (४) स्वकीयावर कुरघोडी आणि (५) परकीयाशी लाडीगोडी. पहिल्या तत्त्वाचे उदाहरण म्हणजे पाकिस्तानची निर्मिती हे जगजाहीर आहे. दुसऱ्या तत्त्वाबद्दल तर आजकाल न भूतो न भविष्यती असा बोलबाला झाला आहे. तिसऱ्या तत्त्वाचे उदाहरण म्हणजे मुस्लीम लीगपुढे गुडघे टेकून पाकिस्तान मान्य करणे आणि आता पुन्हा देशद्रोही आणि देशघातकी मुस्लीम लीगशी हातमिळवणी. ही हातमिळवणी इतकी बेशरमपणाची आहे, की नुकताच वेण्णथ राघवन् या नावाच्या केरळीय हिंदूचा काही धर्मवेड्या व माथेफिरू मुसलमानांनी तुकडे तुकडे करून खून केला. मुख्य आरोपी बाबा कुन्हू, यास सेशन कोर्टाने फाशीची शिक्षा दिली. ही शिक्षा हायकोर्ट व

व सुप्रीम कोर्टाने कायम केली. राष्ट्रपतीकडे केलेला दयेचा अर्जही त्यांनी फेटाळला. दरम्यान केरळच्या राज्याची उलथापालथ होऊन तेथे राज्यपालाची राजवट सुरू झाली. आणि निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी केरळात कांग्रेस, प्रजा-समाजवादी पक्ष आणि मुस्लीम लीग यांची संयुक्त आघाडी निर्माण झाली आणि जिल्हा कांग्रेसचे अधिकारी केरळच्या राज्यपालांना भेटले आणि बाबा कुन्हूच्या फाशीची अंमलबजावणी स्थगित झाली ! सारांश काय तर निवडणुकीसाठी नेहरूंच्या कांग्रेसने कायदा आणि न्याय पायाखाली तुडविला. या घटनेमुळे हायकोर्ट, सुप्रीम कोर्ट आणि राष्ट्रपती यांचा अवमान झाला हे नेहरूंना दिसत नाही काय ? पण मुस्लीम तुष्टीकरणासाठी सर्व खून माफ ! धन्य नेहरू कॉंग्रेस !! परकीयाशी लाडीगोडी या पाचव्या तत्वाचे उदाहरण चीनशी आणि मुस्लीम लीगशी आखलेले धोरण हे होय. चौथे तत्त्व जे स्वकीयावर कुरघोडी हे आहे, त्याचे उदाहरण महाराष्ट्रावर केलेला सतत अन्याय होय.

### अरे ये मऱ्हाटोंको एक कर दिया तो—

कांग्रेसच्या राजवटीमध्ये महाराष्ट्रावर नेहमीच अन्याय होत आलेला आहे. त्याच्याकरिता सर्वच कांग्रेसश्रेष्ठी आणि कांग्रेस संस्था जबाबदार आहेत. एकदा भाषावार प्रांतरचनेच्या गोष्टी चालू असताना मी जेव्हा कांग्रेसमध्ये होतो तेव्हा महात्मा गांधींच्या तोंडचे "अरे ये मऱ्हाट्टोंको एक कर दिया तो हमारी सूरत फिरसे लुटेंगे" हे शब्द मी आपल्या कानांनी ऐकले आहेत. महात्मा गांधींनी छत्रपती शिवाजी महाराजांना बहकलेला देशभक्त म्हटलेले सर्वांनाच ठाऊक आहे व शिवाबावनी नांवाची शिवाजीच्या स्तुतिपर असलेली हिंदी कविता नष्ट करावी, असा हट्ट धरला होता, हेही सर्वांना विदित आहे. नेहरूंनी आपल्या आत्मचरित्रात शिवाजीला साहसबाज लुटारू म्हटले होते, पण पुढे कै. नरसोपंत केळकरांनी चमकावल्यामुळे त्यांनी तो भाग गाळला. ज्या पुण्यश्लोक शिवाजी महाराजांनी परदास्यकालात पहिल्या प्रथम स्वतंत्र राज्य स्थापन करून स्वातंत्र्याच्या चळवळीचा श्रीगणेशा केला, त्यांच्याबद्दल असे विचार व्यक्त करणाऱ्या नेहरूंना महाराष्ट्राबद्दल आणि त्याच्या गौरवशाली इतिहासाबद्दल काय म्हणून आपुलकी असावी ? मुरारजीभाई देसायांनी तर एका अमेरिकन पत्रकाराजवळ शिवाजी हा विश्वासघातकी आणि खुनी होता आणि महाराष्ट्रीयच त्याचा उदो उदो करू जाणोत, असे मत व्यक्त केल्याचे वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले होते. त्याचा निःसंदिग्ध प्रतिवाद प्रसिद्ध झालेला अजून कोठे पाहण्यात आलेला नाही. खरे प्रकरण निर्माण होण्यापूर्वी १९३६ मध्ये फैजपूर कांग्रेसच्या वेळी एका उमेदवाराच्या नेमणुकीबद्दल वल्लभभाईंचा नि माझा खूप वाद झाला. पार्लमेंटरी बोर्डाच्या उघड सभेमध्ये

त्या बोर्डाचे अध्यक्ष वल्लभभाई पटेल यांना ब्रिटिश नोकरशाहीपेक्षाही तुम्ही अधिक अन्यायी आहा असे मी म्हटले होते. तेव्हा वल्लभाई म्हणाले होते की, 'देखो ये मराठा कैसा छाती में तीर मारने के माफक बोलता है'. हे ऐकून मी तेव्हाच कांग्रेसमधील माझे भवितव्य समजून चुकलो होतो. कांग्रेसश्रेष्ठींचा महाराष्ट्रद्वेष औरंगजेबाच्याच महाराष्ट्रद्वेषाशी तुलना करण्यासारखा आहे. म्हणून मी १९४६ च्या नोव्हेंबर महिन्यात मुस्लीम लीगने कलकत्त्यात हत्त्याकांड सुरू केल्यावर गांधींना कॉंग्रेस कल्पून गांधी औरंगजेबाचा अवतार आहेत, असा एक लेख वर्तमानपत्रात प्रसिद्ध केला होता. आज मोठी मोठी दैनिके मोठी मोठी शीर्षके देऊन नेहरूनाच औरंगजेब म्हणताहेत त्याचे आश्चर्य वाटावयास नको!

## महाराष्ट्राबद्दलचा आकस

यानंतर सात वर्षांनी म्हणजे १९५३च्या नोव्हेंबर महिन्यात राज्यपुनरर्चना समिती नियुक्त होण्यापूर्वी मी 'केसरी'त लेख लिहून महाराष्ट्राला जाहीर इशारा दिला होता की, कॉंग्रेस श्रेष्ठींच्या महाराष्ट्राविरुद्ध असलेल्या आकसामुळे सगळे प्रांत भाषावार झाले तरी महाराष्ट्र होणार नाही. या इशाऱ्यातच पुढे मी असेही म्हटले होते की, मुंबई राज्यातून कर्नाटकी चार जिल्हे काढून टाकून त्याला सौराष्ट्र वगैरे जोडण्यात येईल. तसे झालेही. नेहरूंचा महाराष्ट्राबद्दलचा आकस इतका तीव्र आहे, की त्यांनी एके काळी मुंबई शहराला महाराष्ट्रापासून तोडून केंद्र राज्याची व्यापारी राजधानी करण्याचा मनसुबा रचला होता. कारण मुंबईकरिता गुजराथी आणि महाराष्ट्रीय भांडत होते. जसे काही एकाच वधूसाठी दोन भावात भांडण असताना त्यांच्या पित्याने मध्ये पडून स्वतःच त्या वधूला पटकवावे! पुढे महाराष्ट्रामध्ये मुंबईसकट संयुक्त महाराष्ट्रासाठी खूप जोरदार चळवळ झाली. तेव्हा नेहरूंच्या खाली असलेल्या मुरारजी भाईंच्या मुंबई सरकारने गोळीबार करून १०५ महाराष्ट्रीयांचे बळी घेतले. स्वकीयाशी हे वर्तन आणि शत्रुस्थानी असलेल्या चीनने जेव्हा सरहद्दीवरील आमच्या शिपायांना गोळ्या घालून ठार केले आणि काही शिपायांना कैद केले तेव्हा मात्र भारत सरकारने शेपूट घातले आणि आपले शिपायी आणि मेलेल्यांचे मुडदे परत मिळावे यासाठी चीनची अजीजी केली. चीनने मात्र हो ना करता करता दिरंगाई करून ते मुर्दे आणि ते शिपायी १४ नोव्हेंबरला म्हणजे नेहरूंच्या वाढदिवशी परत करून बीभत्स विनोद केला. आणि आम्ही जितं मया म्हणून समाधानाचे सुस्कारे सोडले!

## महाराष्ट्राला झुलविण्याचा छंद

महाराष्ट्राला झुलवण्याचा आणि त्याच्यावर अन्याय करण्याचा नेहरूंना छंदच लागला आहे. ता. १ ऑगस्ट १९५६ या रोजी टिळक पुण्यतिथीच्या

दिवशी नेहरूंनी पुणे येथे भाषण केले. या भाषणात ते निःसंदिग्धपणे असे म्हणाले, की मुंबई महाराष्ट्राची आहे हे मला पटू लागले आहे आणि ती महाराष्ट्रात घालण्यासाठी संधि येताच मी स्वतःच पुढाकार घेईन. पण हीही शेवटी थापच ठरली. कारण यानंतर पाच सात दिवसातच दिल्लीस संसदेत अशोक मेहताकडून द्विभाषिक मुंबई राज्याचा ठराव मांडण्यात आला आणि नेहरूंनी त्याला संमति दिली. नेहरू या ठरावाकडे बोट दाखवून संसदेच्या आड लपू पहातात. पण हे ढोंग आहे. कारण मी एकदा संसदेतच म्हटल्याप्रमाणे संसदेचे कॉंग्रेस पक्षाचे सदस्य हे गोपी किंवा गाई आहेत आणि नेहरू हे गोपीवल्लभ आहेत. मीच एकटा असे म्हणतो असे नव्हे, तर नेहरूंचे चरित्रकार फ्रॅंक मोरेस यांनी लिहिलेल्या नेहरूंच्या चरित्रात त्यांना सीझरचीच उपमा दिलेली आहे.

## खानेकु चव्हाण—लडनेकु समिती

द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन करण्यासाठी आणि मुंबईसकट संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व कॉंग्रेसविरोधी पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली व तीव्र चळवळ केली. निवडणुकी-मध्ये पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई शहर येथे या समितीने कॉंग्रेसचा पराभव केला आणि मुंबई सरकारला सळो की पळो केले. कॉंग्रेसश्रेष्ठींना तर द्विभाषिक मुंबई राज्य मोडून त्याची दोन भाषिक राज्ये निर्माण करण्यास भाग पाडले. स. का. पाटलांची महाराष्ट्राला पाच हजार वर्षे मुंबई मिळणार नाही, ही घोषणा फोल ठरली. चव्हाणांची 'मी द्विभाषिक मुंबई राज्य यशस्वी करून दाखवीनच' ही प्रतिज्ञाही सफल झाली नाही. त्यांना हताशपणे कॉंग्रेसश्रेष्ठींपुढे 'मला या कार्यात यश आले नाही' अशी कबुली द्यावी लागली. तरी सुद्धा काही लाळघोटी पत्रे द्विभाषिक मोडण्याचे श्रेय संयुक्त महाराष्ट्र समितीला न देता चव्हाणांनाच देतात. म्हणजे खानेकु चव्हाण आणि लढनेकु बडा भाई.

## नवग्रह समितीचे उपद्व्याप

कॉंग्रेस श्रेष्ठींनी हा द्विभाषिक मोडण्याचा निर्णय अमलात आणण्यासाठी कोणतेही सर्वांना लागू होईल असे सामान्य तत्त्व न ठरविता तपशील ठर-विण्यासाठी गृहमंत्री पं. पंत यांच्या अध्यक्षतेखाली एक नवग्रह समिती स्थापन केली. हा केवळ द्विभाषिक मोडता मोडता महाराष्ट्राचे आणखी नुकसान करण्याचा डाव होता. 'आलमगीर'मध्ये 'चव्हाणांचे पुतळे उभारा' या शीर्षकाखाली एक लेख प्रसिद्ध करून मी याबद्दल जो आगाऊ इषारा दिला होता, तसे झाले आहे. म्हणजे डांगचे दान गुजरातला देण्यात आले आहे. नवीन होणाऱ्या मराठी राज्यावर गुजरातच्या राजधानीसाठी पन्नास साठ कोटी

रुपयांचा बोजा बसविण्यात आला व नवीन होणाऱ्या महाराष्ट्र राज्याला महाराष्ट्र राज्य न म्हणता त्याला मुंबई राज्य म्हणण्याचा हट्ट जाहीर झाला आहे. आणि उंबरगाव तालुकाही गुजरातला जोडण्यात आला आहे. ( पूर्वी एका जाहीर निवेदनात मी नंदुरबार, नवापूर, उंबरगाव इ. पाच सहा तालुके गुजरातेत जाण्याचा संभव आहे असा इशारा दिला होता. ) चव्हाणांनी या सर्व योजनांना आपली संमती असल्याचे निर्लज्जपणे जाहीर केले आहे. ठीकच आहे.

" जोडे उचलावे नेहरू-पंतांचे ! मग अधिकारपदी नाचे !! "

## आंध्र राजधानीची सोय कशी केली

ही नवग्रहसमिती महाराष्ट्राच्या बोकांडी बसली. आणि जाणूनबुजून तिने महाराष्ट्राचा अपमान केला. आणि त्याच्यावर घोर अन्यायही केला, याशिवाय महाराष्ट्रावर तिने आर्थिक संकटही कोसळविले आहे. आणि हे सर्व महाराष्ट्रावर केलेला द्विभाषिकाचा अन्याय नाहीसा करण्यासाठी आहे, असा हा नवग्रह समितीचा दावा ! गोल्डस्मिथच्या कवितेतील एक ओळ या नवग्रह समितीला नेमकी लागू पडते. " While making penance planning sins anew " गुजरातला समृद्ध करण्यासाठी महाराष्ट्राला खच्ची करण्याचाच या नवग्रह समितीचा उद्देश आहे यात शंका नाही. कारण पूर्वी जेव्हा मद्रास राज्यातून आंध्र वेगळा झाला, तेव्हा आंध्राच्या नवीन राजधानीसाठी अशी वेगळी तरतूद करण्यात आली नाही. आंध्र राज्याला हैद्राबाद राजधानी मिळेपावेतो छोट्या कर्नूल शहरातच आपला संसार थाटावा लागला होता. गुजरात राज्याला बडोदे शहरासारखे सुसज्जित शहर राजधानी म्हणून आयतेच लाभलेले आहे. राजधानीसाठी गुजरातला दगड-विटांमध्ये वास्तविक एक पैसाही खर्च करण्याची गरज नाही. पण बडोदे शहराला महाराष्ट्राचा वास येतो ना ? मग ते कसे चालेल ? म्हणून लाडक्या गुजरातचा हट्ट कांग्रेसश्रेष्ठींनी पुरवला आहे आणि महाराष्ट्रावर अन्याय करून जातीजातीत तेढ निर्माण करण्याचा गुन्हा या नवग्रह समितीने केला आहे. एका राज्याच्या अर्थसंकल्पात ( बजेट ) दुसऱ्या राज्याच्या तुटीच्या भरपायीसाठी योजना करणे हे माझ्या मते घटनाबाह्य आहे, याचा सोक्षमोक्ष कायदेपंडितांनी लावावा अशी माझी नम्र सूचना आहे.

## डांगचा सौदा

डांगबद्दल तर नेहरूंच्या तत्त्वच्युतीचे आणि विसंगतीचे भयंकर आश्चर्यच वाटते. डांगबद्दल प्रथम जेव्हा वाद निर्माण झाला, तेव्हा त्यावेळचे मुंबई

राज्याचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर व श्री. मुरारजी देसाई या दोघांनी डांग प्रदेशाचा दौरा करून निःसंदिग्धपणे ठरविले की, डांग महाराष्ट्राचाच आहे. तरीही काही गुजराथी लोकांनी निवडणुकीसाठी डांग सुरत जिल्ह्याला जोडावा असा आग्रह धरला म्हणून टेकचंद कमिटीची नियुक्ती झाली. या टेकचंद कमिटीनेही असा निःसंदिग्ध निर्णय दिला की, डांग महाराष्ट्राचाच आहे आणि तो नाशिक जिल्ह्यालाच जोडण्यात यावा. हा टेकचंद कमिटीचा निर्णय १९५० मध्ये पं. नेहरूंनीच स्वतः संसदेला सादर केला आणि जाहीर केले की, डांगचा प्रश्न आता कायमचा मिटला आहे. तो पुन्हा आता कोणी उकरून काढू नये. आणि हेच नेहरू आता समितीच्या नेत्यांना तोंड भरून सांगतात की, तुमची डांगबद्दलची बाजू लंगडी आहे. याला हसावे की रडावे ?

## नेहरूकृत 'महा'चा उपहास

महाराष्ट्र नाव नष्ट करण्याचा हेका पं. नेहरूंचाच असावा असे वाटते. कारण पं. नेहरूंना एकदा दिल्ली येथे भाषण करताना मी ऐकले आहे. तेव्हा त्यांनी महाराष्ट्र या नामातील 'महा' या उपपदाचा अगदी हावभावपूर्ण उपहास केला होता. ते म्हणाले होते, I dont like this Maharashtra, this 'maha' and that 'maha' like mahagujrat and maha punjab etc." म्हणून महाराष्ट्र प्रदेशाला मुंबई राज्य हे नाव देण्याचा हट्ट करून महाराष्ट्राचा तेजोभंग आणि विडंबन करण्याचाच हा डाव आहे असे म्हणता येईल. पण नेहरूंनी हा हट्ट धरू नये आणि दुराग्रह सोडून महाराष्ट्र हेच नाव मराठी राज्याला द्यावे हेच योग्य होईल. नेहरूंचेच जे नाव जवाहरलाल आहे त्याचे विडंबन करून त्यांना जर कोणी 'लाल जहर' म्हटले तर कसे वाटेल, याचा त्यांनी विचार करावा. तसे म्हटले तर जवाहर हे रत्न महाराष्ट्राला आणि भारतालाही अनिष्टच ठरले आहे. एका तपात जर्मनीसारखे सर्वस्वी बेचिराख व निःसत्व बनलेले राष्ट्र आज सबल आणि संपन्न बनून धनको राष्ट्र बनले आहे. पण नेहरू काँग्रेस राजवटीने ग्रासलेला भारत परकीयांच्या द्रव्याची, तंत्रविशारदाची व साधन सामुग्रीची मुबलक मदत असताना देखील आज अधोगतीस गेलेला व दुर्बल दिसतो. याला कारण स्वार्थलंपटता आणि नैतिक अधःपतन. म्हणूनच महाराष्ट्र काँग्रेस कमिटीने आपल्या हातात अधिकार टिकविण्यासाठी कांग्रेस श्रेष्ठींच्या, महाराष्ट्राची मानखंडना आणि आर्थिक नुकसान करणाऱ्या या सर्व योजनांना संमती दिली आहे. कमिटी सूर्याजी पिसाळ आणि बाळंभट नातू यांचीच अवलाद आहे असे दिसते. महाराष्ट्रातून अशा काँग्रेसचे कायमचे उच्चाटण झाले पाहिजे. याकरिता आणि महाराष्ट्रावर केलेल सर्व अन्याय नाहीसे

करण्याकरिता संयुक्त महाराष्ट्र समितीने आपसातील सर्व मतभेद विसरून एक झाले पाहिजे आणि आपली संघटना बलशाली करून या अन्यायाविरुद्ध प्राणपणाने झुंज दिली पाहिजे. पण सर्व चळवळ शांततेने आणि आपल्या गुजराथी बांधवांशी भाईचाऱ्याचे संबंध कायम ठेवूनच केली पाहिजे. कारण गुजराती लोक हे आपले बंधू आहेत. शत्रू नाहीत. आपण सर्व भारताचेच नागरिक आहोत. आपले शत्रुत्व केवळ अन्यायी काँग्रेस संघटनेशी आहे, ही खूणगाठ आपल्या मनाशी सदैव बांधून ठेवावी. शेवटी या चळवळीला यश येऊन महाराष्ट्राचे इप्सित साध्य होवो, अशी शुभेच्छा व्यक्त करून मी हा लांबलेला लेख संपवितो.

## युगधर्मातील माझा लेख

यानंतर या चीनच्या आक्रमणाबद्दल 'नेहरू नीती में परिवर्तन आवश्यक' या शीर्षकाखाली हिंदी भाषेत मी एक लेख लिहिला. तो ता. २५–१–६० च्या नागपूरच्या 'युग–धर्म गणराज्या'च्या खास अंकात प्रसिद्ध झाला आहे. तो येथे देतो.

हमारे देश के सामने चीनी आक्रमण की बिकट समस्या मुंह बाये खडी हुई है एवं उसके दीर्घकाल तक रहने की संभावना भी है। इस संकट के अवसर पर भारतीय जनता राष्ट्र–रक्षा के प्रश्न पर जितनी जागरूक हुई है, पहले कभी नहीं हुई थी। यह संकट वस्तुतः सत्य और अहिंसा के बल पर भारतीय स्वातंत्र्य को प्राप्त करने के लिए बनाए गए 'चरखा कार्यक्रम' के कारण ही आया है। किंतु यह आज भी संदेहास्पद है कि यदि सुभाष बोस ने भारत पर सशस्त्र हमला न किया होता और भारतीय सेना की ब्रिटिश सरकार के प्रती जो निष्ठा थी वह क्षीण न हुई होती तो सत्य और अहिंसा युक्त 'चरखा कार्यक्रम' के द्वारा ही स्वराज्य मिला होता। किंतु यह सत्य है कि इस कार्यक्रम ने अपनी विरासत के रूप में अपने पीछे "प्रामाणिक कायरता" एवं "पाखंडपूर्ण वीरता" छोडी है। वह भारतीय राजनीती में अपनी जडे गहरी जमाती जा रही है एवं इसके कारण कि यह चीनी हमला हुआ है।

### ब्रिटिश दूरदर्शिता

ब्रिटिश सरकार ने भारतीय सीमाओं की रक्षा हिमालय की तराई में न कर तिब्बत के ऊंचे पठार पर की थी। यद्यपि अंग्रेजोंने तिब्बत पर चीन की प्रभुसत्ता को स्वीकार किया था फिर भी उन्होंने चीन से भी यह मान्य करा लिया था कि तिब्बत अपने आन्तरिक मामलों मे स्वायत्तता का उपभोग करेगा। इसका परिणाम यह हुआ था कि तिब्बत पर चीन की प्रभुसत्ता औपचारिक एवं नाममात्र के लिए ही थी। अंग्रेजों ने तिब्बत के इस आन्तरिक

स्वायत्ता प्राप्त राज्य को चीन और भारत के बीच एक अन्तस्थ ( बफर ) राज्य माना था।

## भारत की भूल

१० वर्ष पूर्व ही चीन में कम्युनिस्टों का शासन हुआ। इसके तुरन्त बाद ही धूर्त चाऊ-एन लाई ने भोले-भाले नेहरू जी को तैयार कर लिया कि वे तिब्बत से भारतीय प्रतिनिधि को हटा लें। उस समय इस पद पर ह्यू रिचार्डसन नामक एक अंग्रेज सज्जन थे। इन महाशय ने तिब्बत छोड़ने के पूर्व नेहरू जी को चेतावनी भी दी थी कि भारतीय सेनाए तिब्बत से न हटायी जाय। किंतु हमारे प्रधान मंत्री (नेहरूजी) ने इस नेक सलाह को स्वीकार न किया एवं तिब्बत से भारतीय सेनाएं हटा ली जो भारतकी सीमा-रक्षा की दृष्टि से सबसे बड़ी गलती थी।

## भारत के नेपाल के मामले में अनुचित हस्तक्षेप

इस समय जबकि कम्युनिस्ट चीन ने तिब्बत को कम्युनिस्ट साम्राज्य मे मिला लिया, भारत की कांग्रेसी सरकार ने एक गंभीर राजनीतिक गल्ती की। यद्यपि जहां तक नेपाल के आन्तरिक प्रशासन का संबंध है भारत तटस्थता की नीती से संकल्पबद्ध था, फिर भी स्वर्गीय मौलाना आज़ाद ने, जो उस समय भारत के शिक्षा मंत्री थे, नेपाल के प्रशासन की तीव्र तम आलोचना की। दिसंबर १९५० में जब पूना में अखिल भारतीय हिंदू सभा का वार्षिक अधिवेशन हुआ था उस समय मैंने अपने अध्यक्षीय भाषण में भारत सरकार को चेतावनी दी थी कि वह उस समय नेपाल के आन्तरिक प्रशासन में हस्तक्षेप न करें क्योंकि उससे (उस हस्तक्षेप से) नेपाल के राजनीतिक जीवन में जो अस्थिरता निर्माण होगी उससे वहां तिब्बत की ओर से आनेवाले कम्युनिज़म को पनपने में बहुत सहायता मिलेगी। किंतु मेरी चेतावनी की ओर कोई ध्यान न दिया गया एवं कांग्रेसी अखबारो ने मुझे नेपाल की राणाशाही का समर्थक बताया। किन्तु अन्ततोगत्वा मेरी चेतावनी सही निकली एवं भारत सरकार के हस्तक्षेप ने नेपाल में अराजकता एवं अव्यवस्था की स्थिती निर्माण कर ही दी। फलस्वरूप सारी ही हिमालयन सीमा (नेपाल, भूतान एवं सिक्किम आदि) की सुरक्षा के लिए खतरा खडा हो उठा है। हमारे प्रधानमंत्री बस गर्जनाएं ही करते रहते हैं कि हिमालय की उपत्यकाओं में अवस्थित इन तीनों राज्यों में से किसी पर भी बाहर से कोई हमला हुआ तो वह भारत पर हमला माना जायगा क्योंकि भारत इन तीनों ही देशों की बाहरी आक्रमण से रक्षा करने के लिये वचनबद्ध है। अब इस समय जनता सारचर्य यह पूछ सकती है कि जो

भारत सरकार लद्दाख की अपनी सीमाओं पर हुए विदेशी हमले को नहीं रोक सकती तो वह इन दुर्गम पर्वतीय राज्यों की रक्षा कैसी करेगी।

## भारत की पराक्रमशून्यता नेहरूजी का कम्युनिजम प्रेम

अभी तक भारत ने न तो कभी पाकिस्तानी आक्रमण का और न चीनी आक्रमण का ही सेना के द्वारा प्रतिकार किया है। उसने केवल पुरुषार्थहीन विरोधपत्र ही भेजे हैं। यह सब उस "प्रामाणिक कापुरुषता एवं पाखंडपूर्ण वीरता" की विरासत ही है जिसका कि हम ऊपर उल्लेख कर आये है। किन्तु अन्य बातें भी हैं जिनके कारण कि भारत सरकार ने यह नपुंसक नीति अपनायी है। यदि हम पाकिस्तान की ओर निगाह डाले तो हमें देखने को मिलेगा कि वह कांग्रेस एवं ब्रिटिश साम्राज्यवाद की अवैध सृष्टि है। अतः स्वाभाविक है कि कांग्रेस का उसके प्रति प्रच्छन्न प्यार एवं सहानुभूति है। एक माँ अपने बच्चे पर किस प्रकार आक्रमण कर सकती है? इस संबंध मे मुझे एक प्रमुख कांग्रेसी श्री. शंकरराव देव के वे शब्द याद आते हैं जो उन्होंने भारत की संविधान सभा में कहे थे कि पाकिस्तान का कल्याण करते हुए ही भारत अपना अधिक से अधिक कल्याण कर सकता है। 'चरखा कार्यक्रम' की यही बिरासत है। भारत को अपना क्षेत्र तुकेरग्राम सैन्य-बल से न मिल कर समझौता वार्ता द्वारा मिला एवं बदले में पथरिया जंगल देकर।

इस चरखा कार्यक्रम के भयंकर परिणाम १५ अगस्त १९४७ के पूर्व के नरसंहार में दिखायी दिये। उस समय तो हमारे प्रधान मंत्री पंडित नेहरू ने भी कहा की "देश को रक्त एवं आसुओं के समुद्र में से निकलना पड़ा है।" (इतना होने पर भी कांग्रेस जन यह कहने का दुस्साहस करते हैं कि स्वराज्य खून की एक भी बूंद बिना गिराये मिला है।)

## गांधीवाद का खोखलापन

ऐसा वह संकट था और इस प्रकार की वह कठिन परिस्थिति थी कि लोगों को गांधीवाद का खोखलापन दिखलायी दिया एवं उन्होंने उसके प्रति अपनी अनास्था और अरुचि व्यक्त की जब कि उसके पूर्व तक देश की अधिकतर जनता गांधीवाद में सर्वाधिक आस्था रखती थी। रक्तपात, अश्रु-प्रवाह, आहों-कराहों एवं स्वजन-स्वगृह विछोह ने यह सिद्ध कर दिया कि गांधीवाद परीदेश की कल्पना है। परिस्थिति बडी ही विस्फोटक थी और उससे यह स्पष्ट हो गया कि देश की यह जो सब दुर्दशा हो रही है गांधीवादी विश्वासों और कार्य-कलापों का ही परिणाम था। इससे प्रकट होता हैं कि

नेहरू जी का अपने हृदय के अन्ततंम मे गांधीवाद पर कोई विश्वास नहीं है। किन्तु उन्होंने अपने आपको गांधीवादी घोषित कर दिया है एवं 'चरखा–कार्यक्रम' की शाब्दिक सराहना करते हैं ताकि गांधी जी की लोकप्रियता का लाभ उठाकर अपनी तानाशाही कायम कर ले।

नेहरू जी चीन की चुनौती को स्वीकार करने में जो अपनी निष्क्रियता बता रहे हैं उसके पीछे उनकी राजनीतिक पृष्ठ–भूमि है। रूस में जब लेनिन ने प्रथमतः क्रांति का शंख फूंका तो नेहरू जी कम्युनिस्ट दर्शन से प्रभावित हुए और वे बाद में रूस गये। पुरानी पीढी के अनेक राज-नीतिज्ञों को यह याद होगा कि तत्कालीन ब्रिटिश सरकार नेहरूजी की भारत वापसी पर इसलिए रोक लगानेकी बात सोच रही थी कि उनके (नेहरूजी के) यूरोप में कम्युनिस्टों से घनिष्ट सम्बन्ध थे। स्वर्गीय पं. मोतीलाल नेहरू ने, जो उस समय केंद्रीय असेम्बली में स्वराज पार्टी के नेता थे, अपने पुत्र की ओर से हस्तक्षेप करते हुए तत्कालीन होम मेम्बर सर अलेग्जेण्डर मुडीमैन से कहा कि जवाहरलाल को कम्युनिज्म के चंगुल से अलग करने का सर्वोत्तम तरीका यही है कि उन्हें भारत आने दिया जाय जहां वे मेरे नियंत्रण एवं प्रभाव में रहेंगे। किन्तु इसके बाद भी नेहरूजी आज भी कहते है कि कम्युनिस्ट दर्शन में इसके सिवाय और कोई बुराई नहीं है कि उसके तौर–तरीके खराब हैं। यही कारण है कि हमारी तटस्थता की नीती कम्युनिज्मकी ओर अधिक झुकी हुई है।

## चीन की आक्रमणप्रियता

यही कारण है कि १८ वी शताब्दी के अन्त में चीन के सम्राट चुएन-लङ् ने जो आक्रामक नीती अपनायी थी उसे नेहरू जी भूल गये। अपने शासन काल में चीनी सम्राट ने कोरिया, अनाम, स्याम तथा बर्मा को चीन का आश्रित बना लिया था। १७९० में भारत का पडौसी नेपाल तक चीन को चौथ दिया करता था। इन देशों पर चीन की प्रभुसत्ता का तभी अन्त हुआ जब ब्रिटेन, फ्रांस तथा हॉलैन्ड सदृश पश्चिमी शक्तियों ने चीन पर हमले किये। कदाचित् "प्रच्छन्न–कम्यु-निस्ट" होने के कारण नेहरू जी ने चीन के इस पुराने साम्राज्यवादी इतिहास की उपेक्षा की और 'भारत चीनी भाई-भाई' के नारे लगाते रहे। उनके साथी प्रतिरक्षामंत्री (श्री. मेनन सं.) तो यह तक स्वीकार करने के लिए तैयार नहीं है कि चीन ने भारत पर हमला किया है। वे उसे 'हमला' न कह कर केवल 'अतिक्रमण' कहते हैं। इससे उनकी अन्तस्चेतना को सन्तोष हो सकता है किन्तु देश की रक्षा के लिए तो एक विशाल शक्तिशाली एवं

आधुनिकतम साधन-सम्पन्न युक्त सेनाकी आवश्यकता है। भारत को इस लक्ष्य की पूर्ति के लिए तत्काल कदम उठाना चाहिए एवं इतना ही नहीं तो चीन की भांति नागरिकों की भी एक सेना तैयार करनी चाहिये।

## नेहरू-नीति से कम्युनिस्टों को प्रोत्साहन

किन्तु दुर्भाग्य से अपनी सीमाओं से चीनियों को खदेड़ने के लिए सेना को ताकतवर बनाने की अपेक्षा भारत अभी भी शांति एवं हिचकिचाहट की नीति का अनुसरण कर रहा है। यही कारण है कि भारत में कम्युनिस्ट नेता यह अच्छी तरह से जानकर कि नेहरू जी गर्जनाएं करने के बाद भी चीन से न लड़ेंगे, एक दूसरे का अनुकरण करते हुए घोषणाएं कर रहे हैं वे नेहरू जी के पीछे हैं एवं उनकी ( नेहरू जी की ) चीन सम्बन्धी नीति का समर्थन करेंगे। कम्युनिस्ट चीन ने भी यह अच्छी तरह से समझ लिया है कि भारत आक्रमण का प्रतिकार तो करेगा नहीं अतः वे बेरोकटोक आगे बढ सकते हैं एवं भारत के विभिन्न स्थानों को कब्जे में कर सकते हैं। अतः राष्ट्र की सुरक्षा, रक्षा तथा प्रतिष्ठा के लिए, एवं यहां तक कि जनता में खोये हुए विश्वास को पुनः जगाने के लिये यह आवश्यक है कि चीनी हमले को न केवल रोका जाय वरन् मौसम के अनुकूल होते ही चीनीयों को हम अपनी भूमि से खदेड कर बाहर भी करें। नेहरू जी ने ' वार्ता करेंगे ' शब्दों को तीन बार दुहरा कर उन पर जो बल दिया है तो उस नीती की सफलता के लिए भी यह आवश्यक है कि हम एक शक्तिशाली सेना रखें एवं उसका प्रदर्शन भी करें।

## सैनिक कार्रवाई की जाय

भारतीय सेना के लिए जैसी कि वह आज भी है, पहाडों में युद्ध करना कोई नई बात नहीं है। उसे तो इस प्रकार की युद्ध-कला का पर्याप्त अनुभव है। यदि सरकार निश्चय करती है, तो जैसे ही पहाडों पर बर्फ गिरना बन्द होता है, वह सैनिक कदम उठा सकती है इसे आप चाहें तो पुलिस कार्रवाई भी कह सकते हैं। इस प्रकार से चीनियों को, जिन्होंने कि लद्दाख पर काफी अर्से से अधिकार कर रखा है, निकाला जा सकता है। यदि आवश्यक हो तो, जहां से भी उपलब्ध हो, सैनिक सहायता भी ली जा सकती है। हमने अनेक देशों से आर्थिक सहायता प्राप्त कर देश पर कर्ज का एक बहुत ही बड़ा एवं खतरनाक बोझ लाद दिया है। वास्तव में आज आर्थिक सहायता एवं सैनिक सहायता में वही अंतर है जो '६' आधा ' आधा दर्जन ' में है। प्रकारान्तर में यह सिद्ध हो जाता है कि किसी भी शक्ति-गुट से न मिलने

अनुक्रम ३७८७८ दि:
क्रमांक ९१५०८ नों दि.


की जो नीती अभी तक भारत ने अपनायी है वह असफल रही है। उस पर आगे भी व्यवहार करते रहने का अर्थ आत्म-समर्पण ही होगा।

**चीन आक्रमित लडाकचे भवितव्य**

यानंतर सुमारे पाच महिन्यांनी म्हणजे ता. ५ जून १९६० च्या 'आलमगीर' मध्ये 'चीन आक्रमित लडाकचे भवितव्य' या शीर्षकाखाली मी एक लेख लिहून आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यात नेहरूंची चांगलीच हजेरी घेतली आहे. तोही लेख येथे देतो.

आजपावेतो भारताचे पंतप्रधान हे जसे वागले आहेत व ज्या गोष्टी त्यांनी केल्या आहेत त्यावरून लडाकमधील चीनने व्यापिलेल्या अंदाजे २०-२५ हजार चौरस मैल भारतीय प्रदेशाचे पुढे काय होणार आहे, याचा अंदाज बांधता येतो. १९४६ मध्ये जी सार्वत्रिक निवडणूक झाली त्यात हिंदुसभेचा नारा 'अखंड भारत' हा होता. म्हणजे पाकिस्तान द्यावयाचे नाही हा त्याचा अर्थ. कांग्रेसनेही हाच नारा उचलला. नेहरू तर म्हणत असत की, पाकिस्तान ही मूर्खपणाची कल्पना आहे. एक जिना काय हजार जिनाही माझ्याकडून पाकिस्तान घेऊ शकत नाहीत. या खोट्या घोषणेमुळे कांग्रेस निवडणुकीत यशस्वी झाली. पण एक वर्षाच्या आतच, मे १९४७ च्या आरंभी पाकिस्तान निर्माण करण्याबद्दल जिना आणि नेहरू या दोघांची संमती खिशात घेऊन व्हाइसरॉय लॉर्ड मौंटबॅटनचे सहाय्यक लॉर्ड इस्मे हे विलायतला रवाना झाले. यावरून जनतेची फसवणूक आणि वचनभंग पं. नेहरू बिनदिक्कत करतात हे सिद्ध होते.

असाच अनुभव काश्मिरबद्दलही आलेला आहे. काश्मिरवर पाकिस्तानने आक्रमण केले त्यावेळेस नेहरूंनी अशा घोषणा केल्या, की काश्मिरची एकही इंच जमीन पाकिस्तानच्या ताब्यात आहे तो पावेतो आम्ही विश्रांती घेणार नाही. पण अनुभव काय आला? जवळ जवळ अर्धा काश्मिर पाकिस्तानच्या ताब्यात आहे आणि नेहरू मजा करीत आहेत! सारांश वचनभंग नि फसवणूक हा नेहरूंच्या हातचा मळ आहे!!

**कॉमनवेल्थची टिंगल**

कॉमनवेल्थच्या कल्पनेची नेहरूंनी कांग्रेसच्या अध्यक्षपदावरून व अन्य प्रसंगी इतकी टिंगल केली आहे, की सांगता सोय नाही. पण घटना समितीने हिंदुस्थानचे प्रजासत्ताक राज्य करावयाचे असा निर्णय घेतल्यावर हेच टिंगलबाज नेहरू विलायतला गेले आणि ब्रिटिश राजाला भारत, कॉमनवेल्थचा मुख्य

मानील ही शर्त मान्य करून कॉमनवेल्थमध्ये राहण्याचा निर्णय घेऊन हिंदुस्थानमध्ये परत आले. पुन्हा कोलांट उडी आणि वचनभंग—! सन १९४९ च्या ब्रिटिश नॅशनॅलिटी ॲक्ट प्रमाणे भारतीय स्वतंत्र प्रजासत्ताकाचा प्रत्येक नागरिक ब्रिटिश प्रजाजनच ( British subject ) आहे.

१९५५ मध्ये गोव्याचा सत्याग्रह झाला त्यावेळेस नेहरू इतके हुरळून गेले होते की, त्यांनी घोषित केले की मलाही गोव्यातील सत्याग्रही तुकडीचे नेतृत्व पत्करून सत्याग्रह करावासा वाटतो. या सत्याग्रहामुळे गोव्याचे पोर्तुगीजही गाशा गुंडाळण्याच्या मनस्थितीत होते. तोच नेहरूंनी एक फर्मान काढले आणि सत्याग्रह बंद केला. पुन्हा फसवणूक आणि परधार्जिणे वृत्तीचे प्रदर्शन !

## चोरून ठेवलेली बाब

लडाकवर चीनने पाच सहा वर्षापासून आक्रमण केले आहे. पण ते आपल्या मित्रपणामुळे असो वा परधार्जिणेपणामुळे असो नेहरूंनी राष्ट्रपतींपासून, पार्लमेंटपासून व जनतेपासून लपवून ठेवले. कदाचित पंचशीलमुळे अथवा चीनच्या मैत्रीत बिघाड होऊ नये म्हणूनही नेहरू गुपचूप राहिले असतील. अखेरीस विरोधी पक्षाच्या कारवायांमुळे नेहरूंना ही गोष्ट लपवून ठेवणे अशक्य झाले. पण नेहरूंनी चीनने व्यापलेला लडाकचा भाग समुद्रसपाटीपासून १४००० फूट उंच आहे व तेथे गवताची पातीही उगवत नाही असे म्हणून आपल्या अपराधाची गंभीरता कमी करण्याचा प्रयत्न केला. या प्रदेशात शेकडो मैल रस्ते चीनने बांधले. बांधण्याचा हेतू सिंकियांग प्रांत व तिबेट यांच्यामधील दळणवळण सुकर होणे. नेहरूंच्या हलगर्जीपणामुळे चीन म्हणतो, ‘ मूळ हा प्रदेश तुमचा नसलाच पाहिजे. तुमचा जर हा प्रदेश होता तर तुम्ही इतकी वर्षे चूप कसे राहिला ? ’

## शब्दात शब्द नाही !

पार्लमेंटात नेहरूंच्या या कचदिलपणाबद्दल चांगलीच हजेरी घेण्यात आली. नेहरूंनी पहिल्यांदा जाहीर केले की चीनने भारताचा व्यापलेला प्रदेश खाली केल्याशिवाय त्याच्याशी कोणतेही बोलणे करण्यास आम्ही तयार नाही, अशी घोषणा करूनही नुकतीच दिल्ली येथे नेहरू व चीनचे पंतप्रधान चाऊ एन लाय यांची बोलणी झाली. या भेटीतच कदाचित् लडाकचा प्रदेश चीनला समर्पित करण्यात आला असता. पण जनसंघ, हिंदुसभा, प्र. स. पक्ष इत्यादी विरोधी पक्षांनी फार जोराचे आंदोलन केले, म्हणून नेहरूंचा नाइलाज झाला. आणि ‘ जैसे थे ’ची परिस्थिती मान्य करून ही मुलाखत संपली. नेहरूंनी स्वतःच म्हटले आहे की, आमची ही मुलाखत यशस्वी न होण्याचे

कारण विरोधी पक्ष. या मुलाखतीत असे ठरले आहे की, चीन आणि भारत यांच्या अधिकाऱ्यांनी परस्परांच्या पुराव्यांची छाननी करावी. हे नुसते ढोंग आहे. आणि पुढील सार्वत्रिक निवडणुकीपावेतो काळ काढण्याची नेहरूंची ही क्लृप्ति आहे. लढाकचा प्रदेश चीन सोडणार नाही हे स्पष्ट आहे. भारत तेथून चीनला हाकलू शकणार नाही हेही स्पष्ट आहे. पुढील सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी जर चीनशी लडाकबद्दल समझौता केला तर निवडणुकीत अपयश येण्याचा संभव आहे. म्हणून पुढील निवडणुकी होऊन जाईतो लडाकच्या प्रश्नाचे भिजत घोंगडे असेच ठेवण्यात येईल आणि असा देखावा निर्माण करण्यात येईल की, भारत काही चीनपुढे नमला नाही. या देखाव्याचा फायदा घेऊन पुढील निवडणुकी जिंकल्या आणि कांग्रेसचे आणि नेहरूंचे राज्य पुन्हा प्रस्थापित झाले म्हणजे १९४६ च्या निवडणुकी जिंकल्यावर जसे पाकिस्तान देण्यात आले, त्याचप्रमाणे १९६२ च्या आगामी सार्वत्रिक निवडणुकी जिंकल्यानंतर लडाकचा प्रदेश चीनला देण्यात येईल आणि ‘ कमजोर हुवा तो क्या हुवा हमारा नेहरूमिया मुजोर शेर है ’ अशी नेहरूची तारीफ करण्यात येईल.

## खंबीर धोरणाचा उच्चार करताच नेहरूंचे अभिनंदन

मागील लेखात जरी मी नेहरूंची खरमरीत हजेरी घेतली असली तरी त्यानंतर त्यांनी आपले धोरण बदलून चीनने केलेल्या आक्रमणाला तोंड देण्याचा आपला निर्धार ठासून प्रकट केला. म्हणून मी त्यांना जाहीर धन्यवादही दिले. तो लेख ‘ पंतप्रधानांना धन्यवाद ’ या शीर्षकाखाली ता. ४ नोव्हेंबर १९६२ च्या ‘ आलमगीर ’ मध्ये प्रसिद्ध झाला आहे. तो येथे देतो—

प्रधान मंत्री यांनी नवी दिल्ली येथे दि. २५ रोजी जाहीरपणे जे निर्भिड वक्तव्य केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या वक्तव्यात त्यांनी चीनने फसव्या प्रचाराखाली आमच्या सीमेवर केलेल्या प्रचंड आक्रमणास तोंड देण्याचा आपला निर्धार ठासून प्रकट केला. हा प्रचार म्हणजे हिंदी चिनी भाई भाईचा प्रचारच त्यांना अभिप्रेत असावा. जागतिक शांततेसाठी पंचशील तत्त्वाच्या याच प्रचारघोषाने त्यांच्यावर मोहिनी टाकली होती. प्रधान मंत्र्यांचा आज भ्रमनिरास झाला. हे फार चांगले झाले. कारण त्यांनी आपल्या भाषणात मोकळेपणाने मान्य केले की, ‘ या बाबतीत आम्ही असावे तेवढे जागृत नव्हतो हे खरे आहे आणि आमच्या स्वतःच्या आणि इतर देशाच्या जाणिवेने आम्ही जागृत झाले पाहिजे. ’

या भाषणात प्रधान मंत्र्यांनी देशात जे नव चैतन्य निर्माण झाले त्याचे दिलदारपणे स्वागत केले आहे. हे नवचैतन्य आजच्या समरप्रसंगी एकीच्या

आणि सामर्थ्याच्या भावनेला पोषक आहे असे ते म्हणाले. ओरिसाच्या काँग्रेसपक्षीय मुख्य मंत्र्यांनी मांडलेल्या व ओरिसाच्या कायदे मंडळाने संमत केलेल्या ठरावानुसार केंद्रस्थानी व राज्यात जर राष्ट्रीय सरकारे स्थापन केली तर ही राष्ट्रीय एकजूट अधिक बळकट होईल अशी माझी खात्री आहे.

या भाषणात प्रधान मंत्र्यांनी देशाचे सैन्यबळ, शस्त्रबळ वाढविणार असल्याचे व नवीन सैन्याधिकारी शिकवून तयार करणार असल्याचे आवर्जून सांगितले. ही गोष्ट देशाला धीर व समाधान देणारी आहे. प्रधान मंत्र्यांच्या या मतपरिवर्तनाचे मी स्वागत करतो. मला अत्यंत अभिमान वाटावा अशी ही गोष्ट आहे कारण, १९५२–५३ साली मी हिंदु महासभेचा लोकसभेतील प्रतिनिधी असतांना मी हाच आग्रह धरला होता की, २१ ते ४० वयाच्या प्रत्येक सुदृढ पुरुषाला सक्तीचे लष्करी शिक्षण द्यावे आणि सैन्यबळ वाढवावे. पण त्यावेळी मला हास्यास्पद ठरविले होते. आज ही गोष्ट अमलात येण्याच्या मार्गास लागली आहे हे युक्तच झाले आहे.

## लक्ष्मी मेननचा खरपूस समाचार

परराष्ट्र खात्यातील राज्यमंत्री श्रीमती लक्ष्मी मेनन यांनी चीन जेव्हा तिबेटला गिळंकृत करीत होता, तेव्हा भारत सरकारने काही हातपाय हलविले नाहीत, याबद्दल भारत सरकारचे समर्थन करून ब्रिटिश सरकारला दोष दिला आहे. त्यांच्या या उपद्व्यापाचाही मी ता. २६ डिसेंबर १९६२ च्या 'नागपूर–टाइम्स' मध्ये खरपूस समाचार घेतला आहे. तोही येथे देतो.

Nagpur, Monday

Dr. N. B. Khare, veteran citizen and leader of Nagpur in a press statement issued by him today commented on defence put up by the Union State Minister in the Ministry of External Affairs which stated that since the Congress Government of India was successor to the British Government of India, it had to accept the Chinese Sovereignty over Tibet.

The statement said, "It appears from the press reports that Smt. Laxmi Menon, Minister for State in the Ministry of External Affairs, defends the passive attitude of the Government of India, when China was swallowing Tibet, by putting blame on the British for accepting the Sovereignty

of China over Tibet. She says that since the Congress Government of India was successor to the British Government of India, it had to accept the Chinese Sovereignty over Tibet."

The statement adds : "If it was so, why should the Congress Government of India have given up the Indian right created in Tibet by the same British Government and why should it not have stood up for Home Rule of Tibet even under Chinese Sovereignty ?

And further, it must not be forgotten that the Indian Government has abolished all the Indian States for the sake of Indian Sovereignty although they were left completely independent by the British Government. Similiary, the Indian Government should have maintained the Indian rights in Tibet for the defence and safety of India."....—H. S.

### शिवसांप्रदायिक व्हा !

चीनने नोव्हेंबर १९६२ मध्ये जरी आपले आक्रमण एकतर्फे मागे घेतले तरी चिनी हल्ल्याचा धोका सदैव आहे. त्यासाठी 'भारतीय राजकारणाची आजची निकड ! शिवसांप्रदायिक व्हा' हा माझा लेख मी ३ फेब्रुवारी १९६३ च्या 'आलमगीर'मध्ये प्रसिद्धिला. तो येणेप्रमाणे :

## भारतीय राजकारणाची आजची निकड ! शिवसांप्रदायिक व्हा !

कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीवर अर्जुन जेव्हा पुढे होणारा रक्तपात म्हणजे पाप होय या कल्पनेने हतवीर्य झाला आणि अहिंसेची भाषा बोलू लागला, तेव्हा धर्मयुद्धात करावी लागणारी हत्या म्हणजे पाप नव्हे याचा साक्षात्कार श्रीकृष्णांनी अर्जुनाला घडविला. अर्जुनाच्या मनात वैचारिक क्रांती घडवून आणून श्रीकृष्णांनी त्याला युद्धप्रवण केले, हे सर्वपरिचित आहे. चीनशी होऊ घातलेल्या युद्धामुळे आज असाच प्रसंग उद्भवलेला आहे. आज जरी युद्धविराम मान्य करण्यात आलेला असला तरी चिनी हल्ल्याचा धोका डेमॉक्लीसच्या तलवारीसारखा भारताच्या मस्तकावर लटकत राहणार आहे. त्या प्रसंगाला तोंड देता यावे म्हणून भारतीय जनता युद्धोन्मुख होईल अशी तिची मानसिक तयारी करणे अवश्य आहे. हे करायचे तर, आज जनमनावर

दीर्घकाळ ज्याचा पगडा बसला आहे त्या गांधीवादाचा सर्वस्वी त्याग केला पाहिजे; आणि त्याऐवजी शिवसंप्रदायाचा अंगीकार केला पाहिजे. मी ही सूचना आग्रहाने मांडीत आहे, याचा अर्थ मी गांधींच्या महान् व्यक्तिमहत्त्वाचा अनादर करीत आहे असा नाही. कारण, भारतमातेचा दुसरा एक महातेजस्वी सुपुत्र सुभाषचंद्र बोस हे इंग्रजांच्या पहाऱ्यातून निसटून पुढील साहसी जीवनाला वाहून घेण्यासाठी अदृश्य झाले, त्याच्या आधी म्हणजे १ जानेवारी १९४१ ला किंवा त्या सुमाराला त्यांच्या घरी माझ्या त्यांच्याशी झालेल्या गुप्त मुलाखतीत म्हणाले होते की, गांधीवादी तत्त्वज्ञानाने देशाला पौरुषहीन केले आहे आणि ह्या तत्त्वज्ञानाचा पगडा असेपर्यंत भारताला कशाचीच आशा करायला नको.

## हा असत्य प्रचार थांबवा

असीम स्वार्थत्याग, ज्वलंत देशाभिमान, आत्यंतिक शौर्य आणि राजकारणचातुर्य म्हणजेच शिवाजी संप्रदाय होय हे ऐतिहासिक सत्य कुणालाच नाकारता येणार नाही. म्हणूनच, शिवाजीच्या संप्रदायावर श्रद्धा असल्याबद्दल प्रसिद्ध असलेले श्री. यशवंतराव चव्हाण यांना प्राप्त परिस्थितीत संरक्षणमंत्री नेमल्याबद्दल मी महामंत्र्यांचे अभिनंदन करतो. पण एवढयानेच भागणार नाही. सत्ता, प्रतिष्ठा आणि संख्याबल लाभलेल्या कांग्रेसजनांनीच पुढाकार घेऊन जनमानसात क्रांती घडवून आणण्यासाठी प्रथमतःच एक गोष्ट केली पाहिजे. रक्ताचा एक बिंदूही न सांडता केवळ अहिंसात्मक असहकारानेच आपणच स्वराज्य मिळविले हा असत्य प्रचार थांबविला पाहिजे. यापुढे त्यांनी जनतेला निःसंकोचपणे सांगितले पाहिजे की, इंग्रजांवर भारतीय सैन्याची निष्ठा राहिली नाही हे ओळखूनच इंग्रज भारत सोडून चालते झाले. आणि ही गोष्ट खरीच आहे. १९४७ च्या जुलैमध्ये हाऊस ऑफ कामन्सच्या सभेत त्यावेळचे ब्रिटिश पंतप्रधान अॅटली यांनी हीच वस्तुस्थिति जाहीर केली होती. कांग्रेसजनांनी ही गोष्ट केली तर त्यामुळे त्यांच्या हाती पुन्हा राज्यसत्ता न येण्याचा धोका आहे असे तर नाहीच उलट त्यांच्या प्रतिष्ठेत भरच पडेल. राष्ट्रहितासाठी आणि युद्धप्रयत्न कळकळीने व्हावे म्हणून हे सत्यकथन आवश्यक आहे. अहिंसात्मक असहकार गोव्याच्या व हैद्राबादच्या प्रकरणी निष्फळ ठरला आणि मग राज्यकर्त्यांना हिंसेचाच अवलंब करावा लागला हे त्यांनी जाणले पाहिजे.

चिनी आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी पायदळाला, नौदलाला, हवाईदलाला लागणारी सर्व आधुनिक शस्त्रे, वाहने व इतर साधने यांनी सुसज्ज असे मोठे सैन्य साधारणतः २५ लक्ष म्हणा, पाहिजे. सारे श्रम व पैसा याच कारणी लागली पाहिजेत. कारण माणसे काही नखांनी लढत

नाहीत. जरूरच भासली तर मित्रराष्ट्राबरोबर मदतीचा करार करायलाही अनमान करता नये.

सामाजिक व आर्थिक क्षेत्रात धुमाकूळ घालणाऱ्या गांधीवादी घोषणांचा त्याग केला पाहिजे. दारूबंदी उठवून मितपानाला मुभा ठेवली पाहिजे. पंचशीला-वर आता अखेरचा पडदा टाकला पाहिजे. खादी ग्रामोद्योग ही गांधीवादी खुळे अव्यवहार्थ म्हणून सोडून दिली पाहिजेत. मूलोद्योग शिक्षणक्रमालाही रामराम ठोकला पाहिजे. पदयात्रा, भूदान आणि ग्रामदान म्हणजे दुसरे तिसरे काही नसून धादांत जीर्णमतवाद आहे, त्यांना यापुढे थारा देता कामा नये. समाजवादाची किंवा भांडवलशाहीची भाषा आता पुरे झाली. बुद्धिप्रामाण्य आणि प्रत्ययकारी मानवी अनुभवावर आधारलेली मार्गदर्शक तत्त्वे यांचीच आता कास धरली पाहिजे. अशा प्रकारे शिवसंप्रदायावर अधिष्ठित असे धोरण राष्ट्राला सुरक्षिततेच्या, शांततेच्या, प्रगतीच्या मार्गावर नेईल. गांधींच्या शिष्योत्तमात एकटे नेताजी बोस यांनीच शिवसंप्रदायाचा शिवाजीच्या बाण्याचा अंगीकार केला. आज नेताजींच्या जन्मदिनी मी त्यांना नम्रभावाने आदरांजलि वहातो.

## शंकरराव देवांचा राष्ट्रविरोधी प्रचार

शंकरराव देवांच्या नेतृत्वाखाली चीनकडे जाण्यासाठी शांतिपथक निघाले. ते पथक मार्गामध्ये राष्ट्रविरोधी प्रचार करीत होते. त्याला सरकारने प्रतिबंध घालावा म्हणून मी पंतप्रधान नेहरूंना खुले पत्र लिहिले. ते ता. १० एप्रिल १९६३ च्या 'तरुण भारता'त प्रसिद्ध झाले आहे. माझ्या या पत्राला नेहरूंनी पाठविलेले उत्तर ता. १८ एप्रिल १९६३ च्या 'तरुण भारता'त प्रसिद्ध झाले आहे. ती दोन्हीही पत्रे खालीलप्रमाणे :

भारत आणि चीन या दोन राष्ट्रात सलोख्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत यासाठी एक जागतिक शांति पथक चीनला जाण्यास पायी निघाले आहे. पण हे पथक राष्ट्रविरोधी प्रचार करीत आहे. अतएव त्यास चीनकडे जाण्यास मज्जाव करण्यात यावा अशी सूचना नागपूरचे वयोवृद्ध नागरिक व नेते डॉ. ना. भा. खरे यांनी पंतप्रधान श्री. नेहरू यांना खुले पत्र पाठवून केली आहे.

या खुल्या पत्रात डॉ. खरे म्हणतात की हे शांतिपथक भारतविरोधी व चीनला अनुकूल असा प्रचार करीत आहे याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण या पथकाचे नेते भारतविरोधी पिझोचे समर्थक रे. स्कॉट हे आहेत. वस्तुतः या पथकास या बाबतीत भारत सरकारने उत्तेजन द्यावयास नको अथवा त्याच्या राष्ट्रविरोधी प्रचाराकडे कानाडोळा करावयास नको.

पत्रात पुढे म्हटले आहे की या शांतिपथकाच्या प्रचाराचा आधार असा दिसतो की चीनने तयार केलेले भारत–चीन सीमाभागाचे नकाशे अभ्यासावेत.

त्याचा अर्थ असा की चीनची भूमिका या पथकास योग्य व 'विश्वासार्ह' वाटते. दुसरा या पथकाच्या प्रचारातील भाग म्हणजे चिनी सेना भारतीय सीमेच्या बाहेर घालवून देण्याचा पंतप्रधान नेहरूंनी आदेश दिला नसता तर चीनने भारतावर आक्रमण केलेच नसते आणि तिसरे म्हणजे चीनने जी एकतर्फी युद्धबंदी घोषित केली त्यावरून भारताबद्दल चीनचा पहाण्याचा दृष्टिकोण सद्‌हेतुमूलक व सद्‌भावनाप्रेरक आहे.

पत्रात शेवटी स्पष्ट म्हटले आहे की, या शांतिपथकाचा प्रचार शुद्ध राष्ट्रविरोधी आणि चीनला अनुकूल असल्यामुळे हा प्रचार यापुढे बंद करावयास पाहिजे म्हणून "माझी अशी नम्र सूचना आहे की या जागतिक शांतिपथकास चीनला जाण्यास मज्जाव करण्यात यावा."

### डॉ. खरे यांना नेहरूंचे पत्र

नागपूर, ता. १७ (हिं. स.)

रेव्ह. स्कॉट यांच्या नेतृत्वाखाली चीनकडे जाण्यास निघालेल्या जागतिक शांतिपथकासंबंधी जे वृत्त प्रसिद्ध झाले आहे त्यापैकी बऱ्याच गोष्टी पथकातील सदस्यांनी नाकारल्या असून या पथकामुळे सर्वसाधारण जनमतावर कोणताही प्रभाव पडलेला नाही आणि हे पथक पुढे जाणारही नाही.

ही माहिती पंतप्रधान श्री. नेहरू यांनी नागपूरचे वयोवृद्ध नागरिक व नेते डॉ. ना. भा. खरे यांना त्यांनी पाठविलेल्या खुल्या पत्राला दिलेल्या उत्तरात कळविली आहे.

डॉ. खरे यांनी पंतप्रधानांना उद्देशून लिहिलेल्या खुल्या पत्रात या शांतिपथकाला चीनला जाण्यास मज्जाव करण्यात यावा अशी विनंती केली होती.

पंतप्रधान श्री. नेहरू यांनी खुल्या पत्राचे उत्तर पाठविल्याबद्दल डॉ. खरे यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

## मी वर्तविलेले राजकीय भविष्य

पाकिस्तान आणि चीन यांची जी गाढ दोस्ती आहे तिचा संभाव्य परिणाम काय होईल याबद्दल मी एक राजकीय भविष्य वर्तविण्याचे धाडस केले आहे. ते माझे राजकीय भविष्य 'काश्मिर प्रॉब्लेम' या शीर्षकाखाली ता. ४ मे १९६३ च्या 'हितवाद'मध्ये प्रसिद्ध झाले आहे. ते येथे देऊन हे प्रकरण संपवितो.

### Kashmir Problem

Although many consultative meetings have been held between the representatives of India and Pakistan on a ministerial level to hammer out a

solution to the Kashmir problem, a solution agreeable to both the parties in the dispute is as far away as ever.

In spite of this fact president Ayubkhan of Pakistan, has recently expressed his view that the Indo–Chinese conflict has brought the solution of the Kashmir problem much nearer. Since according to Pakistan the solution of the Kashmir problem means the ceding of the Kashmir territory by India to Pakistan, the mischief implied in this latest pronouncement of president Ayubkhan is obvious. It means that in the forseeable future, Pakistan will take advantage of the Indo–Chinese conflict, and there will be a joint attack by Pakistan and China on the Kashmir territory to wrest it from India.

It this happens a third world war is very likely, because, America will not like Communist China to gain the upper hand in the area, and so America will jump into the fray to oppose China. Thus the friendship between America and Pakistan will come to an end.

Russia is an ally of China, but it will not like a strong and Victorious china so near its frontiers. Besides this, Russia has steadfastly stood in the United Nations, to support the sovereignty of India over Kashmir; therefore after great cogitation it will jump into the fray on the side of India, to defend Indian sovereignty over Kashmir.

Thus since the two most powerful nations of the world, happen to take the same side in this conflict, this third world war will be of a short duration and will not be so destructive. As a result of this third world war, Pakistan as a separate entity will vanish. Pakistan and Kashmir will again be joined to India, which will again be a Strong Akhand Bharat.

★ ★

# प्रकरण ७ वे

# खट्याळ खरे

## संकलित केलेल्या माझ्या काही आठवणी

या पुस्तकाचे नांव ‘ खरे–दर्शन ’ असे आहे. ते सार्थ करण्यासाठी माझ्या स्वभावाच्या आणि वागणुकीच्या सर्व छटा व सर्व बाजू जनतेपुढे येणे रास्त आहे. म्हणून नागपूरचे एक सज्जन श्री. चंद्रशेखर गुप्ते, बी. ए., एलएल. बी. यांनी संकलित केलेल्या माझ्या आठवणींपैकी काही आठवणी दादरच्या ‘ हिंदू ’ साप्ताहिकाच्या १९६० आणि १९६१ च्या दिवाळी अंकात लागोपाठ प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या ह्या प्रकरणात उद्‌धृत करतो.

### १. हृदयविकाराचे उपकार

हृदयविकारामुळे मला जिना चढता येत नाही. व्हाइसरॉयच्या घरी जेव्हा कौन्सिलची सभा होत असे तेव्हा विजेच्या पाळण्यातून मी वर जाई. एक दिवस संध्याकाळी व्हाइसरॉय वॅव्हेलच्या घरी काही कार्यक्रम होता. आमंत्रणानुरूप मी गेलो. पण त्या दिवशी पाळणा बिघडला होता. व्हाइसरॉयच्या A. D. C. ने मला जिन्याने वर जायला सांगितले. माझ्या दौर्बल्यामुळे मी ते नाकारून परत जाऊ लागलो. A. D. C. म्हणाला, “ जर तुम्ही परत गेला तर व्हाइसरॉयसाहेब रागावतील नि त्यांना वाईटही वाटेल.” मी म्हटले, “ माझा उपाय नाही. मी जिना चढण्याचा धोका पत्करू शकत नाही.” A. D. C. ने विचारले, “ मी तुम्हाला पाटुंगळी नेले तर तुमचा काही आक्षेप आहे काय ? ” मी म्हटले, “ माझा मुळीच आक्षेप नाही. खुशाल ने.” तेव्हा तो व्हाइसरॉयचा A. D. C. मला पाठीवर घेऊन जिना चढू लागला. तो चढत असताना मी त्याच्याशी थोडासा विनोद केला, “ माझ्या हृदयविकारास मी धन्यवाद देतो. त्याच्याचमुळे आज मला एका इंग्रजाच्या पाठीवर स्वार होण्याचे भाग्य लाभले.” त्यालाही हसू आले नी आम्ही मोकळेपणाने हसलो.

### २. पेशवाई जेवण

मी मध्यप्रांताचा मुख्य मंत्री असताना कांग्रेसचे असे अनुशासन होते की ब्रिटिश साम्राज्याचे प्रतिनिधी गव्हर्नर त्यांच्याकडे भोजन करू नये. आता

मी कांग्रेसच्या मंत्रिमंडळांत असल्याने अशी सूट दिली होती की असेंब्लीची बैठक वगैरे चालू असता योगायोगाने गव्हर्नरकडे चहाबिहा पिण्याचा प्रसंग आल्यास नाही म्हणू नये. पण मद्रासचे पंतप्रधान राजाजी गव्हर्नरच्या घरी खुशाल जेवत; त्यांना कोणीही हटकत नसे. एक दिवस मध्यप्रांताचे गव्हर्नर सर हाइड गोवन यांनी मला जेवणाचे आमंत्रण दिले. मी त्यांना सांगितले की, "मी आमच्या प्रधानमंडळाचा सल्ला घेऊन तुम्हाला कळवतो." त्याप्रमाणे प्रधानमंडळाची संमती घेऊन मी, "आम्ही (म्हणजे सर्व प्रधानमंडळ) जेवायला येतो" म्हणून होकार भरला. पण होकार भरताना खालील शर्थी घातल्या—

(१) भोजनप्रसंगी मद्यपान होऊ नये.
(२) भोजन निरामिष राहील.
(३) पदार्थ दक्षिणीब्राह्मण थाटाचे–म्हणजे श्रीखंडपुरी, चटण्याकोशिंबिरी इत्यादी राहतील.
(४) स्वयंपाक ब्राह्मण आचारी करतील.
(५) ते उघड्या अंगाने, सोवळे नेसून वाढतील.
(६) आम्ही डिनरसूटचे बंधन न पाळता स्वेच्छेनुसार वेष करू.
(७) ताटे चांदीची राहतील.
(८) हाताने जेवू. काटेचमचे आम्ही वापरणार नाही. "या अटी कबूल असल्यास आम्ही जेवायला येऊ" म्हणून मी कळविले. याप्रमाणे सर्व अटी अक्षरशः पाळण्यात आल्या आणि जेवण पार पडले. हे जेवण इंग्रज स्त्रियांनीही एकमेकींना थट्टेने घास देत खाल्ले—लाडू, साखरभात, वडे इत्यादी.

पण ज्या मंत्रिमंडळाने संमती दिली होती, त्यातीलच काहींनी–शुक्ला, मिश्रा इत्यादींनी–हायकमांडजवळ चुगली केली की, "डॉ. खऱ्यांनी अनुशासन भंग केला." सरदार पटेलांनी मला कैफियत मागितली. मी सांगितले, "चुगली करणारेही माझ्या समागमे जेवले की." त्यावर उत्तर मिळाले, "ते तुमच्या दबावामुळे, भिडेस्तव जेवले." मी सरदार पटेलांना म्हटले, "जर मी असल्या जेवण्याने ब्रिटिशांच्या आहारी जाणारा असेन तर मी कवडीमोलाचा ठरेन. तुम्ही नुसत्या नियमाच्या शब्दाकडे पाहू नका. त्यातील तत्वाकडे, अर्थाकडे, पाहा. कोणत्याही Govt. House वर आजवर असले जेवण घडून आले नसेल. हे जेवण करून मी ब्रिटिश साम्राज्याच्या प्रतिनिधीला हिंदु चालीरीतीचा वापर करायला लावला की नाही, बोला. मला वाटते की या घटनेपूर्वी कधी असले जेवण झाले नसेल; इतकेच नव्हे तर पुढेही होणार नाही."

## ३. दौरा

महात्मा गांधींचा हरिजनदौरा मराठी मध्यप्रांतात चालू झाला. त्यांचा मुख्य व्यवस्थापक मी होतो. सगळ्या दौराभर मी महात्माजींच्या सांगाती होतो. त्या वेळेस सनातनी लोकांना हरिजनोद्धाराची चळवळ मान्य नव्हती आणि ते लोक जंगलातच वाटेवर आडवे पडण्याचा सत्याग्रह करू लागले. त्याला मी अशी तोड काढली की, आमच्या सांगातीच एका लॉरीत पंचवीस स्वयंसेवक बजरंग ठेकेदारांच्या नेतृत्वाखाली येत. रस्त्यात कोणी सत्याग्रह केल्यास हे स्वयंसेवक सत्याग्रहींना बलात्काराने वाटेतून दूर सारावयाचे नि आमचा मार्ग मोकळा व्हावयाचा. मी महात्माजींना विचारत असे की, "बोला हा अत्याचार (Violence) आहे की अनत्याचार (non-Violence) ?" पण उत्तरादाखल तो मिस्कील म्हातारा केवळ हसत असे.

दौऱ्यामध्ये जेथे कोठे मोटर थांबे, त्या गावात खूप गर्दी होई आणि जो तो महात्माजींच्या अंगाला-डोक्याला, खांद्याला, पायाला-हात लावण्याचा यत्न करी. लोकांच्या या कृतीपासून महात्म्याला कोणतीही इजा होवू नये म्हणून मी एक हातभर छडी बाळगत असे आणि कोणी स्पर्श करू लागला की त्याला सौम्यसा तडाखा देत असे. हे Violence की non-Violence या वरही उत्तर स्मितच.

महात्माजींच्या दौऱ्यामध्ये जेथे मुक्काम पडे तेथे महात्मा फिरायला जात असे. मीही सांगाती जाई. आमचा वर्ध्याला मुक्काम असतांना एक दिवस असे फिरायला जाण्याचा प्रसंग आला आणि नेहमीच्या संवयीप्रमाणे महात्मा दोन मुलींच्या खांद्यावर हात ठेवून चालू लागला. मला हे काही आवडले नाही. मी त्याला तोंडावर बजावले, "महात्माजी तुम्ही म्हातारे झाले आहा. तुम्हास चालण्याचे त्राण नसेल तर दोन पहिलवान ठेवा. तुम्हाला अनुकूलता आहे. पण हे नको. तुमच्या मनी पाप नसेल, पण 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयम् ।,' म्हातारा तेवढ्यापुरता विरमला आणि मुलींना म्हणाला, "जाव भाई; यह डॉक्टर नाराज होता है।"

## ४. चरणसंवाहन

याच दौऱ्याच्या वेळी चांदा येथे मुक्काम असताना आणखी असाच एक प्रसंग घडला. चांदा येथे मी एका विस्तीर्ण आवार असलेल्या कापूस जिनमधे उतरलो होतो. महात्माजीही त्याच जिनात दुसऱ्या भागी उतरले होते. चांदा येथून मुक्काम हलविल्यावर मराठी मध्यप्रांतातला दौरा संपूर्ण होणार होता आणि महात्माजींना मांजरी या स्टेशनवर वऱ्हाडच्या लोकांच्या

हाती सोपवून मी माझ्या जोखमीतून मुक्त होणार होतो. मांजरीला जायच्या आदल्या रात्री मांजरी येथील कार्यक्रम आणि निघण्याची वेळ महात्माजीस कळवायची होती. म्हणून, रात्री नऊसाडेनऊचा सुमार असेल, मी महात्माजींना भेटायला गेलो.

महात्माजी सर्व ऋतूत उघड्यावर निजत. आसपास फर्लांग दोन फर्लांग पर्यंत कोणी माणूस नव्हते. महात्माजी निजले होते आणि त्यांनी लुंगी अथवा धोतर दोन्ही जांघापर्यंत वर सरकविले होते. अशा स्थितीत, निर्जन वातावरणात एक इंग्रज बाई Miss Slade (जी पुढे मीरा बेन नांवाने प्रसिद्ध झाली ती ), जुन्या काळी जशी एकादी कर्तव्यदक्ष पत्नी पतीचे पाय दाबत असे तसे महात्माजींचे पाय चेपत होती. मी दूरूनच हे दृश्य पाहिल्यावर मला संकोच वाटला. जवळ जावे की न जावे, असा संदेह मनात आला. पण संकोच वाटून उपयोग नव्हता, कारण महात्माजींना दुसऱ्या दिवसासंबंधी माहिती देणे भागच होते. म्हणून मी दुरूनच विचारले, "महात्माजी, ऐसी हालतमें मैं आसकता हूं ?" ते निःसंकोचपणे म्हणाले, "आव भाई, आव आव !"

मी गेलो आणि मी म. गांधींशी सर्व बोलणे उरकले. पण त्यांच्याशी बोलत असतांना आणि ते दृश्य पाहत असताना मला बोकॅशिओच्या Decameron मधील ख्रिस्चन मॉंक आणि नन्सचे पाय चेपण्याच्या प्रसंगाची आठवण झाल्यावाचून राहिली नाही.

## ५. शेराला सव्वाशेर

१९१९, मे महिन्याची ६ वी तारीख असावी. माझे तिसरे लग्न (अर्थात् रुईशी वगळून !) ३ मेला झाले होते. नूतन पत्नीला घेऊन मी महाबळेश्वरला जावयाला निघालो. त्या वेळेस कलकत्ता–मुंबई डाकगाडी बहुधा ११–४४ ला नागपूरहून निघत असे. माझ्या पत्नीची मावशी समागमे असल्याने त्या दोघी स्त्रियांच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसल्या आणि मी पुरुषांच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यात बसलो.

त्यावेळी पहिले महायुद्ध नुकतेच संपले असल्याने सैनिकी अधिकाऱ्यांची गाडीत बरीच जा ये असे. दुसऱ्या वर्गाचे बहुतेक सर्व डबे त्यांच्यासाठी राखीव होते. अर्धाच डबा काय तो मोकळा होता. मी तेथेच बसलो होतो. डब्यातले आधीचे पाचही प्रवासी गोरे लष्करी अधिकारी होते आणि मी शिरलो तेव्हा ते गाडीतून तात्पुरते उतरले होते. गाडी सुटण्याच्या बेतास ते परतले आणि माझ्यासारखा काला आदमी त्यांच्या डब्यात बसलेला पाहून त्यांचे माथे भडकले ! त्यांनी मला मोठ्या तोऱ्यात प्रश्न विचारला,

"How many more beggars are coming in this compartment?" मी त्यांना तडाख्यासरशी जबाब दिला, "I am not a beggar in my own country. Only those who come to my country for bread are beggars." "What are you talking? Say it again." "I have said it; you have heard it." इतक्यात गाडी चालू झाली. ते म्हणाले, "You get down at the next stop. If not, we shall throw you out." मी म्हटले, "हे माझे तिकीट. माझा बसण्याचा हक्क आहे. मला कोणीही काढू शकत नाही. तुम्ही शस्त्रसज्ज लोकांनी जर माझा जीव घेतला तर तो तुमच्या जर्मनावरील विजयाहूनही मोठा विजय होईल."

मी मधल्या बाकावर बसलो होतो. बूटमोजे काढून मी पुस्तक वाचू लागलो. माझ्या शेजारी बसलेल्या सैनिकाने रेलून आपले बुटाचे पाय मुद्दाम माझ्या पृष्ठास आणून भिडविले. तो ते हटवी ना. तेव्हा मीही बूट चढवून, रेलून त्याचेच अनुकरण केले. हे मी करताच समोरच्या बाकावर बसलेला त्याचा सोबती ओरडला, "Behave yourself!" मी म्हणालो, "Your friend has taught me how to behave and I have followed his advice." मग आम्ही दोघांनीही आपापले पाय बाजूला केले. पुनः मी वाचनात मग्न झालो.

त्यांनी पाहिले की धमक्या, उद्धटपणा यांना हा भीक घालत नाही. तेव्हा त्यांनीही नाद सोडलासे दिसले. हे सर्व होत असता मी साखळीकडे झेप घेण्याच्या दक्षतेत होतो. मग त्यांनी दोस्तीचा प्रयोग केला. मला ते चहाबिस्किटे देऊ लागले. मी म्हटले, "Sorry. I accept courtsey only at the hands of gentlemen."

कल्याणपर्यंत मी वरच्या बर्थवर पडून त्यांच्यासह प्रवास केला, पण झोप लागणार नाही याची काळजी घेतली—हो, झोप लागलेली पाहून त्यांनी काही दगा केला तर!

(आगगाडीचे पहिल्या वर्गाचे तिकीट काढले असताही बॅ. गांधींना दक्षिण आफ्रिकेतील मुक्कामात गोऱ्या प्रवाशांनी पहिल्या वर्गाच्या डब्यात बसू न देता त्यांचे सामान बाहेर फेकून दिल्यावर खालच्या वर्गातून प्रवास न करता दुसऱ्या दिवसापर्यंत प्लॅटफॉर्मवरच दृढतेने ठाण मांडून बसल्याबद्दल त्यांचे साऱ्या जगाकडून आणि विशेषतः भारताकडून कोण कौतुक केले जाते!

वस्तुतः त्यांच्या वागण्यात अन्यायाला उलट टोला देण्याचे धैर्य कणभर तरी दिसून येते काय ? डॉ. खऱ्यांची वागणूक गांधींच्या तुलनेने किती तरी अधिक पौरुषाची होती. पण डॉ. खऱ्यांच्या पाठीशी जाहिरातीचे ढोल पिटणारे साजिंदे नसल्याने आणि गांधींच्या पाठीशी त्यांचे ताफेचे ताफे असल्याने खऱ्या धैर्याची बूज होत नाही आणि दुबळ्या शरणागतीचा गौरवपूर्ण डंका मात्र जगाच्या कान्याकोपऱ्यात गरजतो, दुसरे काय ?

—संग्राहक )

## ६ मागच्यावरही ताण

१९१९ च्या डिसेंबरमधे बॅ. अभ्यंकर, नारायणराव वैद्य आणि मी अमृतसरच्या कांग्रेसच्या अधिवेशनास गेलो होतो. ते आटोपून परत येताना आम्ही तीन जणांनी पाच स्थाने असलेला दुसऱ्या वर्गाचा अर्धा डबा राखून ठेवला होता. मध्यरात्री दोन युरोपिअन आमच्या डब्यात घुसण्याचा यत्न करू लागले. मी दरवाजाजवळ, अभ्यंकरमध्ये आणि नारायणराव पलीकडे निजले होते. दरवाजा ठोठावण्याच्या आवाजाने मी जागा झालो आणि दरवाजा उघडून नवागतांना म्हणालो, "ही जागा राखीव आहे; आपण दुसरीकडे जा." त्यांना ते पटेना. आमची बाचाबाची झाली. त्यामुळे अभ्यंकरांना जाग आला, त्या युरोपियनांचे सामान डब्यात घुसविण्याच्या प्रयत्नात दोन हमाल होते. अभ्यंकरांनी त्या युरोपियनांच्या आईमाईचा उद्धार करून ठोकरीने त्या हमालांच्या डोक्यारील पेट्या धाडदिशी खाली पाडल्या. त्या गोऱ्यांना हा अनुभव आगळाच असावा. कुलूप मोडून, ट्रंक फुटून सर्व सामान अस्ताव्यस्त फेकले गेले. पोलिसात तक्रार करण्यात आली. पोलीस, स्टेशन मास्तर, गार्ड, बघे यांची तोबा गर्दी झाली. आमची तिकिटे तपासली गेली. पण आम्ही नियमानुरूप वागत असल्याने त्या युरोपियनांचे काहीच चालले नाही.

## ७. छान जिरली उर्मटाची !

१९०४–५ ची गोष्ट असेल. मी लाहोरला कॉलेजमध्ये विद्यार्थी होतो. त्या वेळेस मी सपरिवार सोलापूरला राहत असे. लाहोर कॉलेजला सुटी ३ महिने असे. सुटी लागली की आम्ही दक्षिणेकडे जाण्यास निघत असू. प्रवास तिसऱ्या वर्गाचा. त्या काळामध्ये दहा माणसांचा अलग कंपार्टमेंट असे. लाहोर स्टेशनवर अशा प्रकारच्या एका डब्यात आम्ही नऊ दक्षिणी विद्यार्थी बसलो. तेवढ्यात एक अँग्लोइंडियन तिकीट तपासनीस तिकीट तपासण्यास आला. आमच्यापैकी एक विद्यार्थी खिडकीबाहेर तोंड काढून बसला होता. त्या अँग्लोइंडियन बाळाने आपला चिमटा "टिकेट !"

म्हणून त्याच्या हनुवटीखाली मारला हे गैरवर्तन होते. आम्हा विद्यार्थ्यांची आपसात नेत्रपल्लवी झाली आणि त्याला सांगण्यात आले, "Come in and check the tickets."

तो आत आल्यासरशी सर्व दारे खिडक्या बंद झाल्या आणि, "You want ticket, don't you ? Take this." अशा ओरड्यासह त्यावर लाथाबुक्यांचा मार पडू लागला. माराने बेजार होऊन तो गयावया करू लागला. "Oh, let me go. I shall never do it again." पण ज्यावेळी गाडी सुटण्याच्या ऐन बेतात आली तेव्हा कोठे त्याला आम्ही दरवाजा उघडून जाऊ दिले, आणि बजावले, "Mind you don't complain. And mind also that you don't insult Indians here after."

### ८. हा तुमचा महात्मा

मी अलवरला दिवाण असताना घटना समितीचा सदस्यही होतो. त्यामुळे मी बरेचदा दिल्लीला रहात असे. अलवर राज्यामध्ये सरहद्दप्रांत आणि पंजाब यातून येणाऱ्या निर्वासितांची सोय प्रथम झाली ही गोष्ट प्रसिद्ध आहे. यामुळे माझ्याकडे पुष्कळसे स्त्री-पुरुष निर्वासित येत असत नि आपली कहाणी सांगत असत. मीही त्यांच्याशी मोकळेपणाने बोलत असे. अशाच एका प्रसंगी मी म. गांधीबद्दल काही तिरस्कारदर्शक उद्गार काढले. त्यामुळे एक पंजाबी बाई माझ्यावर फार रागावली. ती म्हणाली, "डॉक्टरसाहेब, जिसको हम महात्मा मानते है उसकी तौहीन (निंदा) आप नहीं कर सकते।" मी तिला म्हणालो, "जैसे आपको गांधीजी को महात्मा मानने का अधिकार है वैसेही हमको उसके खिलाफ बोलने का अधिकार है। आप चाहे हमारा कहना मत माने, लेकिन हमको हमारी राय जाहीर करने से नहीं रोक सकती।"

यानंतर काही दिवसांनी पंजाबी निर्वासित स्त्रियांचे एक प्रतिनिधिमंडळ महात्माजींना भेटायला गेले. या प्रतिनिधिमंडळात ती बाईही होती. या मंडळाने आपली दर्दभरी कहाणी महात्माजींना निवेदन केली नि पुष्कळ तरुण स्त्रियांना मुसलमानांनी पळवून नेले असेही सांगितले. महात्माजींनी ही सर्व कहाणी शांतपणे ऐकून घेतली नि शेवटी ते म्हणाले, "बहेन, हमने सब सुन लिया। हिंदुओंमें औरतों की तादात ज्यादा है और मुसलमानों में कम है। इसलिये वे थोडीसी हिंदू औरते ले गये तो क्या हुआ ?"

ही सर्व हकीकत पुढे, माझ्यावर रागावलेल्या त्या बाईने येऊन मला सांगितली आणि ती मला म्हणाली, "डॉक्टरसाहेब, आप महात्माके सम्बन्ध में ठीक कह रहे थे। अब हम आपके खिलाफ नहीं होंगे।"

## ९. कुसळ आणि मुसळ

१९४७ च्या जुलै ऑगस्टमध्ये पश्चिम पंजाबात हिंदु शिखांची खूप कत्तल झाली. साहजिकच असहाय लोक निर्वासित म्हणून अमृतसरला आले आणि त्यांनीही अमृतसरला आल्यावर मुसलमानांवर हल्ला करून त्या कत्तलीचा वचपा काढला. त्यासंबंधी वर्तमानपत्रांत बातम्या येऊ लागल्या, तेव्हा महात्माजींनी जाहीर रीतीने असे उद्‌गार काढले की, "शीख कौम बडी वहशी (जंगली) है। शराब पीकर खूनखराबी करती है।" या वेळेस मी दिल्लीला होतो आणि 'विविधवृत्ता'चा वर्गणीदार होतो. या वृत्त-पत्राच्या एका अंकात एका युरोपियन राजधानीमधील दिवाणखान्यात उभ्या असलेल्या विजयालक्ष्मी पंडितचा आणि दोन युरोपियन मुत्सद्यांचा फोटो प्रसिद्ध झाला होता. त्या फोटोत विजयालक्ष्मीच्या हातात एक लहानसे liquor-glass होते. त्या फोटोखाली मराठीत विवरण दिले होते. या फोटोचे आणि विवरणाचे कात्रण मी हिंदीत भाषांतर करून महात्माजींना दिल्लीतच नोंदडाकेने (Registered post) पाठविले होते आणि महात्माजींना असेही लिहिले होते की, "शीख दारू पितात हे सत्य आहे. पण ते पाकि-स्तानातून मार खाऊन आणि अपमानित होऊन अमृतसरला आले असताना. त्यांच्याविषयी सहानुभूती व्यक्त करण्याऐवजी त्यांची अशी निर्भर्त्सना करणे योग्य नव्हे. तुम्हाला जर दारू पिण्याविषयी इतका तिटकारा वाटत असेल तर त्या फोटोमध्ये विजयालक्ष्मीच्या हातामध्ये कसला पेला आहे तो पहा आणि शिखांच्या वाटेस जाण्यापूर्वी तिला चार उपदेशाच्या गोष्टी सांगा, कारण की, ती तुम्हाला शिखांपेक्षा फार जवळची आहे." अर्थात उत्तर आले नाही.

## १०. ब्राह्मणद्वेष्ट्याचा मुखभंग

काही वर्षांपूर्वी अमरावती येथे संयुक्त महाराष्ट्र परिषद भरली होती. या परिषदेसाठी ठिकठिकाणचे कार्यकर्ते बोलाविले गेले होते. कोल्हापूरचे श्री. बागल हे कट्टर ब्राह्मणेत्तर कार्यकर्ते या परिषदेचे अध्यक्ष होते. वास्तविक संयुक्त महाराष्ट्र परिषदेमध्ये ब्राह्मणब्राह्मणेतर वादाला काही स्थान नव्हते. परंतु आपल्या भाषणात अध्यक्ष महाशय अस्वाभाविकपणे असेल कदाचित् पण जुन्या वळणावर गेले आणि त्यांनी आपल्या भाषणात ब्राह्मणांना दूषण देणारे उद्‌गार काढले. ते इतके वहावत गेले की त्यांनी गोडसे यांनी केलेल्या गांधींच्या खुनाचाही उल्लेख केला. त्यांनी गोडसेच्या जातीला दूषण दिले. अध्यक्षांच्या भाषणानंतर मलाही बोलण्याची संधी मिळाली आणि मी स्पष्टपणे सांगून टाकले की, "ब्राह्मणब्राह्मणेतर वाद या परिषदेत आणण्याची गरज नव्हती. गोडशांच्या जातीचा उपहास केला गेला. त्याला उत्तर म्हणून मी सभेला

स्वच्छ सांगू इच्छितो की गोडशांच्या जातीत जन्मल्याचा मला अभिमान आहे. ही जात एकेकाळी हिंदुस्थानावर राज्य करणाऱ्या पेशव्यांची जात आहे."

मला असे मागाहून सांगण्यात आले की या माझ्या भाषणाने सभेला आलेल्या से. बापटांनी कोणाजवळ तरी माझ्या स्पष्टवक्तेपणाविषयी आश्चर्योद्‌गार काढले.

## ११. गांधीछाप विजय

सन १९१३ मध्ये म. गांधी दक्षिण आफ्रिकेत रहात होते. दक्षिण आफ्रिकन सरकारचा वर्णविद्वेष आजही मशहूर आहे. त्या काळात त्या सरकारने असा निर्बंध केला होता की प्रत्येक भारतीयाने पोलिसला आपल्या अंगठ्याचे ठसे दिले पाहिजेत. म्हणजे ते सरकार प्रत्येक भारतीयाला गुन्हेगारच समजत होते, कारण अंगठ्याचे ठसे गुन्हेगाराकडून घेण्यात येतात. म्हणून हा कायदा भारतीयांना अपमानकारकच होता आणि गांधींनी या कायद्याविरुद्ध सत्याग्रह पुकारून अंगठ्याचे ठसे न देण्याचा आदेश भारतीयांना दिला. या आंदोलनात गांधीसकट हिंदु, मुसलमान, पठाण इ. अनेक भारतीय, तुरुंगात गेले. पुढे गांधींनी तडजोड काढली ती अशी की दक्षिण आफ्रिकन सरकारने हा कायदा मागे घ्यावा म्हणजे आम्ही खुशीने आमच्या अंगठ्याचे ठसे देऊ ! या तडजोडीमुळे गांधीजी तुरुंगातून सुटले.

पठाण लोकांना ही तडजोड पसंत झाली नाही. म्हणून दोन पठाण कुऱ्हाडी घेऊन गांधींचा शिरच्छेद करण्यास उद्युक्त झाले. गांधींचा या आपत्तीतून दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या पोलिसांनीच बचाव केला. दक्षिण आफ्रिकेतील गांधींच्या चळवळीचा विजय म्हणतात तो हा असा आहे ! ही कीर्ती घेऊन गांधी भारतात आले आणि येथेही त्यांनी स्वातंत्र्याकरता सत्याग्रहांदोलन सुरू केले. या आंदोलनाचा परिपाक दक्षिण आफ्रिकेसारखाच झाला आणि परिणामस्वरूप पाकिस्तान निर्माण झाले !

## १२. भली खोड मोडली

१९०९ मध्ये मी अमरावती येथे सरकारी डॉक्टर होतो. त्या वेळेस तेथे एडवर्डस् नावाचा एक अँग्लोइंडियन सबजज्जही होता. त्याला मधुमेहाचा रोग होता. त्याच्या लघवीची परीक्षा करण्याकरिता मी त्याला लघवी पाठवून देण्याला सांगितले. दुसऱ्या दिवशी त्याची लघवी काही तपासणीसाठी आली नाही, पण तो स्वतःच आला. मी त्याला लघवी न पाठविण्याचे कारण विचारले तेव्हा त्याची हसता हसता मुरकुंडी वळली. तो कारण सांगण्याचा प्रयत्न करी, पण त्याचे हसू पुनः पुनः उफाळून येई आणि त्या कल्लोळात

त्याचे शब्द बुडून जात. शेवटी त्याने मोठ्या कष्टाने संयम करून कारण सांगितले. तो म्हणाला, " मी अर्थात् व्हिस्कीब्रँडीचा शौकीन आहे. माझा बटलर हुसेन माझी दारू चोरून पितो असा मला संशय आला. म्हणून मी एक दिवस त्याची शहानिशा करण्याकरिता व्हिस्कीच्या बाटलीत लघवी करून कपाटात ठेवून दिली आणि बटलरच्या हालचालीवर गुप्तपणे, आडून नजर ठेवली. बटलर आपल्या सवयीप्रमाणे इकडे तिकडे पाहून चोरून दारू पिण्यासाठी कपाटाकडे गेला आणि त्याने तीच बाटली तोंडाला लावली. पहिला घोट तोंडात जाताच त्याच्या लक्षात सारा प्रकार येऊन त्याने तो 'थू थू' करून थुंकून टाकला. म्हणून काल लघवी आली नाही. "

तात्पर्य चोरी नी दारू यांची सवय वाईट.

## १३. कामिनीकांचन

२५ जुलै १९३८ च्या काळरात्री म. गांधींनी दिलेला मसुदा मी सही न करता घेऊन नागपूरला आलो नि त्या वेळच्या Associated Press ला मी बातमी दिली, 'म. गांधींनी मला सही करण्याकरिता एक मसुदा दिला आणि तो पक्का करून त्यावर सही करण्यास मला सांगितले. ते करण्याचे मी नाकारले.' या माझ्या निवेदनावर म. गांधींनी Associated Press ला असे निवेदन दिले की, 'तो मसुदा डॉ. खऱ्यांच्याच हातचा असून त्यात मी केवळ थोडी दुरुस्ती केली आहे. माझ्या हातचा तो नव्हे.' म. गांधींच्या या निवेदनाला मी पुनः Associated Press मधून जाहीर उत्तर दिले की, 'त्या मसुद्याचा ब्लॉक मी प्रसिद्ध करीन. त्यातील हस्ताक्षरावरून लोकांनी लेखक ओळखावा.' यानंतर मी १ ऑगस्टला टिळक पुण्यतिथिनिमित्त व्याख्यान देण्यास पुण्याला गेलो आणि मुंबई, ठाणे, कल्याण, नाशीक, मलकापूर इ. ठिकाणी दौरा करून कांग्रेसने मजवर केलेल्या अन्यायाचा मी जाहीर रीतीने पाढा वाचला. १४ ऑगस्ट १९३८ च्या सुमारास मी नागपूरला परत आलो आणि ९ सप्टेंबर १९३८ रोजी My Defence नावाची इंग्रजी पुस्तिका मी त्या पत्राच्या ठशासह प्रसिद्ध केली. या तीन आठवड्यांच्या काळात दोन विलक्षण घटना घडल्या.

एके दिवशी माझ्या दवाखान्यात केसांचे फुगे केलेली, खांदे उडवत ठुमकत चालणारी एक तरुण बाई रोगी म्हणून आली. ती मला म्हणाली, " डॉक्टरसाहेब, माझ्या छातीत फार दुखत आहे. मला औषध द्या. " तिच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून तिचे कांही दुखत असेल असे मला वाटले नाही. म्हणून मी तिची नाडी पाहून तिला एक औषध लिहून दिले, ते घेऊन ती गेली. दुसऱ्याच दिवशी ती पुनः आली आणि म्हणाली, 'डॉक्टरसाहेब, कालच्या औषधाने

मला काहीच बरे वाटले नाही. मला तुम्ही तपासलेही नाही, मला अवश्य तपासा.' म्हणून मी तिला माझ्या तपासण्याच्या खोलीत घेऊन गेलो. तपासण्याची खोली म्हणजे रोग्याला निजवण्यास एक बाक आणि एक सरक पडदा! मी त्या तरुण स्त्रीला बाकावर निजायला सांगितले आणि पडदा बंद करून, उजव्या हाती स्टेथॉस्कोप घेऊन तिला विचारले, 'कोठे दुखते सांगा' साधारणपणे हिंदु आणि मुसलमान स्त्रिया छाती दाखवायला आढेवेढे घेतात. पारशी आणि युरेशियन स्त्रिया असे आढेवेढे घेत नाहीत असा अनुभव आहे; पण या तरुण हिंदू स्त्रीने 'कोठे दुखते' असे मी विचारताच माझा डावा हात धरून आपल्या डाव्या स्तनावर दाबला. त्यामुळे मी घाबरलो आणि ताबडतोब पडदा सरकवून बाहेर पडलो. अर्थात मी तिला तपासले नाही आणि ती जी निघून गेली ती पुनः आली नाही.

माझ्या अनेक वर्षांच्या धंद्यात मला असा अनुभव आला नव्हता. मी या घटनेस फारसे महत्त्व दिले नाही, कारण ती एखादी बाजारबसवी धंदेवाईक स्त्री असावी असे मला वाटले. यानंतर पाचसात दिवसांनी दुसरी एक घटना घडली. तिने मात्र माझे डोळे उघडले. मी एके दिवशी दवाखान्यात जाण्यापूर्वी सकाळी वर्धेहून मोटरने एक मारवाडी गृहस्थ दोन गृहस्थांना तपासण्यासाठी म्हणून घेऊन माझ्या घरी आला. मी त्यांना तपासले, माझी फी घेतली आणि दोघांनाही औषधे लिहून दिली. त्यानंतर तो मारवाडी मला म्हणाला, "डॉक्टरसाब, आपको फुर्सद है? मैं आपको एक सवाल पूछूं?" मी म्हणालो, "सेठजी, आप एकही क्यों, दोभी सवाल पूछ सकते हैं।" यावर तो म्हणाला, "हमारे दुकानपर जो लोग आते हैं उनसे मालूम हुवा कि आपके पास गांधीका लिखा हुआ एक कागज है। क्या यह सच है?" मी त्याला म्हटले, "हां सच है। पर आपका इस बातसे मतलब?" तो म्हणाला, हमारे दुकान में लोग कहते थे की डॉ. खरे को दसपन्द्रह हजार रुपये दे दिये तो कागज वापस मिल जायगा। तेव्हा माझे कुतूहल जागृत होऊन मी त्याला म्हणालो, "शेठजी, आपको ऐसा पैगाम देकर किसीने भेजा है क्या!" त्यावर तो म्हणाला, "ऐसी बात नहीं। मैंही स्वयं पूछ रहा हूं।" मी म्हणालो, "मैं हि मूरख हूं। यदि आपको किसीने पैगाम देकर भेजा भी होगा फिर भी आप कबूल करनेवाले थोडेही हैं।" तो म्हणाला, "उस कागज में इतना महत्व का क्या है?" मी म्हणालो, "उस कागज का फोटो छापकर मैं गांधीको झूठा ठहराऊंगा।" तेव्हा तो मला म्हणाला, "झगडनेमें क्या फायदा है? थोडा और रुपिया लो तो घरगिरस्ती में काम आयेगा।" तेव्हा मी त्याला म्हणालो, "इतना रुपया तो मैंने खुदका कांग्रेसके आन्दोलन में खर्च किया है। सेठजी

तुम हो बनिया, तुमको पैसाही दीखता है। मैं हूं ब्राह्मण, मुझको न्याय और सत्य दीखता है। पन्द्रहबीस हजार रुपयोंकी कोई बात नहीं है। आपने अगर पन्द्रहबीस लाख रुपयोंके भी बदले में वह कागज मांगा तो मैं क्या करूंगा, जानते हो?" त्याने विचारले, "क्या करेंगे आप?" त्यावर मी म्हणालो, "मैं आपके उन रुपयोंका ढेर लगाऊंगा और उसपर थूककर वह वापस ले जाने को कहूंगा।" तो गेला आणि पुनः परत आला नाही.

हे प्रत्यक्ष आणि उघड, पण अनामिक प्रलोभन होते. त्यामुळे ती युवती पाचसात दिवसापूर्वी का आली होती यावर प्रकाश पडला. मला असे वाटते, मी जर तिच्या जाळ्यात सापडलो असतो तर ती मला म्हणाली असती, "डॉक्टर तुमच्या म्हणण्याप्रमाणे सर्व काही होईल हो! पण तो गांधींचा कागद द्या गडे!"

## १४. यह बम्बई है!

१९२० मध्ये नागपूर कांग्रेसच्या वेळी राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव मंजूर झाला आणि एक 'टिळक विद्यापीठ' काढावयाचे ठरले. त्या विद्यापीठाला मी ३०० रु. ची देणगी दिली होती. मला त्या कार्याची रूपरेषा ठरविण्यासाठी नियामकमंडळाचा सदस्य म्हणून पुण्याला बोलावले होते, त्याप्रमाणे मी गेलो. दिवस पावसाळ्याच्या आरंभाचे. त्यावेळी माझ्या जवळ Portmanteau आणि पोशाख कोटपाटलून हा होता. सभा आटोपून मुंबईला परतताना घाटात सपाटून पाऊस लागला. पावसाचा जोर वाढतच चालला आणि भायखळ्याला तर गाडी पुढे जाणे अशक्य झाले. तेव्हा गार्डाने सांगितले, "मार्ग केव्हा मोकळा होईल नि गाडी केव्हा चालू लागेल सांगता येत नाही. तरी ज्यांना उतरायचे असेल त्यांनी उतरावे, बोरीबंदर आलेच आहे." त्याप्रमाणे मी गाडी सोडून स्टेशनाबाहेर आलो.

रात्री १० ची वेळ. पाण्यामुळे व्हिक्टोरिया नाही की टॅक्सी नाही. त्यातून मी मुंबईत नवखा असल्याने मला माझ्या ठिकाणाची (गिरगाव बॅक रोड किंवा हल्लीचा विठ्ठलभाई पटेल मार्ग) वाट ठाऊक नव्हती. आता घरी पोचावे कसे हा मला पेच पडला. जवळ उभ्या असलेल्या एका भिकाऱ्याच्या पोराच्या ते लक्षात आले असावे, कारण तो पुढे येऊन मला म्हणाला, "साहेब, माझ्या संगे चला. मी तुम्हाला नेऊन पोचवितो." मला त्याचा विश्वास वाटून धीर आला आणि मी त्याच्या पाठोपाठ चालू लागलो. काही अंतर कापल्यावर त्याने जवळचा आडमार्ग घेऊन चकला ऊर्फ शुक्लाजी स्ट्रीट

( सफेद गल्ली भाग ) वसतीतून जाणे आरंभिले. हा मोहल्ला म्हणजे वेश्याआळी. मला ते कोठून ठाऊक असणार ? मी त्या मुलाच्या पाठोपाठ मुकाट्याने चालत असता माझ्या प्रवासी पेटीवरून अंदाज बांधून मला कोणीशी 'डॉक्टरसाब' म्हणून हाक मारली. मी चकितच झालो की मुंबईसारख्या अफाट शहरात मला ओळखणारी ही व्यक्ती कोण ?

पण मी थबकताच चार आडदांड मवाली धावत येऊन त्यांनी मला दोन्ही दंडावर पकडले. हे मवाली म्हणजे तेथल्या धंदेवाल्या बायांनी पोसलेले दलाल होते. संभाव्य गिऱ्हाइकांना भुलवून, मोह घालून, दरडावून आणि मुख्यतः खेचून आपल्या मालकिणीच्या कबजात नेऊन सोडणे हा यांचा व्यवसाय. त्यांनी मला पकडून, "चलिये न, बढिया माल दिलाता हूं" करत मला खेचण्यास प्रारंभ केला. मी गांगरूनच गेलो. मी साहाय्यहीन, खिशात पैसे, वसती असली, वेळ दहाची आणि पावसामुळे रस्त्यावर चिटपाखरू फिरकत असेल तर शपथ ! या स्थितीत आपले काही चालणे शक्य नाही हे ओळखून मी युक्ती योजण्याचे ठरविले. मी वस्तुतः त्यांना पहिल्या क्षणीच सांगितले होते की, "बाबांनो, मला हे असले छंद नाहीत. मला जाऊ द्या कसे !" पण ते कोठले ऐकायला बसले ?

शेवटी मी पाहिले की यांच्याशी सामोपचाराने बोलून काही उपयोग नाही. आणि दांडगाई करण्याचाही हा प्रसंग नव्हे. तर आता आल्या प्रसंगातून युक्तीच्या बळावर आपली सुटका करून घेतली पाहिजे. अशा बेताने मी त्यांना वश झाल्यासारखे दाखवून म्हणालो, "ठीक आहे. मी येतो तुमच्याबरोबर. मात्र माल अगदी नामी मिळाला पाहिजे बरे का !" ते संतोष पावलेले दिसले. शेवटी मासा गळाला लागला याचा त्या पोटभरू दलालांना आनंद होणे साहजिकच होते.

त्या आनंदाच्या भरात त्यांची माझ्या दंडावरील पकड स्वाभाविकच किंचित् ढिलावली. मी याचीच वाट पहात होतो. झटक्यासरशी दोन्ही दिशांना त्या चौघास बाहूंच्या रेटाने लोटून देऊन मी स्वतःची सुटका करून घेतली आणि अशी धूम ठोकली म्हणता ! त्यांनी माझा काही अंतरापर्यंत पाठलाग केला, पण पुढे पोलीस पहारा देत असलेला पाहून ते थबकले. आपली शिकार आपल्याला चकवून निसटली हे त्यांनी ओळखले. पोलिसाला मी सारा प्रकार सांगितला आणि त्याला रस्ता विचारून घेऊन नि भिकाऱ्याच्या मुलाला बिदागीसह निरोप देऊन खेतवाडीच्या छातीभर पाण्यातून चालत एकदाचे घर गाठले ! क्विनिन आणि ब्रँडीचा डोस घेऊन गादीवर पडल्यावर माझ्या जीवात जीव आला.

## १५. आगगाडीतील एक प्रसंग

वरील प्रसंगानंतर मी जेव्हा मुंबईहून नागपूरला येण्यास निघालो तेव्हा (म्हणजे १९२१ मध्ये ) एक घटना घडली. त्या काळात लोकसंख्या थोडी होती आणि गाडीच्या वरच्या श्रेणीच्या डब्यातून फारच थोडे लोक प्रवास करत. मी बोरीबंदरहून नागपूरचे दुसऱ्या वर्गाचे तिकिट काढले आणि नागपूरच्या डाकगाडीत न बसता भुसावळला उतरण्याच्या विचाराने जबलपूरकडे वळणाऱ्या डाकगाडीत बसलो. गाडीच्या दुसऱ्या वर्गात जागा नव्हती. माझ्याप्रमाणे एक युरोपियन जोडपेही दुसऱ्या वर्गाने निघाले होते, पण त्यालाही जागा मिळाली नव्हती. त्या काळामध्ये जर दुसऱ्या वर्गात जागा नसेल आणि पहिला वर्ग रिकामा असेल तर त्या पहिल्या वर्गाच्या डब्याला दुसऱ्या वर्गाची चिठ्ठी लावून त्याचे रूपांतर दुसऱ्या वर्गाच्या डब्यात करण्याचा अधिकार स्थानिक अधिकाऱ्याला असे. त्या युरोपियन जोडप्यासाठी अशी सोय करण्यात आली आणि खाली दोन नि वर दोन असे चार बिछाने असलेला अर्धा डबा त्या जोडप्याला देण्यात आला. तेव्हा मीही त्या डब्यात घुसून विरुद्ध अंगाच्या दाराजवळ बसलो.

काही वेळानंतर ती युरोपियन मड्डम आपल्या नवऱ्याच्या कानाशी लागून मला काढून लावण्याचा त्याला तगादा करू लागली आणि मला उद्देशून तिने वापरलेला ' निगर ' शब्द मला ऐकू आला. नवऱ्याने प्रथम तिची समजूत घालून पाहिली की, " हा शिकलेला आणि वरच्या वर्गाचा माणूस दिसतो. त्याच्याजवळ तिकीट असले पाहिजे." पण ती बाई हट्ट सोडीना. मी ऐकत होतो. शेवटी बायकोचा हट्ट पुरविण्यासाठी त्याने एका निमगोऱ्या अधिकाऱ्यास बोलावून मला काढून लावण्याची त्याला सूचना केली. त्याने माझे तिकीट तपासून मला दम भरला की माझे तिकीट दुसऱ्या वर्गाचे असून मी पहिल्या वर्गात कसा बसलो ? मी त्याला म्हटले, " तू मला शहाणपण शिकवू नकोस. या डब्याचे रूपांतर दुसऱ्या वर्गात केलेले आहे. तू मला कसा दाट भरतोस ? " पण त्या तिकीट तपासनिसाने हमालाला हाक मारली आणि सांगितले, " इसका सामान नीचे उतारो ! " मी हमालाला दटावले, " मी सांगेपर्यंत माझ्या सामानाला हात लावायचा तुला अधिकार नाही. लावशील तर परिणाम वाईट होईल. " तो घाबरून मागे सरला. मग मी तपासनीसाला म्हटले, " हमालाला कशाला सांगतोस ! असेल तुझी छाती तर तू लाव पाहू स्वतः हात माझ्या सामानाला, की बघ परिणाम काय होतो ते. " मग तोहि थोडे अंग चोरू लागला. पुढे त्याने पोलिसात तक्रार केली. पोलीस आले, पण माझी बाजू बळकट होती. स्थानिक अधिकाऱ्याकडे तक्रार गेली. पण तो तरी काय करणार ? डब्यापुढे पाचपन्नास माणसांची गर्दी जमली.

मी धाकाने उतरत नाही असे पाहून एका अधिकाऱ्याने माझा अनुनय चालविला की, "शेजारचा पहिल्या वर्गाचा असाच डबा रिकामा आहे. तो आम्ही तुम्हाला देतो, पण कृपा करून येथून उतरा." मी म्हटले, मी काय म्हणून उतरावं ? मी नियमानुसारच बसलो आहे ना ?" अधिकारी म्हणाला, "होय, पण आमच्या सोयीसाठी म्हणून उतरा." मी म्हणालो, आधी त्या डब्याला चिठ्ठी लावलेली मला दाखवा, माझे सामान तुमच्या खर्चाने तेथे नेऊन ठेववा, मग मी पाहीन." तसे करण्यात आले आणि मी डबा बदलला. जाताना मी म्हणालो, "हे बघा, मी कोणाच्याही धाकाने जात नाही. पण माझ्या या भगिनीच्या रात्रिसुखात व्यत्यय न यावा एवढ्याचसाठी जात आहे."

तो युरोपियन चांगलाच खजील झाला आणि बायकोला म्हणाला, "बघ, तुझ्याच हटवादीपणाने हा अपमानाचा प्रसंग आपणांवर आला ना ?"

## १६. पुनः आगगडी

एकदा मी १९०४ मध्ये काश्मीरला निसर्गदर्शनास जात होतो. जम्मूला जाताना सियालकोटला गाडी बदलावी लागते. त्या काळी दहा जणांचा एक डबा 'युरोपियन आणि अँग्लोइंडियन' यांच्यासाठी राखीव असे. त्या डब्यात एक पारशी बसलेला मला दिसला. मग मीही त्या डब्यात घुसलो. गाडी सरकू लागली होती. मी फळीवर चढलो तर तो पारशी मला आत शिरू देईना. तो मला लोटू लागला. मी म्हणालो, "गाडी सुटली आहे. मला लोटशील तर मी तुलाही ओढीन नि आपण दोघेही पडू." मग त्याने मला आत शिरू दिले. काही तरी खुसपट काढावे म्हणून तो म्हणाला, "हा डबा युरोपियन आणि अँग्लोइंडियन यांच्यासाठी राखीव आहे. तू यांपैकी नाहीस." मी—"तू तरी आहेस का ?" एवढे विचारून मी त्याला खेटूनच बसलो आणि आमचे बोलणे पुष्कळच लांबले. मी त्याला दादाभाई नौरोजींची थोरवी आणि सज्जनता समजावून सांगितली आणि विचारले, "त्यांच्या जमातीत तू उर्मट कसा निपजलास ?" तो—"पंजाबी मोठे घाणेरडे असतात. त्यांच्या कपड्यांना घाण येते. म्हणून मला ते जवळ नकोसे वाटतात. मी परप्रांतातील मुंबईकडील असल्याने येथे बसलो." मी पंजाबी नाही. मीही मुंबईकडील महाराष्ट्रीय आहे. आणि हे बघ, हा डबा त्यांच्यासाठी राखून ठेवला आहे की ज्यांचा जन्म युरोपिअनापासून आहे. तुझ्या आईचा कोणी युरोपिअन मित्र होता का ?"

तो सर्दच झाला. त्याने मग एका स्टेशनावर अधिकाऱ्याकडे तक्रार केली. त्या अधिकाऱ्याने मला उतरायला सांगितले. त्यावर मी म्हटले, "हाही

माझ्याचसारखा नॉन–युरोपिअन आहे. एक तर दोघांनाही बसू दे नाही तर दोघांनाही उतरव." शेवटी दोघांनाही बसू दिले गेले. मग मात्र मी त्या पारशाला म्हणालो, "तू सारे क्षुद्र प्रयत्न करून पाहिलेस, पण त्यांचा काही उपयोग झाला नाही. तुझ्यासारख्या हलकटाच्या सान्निध्यात मलाच बसायची इच्छा नाही." मी उतरून निघून गेलो.

## १७. जिवावरचा प्रसंग

१९०३ किंवा १९०४ सालात आम्ही काही Medical students लाहोरला शिकत होतो. आम्ही लाहोरमध्ये एका नाटकगृहात गेलो असता तेथे काही अँग्लोइंडियन पोरटीही आली होती. त्यांना आमची उपस्थिती खपेना आणि त्यांनी आम्हाला "These sons of dhobies and chamars." असे उल्लेखिले. आम्ही हे सहन करू शकलो नाही. आमचाही एक गट होता. आम्ही त्यांना बजावले की "We are pure blooded Hindus. It is you who are bastards." तेव्हा बाचाबाची होऊन प्रकरण हातघाईवर आले आणि आम्ही दोनही गट मारामारीसाठी बाहेर पडून चांगलीच मारामारी जुंपली! घरी परतताना त्यांची वस्ती जवळ असल्याने त्यांनी आधी घरी जाऊन घरातून आम्हांवर बंदुकीच्या गोळ्या झाडल्या. सुदैवाने कोणी मेले मात्र नाही. त्यांना गुद्दे मात्र जास्त बसले होते, कारण आम्ही बहुसंख्य होतो. अंधारामुळे आम्ही गोळीबारापासून बचावलो. त्यांच्या हाती बंदुका असत. हिंदूंना कोठले शस्त्र मिळणार?

## १८. अविस्मरणीय अश्वारोहण

माझे पहिले लग्न १९०० मध्ये उमरिया येथे झाले. माझे सासरे डॉ. गोखले खाणीत डॉक्टर होते. लग्नापूर्वी कधी घोड्यावर बसण्याचा प्रसंग आला नव्हता. लग्नात तो आला. वरघोड्याच्या वेळी मी घोड्यावर बसलो होतो आणि घोड्याचा लगाम मोतद्दाराने धरला होता. दारूकामाच्या आवाजामुळे घोडा बिचकला आणि अनवधानामुळे मोतद्दाराच्या हातातला लगामही सुटला. घोडा उधळला! जो जो मी लगाम ओढून घोड्याला काबूत आणू लागलो तो तो तो अधिकाधिक उधळू लागला. मिरवणूक मागे राहिली. घोड्यावर मी एकटाच, घोड्यावर बसण्याची कधी सवय नाही, अश्वारोहणाचे तंत्र माहीत नाही आणि घोडा भरधाव निघालेला! पण अडचणीच्या वेळी अक्कल सुचते. मी लगाम सोडला आणि पुढे सरकून घोड्याच्या गळ्याला मिठी मारली. मनात म्हटले, 'गड्या, आता तू पडशील तेव्हाच

मीही पडेन.' अर्थात आरडाओरडा झाला. मागचे लोक धावले काहींनी घोड्याला अडवले आणि लग्न सुखरूपपणे पार पडले.

आमच्या श्वशुरांनी मात्र मोतद्दाराला त्याच्या हलगर्जीपणाविषयी तेथेच दणकून ठोकले.

## १९. ही जगाची माणुसकी !

१९०१ मध्ये मी जबलपूरला कॉलेजमध्ये शिकत होतो. त्या वेळेस आमचे मामा कृष्णराव गोखले हे विक्रमपूरला स्टेशनमास्तर होते. मी बहुतेक दर शनिवारी जबलपुराहून विक्रमपूरला जात असे. असाच एके रात्री मी नऊ एक वाजता आगगाडीत बसलो आणि एक स्टेशन गेल्यानंतर मला ओकाऱ्या आणि जुलाब होऊ लागले. दहा मिनिटात मी इतका गलितगात्र झालो की मला उठण्याचीही शक्ति राहिली नाही. माझी अशी अवस्था पाहून मीरगंज स्टेशनवर सर्व उतारू मला एकटे सोडून उतरून गेले. उरलेली दोन स्टेशने गाठीपर्यंत मी बेशुद्ध होण्यापासून मोठ्या कष्टाने स्वतःला सावरत होतो. विक्रमपूर येताच मी क्षीण आवाजात हाका दिल्या आणि मला उतरून घेण्यात आले. मला कॉलरा झाला होता.

## २०. वाइटातून चांगले

वरील अनुभवाचा फायदा मी पुढे असाच आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाने प्रवास करत असतांना घेतला. त्यावेळेस मी दहा जणांच्या कंपार्टमेंट-मधून प्रवास करत होतो. गर्दी फार. त्या काळात लोक प्लेगला फार भीत असत. तेव्हा मी झोपायला जागा मिळविण्यासाठी कण्हायला सुरुवात केली. लोकांनी विचारले, 'का कण्हता ?' मी म्हणालो, "मला ताप भरत आहे. माझ्या उजव्या जांघेत दुखू लागले आहे." अर्थात लोक भ्याले. एका स्टेशनावर सर्व लोक डबा सोडून उतरून गेले. आणि मी हातपाय ताणून झोपलो. मला प्लेगबीग काही नव्हते.

## २१. हे म्हणे डॉक्टर होणार !

१९०५-०६ साली मी लाहोरला मेडिकल कॉलेजमध्ये शिकत होतो. त्यावेळेला वसतिगृह नव्हते. तेव्हा आम्ही मध्यप्रांताचे चार विद्यार्थी एका घरात माडीवर दुसऱ्या मजल्यावर भाड्याने दोन खोल्या घेऊन राहत होतो. गणपत रामराव गोवर्धन आणि कालिकाप्रसाद श्रीवास्तव हे दोघे विद्यार्थी एका खोलीत राहात आणि दीनदयाल नि मी असे दुसऱ्या खोलीत राहात होतो. बिऱ्हाडातून बाहेर पडण्यासाठी पहिल्या खोलीतील मुलांना आमच्या खोलीतून जावे लागे. त्या वेळेस लाहोरला प्लेगचा प्रादुर्भाव झाला होता.

अशा परिस्थितीमध्ये आमचा उत्तरप्रदेशाचा रहिवासी असलेला एक वर्गबंधु विश्वंभर दत्त हा सुटी घेऊन घरी गेला होता, तो लाहोरला परत आला. तो जुन्या नगरामध्ये दूर राहत असे, म्हणून रात्रीपुरत्या वसतीसाठी तो माझ्या खोलीवर आला. त्याला थोडा पडसेखोकला असल्याने मी त्याला आपल्या खाटेवर निजविले आणि मी खाली झोपलो. कालिकाप्रसाद आणि गोवर्धन यांना असे वाटले की या पाहुण्याला प्लेग तर झाला नसेल ? त्या दोघांनी मला भयग्रस्त चेहऱ्याने तसे विचारलेही. त्यांच्या या पराकाष्ठेच्या भयामुळे मला त्यांना बनविण्याची बुद्धी झाली आणि मी विश्वंभरला गुपचुप सांगितले की, " गड्या, हे चांगलेच भ्याले आहेत. तर तू खरेच प्लेगचे सोंग कर. " मग तो बेशुद्ध असल्यासारखा बडबडू लागला. मी त्याच्या डोक्यावर बर्फाची पिशवी ठेवली, ज्वरमापक लावले, इतकेच नव्हे तर साबूदाण्याची पेज करून त्याला हळू हळू पाजली. त्या दोघांनी खूप निर्भत्सना केली की, " ही बला येथे कशाला आणलीस ? आम्ही काही येथे मरायला नाही आलो." खोलीतून बाहेर पडताना, एखादी ब्राह्मण विधवा कांद्याचा पाचोळा टाळून जावी तसे ते अंग चोरून जात. मी त्यांना म्हटले, " तुम्ही चार दिवसात डॉक्टर होणार आहा, असे भिऊन कसे चालेल ? डॉक्टरचा तर अशा रोग्यांशी वारंवार संबंध येणार ! तुमचा तो वर्गबंधू आणि पाहुणा आहे. तुम्हाला काही मानवता आहे की नाही ? त्याची चौकशी तर कराल ? " तेव्हा त्यांना थोडी हिंमत येऊन ते त्याजजवळ गेले.

ते येण्यास सिद्ध झालेले पाहताच मी विश्वंभरला कानमंत्र देऊन ठवला होता की, " हे दोघे तुझी विचारपूस करायला येत आहेत. मी त्यांना सांगितले आहे की तुझ्या उजव्या जांघेत गाठ आली आहे. म्हणून तू आपले वृषण उजवीकडे सरकवून गाठ आल्याचे सोंग कर." त्याने त्याप्रमाणे केले आणि त्या दोघांनी चाचपून पाहताच त्यांना खरोखरच गाठ आल्याचा भास झाला. आता थट्टा पुरे झाली असे पाहून मी त्याला उठण्यास सांगितले आणि तोही उडी मारून उठला. आमचे दोघे मित्र थक्कच झाले ! आणि मी गौप्य-स्फोट केल्यावर माझ्यावर असे चिडले की सांगता सोय नाही.

माझ्याशी त्यांनी दोन महिने अबोला धरला होता.

## २२. दोन पुढारी मासले

दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर १९३९ च्या नोव्हेंबर महिन्यात त्या वेळच्या मध्यप्रांताच्या मंत्रिमंडळाने त्यागपत्र दिले. माझी त्या वेळेस कांग्रेस

पक्षातून हकालपट्टी झालेली होती आणि मी कांग्रेसच्या विरोधी पक्षास सामील झालो होतो. त्या वेळेस भाऊजी पागे आणि नानासाहेब केदार हे विधानसभेचे सदस्य होते. त्यांना आणि इतर काही सदस्यांना असे वाटले की, युद्ध चालू असताना कांग्रेसविरोधी मंत्रिमंडळ बनवून प्रांताचा कारभार चालविणे इष्ट होईल. म्हणून त्यांनी माझ्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ बनविण्याची खटपट सुरू केली. अर्थात् मी कोणाकडे जाऊन मला पुढारी करा अशी याचना कधीच केली नाही. माझ्याकरिता श्री. पागे आणि केदार हे मनापासून खटपट करीत होते नि माझ्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ बनावे अशासाठी विधानसभेच्या सदस्यांच्या सह्याही घेत होते. त्यावेळेस मुस्लीम लीगचे नऊदहा सदस्य होते. त्यांनीही माझ्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ बनविण्याच्या विचारास अनुकूलता दर्शविली. अशा परिस्थितीत श्री. पागे, बाबासाहेब खापर्ड्यांची सही मागायला गेले. बाबासाहेब खापर्डे मंत्रिमंडळ बनविण्यास अर्थात् उत्सुक होते. पण ते पागे यांना म्हणाले, " डॉ. खरे अपात्र सिद्ध झाला आहे, तेव्हा त्याला नेता मानायला मी सिद्ध नाही. तुम्ही जर मला नेता बनवून मंत्रिमंडळ बनविण्यास सिद्ध असाल तर मी सही देतो." तेव्हा पागे म्हणाले, " आमचा काही अमुकच नेता व्हावा असा आग्रह नाही. आम्हाला मंत्रिमंडळ बनवावेसे वाटते इतकेच. लोक जर तुमच्या नेतृत्वाखाली वागायला तयार असतील तर तुम्ही नेते व्हा. चला, आपण लोकांकडे जाऊ." असे म्हणून पागे बाबासाहेब खापर्ड्यांना घेऊन दोनचार लोकांकडे गेले. पण त्यांनी सांगितले, " आम्हाला खापर्ड्यांचे नेतृत्व नको. आम्हाला डॉ. खरेच पाहिजेत." तेव्हा पागे म्हणाले, " पहा बाबासाहेब, लोक तुम्हाला अनुकूल नाहीत. तर तुम्ही खऱ्यांसाठी सही करा."

अखेरीस खापर्ड्यांनी सही केली नाहीच. पण मला एकंदर ४८ सदस्यांनी सही करून किंवा तोंडी अनुकूलता दर्शविली. त्या वेळी बरेच कांग्रेसवाले तुरुंगात होते. त्यांच्यापैकी नऊ जणांनी मला गुप्त निरोप पाठविला की, " तुम्ही मंत्रिमंडळ बनवीत असाल तर आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ. पण प्रत्यक्ष मंत्रिमंडळ बनेपर्यंत आमची नावे प्रकट करू नका." अशा स्थितीत १९४० च्या मे महिन्यामध्ये केदार आणि मी पंचमढीला जाऊन गव्हर्नर श्री. ट्वायनॅम यांना भेटलो. केदारांनी गव्हर्नरांना सगळी परिस्थिती निवेदन केली नि घटनेप्रमाणे मंत्रिमंडळ बनविण्यास काही अडचण नाही, असे गव्हर्नरांना पटवून दिले. पण गव्हर्नर साहेबांनी मंत्रिमंडळ बनविण्यापूर्वी त्या नऊ कांग्रेसवाल्यांची नावे सांगण्याचा आग्रह धरला. परंतु कांग्रेसवाल्यांना दिलेले वचन मोडून नावे सांगण्यास मी तयार झालो नाही. त्यामुळे मंत्रिमंडळ बनू शकले नाही. आणि आम्ही हात हलवीत परत आलो.

त्यावेळी मी War Committee चा सदस्य होतो नि युद्धात ब्रिटिशांना सहाय्य देण्याचा प्रचारही करीत होतो. त्यामुळे त्या काळच्या गव्हर्नरशी माझी अनेकदा भेट होत असे. याच काळात व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगोने दि. ८ ऑगस्ट १९४० या दिनी आपले कौन्सिल वाढविण्याची घोषणा केली. याच वर्षाच्या शेवटी केव्हातरी एका भेटीच्या वेळी गव्हर्नर ट्वायनॅमने मला सांगितले, " डॉ. खरे, तुम्ही मंत्रिमंडळ बनविण्यासाठी सह्याविह्या गोळा करण्याच्या भानगडीत कशाला पडता ? बापूजी अणे यांनी तुमच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ स्थापन करावे असे पत्रक प्रसिद्ध केले तर मी तुम्हाला मंत्रिमंडळ बनविण्याला पाचारण करीन; मग तुमच्यामागे मते असोत वा नसोत." मी ही गोष्ट बापूजींचे मित्र श्री. गोपाळराव ओगले यांना सांगितली. ते म्हणाले, " बापूजी येथे ( नागपूरास ) आले म्हणजे आम्ही ही गोष्ट त्यांना सांगून त्यांच्याकडून ही गोष्ट घडवून आणू." बापूजी त्या काळी केंद्रीय विधानसभेत मालवीयांच्या ' राष्ट्रीय पक्षा 'चे पुढारी होते नि दिल्लीहून मला उडत उडत वार्ता आली की व्हाइसरॉयच्या वाढविलेल्या कौन्सिलात बापूजींना जागा मिळणार आहे. अशा परिस्थितीत १९४१ च्या उन्हाळ्यात मी बोबडे वकिलांकडे बापूजी उतरले होते, त्यांना भेटायला गेलो नि त्यांच्या कानावर गव्हर्नरने मला काय सूचना केली ते घातले. तेव्हा बापूजी म्हणाले, " गव्हर्नरने तुम्हाला असे सांगितले ? मी त्याला भेटलो असता तो असे ( म्हणजे प्रकट पत्रक काढायचे ) काहीच बोलला नाही." मी त्यांना म्हणालो, " बापूजी, गव्हर्नर तुमच्याजवळ कशाला बोलेल ? तो माझ्या संबंधीचा प्रश्न असल्याने माझ्याजवळ त्याने उल्लेख केला." पण बापूजींच्या, ते गव्हर्नरच्या भेटीला गेले या कबुलीमुळे, त्यांची व्हाइसरॉयच्या मंडळात नेमणूक पक्की झाली आहे हे मला स्पष्टच कळले. पुढे बापूजींना मी विचारले, " मग सांगा तर, तुम्ही माझ्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ बनवावे असे पत्रक काढता की नाही ? मी काही तुम्हाला विनंती करीत नाही. पण तुमचा विचार मला येथेच सांगा." तेव्हा बापूजी म्हणाले, " तुम्ही असे अडीच कांड्यावर का आला ?" मी म्हणालो, " मला दिरंगाई आणि झमेलेबाजी सहन होत नाही. माझा स्वभाव एक घाव की दोन तुकडे असा आहे." तेव्हा बापूजी म्हणाले, " त्या ××× हायकमांडने तुमच्यावर अन्याय केला ही गोष्ट खरी आहे आणि तुम्ही या प्रांतात पुन्हा मुख्य प्रधान व्हावे ही गोष्ट न्यायसंगत आहे." तेव्हा मी बापूजींना म्हणालो, " मग अडचण कोठे आहे ? हा न्याय करणे तुमच्या हातात आहे." तेव्हा बापूजी म्हणाले, " हे सर्व जरी खरे असले तरी यावेळी कांग्रेसने एक अखिल भारतीय धोरण आखले आहे नि कांग्रेसतर्फे वैयक्तिक सत्याग्रहही चालू आहे.

अशा वेळी या प्रांतात मंत्रिमंडळ बनवून कांग्रेसच्या अखिल भारतीय धोरणात बिब्बा घालावा असे मला वाटत नाही." तेव्हा मी बापूजींना म्हणालो, "मला काही राग नाही. उलट तुम्ही स्पष्ट आणि शीघ्र निकाल लावल्याबद्दल मी तुमचे आभार मानतो." मग मी पुढे विचारले, "हे झाले राजकीय कारण; पण तुमच्या मनात माझ्याविषयी काही वैयक्तिक किल्मिष आहे का?" त्यावर बापूजी म्हणाले, "तुम्ही जरा उतावीळ आणि impulsive आहा." मी म्हटले, "मी जरूर तसा आहे. बापूजी, जगामध्ये बरी किंवा वाईट महान् कार्ये impulsive माणसाकडूनच होतात. थंड आणि हिशोबी माणसाकडून होत नाहीत." मग मी बापूजींना पुढे म्हणालो, "बापूजी, मी जाण्यापूर्वी तुम्हाला एक सल्ला देतो. व्हाइसरॉयने नुकतीच आपले कौन्सिल वाढविण्याची घोषणा केली आहे त्यात तुम्हाला जागा मिळेल की नाही मला माहीत नाही. पण त्यात जर तुम्हाला जागा मिळाली तर कांग्रेसच्या अखिल भारतीय धोरणात बिब्बा घातला जाईल म्हणून ते पद नाकारू नका, अवश्य स्वीकारा!"

१९४१ च्या ऑक्टोबर महिन्यात बापूजींची व्हाइसरॉयच्या कौन्सिलवर नेमणूक झाल्याचे जाहीर झाले, तेव्हा मी त्यांना तार पाठवून टिळकांचे राजकारण सरकारच्या बालेकिल्ल्यात खेळण्याची त्यांना संधी मिळाली यासाठी त्यांचे अभिनंदन केले. पुढे १९४३ च्या फेब्रुवारी महिन्यात गांधीजींच्या उपवासाला भिऊन बापूजींनी आपल्या जागेचा राजीनामा दिला नि पुढे मे महिन्यात व्हाइसरॉयच्या कौन्सिलात माझी नेमणूक झाली. तेव्हा त्यांची गांधीभक्ती किती तकलादू आहे हे जगास दाखविण्यासाठी मी त्यांची सीलोनचे हायकमिशनर म्हणून नेमणूक केली आणि ती त्यांनी स्वीकारलीही.

बापूजींची नेमणूक जाहीर झाल्यानंतर, ज्या बाबासाहेब खापर्ड्यांनी पूर्वी माझ्या नेतृत्वाखाली मध्यप्रांतात मंत्रिमंडळ स्थापण्याला संमती दिली नव्हती ते एक दोन वेळ दिल्लीला येऊन मला भेटले आणि, "जर यापुढे परदेशात असा कोणी पाठविण्याचा प्रसंग आला तर आता माझी पाळी बरे का!" असे गाल फुगवून लाडिक रुसव्याने मला म्हणाले!

## २३. भारतीयांचे सन्मानरक्षण

मी १९३७ च्या जुलायमध्ये जुन्या मध्यप्रांतात पंतप्रधान झालो. त्यापूर्वी श्री. राघवेंद्रराव येथे पंतप्रधान होते. त्यांच्या कारकिर्दीत श्री. ह. वि. कामत I. C. S., हे नरसिंगपूरला Sub-Divisional Officer होते. एक दिवस ते नरसिंगपूर येथे आगगाडीत पहिल्या वर्गाच्या डब्यात बसून आपल्या Sub-Division मध्ये दौऱ्यावर जाण्यास निघाले. ते ज्या डब्यात बसू

लागले त्यात दोन युरोपियन व्यापारी आधीच बसलेले होते. त्यांनी कामतांना 'काला आदमी' म्हणून डब्यात बसू दिले नाही. बाचाबाची झाली, पण काही उपयोग झाला नाही. त्या डब्यात कामतांना बसता आले नाही. कामत I. C. S., Sub-Divisional Officer ! त्यांचा अपमान म्हणजे एकप्रकारे मध्यप्रांत सरकारचाच अपमान. कामतांनी तक्रार केली, पण मध्यप्रांत सरकारने ते कागद दप्तरी दाखल केले.

मी मुख्यप्रधान झाल्यानंतर मला ही कामतांच्या अपमानाची हकीकत समजली. मी तो प्रश्न पुनः उकरून काढला आणि गव्हर्नर गोवनसाहेब यांच्याशी भांडून तो प्रश्न पुनः विचारात घेण्याचे त्यांस सुचविले. प्रथमच ते चौकशी-साठी राजी झाले नाही, पण मी त्यांना कामतांच्या I. C. S. पदवीची आणि सरकारी स्थानाची जाणीव देऊन स्वतः गोवनसाहेबही I. C. S. असल्याचे सांगितल्यावर ते तयार झाले.

चौकशीनंतर त्या दोन गोऱ्या व्यापाऱ्यांवर कलकत्त्यास समन्स गेले आणि ते नरसिंगपूरला येऊन कोर्टात दाखल झाले. तारीख मिळाली. पुनः यावे लागले. शेवटी त्यांनी कंटाळून कोर्टात कामतांची क्षमा मागून प्रकरण मिटवले.

यावर काही महिन्यांनी कामत यांनी I. C. S. चे त्यागपत्र देण्याचे ठरवून माझी भेट घेतली. मी त्यांना म्हटले, "मी तुमची अब्रू राखली आणि आता तुम्ही त्यागपत्र देणे हा माझ्यावर अन्याय आहे." पण ते ऐकत ना. म्हणून मी काँग्रेसचे अध्यक्ष नेहरू यांच्याकडून त्यांना उपदेश करविला पण त्यांचे मन सरकारी चाकरीला उबगल्यामुळे त्यांनी न ऐकता त्यागपत्र दिलेच.

## २४. महिलावर्गाची सोय

भगिनी मंडळाला उत्तर अंबाझरी रस्त्यावर जागा कशी मिळाली ?

१९३७ मध्ये मी जुन्या मध्यप्रांताचा मुख्यप्रधान असताना भगिनी मंडळ या स्त्रियांच्या सार्वजनिक उपयुक्ततेच्या संस्थेकडून भवनासाठी जागा मिळावी असे आवेदन सरकारकडे आले. त्या आवेदनाचा विचार करून सरकारने असे धोरण ठरवले की स्त्रियांच्या या संस्थेला आणि इतर अशा स्त्रीसंस्थांना याच रस्त्यावर जागा द्यावयाची, कारण अशा संस्थांना वातावरण सभ्य पाहिजे. अंतिम निर्णय घ्यायला थोडी दिरंगाई होऊ लागली असे माझ्या दृष्टीस श्रीमती अनसूयाबाई काळे यांनी आणून दिले. तेव्हा मी त्यांना एका विवक्षित दिवशी मोक्यावर यावयास सांगितले. त्याच वेळेला नागपूरचे डेप्युटी कमिश्नर या संबंधित युरोपियन अधिकाऱ्याला इतर अधिकाऱ्यांसह

तेथे उपस्थित राहण्यास सांगितले. मीही स्वतः तेथे त्यावेळी उपस्थित झालो आणि त्या संबंधित अधिकाऱ्यांना आज्ञा केली, " या बाईंना उद्या या वेळेपर्यंत भगिनी मंडळाच्या भवनासाठी ही जागा दिल्याचे अधिकारपत्र मिळाले पाहिजे. "

माझ्या या धसमुसळेपणामुळे ते अधिकारी चकित झाले आणि का कू करू लागले की, " हे कसे शक्य आहे ? " मी त्यांना म्हटले, " अशा प्रकारात दप्तरदिरंगाई कामाची नाही. तुम्ही एकमेकांकडे जाऊन काय विचारविनिमय करावयाचा असेल तो करा. तुम्हा सर्वांजवळ मोटारी आहेत. " माझा तो दृढ निश्चय पाहून त्यांचा उपाय चालेना आणि माझ्या सांगण्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी ते पत्र सौ. अनसूयाबाईंच्या हाती पडले.

पुढे याचेच अनुकरण करून त्या रस्त्यावरील इतर जागा, माझ्या मागाहून अधिकारपदावर आलेल्या मंत्र्यांनी इतर स्त्रीसंस्थांना दिलेल्या सर्वांना माहित आहेतच.

## नागपूर रेडियो केंद्राच्या निमंत्रणाचे आश्चर्य

नागपूरच्या ऑ. इं. रिडियो केंद्राने माझ्यावर बहिष्कारच टाकला होता. त्याबद्दल मला काही आश्चर्यही वाटले नाही व माझी काही तक्रारही नाही. मला जे आश्चर्य वाटले ते त्या केंद्राचे १९६२ च्या जुलैमध्ये मला आलेले त्या केंद्रावर भाषण करण्याचे विनंतीपत्र पाहून. पण भाषणाचा विषय पाहून ते माझे आश्चर्यही संपुष्टात आले. कारण भाषणाच्या विषयाचे शीर्षक होते. ' आम्हीही खोडकर होतो.' या विषयावर माझे भाषण रेडिओ केंद्रावर दिनांक २६–८–१९६२ रोजी झाले. रेडियो केंद्राच्या सौजन्याने ते माझे समग्र भाषणही या प्रकरणात देण्यात येत आहे.

यानंतर ' कथा–लक्ष्मी ' मासिकाच्या १९६२ च्या ( नोव्हेंबर ) दिवाळी अंकात श्री. खंडेराव केळकर यांनी ' चोख उत्तर ' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केलेले एक पत्र उद्धृत करून हे प्रकरण पूर्ण करतो.

दिनांक २६–८–१९६२ रोजी दिलेले रेडियोवरील भाषण

## आम्हीही खोडकर होतो

१८९५ साली मी १३ वर्षांचा होतो आणि माझे वडील बंधू जे शंकराचार्य होऊन गेल्या वर्षी ब्रह्मीभूत झाले, त्यांचे पहिले अपत्य त्यावेळी सहासात महिन्यांचे होते. आमची भावजय आपल्या बाळाची साफसफाई

करणारच. ती जेवायला वाढायला आली म्हणजे मी तिला म्हणायचा, 'वहिनी, नखे दाखवा. साफ आहेत की नाही.' १८९७ साली जबलपूर येथे कॉलेजात शिकत असताना आम्हाला एक प्रोफेसर इंग्रजी व ट्रिग्नॉमेट्री शिकवीत असे. त्याचे नांव हरिधन बंदोपाध्याय, एम. ए. असे होते. हा गृहस्थ बहुतेक ब्रह्म समाजी विचारांचा होता. त्यावेळी माझ्या डोक्याला शेंडी व घेरा होता व मी कपाळाला गंध लावीत असे. बंदोपाध्यायाला माझे गंध व शेंडी आवडत नसे व तो माझी टिंगल करी. म्हणून त्याला चिडवण्याकरिता मुद्दाम मी कपाळावर खडूने त्रिपुंड्र काढून त्याच्या वर्गात जात असे. त्यामुळे एक दिवस त्याची व माझी बाचाबाची झाली. चेष्टेने मी त्याला सहज विचारले, 'सर, तुम्ही मॅट्रिक झाला काय?' तोही मिस्किल होता. तो म्हणाला, 'तुझ्या आईला जाऊन विचार की, तुझा जन्म पहिले झाला की तिचे लग्न पहिले झाले?' तेव्हापासून मी कानाला खडा लावला की, या प्रोफेसराशी जरा जपूनच बोलायचं.

जबलपूरला त्या काळी होळीचे बंड फारच असे. होळीच्या दिवसात रस्त्यात चालणाऱ्या वाटेल त्या माणसाच्या पार्श्वभागावर मुले शिवी खोदलेला छाप मारीत असत. सन १९०० मध्ये मी कॉलेज विद्यार्थी असतानाही हे धंदे करीत असे. एके दिवशी असाच मी एका पठाणाच्या पार्श्वभागावर छाप मारला. त्याने मला शिवी हासडून तो मला धरण्यासाठी माझ्या पाठीमागे धावला. तो लठ्ठ आणि मध्यमवयी असल्यामुळे धावण्यात तो माझी बरोबरी करू शकला नाही. मी त्याला गुंगारा देऊन घरात लपून बसलो आणि दार लावून घेतले. मी जर त्याच्या हाती सापडलो असतो तर त्याने माझी मुंडीच मुरगाळली असती.

याच काळात जबलपूरला लॉर्डगंजमध्ये फवाऱ्याजवळ गोऱ्या मिशनऱ्यांची खिस्ती धर्मप्रचारासाठी भाषणे होत असत. ती मी ऐकत असे. त्यांच्या प्रचारात येशु खिस्ताच्या स्तुतीबरोबर जी राम आणि कृष्ण यांची निंदा होत असे, त्यामुळे मला राग येत असे. म्हणून एक दिवस मी त्या मिशनऱ्याची फजीती करण्याचे ठरविले व त्याला सांगितले की, 'प्रभु येशूवर माझी भक्ती जडली आहे आणि मी इसाई होऊ चहातो. तू मला बाप्तिस्मा दे.' तो म्हणाला, 'ठीक आहे, पण तुझी शेंडी कापावी लागेल आणि गळ्यातील जानवे फेकून द्यावे लागेल.' मी म्हणालो, 'ते करायला मी तयार नाही.' तो म्हणाला, 'आमच्या खिश्चन समाजात जानवे आणि शेंडी ही चालत नाही.' त्यावर मी म्हणालो की, 'तू बायबलमध्ये शेंडी आणि जानवे यांच्या निषेधाला आधार दाखव. म्हणजे तेही करायला मी तयार आहे.' त्याने उत्तर दिले की, 'तसा

आधार दाखविता येणार नाही.' तेव्हा मी म्हणालो, 'शेंडी आणि जानवे ही येशु खिस्ताच्या भक्तीच्या आड कशी येतात हे मला समजून सांग.' अर्थात् तो गडबडला व मीही त्याच्यावर उलटलो. मी त्याला विचारले, 'तुझ्या कपाळावर जुल्फे (म्हणजे वाढलेल्या केसांचा एक पुंजका) आहे की नाही ? तो जर तुझ्या येशु खिस्तावर भक्ती करण्याच्या आड येत नाही तर माझ्या डोक्यावर पाठीमागे शेंडी म्हणजे वाढलेल्या केसांचाच पुंजका आहे तो माझ्या येशु खिस्तावरच्या भक्तीच्या आड कसा येऊ शकतो ? तुझ्या अंगात जो कापसाचा शर्ट आहे तो जर तुझ्या येशु खिस्ताच्या भक्तीच्या आड येत नाही, तर माझ्या गळ्यात त्याच कापसाचे तीन दोरे म्हणजे जानवे आहे, ते माझ्या येशु खिस्ताच्या भक्तीच्या आड कसे येऊ शकते ?' या माझ्या प्रश्नांच्या सरबत्तीमुळे तो मिशनरी निरुत्तर झाला आणि मला पाखंडी म्हणून शिव्या देऊ लागला. मी त्याला म्हटले, 'अशा महत्त्वाच्या प्रसंगी शिव्या देऊन भागत नाही. तू वादविवादात हरलास हे कबूल कर.' अर्थात् यानंतर तेथे जमलेल्या लोकांनी टाळ्या वाजविल्या आणि त्या मिशनऱ्याची हुर्यो केली.

याच काळात मी जबलपूरला रहात होतो त्या वाड्यात चैत्रगौरीच्या हळदीकुंकवासाठी बायका जमल्या होत्या. त्या जमावात मी दूर व आडोशाला उभा राहून एक रबरी साप फेकला आणि 'अग बाई, साप साप म्हणून बाया ओरडू लागल्या.' त्यांची मजा पहात राहिलो.

१९०१ मध्ये मी जबलपूरच्या गव्हर्नमेंट कॉलेजच्या बोर्डिंगात रहायला गेलो. बोर्डिंगमध्ये एक इंदूरचा विद्यार्थी रहात होता. त्याचे नाव मेहेंदळे असावे असे वाटते. त्या काळात ब्राह्मण कुटुंबात डोक्यावर केस ठेवण्याची चाल नव्हती. पण मुले शिकण्यासाठी परठिकाणी राहिली म्हणजे केस ठेवीत असत. पण सुटीच्या दिवसात घरी जाण्यापूर्वी हजामत करून घेरा ठेवीत असत. मेहेंदळ्याने इंदूरला जाण्यापूर्वी हजामत केली व तेलाच्या ऐवजी चुकून एका विद्यार्थ्याच्या बाटलीतले बुटपॉलिश डोक्याला लावले व तो सांगायला लागला, 'आता काय करू ?' त्याच्या बावळटपणाला अर्थात विद्यार्थी हसले व त्याची चेष्टा करण्याकरिता मी त्याला सांगितले की, 'अंड्याच्या पांढऱ्या बलकामध्ये शेंदूर खलून ते डोक्याला लाव. म्हणजे ते बुटपॉलिश निघून जाईल.' त्याने खरोखरच तसे केले व त्याच्या डोक्याचा हनुमान बनला ! त्यामुळे त्याचे इंदूरला जाणे दोन तीन दिवस अर्थातच लांबले.

१९०१ साली माझे जन्मग्राम नेरे, तालुके पनवेल या गावी मी माझ्या मावशीकडे पाहुणा म्हणून गेलो होतो. माझा मावसभाऊ कै. चिंतामणी वैशंपायन हा माझा समवयस्क होता. या वर्षीची होळी नेरे मुक्कामी पडली.

माझा मावसभाऊ, त्याचे मित्र व मी ह्यांनी ती होळी खूप रंगवली. अर्थात् या टोळक्याचे नेतृत्व माझ्याकडे होते. या होळीमध्ये गावातील ब्राह्मण आळी-तील घरांच्या परसातील भाजी आम्ही रात्री लोकांची निजानीज झाल्यावर एकदम साफ केली. आणि त्या भाजीच्या लहान लहान जुड्या बांधून प्रत्येक घराच्या दारापुढे एकएक जुडी ठेवून दिली. सकाळी उठून घरातील गृहिणीने त्या दिवसाच्या भाजीची आयतीच सोय झालेली पाहून आम्हाला ओव्या गायल्या असतील. पण ज्यांच्या परसातील भाजी साफ नष्ट झाली त्यांनी आम्हाला शिव्या दिल्या असतील.

यानंतर दुसऱ्या रात्री मी आणखी एक पराक्रम केला. गावात एक लिमये नावाचे गृहस्थ होते. त्यांच्या अंगणात १००-१२५ केळ्यांचं एक लोंगर लागलेलं होतं आणि ते पिकायला आलं होतं. आधल्या रात्रीचा प्रकार पाहून लिमये यांनी घोषणा केली होती की 'माझ्या अंगणातील लोंगर कोण तोडतो ते पहातो.' त्यासाठी तो गृहस्थ पहारा देण्यासाठी जागत बसला. अखेरीस पहाटे तीनचारच्या सुमारास त्याला झोप लागली व आम्हाला संधी मिळाली. मी एका बांबूला विळा बांधला व चार मुलांना खाली पासोडी घेऊन उभं केलं आणि ते लोंगर कापून त्या पासोडीत अलगत झेललं. केळी वाटून टाकली आणि लोंगराचा दांडा लिमयेच्या दारासमोर ठेवून दिला.

१९०३ साली मी लाहोर येथे मेडिकल कॉलेजात विद्यार्थी होतो. संध्या-काळी बॉटनीमधील नॅचरल आर्डर्सचा अभ्यास करण्यासाठी आम्ही लाहोरच्या मॉल रोडवरून लॉरेन्स गार्डनमध्ये जात असू. एके दिवशी संध्याकाळी सोहनलाल नावाच्या एका पंजाबी विद्यार्थ्याला असे वाटले की, रस्त्यात चालणारी एक अँग्लो इंडियन तरुणी त्याच्याकडे पाहून हसली व त्याच्यावर फिदा झाली. आम्ही त्याचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला पण तो अगदी लट्टू झाल्याचे दिसले. मग त्याला बनवण्याचा कट रचण्यात आला. 'लेडी हँड'मध्ये एक बनावट पत्र लिहून त्याला त्या तथाकथित अँग्लो-इंडियन तरुणीने मीलन-स्थल व काल दर्शवून भेटीला बोलावले. ते पत्र सोहन-लालला नेऊन देण्याचा रोल मी केला होता. त्या अँग्लो-इंडियन तरुणीचा पार्ट मुझफरउद्दिन अहमद नांवाच्या एका मुसलमान विद्यार्थ्याने केला. कारण हा विद्यार्थी गोरागोमटा व सुंदर होता व त्याला इंग्रज बायकांप्रमाणे बोलण्याची लकब साधली होती. तरुणीच्या नवऱ्याचा पार्ट महमद सादिक नावाच्या एका विद्यार्थ्याने केला. ठरलेल्या वेळी संकेत स्थळी भेटीला जाताना सोहनलालने सिल्क सूट, पंप शू इत्यादी फॅशनेबल पोषाख केला व बरोबर घड्याळ व पैशाचे पाकीटही घेतले. संकेतस्थळी मुझफर अहमद अँग्लो-इंडियन लेडीचा पोषाख

करून त्याची वाट पहात होता. सोहनलाल तेथे पोहचल्याबरोबर 'ओ डार्लिंग' वगैरे प्रेमाची भाषा झाली आणि त्या तथाकथित तरुणीने सोहनलालचे घड्याळ व पैशाचे पाकीट घेतले. इतक्यात महमद सादिक त्या तरुणीचा नवरा बनून तेथे पोचला आणि, 'यू काला अदमी, हमारे मेमसाबकु बिघाडता है!' असे म्हणून सोहनलालच्या पाठीत दोन बेत मारले. सोहनलाल घड्याळ आणि पैशाचे पाकीट तेथेच सोडून पळाला. अर्थात् दुसऱ्या दिवशी त्या वस्तू त्याला परत करण्यात आल्या. पण ही घटना कॉलेजभर पसरली आणि सोहनलालला कॉलेजमध्ये राहणं कठीण गेलं. त्यामुळे तो पुढे विलायतेस जाऊन एल. आर. सी. पी., एल. आर. सी. एस. झाला. मुझफिर उद्दिन पुढे आय. एम. एस. मध्ये जाऊन लेफ्टनंट कर्नलच्या हुद्यापर्यंत चढला. महमद सादिकने लाहोर येथे एक फार्मसी काढली आणि मी नागपुरात तुमच्यापुढे बोलतो आहे.

आम्ही लाहोरला शिकत असताना कॉलेजला बोर्डिंग हाऊस नव्हते. म्हणून विद्यार्थी भाड्याने जागा घेऊन आपापले क्लब करून रहात असत. एकेवेळी आमच्या क्लबमध्ये चंद्रिकाप्रसाद नावाचा एक कान्यकुब्ज ब्राह्मण विद्यार्थी होता. 'आठ कनोज्ये व नऊ चुल्हे' ही म्हण प्रसिद्ध आहे. हा विद्यार्थी संध्याकाळी चौका लावून आपल्या हाताने रोट्या बडवून जेवत असे. सकाळी स्वयंपाक करायला वेळ मिळत नसे म्हणून तो बाजारातून शेवयाची खीर विकत आणून पीत असे. मी त्याला पुष्कळ सांगून पाहिलं की, 'तू मुर्दे आणि भंगी यांत वावरतोस. तेव्हा हे सोवळं तू सोडून दे.' पण त्याचा काही परिणाम झाला नाही. म्हणून मी सकाळी धावत धावत त्याच्या अगोदर कॉलेजमधून येऊन त्याने ठेवलेली खीर अर्धी पिऊन त्यात पाणी घालून ठेवीत असे. तो ती पाणी घातलेली खीर पिऊन म्हणायचा, 'अरे यार, ये खीर फिकी क्युं लगती है!' पण शेवटी माझं कपट उघडकीस आलं आणि तो सावध झाला. एक दिवस संध्याकाळी मी त्याच्या चौक्यात एक खडा टाकला. त्यामुळे त्याचा चौकाही विटाळला आणि तो रागावला व त्याची माझी भांडी घासण्याच्या जागी कुस्ती झाली. हा चंद्रिकाप्रसाद पुढे विलायतेला जाऊन नेत्रतज्ञ होऊन आला आणि लखनौला त्याने मानाचे स्थान पटकावले. सात आठ वर्षांपूर्वी नागपूरला आला असताना तो मुद्दाम माझ्या भेटीस आला होता आणि जुन्या आठवणी काढून आम्ही खूप हसलो.

१९०८ मध्ये जबलपूरच्या व्हिक्टोरिया हॉस्पिटलमध्ये हौससर्जन म्हणून माझी तात्पुरती नेमणूक झाली. त्यावेळी तेथे लेफ्टनंट कर्नल अलेक्झांडर सिलकॉक या नावाचा सिव्हिल सर्जन होता. तो स्वभावाने जरा चमत्कारिक होता आणि मला छोकरा समजून माझ्यावर रुबाब करू लागला. बहुतेक

इस्पितळामध्ये नाग, फुरसे इत्यादी विषारी सापांच्या तसबिरा उंच टांगलेल्या असतात. शिडी लावून त्या तसबिरा रोज कुणीही साफ करीत नाही. एके दिवशी सिव्हिल सर्जनसाहेबांनी त्या तसबिरीच्या दोऱ्यांना असलेली जळमटं मला दाखविली आणि म्हणाला, 'हे साफ करणे तुझे काम आहे आणि ते तू करीत नाही.' मी त्याला म्हणालो 'हे झाडूवाल्याचे काम आहे आणि कुठेही अशा तसबिरा रोज कोणी साफ करीत नाही.' पण त्याला ते पटेना. म्हणून त्याला अक्कल शिकविण्याकरिता दुसऱ्या दिवशी मी कंपौंडर लोकांना हुकूम दिला की, जे प्रिस्क्रिप्शन मी 'इमीजिएट' म्हणून मार्क करीन तेच त्यांनी तयार करून द्यावे व बाकीच्यांना रेंगाळत ठेवावे. अशा रीतीने बरेच रोगी इस्पितळात जमा झाले. सिव्हिल सर्जन दवाखान्यात येण्याच्या वेळी मी त्या सापांच्या तसबिरा खाली काढल्या आणि शर्टच्या बाह्या वर करून त्या तसबिरा घासू लागलो. सिव्हिल सर्जन आला आणि त्याने विचारले की 'इतके लोक येथे का जमा झाले?' मी म्हणालो, 'तुम्ही काल सांगितल्याप्रमाणे मी माझे काम करीत आहे. हे रोगी मेले तर हरकत नाही. कारण ते काही सरकारी मालमत्ता नाही पण या सापांच्या तसबिरा मात्र घासून पुसून साफ केल्याच पाहिजेत.' या माझ्या बोलण्यामुळे त्यांना रेंगाळत ठेवण्याचा अर्थ कळला आणि त्यांनी हसून टाळ्या पिटल्या आणि साहेबाची फजिती झाली.

१९०९ मध्ये मी अमरावती येथे असिस्टंट टु सिव्हिल सर्जन होतो आणि लेफ्टनन्ट कर्नल अँड्र्यु बुकॅनन्, आय. एम. एस. हे तेथे सिव्हिल सर्जन होते. मी त्यांना खाजगी प्रॅक्टिस मिळवून द्यावी अशी त्यांची इच्छा होती. अर्थात हे माझे काम नव्हते. एके दिवशी मी पोस्टमार्टम् करण्यात गुंतलो असताना, एक खाजगी श्रीमंत रोगी माझ्याकडे येऊन सिव्हिल सर्जन साहेबाची भेट करून द्या असे मला म्हणाला असताना मी साहेबाचा दलाल नाही असा जबाब त्याला दिला, हे साहेबांना कळले, म्हणून साहेब संतापून पोस्टमॉर्टम् रूममध्ये आले आणि त्यांनी माझ्यावर मूठ वळवून उगारली. मी ताबडतोब त्यांच्यासमोर मुडद्याच्या रक्ताने भरलेला चाकू धरला व त्यांना सांगितले की मी तुमचा वार या चाकूवर झेलेन. त्याच्या गंभीर परिणामाची जबाबदारी तुमची. अर्थात साहेब एकदम घाबरले व त्यांनी ताबडतोब तेथून काढता पाय घेतला.

येथे माझे रेडियो भाषण संपले. या माझ्या खोडखर स्वभावामुळेच मी माझ्या आयुष्यात अनेक थोरामोठ्यांचा संबंधित पत्रांचे फोटो ब्लॉक प्रसिद्धून दंभस्फोट करू शकलो. मी ज्यांचा दंभस्फोट केला त्यांची यादी येथे देणे अनाठायी

होणार नाही. १९३४ मधे मुंजे, १९३८ मधे महात्मा, १९३९ मधे मिश्र, व १९६३ मधे माडखोलकर अशा ४ ‘ म ’ कारांचा दंभस्फोट माझ्याकडून झाला.

रेडियोवर लिखित भाषण वाचण्यापूर्वी, त्यातील हिंदु-मुसलमानांची नावे वाचण्याला हरकत घेण्यात आली नाही, पण अलेक्झँडर सिलकॉक व अँड्रयू बुकॅनन ही दोन साहेबांची नावे गाळण्यास मला सांगण्यात आले. साहेबांचे इतके भय अजून आहे !

कथालक्ष्मी, मासिकाच्या नोव्हेंबर १९६२ दिवाळी अंकामधील खालील उताराही माझा खोडकरपणा दाखवितो.

## चोख उत्तर

प्रसिद्ध राजकीय पुढारी श्री. ना. भा. खरे हजरजबाबीपणाबद्दल प्रसिद्ध आहेत. राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी ते सरकारी नोकरीत होते. एका वरिष्ठ अधिकाऱ्याशी त्यांचे जमत नव्हते. तो इंग्रज असून भारतीयांना तुच्छ लेखण्यात अग्रेसर होता. एका वादविवादप्रसंगी डॉ. खऱ्यांना तो म्हणाला,

“ Mr Khare, there are no fools like you in England. ”

डॉ. खरे खाडकन् म्हणाले, “ Naturally, because all fools are exported to India. ”

खरे साहेबांचे उत्तर ऐकून गोरासाहेब गोरामोरा झाला.

—खंडेराव केळकर

* *

प्रकरण ८ वे

# किंचित उर्दू शायरी

मला उर्दू भाषेचा शोक आहे हे नागपूरच्या लोकांना तरी सांगावयास नको. परंतु या ग्रंथाच्या वाचकांसाठी काही प्रसंगी मी वापरलेले काही उर्दू शेर त्यांच्या मराठी अर्थासह या प्रकरणात देत आहे.

(१) ता. २५ फेब्रु. १९३५ या दिवशी केंद्रीय असेंब्लीत केलेल्या भाषणात मी इंग्रज राज्यकर्त्यांना उद्देशून खालील शेर म्हटला होता.

संग दिल को संग लेके संग दिल के संग गये ।
जिनका दिल था संगमर्मर उनके संग मरमर गये ॥

**अर्थ**—मी माझ्या कठीण हृदयाला घेऊन ज्याचे हृदयही कठीण होते त्याच्याबरोबर गेलो. पण ज्यांचे हृदय पांढऱ्या संगमरवरी दगडासारखे कठीण आणि थंड होते त्यांच्याशी सामना देताना मरून गेलो.

(२) ता. १२ मार्च १९३५ रोजी केंद्रीय असेंब्लीत बजेटवर भाषण करीत असताना इंग्रजांना साथ देणाऱ्या बड्या हिंदी अधिकाऱ्यांना उद्देशून मी आपल्या भाषणात खालील तीन शेर म्हटले होते :

अय् हिंद तुझको खाक में क्यौं ना मिलायेंगे हम् ।
इज्जत को तेरे शौक से क्यौं ना घटायेंगे हम् ॥१॥
तालीम जैसी पाते हैं उस राह जायेंगे हम् ।
अपने वतन से नफरत क्यौं ना करेंगे हम् ॥२॥
खैर ख्वाह इंग्लिस्तान के क्यौं ना बनेंगे हम् ।
साहिब ने दी खाते हैं रोटी डबल जो हम् ॥३॥

**अर्थ**—हे हिंद माते, तुला मी राखेत का मिळवू नये ? तुझ्या प्रतिष्ठेला कमी का करू नये ? जसे आम्हाला शिक्षण मिळते त्याच मार्गाने आम्ही जाणार. आपल्या देशाची घृणा आम्ही का करू नये ? इंग्लंडचे हितचिंतक आम्ही का बनू नये ? आम्ही साहेबांनी दिलेली डबलरोटी खात नाही काय ?

(३) १९०३–४ या काळात मी लाहोरमध्ये मेडिकल कॉलेजमध्ये शिकत होतो. यावेळी पहिल्या तीन वर्षांचे विद्यार्थी काही विषयांकरिता एकत्र येत असत.

त्यामुळे एका वर्गात विद्यार्थ्यांची संख्या दोनशे अडीचशें होत असे. प्रोफेसर वर्गात येण्यापूर्वी वर्गात विद्यार्थ्यांमध्ये खूब हास्यविनोद व हल्लागुल्ला चालत असे. एक मुसलमान विद्यार्थी वर्णाने सावळा, तोंडावर देवीचे वण, ऐटबाज पोषाख करून जसा काही जगाकडे तुच्छतेच्या भावनेने पहातो आहे अशा ऐटीत वागत असे. त्याची फजीती करण्याकरिता मी खालील शेर वर्गात म्हटला

किसी जागे पहाडीने जो मारी चोंच गोबरपर ।
तो मैं समजा कि यह चेचकजदा रुखसारे जाना है ॥

**अर्थ**—एका पहाडी कावळ्याने शेणाच्या पोहट्यावर चोंची मारल्या. ते पाहून मला असे वाटले की हा माझ्या प्रियेचा देवीचे वण असलेला गाल असावा.

(४) काल १९२४-२५—यावेळी मी मध्यप्रदेश विधान सभेचा स्वराज्य पक्षीय सदस्य होतो. स्वराज्य पक्ष बहुमतात होता. त्याचे तत्वज्ञान बजेट नापास करण्याचे व दिवाणांचे पगारही नापास करून दिवाणगिऱ्या न घेण्याचे होते. अशा परिस्थितीत खंडव्याचे एक वकील हिफाजत अलीखान दिवाणगिरी घेण्यास तयार होतील अशी बातमी उठली. तेव्हा साहजिकच मुस्लीम रिवाजाप्रमाणे या आनंदाच्या प्रसंगी त्यांच्या घरी नाचगाण्याचा जलसा झाला असे मी कल्पिले. गाणारणीचे नाव नसीबनजान असेही मी कल्पिले. हिफाजत अलीची दाढी खसखसी होती व वर्ण काळा होता. म्हणून नसीबनजानच्या तोंडी मी खालील उर्दू गाणे घातले होते. ते असे.

खसखसी है दाढी तेरी और काला है बदन ।
जब याद तेरी आवेगी रो रो मरेंगे हम् ॥

**अर्थ**—हे प्रिया, तुमची दाढी खसखसी आहे व तुम्ही शामवर्णी आहा. तुमची जेव्हा आठवण येईल तेव्हा मी रडून रडून मरेन.

हिफाजत अलीच्या बैठकीत अशा तऱ्हेने नाचगाणे चालू असताना एकदम नागपूरवरून तार येते की, स्वराज्य पक्षाने दिवाणांचा पगार नामंजूर केला आहे. हे ऐकून बैठकीत हाहाक्कार माजतो आणि हिफाजतअली रडत रडत खालील शेर म्हणतो.

इज्जत और हिफाजत के लिये हो रहा था मिनिस्टर ।
लेकिन स्वराजियोने मुझे उल्लू बनाया मिस्टर ॥

**अर्थ**—इभ्रतीसाठी व स्वरक्षणासाठी मी मिनिस्टर होण्याचे ठरविले होते. पण काय करू हो, या स्वराज्य पक्षाच्या लोकांनी मला मूर्ख बनविले.

अशा प्रकारचे एक प्रहसनही मी लिहिले होते व ते नागपूरच्या अबदुल रज्जाक ( विधान सभेचे सदस्य ) वकीलांच्या येथ हिफाजतअलीच्या समोर वाचण्यात आले होते.

(५) १९४४–४५ च्या सुमारास मुस्लीम लीग अगदी दबलेली संस्था होती. बहुसंख्य मुस्लीम संख्या असलेल्या बंगाल प्रांतात फजलुल हक्कचे मंत्रिमंडळ होते. मुस्लीम लीगचा या मंत्रिमंडळाशी काही संबंध नव्हता. फार मोठे मुस्लीम बहुमत असलेल्या सरहद्द प्रांतात डॉ. खानसाहेब यांच्या नेतृत्वाखाली कांग्रेस पक्षाचे मंत्रिमंडळ होते. आणि बहुसंख्य मुस्लीम असलेल्या पंजाब प्रांतात मुस्लीम लीगच्या तिकिटावर निवडून आलेले एक दोघेच मुस्लीम, विधान सभेत सदस्य होते. आणि मंत्रिमंडळ खिजर हयातखान यांच्या नेतृत्वाखाली युनियन पक्षाचे संमिश्र असे जाट व मुस्लिमांचे होते. सारांश या काळात मुस्लीमलीग कोणत्याही प्रांतात जोरदार नव्हती. म्हणून मुस्लीम लीगचे पुढारी जिना यांनी पंजाबचे मुख्यमंत्री खिजर हयातखान यांना भेटण्याची इच्छा दर्शविली. ही भेट घडवून आणण्याची खटपट नबाबजादा लियाकत अली खान यांनी केली. पण खिजर हयातखान यांनी जिनांना भेटण्यास नकार दिला असे वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले होते. यावेळी मी व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य होतो. त्यामुळे अर्थातच मी केंद्र असेंब्लीचाही सरकारी सभासद होतो. यावेळी मी सरकारतर्फे विधान सभेत केलेल्या एका भाषणात खालील स्वकपोलकल्पित दोन उर्दू शेर म्हणून या घटनेचा उल्लेख केला होता. ते दोन शेर असे.

लियाकत अलीखान खिजर हयातखानला म्हणतो—

मरता हुं तेरे हिज्र में अय् खिज्र खबर लो।
लीग का लिहाज कर के लियाकत को बचा लो॥

**अर्थ**—हे खिजर, मी तुझ्या विरहाने व्याकूळ झालो आहे. म्हणून तू माझी खबर घे व लीग या संस्थेची कदर करून आपली स्वतःची अक्कल व माझा म्हणजे लियाकत अलीचाही बचाव कर.

खिजर हयातखानचे लियाकत अलीला उत्तर—

ल्याकत तू मेरी आरजू नाहक है कर रहा।
जिन्ना के तरफसे दिल में मेरे छाला है पड़ गया॥

**अर्थ**—हे लियाकत अलीखान, तू माझे आर्जव व्यर्थ करीत आहेस. कारण जिनाबद्दल माझ्या हृदयात कटुताच निर्माण झाली आहे.

हे शेर मी जेव्हा आपल्या भाषणात म्हटले तेव्हा मध्यवर्ती असेंब्लीतील मुस्लीम लीगच्या सदस्यात खूपच खळबळ झाली.

(६) १९४७ च्या जूनमध्ये ब्रिटिश सरकारने जिना आणि नेहरू यांची संमती घेऊन देशविभाजनाचे धोरण जाहीर केले. पुढे लौकरच जुलैमध्ये ब्रि. पार्लमेंटात तसा कायदाही पास झाला. यावेळी मी अल्वर संस्थानचा दिवाण होतो

व त्या संस्थानचा प्रतिनिधी म्हणून हिंदुस्थानच्या घटना समितीचाही सभासद होतो. त्यामुळे माझा मुक्काम बरेच दिवस दिल्लीस असे. ब्रिटिश सरकारच्या या धोरणाचा निषेध करण्यासाठी हिंदुमहासभेतर्फे हिंदुसभेचे एक कार्यकर्ते प्रो० रामसिंग यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत एक सभा झाली. मी जरी यावेळी हिंदुसभेचा सदस्य नव्हतो तरी मी कट्टर विभाजनविरोधी होतो. म्हणून मला या सभेत बोलण्याची विनंती करण्यात आली. मी आपल्या भाषणात पुढील शेर म्हणून देशविभाजनाच्या घटनेचा उल्लेख केला. तो शेर असा :

दोनो चुगत खुर्द कलां दोनो को रखना मंजूर ।
कह दो खीबूसे बना लाये दोहरा पिंजरा ॥

**अर्थ**—लहान उल्लु आणि मोठा उल्लु या दोघांनाही पाळायचं ठरवलं आहे, म्हणून बुरुडाला सांगा की दुहेरी पिंजरा तयार करून आण.

(७) १९५३ मध्ये केव्हा तरी पं. नेहरूंनी असे जाहीर उद्‌गार काढले होते की, मी नुसता पंतप्रधानच नाही; तर त्याहून काही अधिक आहे. यावेळेस माझा मुक्काम लोकसभेचा सदस्य म्हणून दिल्लीस हिंदुसभा भवनात होता. नेहरूंचे हे जाहीर झालेले उद्‌गार वाचून मी एक शेर रचून तो नागरी लिपीत लिहून पोस्टाने ताबडतोब पं. नेहरूंना पाठविला. तो शेर असा :

नाहक गरूर मत कर तू अय् प्राइम मिनिस्टर ।
सबके माफिक तू भी तो है मट्टी का कनिस्तर ॥

**अर्थ**—हे पंतप्रधाना, तू व्यर्थ गर्व करू नकोस. इतर सर्व मानवांप्रमाणे तूही मातीचाच पिपा आहेस.

(८) १९५४ च्या मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हैद्राबाद येथे हिंदुसभेचे वार्षिक अधिवेशन झाले होते. त्यावेळेस पूर्व पाकिस्तानात पश्चिम पाकिस्तानच्या विरुद्ध काही कटुता निर्माण झाली होती. तिला अनुलक्षून मी हिंदुमहासभेच्या अधिवेशनात केलेल्या आपल्या भाषणात खालील उर्दू शेर म्हणून पाकिस्तानी बेगमेला चेतावणी दिली होती. ते शेर असा :

गरमी-ए-हुस्न है सीनेसे पसीना पोंछो ।
बहे जाते है जवानीके समर पानी में ॥

**अर्थ**—हे पाकिस्तानी बेगमे, तुझ्या सौंदर्याच्या उष्णतेमुळे तुझ्या वक्षस्थळाला घाम फुटला आहे. तो पुसून टाक. नाहीतर तुझ्या तारुण्याची फळे पाण्यात वाहून जातील.

हैदराबाद हे शहर उर्दूचे माहेरघर असल्यामुळे माझ्या या उर्दू शेरावर हास्याचे फवारे उडाले.

(९) १९५४–५५ मध्ये हिंदुमहासभेचा उपाध्यक्ष असताना वाराणशी येथे एक प्रचाराची सभा घेतली. त्या सभेत १९४५ च्या जूनमध्ये कांग्रेस वर्किंग कमेटीच्या सदस्यांची तुरुंगातून मुक्तता झाल्यावर त्यांच्यामध्ये आणि ब्रिटिश उच्च अधिकाऱ्यांमध्ये एकमेकाजवळ येण्यासाठी ज्या हालचाली झाल्या त्या मी जवळून पाहिल्या होत्या. म्हणून मी त्या घटनेचे वर्णन खालील उर्दू पंक्ती म्हणून केले. त्या पंक्ती अशा :

दोनो जानिब से इशारे हो चुके ।
तुम हमारे हम तुमारे हो चुके ॥

**अर्थ**—दोन्ही बाजूंनी संकेत झाले व आपण दोघे एकमेकांचे होऊन गेलो.

(१०) याच सुमारास पाटणा येथे माझे एक भाषण झाले. त्यात कांग्रेसवाले मला जे गालिप्रदान करीत असत, त्या घटनेचे मी जे वर्णन केले ते असे.

सिरपे है गांधि टोपी पजामे में चूडियां ।
हम को गरीब जानके देती हो गालिया ॥

**अर्थ**—हे कांग्रेस महाराणी, तुझे डोके गांधी टोपीने व पाय चुडीदार पायजम्याने विभूषित आहेत. तू मला गरीब समजून शिव्या देतेस काय ?

(११) डॉ. सय्यद हुसेन हे भारताचे इजिप्तमधील राजदूत कायरो येथे निधन पावले. त्यांची कबरही भारत सरकारने कायरो येथे बांधून त्यांचे स्मारक केले आहे. असे स्मारक परदेशात निधन पावलेल्या दुसऱ्या कोणाही भारतीय राजदूताचे झाले नाही. भुलाभाईंचे चिरंजीव धीरुभाई देसाई व जस्टिस रामलाल हे अनुक्रमे स्विट्झर्लंड व इटलीत भारताचे राजदूत म्हणून निधन पावले. पण त्यांचे स्मारक मात्र त्या त्या देशात भारत सरकारने केल्याचे ऐकिवात नाही. काही वर्षांपूर्वी कायरो येथील त्यावेळच्या भारताच्या राजदूताला पैगंबरवासी डॉ. सय्यद हुसेन यांच्या कबरेला फुले वाहण्याची सूचना देण्यात आली. हे वाचून मी स्वतः एक शेर रचून तो मुंबईच्या ‘ आलमगीर ’ साप्ताहिकात प्रसिद्ध केला होता. तो शेर असा.

अपने हार के बासी जो फूल हों चढा दो ।
मजारे आशिके नाशाद पर काहिरा में ॥

**अर्थ**—कायरोमध्ये तुझ्या असफल म्हणून दुःखी झालेल्या प्रियकराची जी कबर आहे तिच्यावर आपल्या गळ्यातील हाराची शिळी फुले वहा.

ज्यांना १९२० साली घडलेल्या पळवापळवीच्या एका ऐतिहासिक घटनेची माहिती आहे त्यांना या शेराचे वर्म कळेल.

(१२) लोकसभेत पं. नेहरू व मी समोरासमोर बसत असू. नेहरू हे नेहमी माझ्याकडे रागाने पहात आहेत असे मला वाटे. याचा वचपा मी खालील शेर लोकसभेतील माझ्या एका भाषणात म्हणून काढला. तो शेर असा :

वो दुष्मनी से देखते हैं लेकिन देखते तो हैं ।
मैं शाद हूं कि हूं तो किसीके निगाह में ॥

**अर्थ**—ते ( किंवा त्या ) माझ्याकडे रागाने पाहातात. पण काही असो पाहातात तर खरे. कोणत्या निमित्ताने का होईना, पण त्यांच्या नजरेत माझी छबी समावलेली आहे म्हणून मी खूष आहे.

(१३) हल्लीच्या परिस्थितीला अनुलक्षून एक दिवस कोणाशी तरी सहज बोलता बोलता मला खालील शेर सुचला तो असा :

खरे मोती गये सारे कल्चरोंकी बनी दुनिया ।
व्हल्चरोंसे पड़ा पाला हुवा इन्साफ मूंह काला ॥

**अर्थ**—खरे मोती सर्व लुप्त झाले व त्यांची जागा कल्चर्ड मोत्यांनी घेतली. त्यामुळे असे दिसते की, जणू काय गिधाडे मोकाट सुटली आणि न्यायनीतीचे तोंड काळे झाले.

★ ★

## प्रकरण ९ वे

# मी आणि माझे चरित्रकार

### या प्रकरणाचा प्रपंच का ?

नागपूरचे एक श्रमिक पत्रकार श्री. ज. रा. जोशी हे माझे चरित्रकार आहेत हे सर्वांना विदितच आहे. त्यांचे माझे संबंध काय आहेत याचा खुलासा करण्यासाठीच मला या पुस्तकात हे प्रकरण लिहावे लागले. त्याला कारण श्री. ग. त्र्यं. माडखोलकर. आणि शिवराज प्रकाशन लि. या संस्थेविरुद्ध श्री. ज. रा. जोशी यांनी नुकतीच जिंकलेली केस. या प्रकरणात श्री. ज. रा. जोशी यांचा उल्लेख जोशीबुवा याच नावाने मी करणार आहे. कारण मी व इतर बरीच मंडळी त्यांना याच नावाने संबोधितात.

### माडखोलकरांचे खवचट वाक्य

१९६०–६१ मध्ये केव्हा तरी श्री. माडखोलकर माझ्याकडे आले असताना सहज बोलता बोलता म्हणाले, जोशीबुवा काय, तुमचे आश्रितच आहेत. ते तुमची तारीफ करतीलच. या सहज उच्चारलेल्या एका वाक्याने जणु काय माडखोलकरांनी एका दगडाने दोन पक्षी मारले. जोशीबुवांना माझ्यावर अवलंबून असलेला आश्रित असा हीन दर्जा दिला व मी एकाद्याला आश्रय देऊन त्याला आपला मिंधा करून, त्याच्याकडून आपली तारीफ करून घेण्याचा हीन प्रयत्न करतो, असा आरोप माझ्यावर केला. माडखोलकरांनी उच्चारलेले हे वाक्य मला फार खटकले. मला वाटले, माडखोलकरांचा, जोशीबुवा आणि मी अशा आम्हा दोघाशी निकट परिचय असताना असा गैरसमज झाला आहे तर, साधारण जनतेच्या मनामध्ये अशा प्रकारचा गैरसमज झाला असलाच पाहिजे. म्हणून तो गैरसमज दूर करण्यासाठीच हे प्रकरण या पुस्तकात घातले आहे.

### जोशीबुवांनी लिहिलेली माझी चरित्रे

जोशीबुवांनी मराठीत दोन भागात माझे चरित्र प्रसिद्धिले आहे. पहिला भाग त्यांनी १९४३ मध्ये नागपंचमीच्या मुहूर्तावर दिल्ली येथे प्रसिद्ध केला. दुसऱ्या भागाचा अर्पण समारंभ १९४९ मध्ये कलकत्ता येथे श्री. आण्णासाहेब भोपटकरांच्या हस्ते झाला व प्रकाशन समारंभ बनहट्टींच्या सुविचार प्रकाशन संस्थेतर्फे १९५० मध्ये नागपूर येथे श्री. रुईकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

### मी माझी माहिती केव्हा दिली ?

मी जोशीबुवांना माझे चरित्र लिहिण्यासाठी कधीही सांगितले नाही. १९४२ मध्ये केव्हा तरी चरित्र लिहिण्यासाठी माहिती मागण्यासाठी माझ्याकडे ते आले तेव्हा प्रथम मी त्यांना धुडकावून लावले. पण पुन्हा जेव्हा ते माझ्याकडे आले व त्यांनी माडखोलकरांचा हवाला दिला, तेव्हा मी त्यांना माझे बालपण, शिक्षण इत्यादिकांची माहिती दिली. माझ्या चरित्राचा पहिला भाग चितळे यांच्या ऑल इंडिया रिपोर्टर प्रेसने विनामूल्य छापला. त्यातील ब्लॉक्स नागपूरचे शिवराज लिथो प्रेसचे संचालक श्री. दादासाहेब धनवटे यांनी तयार करून विनामूल्य छापून दिले आणि पुस्तकाच्या कागदाचा खर्च श्री. गणपतराव बुटी यांनी केला. मी जोशीबुवांना काहीही दिले नाही. पुस्तक विकून जो काही पैसा मिळाला असेल तेवढाच त्यांना मिळाला.

### ढवळे, अन्याय सहन होणार नाही. मी जोशीबुवांच्या पाठीशी आहे.

दुसऱ्या भागाच्या वेळीही मी जोशीबुवांना काहीही दिले नाही बनहट्टींच्या सुविचार ग्रंथमालेनेच धंदा म्हणून या भागाचे प्रकाशन केले व सर्व खर्च त्यांनीच कलो व जोशीबुवांना त्यांच्या रॉयल्टीबद्दल साडेसातशे रुपये नगदी व प्रत्येकी सात रुपये किंमत असलेल्या पुस्तकाच्या दीडशे प्रती दिल्या. माझ्या चरित्राशिवाय जोशीबुवांनी माझे मित्र व नागपूर विद्यापीठाचे बाणेदार कुलगुरु श्री. नानासाहेब केदार यांचेही चरित्र लिहिले आहे. याबद्दल जोशीबुवांना नागपूर विद्यापीठाकडून ना. के. बेहेरे सुवर्णपदक व वाङ्मयीन पुरस्कार मिळाला. त्यामुळे ते माझे चरित्रकार म्हणून मला आनंद झाला. तो व्यक्त करण्यासाठी मी २६ जानेवारी १९५९ रोजी माझ्या घरी अनेक साहित्यिकांना बोलावून आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार केला. पुढे ११ फेब्रुवारी १९५९ रोजी जोशीबुवांचा नागपूरच्या विदर्भ साहित्य संघातर्फे सत्कार झाला. या सत्काराची माहिती देतांना ता. १६–२–५९ च्या ‘तरुण–भारता’ने जोशीबुवा जे बोलले नाहीत, ते त्यांच्या तोंडी घातले. ते ‘महाराष्ट्र’ दैनिकाची बेअदबी करणारे होते असे त्या संस्थेने जोशीबुवांना कळविले. अगोदरच जोशीबुवांचा हा वाढता लौकिक काही जणांच्या डोळ्यात सलू लागला होता. त्यात ‘तरुण–भारता’तील वर उल्लेख केलेल्या मजकुराचे निमित्त मिळाले. त्याचा परिणाम जोशीबुवांना १० मार्च १९५९ रोजी ‘चार्जशीट’ देण्यात झाला. या दिवशी त्यांचा ‘महाराष्ट्र’ दैनिकाच्या कचेरीत खूब छळ करण्यात आला. त्यामुळे ते अखेरीस कचेरीतच बेशुद्ध पडले. मग मात्र ‘महाराष्ट्रा’चे चालक घाबरले व जोशीबुवा सावध झाल्यावर त्यांना त्यांनी मोटारीत घालून डॉक्टर म्हणून माझ्याकडे आणले. त्यांच्याबरोबर ‘महाराष्ट्रा’चे संपादक श्री. बाळासाहेब ढवळेही होते. मी त्यांना म्हणालो, ‘ढवळे, तुम्ही

जोशीबुवांवर अन्याय करता. पण हा अन्याय सहन होणार नाही, मी त्यांच्या पाठीशी आहे हे लक्षात ठेवा.'

## जोशीबुवांची बडतर्फी व न्यायालयाकडे धाव

पुढे चौकशीचा फार्स होऊन ता. २७ मे १९५९ रोजी जोशीबुवांना 'महाराष्ट्र'तून बडतर्फ करण्यात आले. जोशीबुवांनी ह्या अन्याय्य बडतर्फीविरुद्ध न्यायालयात केस दाखल केली व जोशीबुवा ती केस जिंकले. कोर्टाने त्यांना निकालपत्रात नुकसान भरपाई, महाराष्ट्राकडून देवविण्याचा हुकूम दिला व गंभीर अन्याय झाला आहे असा स्पष्ट शेराही मारला आहे. यामुळे मला जोशीबुवांपेक्षाही अधिक आनंद झाला आहे. कारण मी केलेली गर्जना खरी झाली व सफल झाली. या सर्व खटल्यात नागपूर श्रमिक पत्रकार संघाने जोशीबुवांची केस लढवून त्यांना जी मदत केली, त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

## तरुण-भारत व त्याच्या संपादकावर न्यायालयाने झाडलेले ताशेरे

'महाराष्ट्र'च्या व्यवस्थापकाने जोशीबुवांना केवळ त्यांच्याबद्दल ता. १६ फेब्रु. १९५९ च्या 'तरुण-भारत' मध्ये जो मजकूर छापला आहे त्यामुळे व त्या मजकुराचे समर्थन करणारे जे पत्र 'तरुण-भारता'चे संपादक माडखोलकर यांनी 'महाराष्ट्र'च्या व्यवस्थापकांना लिहिले त्यामुळे बडतर्फ केले. 'तरुण-भारता'चे आणि त्याच्या संपादकाचे हे कृत्य किती बेजबाबदारपणाचे होते व 'तरुण-भारता'त छापलेला मजकूर व त्याच्या संपादकाने 'महाराष्ट्र'च्या संपादकाला लिहिलेले पत्र कसे विश्वासपात्र नव्हते, हे जोशीबुवांच्या केसमधील निकालपत्रात त्याबद्दल कोर्टाने जे ताशेरे झाडले आहेत, त्यावरून दिसून येईल. ही केस महत्त्वाची असल्याकारणाने कोर्टाने झाडलेले ताशेरे येथे जसेच्या तसे उद्धृत करण्यात येत आहेत.

> ...The whole controversy has been generated by the incident which took place in the Vidarbha Sahitya Sangh, Nagpur where Mr. Joshi was feted for the Gold medal he received from the Nagpur University. There was a press-report in the Tarun Bharat, a Marathi Daily, in which it was reported that Mr. Joshi in reply to the honour done to him spoke and said, "I have been serving in the Daily Maharashtra for the last 25 years; inspite of the fact that I have put in the maximum work in that establishment I am not getting the treatment that ought to have been meted out to me." This report was

published in Tarun-Bharat dated 16th Februry 1959. This was the chief thing that started the whole controversy in this case. On reading this it appears that the General manager got wild and justly so and it appears that he asked Mr. Joshi the very same day his version of the speech. Promptly Mr. Joshi wrote down the purport of his own speech as far as his memory could help him. It is at Exibit A 2. Therein while refering to the neglect to which his problematic utterences have been subjected by the society at large he has added that he has been doing sincere and faithful work for the last 25 years and yet he has been sadly neglected. Thereafter, the management, it appears, wrote to the Editor of Tarun-Bharat regarding the authenticity of their report dated 16th the February 1959. The reply of the Editor Mr. G. T. Madkholkar, is at Exibit A. 5. The Editor has written therein that no official correspondent of the paper was present at the function, but that a friend who took active part in the function gave a report of the same, which was published by the aforesaid Marathi Daily. The Editor assures that he has no doubt about the authentic character of the report. Now Mr. Joshi was charged with making publicly unfounded and unjustified disparagement of the management. This is the material on which the enquiry officer has based his conclusion that Mr. Joshi defamed the paper and has publicly criticised it in inglorious and condemning manner. Now it is clear that Mr. Joshi has denied that he ever referred to the management of Maharashtra in his utterences there. Can it be said that the sentence of which he is accused was uttered by Mr. Joshi ? What is the evidence to prove it ? Exibit A. 1. is the report published in Tarun-Bharat. It is improper to believe that a thing is true merely because it is published in a newspaper. It appears that the enquiry officer seems to have fallen in the usual trap of presuming the truth of a thing that is printed. Otherwise what was there

to hold that Mr. Joshi criticised the management as alleged ? It can perhaps be said that the letter of the Editor was re-assuring and hence the enquiry officer was justified in his conclusion that Mr. Joshi did adversly criticise the management. Here again is the same mistake as in the case of newspapers. Merely because a man writes vouchsafing for the correctness of the report given by his friend we cannot come to a judicial conclusion that it is necessarily correct. *The friend must be disclosed. He must be examined. He must say that Mr. Joshi uttered this. The veil must be lifted.* Till then all the certificates of guarantee from the judicial point of veiw are of no avail. Hence Exibit A. 5 does not advance the proof of the newspaper report in any manner."

## जोशीबुवाच काय कोणालाही माडखोलकर गोत्यात आणू शकतात

या उताऱ्यावरून असे दिसते की, माडखोलकरांचा विश्वासू मित्र पडद्यातच राहिला. म्हणूनच कोर्टाने जोशीबुवांच्या विरुद्ध असलेला हा एकुलता एक पुरावा भरवसा ठेवण्यालायक मानला नाही. आणि त्यामुळे जोशीबुवांना न्याय्यतः विजय मिळाला. जोशीबुवा आणि माडखोलकर हे सहव्यवसायी आहेत व मित्रही आहेत. असे असताना माडखोलकरांनी 'तरुण-भारता'त जोशीबुवांना गोत्यात आणणारा मजकूर का छापावा ! पण याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण 'तरुण-भारता'त त्याच्या जनकाचा नैतिक वध करू पाहणारा मजकूर जर प्रसिद्धिला जाऊ शकतो तर 'तरुण-भारता'च्या जनकाच्या तुलनेने जर माडखोलकरांना वाटले असेल, की जोशीबुवा हे कोण्या झाडाचा पाला, तर नवल नाही !

## ज. रा. जोशी सहाय्यक निधी व माडखोलकर

२७ मे १९५९ रोजी जोशीबुवांना 'महाराष्ट्रा'तून कायमची गचांडी मिळाली. जोशीबुवा हे अल्पवेतनी, मध्यमवर्गीय कुटुंबवत्सल माणूस. म्हणून त्यांच्यापुढे उद्याचा प्रश्न भयानक स्वरूपात उभा राहिला. आता पुढे काय करावे, याबद्दल मित्रमंडळीत विचार झाला. तेव्हा जोशीबुवांचे एक हितचिंतक श्री. पी. वाय. देशपांडे यांनी अशी सूचना केली की, ज. रा. जोशी सहाय्यक निधी सुरू करावा आणि त्या निधीला देणग्या देण्यासाठी जनतेला अपील करावे. या अपीलाचा मसुदा तयार झाला व त्याच्यावर सह्या घेण्यात आल्या. त्या अशा : श्री. पी. वाय.

देशपांडे, आचार्य अत्रे, संपादक 'मराठा', डॉ. खरे, म. भगवानदिन, सेठ पुनमचंद रांका, ॲड. प्रमुणे, डॉ. मोकादम इ. हे अपील 'मराठा' आणि 'नागपूर टाइम्स'मध्ये प्रसिद्ध झाले. पण 'तरुण-भारता'त प्रसिद्ध करण्यास माडखोलकरांनी नकार दिला व अपीलावर स्वतःची सही करण्यासही नकार दिला. त्यांनी नकाराचे कारण असे सांगितले की, हे अपील महाराष्ट्र पत्राच्या विरुद्ध आहे. हे पत्र आज जरी शिवराज प्रकाशन लि० च्या मालकीचे असले तरी मुळात ते गोपाळराव ओगल्यांनी काढले आहे. त्यांनीच मला नागपुरात पहिल्याप्रथम जवळ केले. म्हणून 'महाराष्ट्रा'च्या विरुद्ध मी काही करणार नाही. माडखोलकरांनी दिलेले हे कारण म्हणजे सरंजामशाहीतील आश्रितपणाच नाही काय? तोच आश्रितपणा माडखोलकर माझ्या संबंधात जोशीबुवांच्या माथी चिकटवू पहातात. कारण ज. रा. जोशी सहाय्य निधीला मी भरपूर मदत केली आहे. पण ती मदत जोशीबुवा एक माझे मित्र म्हणून सामाजिक कर्तव्य करण्याच्या बुद्धीने केली आहे. जोशीबुवांना मी आश्रित म्हणून कधीच मानले नाही. म्हणून माडखोलकरांनी त्यांना माझे आश्रित मानण्याचा अन्याय यापुढे तरी करू नये.

## माडखोलकर, तुम्ही अगदी कृतघ्न आहात

पुरेसा निधी जमला तर जोशीबुवांना एक छापखाना काढून देण्याचा विचार होता. पण दरम्यानच्या काळात जोशीबुवांच्या योगक्षेमासाठी तात्पुरती व्यवस्था व्हावी म्हणून एके दिवशी पी. वाय. देशपांडे व माडखोलकर हे दोघेही कर्मधर्म संयोगाने एकाच वेळी माझ्याकडे आले असताना मी जोशीबुवांना सहा महिने तरी 'तरुण-भारता'त नोकरी द्यावी अशी विनंती माडखोलकरांना केली. पण माडखोलकरांनी नकार दिला. तेव्हा मी त्यांना म्हणालो की, माडखोलकर 'तरुण-भारत' काढण्याचा निर्णय जो मी घेतला त्याला थोडेबहुत जोशीबुवाही कारण आहेत. १९४३ च्या नागपंचमीच्या वेळेस जोशीबुवा माझ्या मराठी चरित्राच्या पहिल्या भागाच्या प्रकाशनासाठी दिल्लीला आले होते. त्यावेळेस त्यांनी मला 'महाराष्ट्र' पत्राच्या तंग आर्थिक परिस्थितीची कल्पना दिली. याचा परिणाम माझ्यावर झाला. त्यामुळे लवकरात लवकर 'तरुण-भारत' वर्तमान पत्र काढण्याचा मी निर्णय घेतला आणि तुम्ही त्याचे मुख्य संपादक झाला. म्हणून दूरान्वयाने का होईना जोशीबुवाचे उपकार तुमच्यावरही आहेत. त्याची फेड करण्यासाठी तरी तुम्ही त्यांना सहा महिने 'तरुण-भारता'त ठेवून घ्या. त्याच्याहून जास्त काळ तुम्हाला संकटात घालण्यात येणार नाही. आणि कोणत्याही कारणाने तुमचे आणि जोशीबुवाचे पटले नाही तर तुम्ही जोशीबुवांना सहा महिन्यापूर्वीही काढू शकता. अशा रीतीने मी अगदी दाताच्या कण्या केल्या. तरीही ते बधले नाहीत. तेव्हा मी माडखोलकरांना पी. वाय. च्या समोरच म्हटले, की माडखोलकर तुम्ही अगदी

कृतघ्न आहात. माडखोलकरांनी हे माझे बोल ' व्यक्तरदन ' करून ऐकून घेतले. व्यक्तरदन हा शब्दप्रयोग माडखोलकरांचे साहित्यिक गुरु तात्यासाहेब कोल्हटकर यांचा आहे. म्हणून तो माडखोलकरांना आवडेलच !

## जोशीबुवांना इंडोनेशियातून आलेले पत्र

जोशीबुवा हे माझे चरित्रकार आहेतच. पण याशिवाय ते माझ्या इंग्रजी आत्मचरित्राचे प्रकाशकही आहेत. प्रकाशक ह्या नात्याने त्यांच्याकडे कैक वेळा माझ्या इंग्रजी आत्मचरित्राची परदेशातूनही मागणी केली जाते. मला आठवते की, आस्ट्रेलिया मधील मेलबोर्न युनिव्हर्सिटीकडून मागणी आली होती. ते पत्र गहाळ झाले. त्याचप्रमाणे आक्सफोर्ड येथील एका विद्यार्थी केंद्राकडूनही मागणी आली होती. हेही पत्र गहाळ झाले. ह्या दोन्ही मागण्या पुस्तक विकत घेण्याच्या होत्या. पण इंडोनेशियातून जोग्जकार्ता येथून या पुस्तकाची एक प्रत भेट म्हणून मागण्यात आली. ती प्रत जोशीबुवांनी पाठविली. ती पोचल्याचे आभारप्रदर्शक पत्र आले आहे. ते जसेच्या तसे येथे देण्यात येत आहे.

Shri. J. R. Joshi
Buty Wada,
Sitabuldi, Nagpur, 1. India.

15 Zulhidjdjah, 1379 H.
10–6–1960

Dear Sir,

We are happy in grateful receipt of a free copy of "My Political memoirs or Autobiography" by Dr. N. B. Khare you have sent our library under separate Registered Book Post in complying with our request of 12–4–1960

The book proves to be of immense use and worth political affairs exploration to the library and its readers.

May I have to convey my sincerely, kindest regards to the honourable author : Dr. N. B. Khare.

Best salama to you and friends at office.

We beg to remain to be, dear Sir,
most sincerely,
The Perpustakaan Islam.

H. Farid Ma'ruf,
Chief Librarian.

## स्वकीयाकडून झालेला अव्हेर

परदेशातूनही या पुस्तकाचे महत्त्व पटून त्याला कशी मागणी आली आहे हे वर दिलेल्या हकीकतीवरून दिसून येईल. पण काही स्वकीयांकडून या पुस्तकाचा कसा अव्हेर झाला आहे याचे एक ठळक उदाहरण खाली देतो.

संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यावर दिल्ली येथे महाराष्ट्र राज्यातर्फे 'महाराष्ट्र राज्य माहिती केंद्र' स्थापन करण्यात आले हे योग्यच झाले. या माहिती केंद्राचे व्यवस्थापक श्री. भालजी केळकर हे नागपूरला आले व त्यांनी विदर्भ साहित्य संघात ता. २८ जून १९६१ रोजी सभा घेऊन उपस्थितांना दिल्ली येथील महाराष्ट्र राज्य केंद्राची माहिती करून दिली. आपल्या भाषणात त्यांनी लोकमान्य टिळकांपासून तो महर्षि अण्णासाहेब कर्व्यांपावेतो सर्व थोर व कर्तृत्वसंपन्न महाराष्ट्रीय नेत्यांचा परिचय करून दिला. पण हे भाषण नागपूर येथे विदर्भ साहित्य संघात होत असतानाही श्री. भालजी केळकरांनी विदर्भात होऊन गेलेल्या एकाही दिवंगत अथवा विद्यमान कर्तृत्ववान महाराष्ट्रीय नेत्याचा उल्लेख केला नाही. जोशीबुवा हे जरी संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते असले तरी त्यांना विदर्भाची उपेक्षा करण्याचा अन्याय सहन झाला नाही. म्हणून त्यांनी ता. ५-७-६१ या रोजी श्री. भालजी केळकर यांना याबद्दल तक्रार करणारे एक विस्तृत पत्र पाठविले व ते माझ्या इंग्रजी आत्मचरित्राचे प्रकाशक असल्याने त्या पुस्तकाची एक प्रतही रजिस्टर बुकपोस्टाने श्री. भालजी केळकरांना त्यांनी पाठविली. जोशीबुवांचे ते पत्र जसेच्या तसे खाली देण्यात येत आहे.

## जोशी-केळकर-चव्हाण पत्रव्यवहार

बुटी-वाडा, सीताबर्डी, नागपूर
दिनांक ५-७-१९६१

श्री. भालजी केळकर यांस,

कृ. सा. न. वि. वि.

नागपूरच्या मुक्कामात दिनांक २८ जूनला सायंकाळी ६-३० वाजता आपण विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. त्याप्रसंगी दिल्लीत स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य माहिती केन्द्रासंबंधी उपस्थितांना आपण परिचय करून दिला. मीही त्याप्रसंगी हजर होतो. संघाला दिलेल्या आपल्या भेटीचा वृत्तांत दुसऱ्या दिवशीच स्थानिक तरुण भारतात प्रसिद्ध झाला. लो. मा. टिळकांपासून तो महर्षि अण्णासाहेब कर्व्यांपर्यंतच्या थोर व कर्तृत्व संपन्न महाराष्ट्रीय नेत्यांच्या अखिल भारतीय किंबहुना त्यांच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीचा परिचय आपण करून दिला.

आपल्या महान नेत्यांची प्रशंसा व कीर्ती ऐकून भावनिक ऐक्याची अपेक्षा बाळगणाऱ्या कोणत्या सच्चा महाराष्ट्रीय माणसाचे ऊर भरून येणार नाही ? आपण गायिलेले गुणगान ऐकून मलाही अभिमान वाटला. पण त्याबरोबरच मला एक गोष्ट खटकली. लोकमान्यांच्या सतत सहवासात राहून आणीबाणीच्या प्रसंगी त्यांना बहुमोलाचा सल्ला देणारे विदर्भाचे पितामह श्रीमान दादासाहेब खापर्डे आणि लोकनायक बापूजी अणे, लोकमान्यांच्या जहाल राजकारणाला होत असलेला मवाळांचा विरोध मोडून काढण्यासाठी सुरतेच्या कांग्रेसमध्ये लोकमान्यांच्या रोखाने येत असलेल्या खुर्च्या स्वतः छातीवर बेधडक झेलणारे भोसला लष्करी शाळेचे प्रणेते आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध हिंदुस्थानात हिंदुत्ववादाचा निर्भयतेने पुरस्कार करणारे डॉ. मुंजे, वीर सावरकरांप्रमाणेच तळ हातावर शीर घेऊन भारतीय स्वातंत्र्यासाठी छातीचा परकोट करणारे डॉ. खानखोजे आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या बालेकिल्ल्यात शिरून लॉर्ड वेव्हेल सारख्या अरेराव व्हाईसरॉयशी मोठ्या बाणेदारपणाने सामना घेऊन दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ‘जशास तसे’ कायदा लागू करण्यात व परिणामतः भारतीय स्वातंत्र्याचा मार्ग खुला करण्यात यशस्वी ठरलेले झुंझार वृत्तीचे डॉ. खरे या विदर्भाच्या थोर पुरुषांची आपणास आठवण होऊ नये याचे आश्चर्य वाटले. पानिपतच्या संग्रामात भारताच्या स्वातंत्र्यासाठी एक लाख महाराष्ट्रीयांचे बलिदान झाले ही घटना देशाचे ऐक्य साधू पाहणाऱ्या महाराष्ट्रीयेतरांना निःसंशय विचार करावयास लावील अशीच आहे. पण हा झाला गतेतिहास. आधुनिक कालात भारताचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी डॉ. खरे सारख्या एकट्या महाराष्ट्रीय पुरुषाने अल्वर संस्थानचे दिवाण म्हणून मोठ्या न्यायनिष्ठुर खंबीरपणाने बजावलेली ऐतिहासिक महत्वाची कामगिरी एका कसलेल्या पत्रकाराने आणि दिल्लीसारख्या भारताच्या राजधानीत महाराष्ट्रीयेतरांना महाराष्ट्रीय थोर नेत्यांचा परिचय घडविण्याच्या उपक्रमाचे आस्थेवाईक कार्यकर्ते म्हणून आपल्यास अपरिचित असणे अशक्य आहे. अल्वर राज्याच्या मेवो मुस्लीमांनी पंजाबच्या गुरगाव जिल्ह्यापासून तो थेट मथुरा, आग्रा, बांदेकुई पर्यंत धुमाकूळ घालून भारताची राजधानी दिल्ली हिलाच धोक्यात आणले होते, ही अगदी अलीकडच्या म्हणजे १५-२० वर्षांच्या पूर्वीची घटना आपण विसरला नसालच. त्यावेळी दिल्लीचा हा धोका डॉ. खरे यांनीच आपल्या कणखर पण न्यायनिष्ठुर धोरणाने कसा टाळला, याचा साद्यंत इतिहास आपणास तपशीलवार कळावा म्हणून मी मुद्दाम आपणाकडे त्यांनी लिहिलेले व मी प्रकाशित केलेले इंग्रजी आत्मचरित्र रजि.

बुकपोस्टाने पाठवीत आहे. ते योग्य वेळी आपणास मिळेलच. डॉ. खरे यांच्या या इंग्रजी आत्मचरित्रावर मुंबईच्या 'मराठा' दैनिकाचे निर्भीड पण गुणग्राही संपादक आचार्य अत्रे यांनी नुकतेच त्या पत्रात लिहिलेले विस्तृत परीक्षणही मुद्दाम आपल्या अवलोकनार्थ या पत्रासोबत पाठवीत आहे. त्यावरून डॉ. खरे यांच्या राजकीय कर्तृत्वाची आपणास कल्पना येईल.

शासन चौकटीत राहून लोकांच्या पुढे ठळक रीतीने डॉ. खरे यांचे कर्तृत्व आले नाही म्हणून किंवा पक्षीय राजकारणात ते कर्तृत्व पुढे येऊ शकले नाही म्हणून त्यांची उपेक्षा व्हावी ही गोष्ट मला वाटते, आपणासही संमत नसावी. व्हाईसरायसारख्या युरोपियन गृहस्थांशी कोणत्याही तऱ्हेचा पाठिंबा नसताना एकाकी झुंज घेऊन आपले ईप्सित साध्य करून देशाची मान उंचावण्याचे कृत्य करणाऱ्या डॉ. खरे यांचे उदाहरण देशात अन्य कोणते घडले असल्याचे दिसून येत नाही. पुण्याजवळ खडकवासल्यास सैनिकी विद्यालय स्थापन करण्याचा मद्रासी, बंगाली, पंजाबी आदी व्हाईसरायच्या कौन्सिलच्या अन्य सदस्यांचा विरोध डावलून व्हाईसरॉयला खडकवासला जागेचीच निवड करण्यास उद्युक्त करणारे, दक्षिण आफ्रिकेविरुद्ध संयुक्त राष्ट्रसंघात भारताची तक्रार गुदरणे, परकीय राजवटीतसुद्धा मलायातील हिन्दी नागरिकांना जीवनदान मिळवून देणे, चिमूर आष्टीच्या आरोपितांना आणि १९४२ च्या चलेजाव मोहिमेत अहमदनगर जेलमध्ये अडकवून ठेवलेल्या वर्किंग कमिटीच्या सदस्यांना व्हाईसरॉयला पत्र लिहून मुक्तता करण्याची कोशिस करणे व अल्वर राज्यातील मेवो मुस्लीमांचे बंड मोडून राजस्थानपासून दिल्लीचा परिसर हस्तगत करण्याच्या मुस्लीमांच्या पाकिस्तान निर्मितीच्या कारवायांना जबरदस्त प्रतिबंध करणे ह्या गोष्टी कर्तृत्वसंपन्नतेत येत नाहीत असे आपणही म्हणणार नाही, असे मला वाटते. मी पाठवीत असलेल्या इंग्रजी आत्मचरित्राची आपण निदान ५७२-७३-७४ ही पाने अवश्य वाचावी. ५७४ पानाच्या शेवटी राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांच्याशी डॉ. खरे यांचा जो पत्रव्यवहार झाला त्याचा उल्लेख आहे. तो समग्र पत्रव्यवहार याच पुस्तकाच्या ५०८ ते ५१३ पानावर वाचावयास मिळेल. त्यावरून दिसून येईल की, राजेंद्रप्रसादांनाही डॉ. खरे यांनी कांग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या सदस्यांची जून १९४५ मध्ये तुरुंगातून मुक्तता करून कांग्रेसची इज्जत वाचविली, हे राष्ट्रपतींना मान्य आहे.

विदर्भ साहित्य संघाला दिलेल्या भेटीत आपल्या चर्चेतून विदर्भातील ह्या मान्यवर व कर्तृत्वसंपन्न पुरुषांचा नामनिर्देशही ऐकू आला नसल्यामुळे त्यांच्यावर आणि नवमहाराष्ट्राच्या या भागावर आपल्याकडून यापुढे तरी अन्याय होणार नाही या भावनेनेच येवढे विस्तृत व खुलासेवार पत्र मी

आपणास लिहीत आहे. त्यात कोठे अधिक उणे आढळल्यास मी आगाऊच आपली क्षमा मागून ठेवतो. योग्य वेळी आपल्याकडून पुस्तक व मराठाच्या कात्रणाची पोच मला मिळेलच. कळावे, लोभ निरंतर ठेवावा.

आपला अपरिचित

**ज. रा. जोशी**

जोशीबुवांना भालजी केळकराकडून या पत्राचे उत्तरही आले नाही व ता. २५-७-६१ या रोजी जोशीबुवांनी श्री. भालजी केळकरांना पाठविलेले माझ्या इंग्रजी आत्मचरित्राचे रजिस्टर बुकपोस्ट ' Refused ' म्हणून परत आले. हे पाहून जोशीबुवांना सखेद आश्चर्य वाटले आणि केळकरांच्या या वागणुकीबद्दल तक्रार करणारे पत्र ता. २७-७-६१ या रोजी त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांना पाठविले. ते पत्र येथे देतो—

बुटी-वाडा सीताबर्डी, नागपूर

दिनांक २७-७-६१

माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांस—

सादर नमस्कार वि. वि.

आपला माझा परिचय नाही. तरीही मी आपणास हे पत्र पाठविण्याचे धाडस करीत आहे याबद्दल प्रथमच मी आपली क्षमा मागतो.

माझे नाव जगन्नाथ रामचंद्र जोशी. मी आज २५ वर्षे श्रमिक पत्रकार आहे. या अवधीत मी अखिल भारतीय कीर्तीचे राजकारणी मुत्सद्दी डॉ. खरे यांचे द्विखण्डात्मक चरित्र लिहिले आहे. त्याचप्रमाणे नागपूर विद्यापीठाचे तेजस्वी कुलगुरु डॉ. केदार यांचेही चरित्र मी लिहिले आहे. या चरित्र-ग्रंथाला मुंबई राज्याने वाचनालयासाठी योग्य अशी मंजुरी दिली आहे. या शिवाय नागपूर विद्यापीठाने या केदार चरित्राला गत तीन वर्षांतील सर्वोच्च मराठी ग्रंथ म्हणून १९५९ च्या जानेवारीत दीक्षांत समारोह प्रसंगी सुवर्णपदक आणि वाङ्मयीन पुरस्कारही दिला आहे. मी आजपावेतो राजकारणात भाग घेतला नाही. अर्थातच मी कोणत्याही राजकीय पक्षाचा सभासद नाही. तरी पण विदर्भ साहित्य संघाचा मात्र मी सभासद आहे.

दिल्ली येथे नुकतेच महाराष्ट्र राज्यातर्फे जे माहिती केन्द्र स्थापन झाले आहे त्याचे व्यवस्थापक श्री. भालचंद्र भालजी केळकर हे नुकतेच नागपूरला आले होते. तेव्हा त्यांचे २८ जूनला विदर्भ साहित्य संघात चर्चात्मक भाषण झाले. त्याला मी हजर होतो. त्यांनी दिल्लीच्या महाराष्ट्र माहिती केन्द्राचा

परिचय करून दिला व कर्तृत्वसंपन्न महाराष्ट्रीय नेत्यांचाही परिचय करून त्यात त्यांनी चिपळूणकर, टिळक, आगरकर, रानडे, गोखले, महर्षी कर्वे, सेनापती बापट व वीर सावरकर इत्यादी पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांचे गुणगान केले. पण हे भाषण नागपूर येथे विदर्भ साहित्य संघात होत असताना श्री. केळकरांनी विदर्भात होऊन गेलेल्या दिवंगत व विद्यमान कर्तृत्ववान महाराष्ट्रीयांचा उल्लेख केला नाही. अशा तऱ्हेने त्यांच्याकडून महाराष्ट्राच्या या प्रदेशाची उपेक्षा झाली. मग ही उपेक्षा हेतुपुरस्सर असो की अभावितपणे झाली असो.

सर्व महाराष्ट्रीयांचा एका राज्यात नुकताच समावेश झाला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पण पुष्कळ वर्षांच्या राजकीय दुराव्यामुळे महाराष्ट्रातील निरनिराळ्या प्रदेशातील महाराष्ट्रीयांचे अजून भावनात्मक एकीकरण झाले नाही. ते व्हावयास पाहिजे असे कोणाही स्वाभिमानी महाराष्ट्रीयास वाटेल. तसे ते मलाही वाटते. आपणालाही ते वाटत असले पाहिजे. याबद्दल माझी खात्री आहे म्हणून मी आपणास हे पत्र लिहून तसदी देत आहे.

माझ्या मते दिल्ली येथील महाराष्ट्र राज्याच्या माहिती केंद्राच्या व्यवस्थापकाला महाराष्ट्रातील निरनिराळ्या प्रदेशाबद्दल व त्यातील प्रसिद्ध व्यक्तींबद्दल माहिती असणे अवश्य आहे. त्याशिवाय महाराष्ट्राचे निरनिराळ्या प्रदेशांचे एकीकरण होणार नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्रीयेतरांना संपूर्ण महाराष्ट्राचा परिचय होण्यासाठीही ही गोष्ट अवश्य आहे. त्यात पक्षभेद नको, असे माझ्या अल्पमतीला वाटते. म्हणून मी दिनांक ५-७-१९६१ रोजी एक पत्र श्री. केळकर यांस दिल्ली मुक्कामी पाठविले व त्याच दिवशी डॉ. खरे यांच्या इंग्रजी आत्मचरित्राची एक प्रतही त्यावर आलेल्या मुंबईच्या 'मराठा' पत्रातील अभिप्रायासहित पाठविली. कारण मी डॉ. खरे यांच्या या इंग्रजी आत्मचरित्राचा प्रकाशक आहे. पत्र हवाई डाकेने दुसऱ्या दिवशी दिल्लीस पोचते. तसे ते श्री. केळकरांना दिल्लीस पोचले असलेच पाहिजे. ते पत्र वाचून त्यांना अवघड वाटले असावे म्हणून त्यांनी रजि. बुकपोस्टाने पाठविलेले पुस्तक न घेण्याचा लपंडाव केला. सदर पुस्तक माझ्याकडे दोन दिवसांपूर्वी परत आले. या पत्रासोबत मी केळकरांना दिनांक ५-७-१९६१ रोजी पाठविलेल्या पत्राची नक्कल आहे व 'मराठा'तील अभिप्रायाच्या कात्रणाचीही एक प्रत आपल्या अवलोकनार्थ पाठविली आहे. त्याबद्दल कोणताही अभिप्राय व्यक्त करण्याचे संकट मी आपणास घालीत नाही.

आपले सौजन्य, सहृदयता, समयज्ञता व सामंजस्य सुविख्यात आहे. म्हणून आपणास नम्र विनंती की आपण या बाबतीत महाराष्ट्रातील निर-

निराळ्या प्रदेशांच्या भावनात्मक ऐक्यासाठी श्री. केळकरांस मार्गदर्शन करावे व माझ्याही मनाचे समाधान करावे. कारण भावनात्मक ऐक्यासाठी मीही फार उत्सुक आहे. तसदीची माफी असावी.

आपला नम्र

**ज. रा. जोशी**

या पत्राची पोच फार तत्परतेने मुख्य मंत्र्यांकडून जोशीबुवांना आली ती अशीः—

जा. नं. सी. एम. एस./एम. पी. ६१ एस.
मुख्य मंत्र्यांचे कार्यालय,
हैद्राबाद हाऊस, नागपूर
दिनांक २९-७-६१

स. न. वि. वि.

आपले दिनांक २७-७-६१ चे पत्र मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना मिळाले, कळावे.

आपला नम्र

(सही) **श. के. खांडेकर**
पर्सनल असिस्टंट

मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना जोशीबुवांचे वरील पत्र पोचल्यावर श्री. भालजी केळकर यांस पडद्याआड कानपिचक्या दिल्या असाव्यात हे जोशीबुवांना श्री. भालजी केळकरांनी पाठविलेल्या खालील पत्रावरून दिसून येईल. ते पत्र असे--

३०-३१ यॉर्क हॉटेल बिल्डिंग
कनॉट प्लेस, नवी दिल्ली १
दि. २२ ऑगष्ट ६१

श्री. ज. रा. जोशी,
नागपूर.

सा. न. वि. वि. आपण माझ्या नावे श्री. मामासाहेब वरेरकर यांचेकडे पाठविलेले पत्र दि. २० ऑगस्टला त्यांचेकडून मला मिळाले. कारण मी जुलै महिन्यात येथे नव्हतो. पुस्तकही त्यामुळेच परत गेले. तसेच आपण मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना याविषयी पाठविलेले पत्रही त्यांचेकडून माझ्याकडे अवलोकनार्थ व उत्तरार्थ आले आहे. त्या दोहोंना हे उत्तर लिहीत आहे. मी येथे नसल्याने हा घोटाळा झाला.

माझ्या नागपूरच्या अनौपचारिक चर्चेनंतर आपणास जे वाटले ते आपण मनमोकळेपणाने लिहिलेत ते वाचून आनंद झाला. या पद्धतीनेच आपआपसातील गैरसमज नाहीसे होऊन भावनात्मक ऐक्य जवळ येईल.

मी या चर्चेत आपण उल्लेखिलेल्या व्यक्तींची नावे घेतली नाहीत हे खरे. त्या सर्वांबद्दल मला अत्यंत आदर आहे. त्यांचे कर्तृत्व निर्विवाद आहे. फक्त त्यादिवशीच्या माझ्या विवेचनातील मूळ मुद्याशी निगडित अशा निवडक व्यक्तींची काही नावे मी घेतली एवढेच. इतरांविषयी उपेक्षा वा अन्याय करण्याची बुद्धी त्यात मुळीच नव्हती. माझ्या आठवणीप्रमाणे चर्चेच्या ओघात विदर्भात चाललेल्या अभिमानास्पद संशोधनकार्याचा मी उल्लेख केलाही होता. मला वाटते आपण याविषयी निःशंक असावे. किंबहुना विदर्भातील सामाजिक, सांस्कृतिक चळवळीची अधिकाधिक माहिती आपण पुरवावी ही विनंती. तेवढयासाठीच मी त्या दिवशी इतके सविस्तर विवेचन केले.

आपण पाठविलेले पुस्तक आमच्या ग्रंथालयात आहे. डॉ. खऱ्यांचे वाङ्मय मी पूर्वीच वाचले आहे. आपण आणखी काही सुचविल्यास अवश्य विकत घेईन. कळावे ही विनंती.

आपला

**भा. कृ. केळकर**

## जोशीबुवांकडून मुख्य मंत्र्याचे आभार

भालजी केळकरांकडून जोशीबुवांना वरील पत्र आल्यानंतर त्यांनी ता. २६ ऑगस्ट १९६१ रोजी पत्र पाठवून मुख्यमंत्र्यांचे आभार मानले व त्याच दिवशी श्री. भालजी केळकरांनाही पत्र पाठवून त्यांचे आभार मानले. ही दोन्ही पत्रे येथे देतो.

बुटी–वाडा, सीताबर्डी, नागपूर
दिनांक २६–८–१९६१

माननीय श्री. यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांस—
कृ. सा. न. वि. वि.

श्री. भालजी केळकर, व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य माहिती केंद्र, नवी दिल्ली, यांच्या येथील विदर्भ साहित्य संघाच्या चर्चात्मक भाषणासंबंधी मी आपणास जे पत्र दि. २७-७–६१ ला लिहिले होते, त्याची आपण मोठ्या तत्परतेने दखल घेऊन आपल्या पी. ए. कडून मला त्याची पोच दि. २९–७–६१ ला मिळाली. त्यानंतर श्री. केळकरांकडूनही मला दि. २२–८–६१ ला पत्र आले. त्यांचा खुलासा बराच समाधानकारक आहे.

अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........


आपण माझ्या रास्त तक्रारीची ताबडतोब दखल घेऊन योग्य मार्गदर्शन करविले, याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. आपली तत्परता भावनिक ऐक्याकरिता पोषक होईल, यात शंका नाही. कळावे, अशीच कृपा असू द्यावी.

आपला नम्र
**ज. रा. जोशी**

बुटी–वाडा, सिताबर्डी, नागपूर
दि. २६–८–१९६१

श्री. भा. कृ. केळकर, व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य माहिती केंद्र,
नवी दिल्ली १,

सा. न. वि. वि. आपले दि. २२ ऑगस्ट ६१ चे पत्र मिळाले. आपल्याला माझा मुद्दा पटला हे पाहून बरे वाटले. कळावे, ही विनंती.

आपला
**ज. रा. जोशी**

## या पत्रव्यवहाराने माझे मात्र समाधान झाले नाही

या सबंध पत्रव्यवहारावरून असे दिसते की, जोशीबुवांचे समाधान झाले आहे. पण माझे स्वतःचे झाले नाही हे मी स्पष्ट करू इच्छितो. भालजी केळकर जोशीबुवांना पाठविलेल्या पत्रात असे म्हणतात की, महाराष्ट्र राज्याच्या दिल्ली येथील माहिती केंद्रात डॉ. खरे यांच्या इंग्रजी आत्मचरित्राची एक प्रत आहे. असे जरी असले तरी रजिस्टर पोस्टाने ‘ भेट ’ म्हणून पाठविलेली प्रत ‘ Refused ’ म्हणून परत करण्याचे कारण नव्हते. कोणत्याही ग्रंथालयात एखाद्या पुस्तकाच्या दोन प्रती असणे हे काही पाप नव्हे. म्हणून मी या सर्व घटनेबद्दल असे म्हणतो की, “ बुंद से गयी वो हौदसे नहीं आती. ”

## आणखीही एक ठळक उदाहरण

माझ्या इंग्रजी आत्मचरित्राचे परदेशात झालेल्या गौरवाचे व स्वदेशात झालेल्या अव्हेराचे आणखी एक ठळक उदाहरण सांगतो. या पुस्तकाची आगाऊ पत्र पाठवून सादर भेट रजिस्टर बुक पोस्टाने मी अमेरिकेचे अध्यक्ष श्री. केनेडी यांना पाठविली. ती त्यांनी मोठ्या गौरवाने आभारपत्र पाठवून स्वीकारली. अशीच भेट देण्याबद्दल मी दिल्ली येथील भारताच्या संसदेतील ग्रंथालयाच्या ग्रंथपालाला पत्र पाठविले. तो काय आश्चर्य ! त्या क्षुद्र अधिकाऱ्याचे असे पत्र आले की, पुस्तक वाचून पसंत पडले तर आम्ही ठेवून घेऊ; नाहीतर परत पाठवू;

१९५७ पावेतो मी संसदेतील लोकसभेचा सदस्य होतो. मला हा अपमान सहन झाला नाही. मी त्याला लिहिले की, हे पत्र अपमानकारक आहे. तुम्ही पुस्तकाचे पार्सल 'Refused' म्हणून परत पाठवा. म्हणजे या गोष्टीला मी प्रसिद्धी देईन किंवा पुस्तक वाचून जाळून टाका किंवा कचऱ्याच्या पेटीत फेकून द्या, त्याची मला पर्वा नाही. असे जेव्हा माझे त्राग्याचे पत्र गेले तेव्हा मग उत्तर आले की, पुस्तक पाठवा, आम्ही ठेवून घेऊ. आणि मी पुस्तक पाठविले व त्याची पावती आली. या हकीकतीवरून सरकारी छोटे मोठे कर्मचारी कांग्रेस सरकारला किती भितात हे दिसून येईल.

## जोशीबुवांचे माझ्यावरील दोन लेख

जोशीबुवा हे माझे चरित्रकार आहेत व त्यांना माझ्याबद्दल सर्व माहिती आहे. त्यामुळे त्यांनी वेळोवेळी प्रसंगानुरूप अनेक लेख माझ्याबद्दल वर्तमानपत्रात प्रसिद्ध केले आहेत. ते सर्व लेख येथे देऊन ग्रंथ वाढविण्यात हशील नाही. केवळ नमुन्याखातर दोनच लेख येथे त्या त्या वर्तमानपत्रांच्या सौजन्याने उद्धृत करतो. पहिला लेख ता. १५-५-१९६० च्या मुंबईच्या साप्ताहिक 'हिंदु' मधील आहे. तो येथे देतो.

## डॉ. खरे दिल्लीकरांना कधीच भुलले नाहीत

संपादक 'हिंदु' मुंबई यास,

आपल्या दि. २४-४ च्या अंकात मुखपृष्ठावरील 'वार्ता विचार' या मथळ्याच्या मजकुरात आचार्य अत्रे यांच्या अमर हिंद मंडळातील भाषणात 'दिल्लीच्या सत्तेला जो शरण जात नाही तोच खरा मराठा' या वाक्यावर भाष्य करताना आपण असे म्हटले आहे की, "अनेक मराठी नेते दिल्ली-करांना केव्हा तरी भुललेच आहेत. एकेका मराठी नेत्याला हाताशी धरावा, त्याला चार पाच वर्षे नाचवावा आणि तो गडबड करू लागताच त्याला फेकून द्यावा, हा कांग्रेसश्रेष्ठींच्या हातचा मळ आहे. जेधे, मोरे, हिरे, अत्रे, देशमुख, खरे आदींचा कांग्रेसश्रेष्ठींनी एकेकदा खऱ्या मराठ्यांना मारण्यासाठी उपयोग करून घेतलाच आहे."

आपल्या ह्या भाष्यातील नामावलीत डॉ. खरे यांच्या नावाचा उल्लेख पाहून मी चकितच झालो. डॉ. खरे एकेकाळी कांग्रेसमध्ये जरूर होते. पण ते दिल्लीकरांना कधीच भुलले नाहीत व कांग्रेसश्रेष्ठी त्यांना कधीच नाचवू शकले नाहीत, ही गोष्ट पुढे दिलेल्या घटनांवरून स्पष्ट होईल.

१) १९२२ मध्ये गया कांग्रेसच्या अधिवेशनात दास-नेहरू यांच्या कांग्रेसचा आणि गांधीचा कौन्सिल बहिष्कार उठविण्यासाठी स्वराज्य पक्ष स्थापन करण्याच्या उपक्रमात डॉ. खरे सामील होते.

२) १९२९ च्या लाहोर कांग्रेसमध्ये व्हाइसरॉयवर बॉम्ब फेकण्याच्या कृत्याचा निषेध करण्यासाठी खुद्द महात्मा गांधींनी विषय-नियामक समितीत मांडलेल्या ठरावाला डॉ. खरे यांनी विरोध केला.

३) १९३४ साली बिहारमध्ये फार मोठा धरणीकंप होऊन हाहाकार उडाला, त्यावेळी कांग्रेसने एक अखिल भारतीय बिहार अर्थक्वेक रिलीफ कमिटी स्थापन केली होती. या कमिटीची पहिली सभा पाटणा येथे झाली. या सभेत धरणीकंपाने पीडित झालेल्या लोकांना मदत करण्याच्या कामात कांग्रेसने सरकारशी आदरपूर्वक सहकार्य करावे असा ठराव खुद्द गांधीजींनीच मांडला. डॉ. खरे यांनी गांधींना स्पष्ट बजावले की, " तुम्ही सरकारला ' सैतानी ' हे विशेषण लावले आहे. सैतानाचा आदर कसा करायचा ? म्हणून तुम्ही हा शब्द गाळा. नाही तर मी तुमच्या ह्या ठरावाला विरोध करीन. " हा झगडा पाहून खुद्द वल्लभभाई पटेलने विरोध करू नका असे डॉक्टरांना बजावले. डॉ. खरे यांनी पटेलांना सांगितले की, हा माझ्या सदसद्विवेक बुद्धीचा प्रश्न आहे. या ठरावाला मी विरोध केल्याशिवाय रहाणार नाही. शेवटी गांधींनी तो ठराव तसाच मांडला आणि एकट्या डॉ. खरे यांनीच त्या ठरावाचा विरोध केला. ही घटना त्यावेळच्या वृत्तपत्रांनी ठळक शीर्षक देऊन प्रसिद्धिली होती.

४) १९३६ च्या फैजपूर कांग्रेस अधिवेशनापूर्वी पुढे होणाऱ्या विधान-सभेच्या निवडणुकीसाठी वऱ्हाड आणि मध्यप्रदेश या प्रांतामधून कांग्रेस तिकीटावर उभे राहणाऱ्या उमेदवारांची यादी डॉ. खरे यांनी कांग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे अध्यक्ष सरदार पटेल यांना सादर केली होती. त्या यादीतून सरदारांनी प्रभाकर दिनकर हरकरे वकील यांचे नाव गाळून त्या ठिकाणी भिकूलाल चांडक या अर्धशिक्षित मारवाड्याचे नाव घालून ती यादी तुतीकोरीन येथून प्रसिद्ध केली. हा बदल करण्यापूर्वी सरदार पटेल यांनी कोणतीच चौकशी केली नाही. डॉ. खरे यांना हा सहाजिकच अन्याय आणि अपमान वाटला व डॉ. खरे यांनी कांग्रेसमधून राजीनामा देण्याची धमकी दिली. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी फैजपूर येथे अ. भा. कांग्रेस पार्लमेंटरी बोर्डाची बैठक झाली. या खुल्या बैठकीत डॉ. खरे यांनी सरदार पटेलांवर जोराचा हल्ला केला नि सरदारांना त्यांच्या तोंडावर बजावले की, तुम्ही ब्रिटिश नोकरशाहीपेक्षा अधिक जुलमी आहा. हा प्रश्न काही मराठा नि अमराठा असा केवळ जातिविषयक नव्हता तर न्यायाचा होता. असे असताना

ऑ. इं. कां. पार्लमेंटरी बोर्डाचे सेक्रेटरी पं. गोविंद वल्लभ पंत डॉक्टरांना म्हणाले, 'अरे डॉक्टर, तू क्या मराठा होनेकी अकड दिखलाता है? मैं भी तो मराठा हूं।' यावर अध्यक्ष सरदार पटेल पंतांना म्हणाले, 'अरे पंत तू कायका मराठा है? मराठा वो है। जिसका एकेक शब्द छातीको तीरके माफक छेदता है।' पुढे भिकूलाल चांडकला बोलावून आणून त्याला डॉक्टरांची भरसभेत माफी मागावयास लावले. भिकूलालला सरदार पटेल यांचेच प्रतीक समजून डॉक्टरसाहेबांनी राजीनाम्याचा धाक मागे घेतला.

या सर्व घटना डॉ. खरे कांग्रेस श्रेष्ठींच्या तालावर नाचण्याच्या द्योतक आहेत काय? पण आपण श्वानं, युवानं, मघवानम् या व्याकरणातल्या न्यायाने डॉक्टरसाहेबांना जेधे, हिरे, मोरे यांच्याच मालिकेत गोवून त्यांच्यावर अन्याय केला आहे. वास्तविक पदाच्या आशेने म्हणा वा अन्य काही कारणाने म्हणा जेधे, मोरे हे पुन्हा कांग्रेसमध्ये गेले व हिऱ्यांनी तर कांग्रेस कधीच सोडली नाही. याच्या उलट डॉ. खरे यांची कांग्रेसमधून हकालपट्टी झाल्यावर त्यांनी कांग्रेसश्रेष्ठी, खुद्द महात्मा गांधी नि कांग्रेसवरही आपल्या वाणीने आणि लेखणीने सतत शस्त्र धरले आहे. त्यांचा हा प्रखर विरोधी प्रचार थांबावा म्हणून कांग्रेसचे चालक, मालक नि सर्व काही असलेल्या गांधींनी डॉक्टरांना पुन्हा कांग्रेसमध्ये येण्याचे पाचारण करून मुख्यमंत्री पदाचे प्रलोभनही दाखविले. पण डॉक्टरसाहेबांनी खऱ्या मराठ्याला शोभेल अशा बाणेदारपणाने गांधींच्या त्या प्रलोभनाला धुडकावून लावले. यावरून जेधे, मोरे, हिरे आणि खरे यांच्यात काहीही साम्य नाही हे उघड होते. डॉ. खरे यांच्या या बाणेदारपणामुळेच मी जो डॉ. खरे यांच्या चरित्राचा दुसरा भाग लिहिला आहे, त्याची प्रस्तावना लिहिताना गांधीवादी प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनीसुद्धा डॉ. खरे यांचे वर्णन 'खरा–मराठा' असेच केले आहे.

१९३८ च्या जुलै २५ च्या काळरात्री जेव्हा 'खरे प्रकरणा'चा शेवटचा अंक सुरू झाला तेव्हा गांधी देवतेपुढे बळी देण्याकरिता त्यावेळचे कांग्रेसचे अध्यक्ष सुभासचंद्र बोस नि सरदार पटेल, मौ. आझाद, कृपलानी, सरोजिनी नायडू आदी वर्किंग कमिटीच्या १०–१२ सदस्यांनी जेव्हा डॉ. खरे यांना सेवाग्रामला नेले तेव्हा बळी जाण्याऐवजी खऱ्या मराठ्याला शोभेल अशा गनीमी काव्याने गांधीजींच्या हस्ताक्षरातील डॉक्टरांचे राजकीय मृत्युपत्र—ज्यावर डॉक्टरांची सही गांधी मागत होते ते—डॉक्टरांनी मोठ्या चातुर्याने हस्तगत केले व पुढे त्याचा ठसाही प्रसिद्ध करून गांधींना खोटे पाडले. ही गोष्ट अखिल जगताला परिचितच आहे. मी तर असे म्हणेन की, डॉक्टरांची ही कृती शिवाजी महाराजांच्या आग्ऱ्याहून सुटकेचीच आठवण करून देणारी आहे.

दैवयोगाने पुढे १९४३ मध्ये डॉ. खरे यांची व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्ये नेमणूक झाली. तेथे डॉ. खरे यांनी हिं. सरकारच्या बालेकिल्ल्यात लोकमान्यांचे राजकारण आचरून दाखविले. त्यांच्या पाठीमागे त्यावेळी लोकांचा पाठिंबा नव्हता व कौन्सिलातही बहुमत त्यांना अनुकूल नव्हते. तरीही त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी भव्य कामगिरी केली आहे. हे भाग्य एकट्या डॉ. खऱ्यांनाच लाभले आहे. आता दुसरा कोणी असे भव्य कार्य करू शकणार नाही. कारण आता ब्रिटिश सरकारच अस्तित्वात नाही.

डॉ. खरे व्हाईसरॉयच्या कौन्सिलात अशा अवखळपणाने वागत होते की, मराठ्याप्रमाणेच वृत्ती असलेल्या वेल्श जातीच्या त्यांच्या एका सहकाऱ्याने म्हणजे सर आर्चिबाल्ड रोलंड्स या फायनान्स मेंबरने डाक्टरांच्या मराठा बाण्याचे स्मृतिचिन्ह म्हणून त्यांची पुणेरी पगडी मोठ्या आनंदाने मागून घेतली. ४ नोव्हेंबर १९४४ या दिनी दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या लोकांविरुद्ध हिंदुस्थानात ' जशास तसे ' हा निर्बंध लागू करून डॉ. खरे यांनी परतंत्र हिंदुस्थान सरकारकडून स्वातंत्र्याच्या मार्गावर पहिले पाऊल टाकविले. या घटनेचा मोठा गौरवपूर्ण उल्लेख श्री. लंकासुंदरम् यांनी आपल्या ' इंडिया इन वर्ल्ड अफेअर्स ' या पुस्तकात केला आहे. द. आफ्रिकेविषयी डॉक्टरांनी ६ नोव्हेंबर १९४४ ला केंद्रीय विधानसभेत जे भाषण केले तसे आजपावेतो कोणाही सरकारी सदस्याने केले नाही याची प्रशस्ति एक महान महाराष्ट्रीय मुत्सद्दी डॉ. जयकर यांनी लगेच दोन दिवसांनी म्हणजे दि. ८ नोव्हेंबरला डॉक्टरांना पत्र पाठवून दिली आहे. डॉ. खरे यांनी अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टी व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्ये असतांना केल्या आहेत. हे सर्व घडवून आणण्याकरिता त्यांनी कसकसे डावपेच केले हे त्यांनी नुकत्याच लिहिलेल्या इंग्रजी आत्मवृत्तावरून कळून येईल. बहुतेक महाराष्ट्रीय वृत्तपत्रकारांनी त्यांच्या या बहुमोल ग्रंथाची उपेक्षाच केली आहे. पण इंग्रजी, हिंदी आणि उर्दू पत्रांनी त्याचा चांगला परामर्ष घेतला आहे. या घटनेवरून, प्रिय बाळाराव, मराठाच मराठ्याला मारतो हे तुमचे प्रमेय सिद्ध होईल. डॉक्टरांच्या या ग्रंथाचा प्रकाशक म्हणून मी मोठ्या अभिमानाने घोषित करूं इच्छितो की डॉक्टरांच्या या ग्रंथाला सीलोन, द. आफ्रिका, इंडोनेशिया इत्यादी परदेशातून मागणी आलेली आहे.

बाळाराव, असे काही कार्य घडले आहे काय जेधे, मोरे, हिऱ्यांकडून ? अर्थात नाहीच. मग तुम्ही डॉक्टर खऱ्यांना त्यांच्या नामावळीत कसे सामील करता ? देशमुखानाही ( बहुतेक चिंतामणराव ) तुम्ही याच नामावलीत गोवले आहे. देशमुखांनी राजकारण कधी केलेले नाही. त्यांचा जन्म आय. सी. एस. च्या नोकरीत गेलेला आहे. म्हणून तुम्ही त्यांना या वादात ओढून त्यांच्यावरही अन्याय केला आहे.

आचार्य अत्रे यांच्यावरही तुम्ही त्यांना जेधे, मोरे, हिरे यांच्या मालिकेत बसवून भयंकर अन्याय केला आहे. बाळाराव, कोठे अत्रे आणि कोठे हे तिघे ! कहां राजा भोज कहां गंगा तेली ! महाराष्ट्र प्रांत नाकारून कांग्रेस श्रेष्ठींनी मराठ्यांवर अन्याय केला. जेधे, मोरे, हिरे यांनी या अन्याया-विरुद्ध झगडण्याकरिता काही विशेष केल्याचे ऐकीवात नाही. पण अत्रे यांनी तर एक प्रभावशाली आणि मजबूत 'मराठा' नावाचे दैनिक निर्माण करून आपल्या लेखणीने नि वाणीने साऱ्या महाराष्ट्रभर रान उठविले व कांग्रेस श्रेष्ठींना सळो की पळो करून सोडले आणि शेवटी या हसणाऱ्या सिंहानेच कांग्रेस श्रेष्ठींनी स्थापन केलेल्या द्विभाषिक मुंबईरूपी हत्तीचे गंडस्थळ फोडले व कांग्रेस श्रेष्ठींना महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यास भाग पाडले.

डॉ. खरे यांचा एक चरित्रकार म्हणून त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी मी हे स्पष्टीकरण आपल्याकडे पाठवीत आहे. ते आपण कृपाकरून समग्र प्रसिद्ध करावे. कळावे ही विनंती.

**ज. रा. जोशी**

जोशीबुवांचा दुसरा लेख माझ्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त ता. ३१ मार्च १९६३ च्या मुंबईच्या 'आलमगीर' साप्ताहिकात प्रसिद्ध झाला आहे. तोही येथे देतो—

**डॉ. ना. भा. खरे यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त—**

## डॉ. खरे यांचे राजकीय कार्य

२२ मार्च १९६३ रोजी डॉ. ना. भा. खरे यांनी ८२ वा वाढदिवस साजरा केला. भारताची आजपर्यंत त्यांनी जी निरपेक्ष सेवा केली, तशीच सेवा याहीपुढे त्यांच्या हातून घडो म्हणून परमेश्वराने त्यांना उदंड आयुरारोग्य द्यावे अशी मी प्रार्थना करतो. भारताला स्वातंत्र्य प्राप्त व्हावे म्हणून ज्या ज्या विभूतींचे परिश्रम कारणीभूत झाले, त्यात डॉ. खरे यांचा वाटा कोणाही भारतवासियाला अभिमान वाटावा येवढा थोर आहे. जुन्या मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांतिक कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष, मध्यप्रांत वऱ्हाडचे कांग्रेस सरकारचे पहिले मुख्यमंत्री, व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीचे सदस्य, अल्वर संस्थानचे पंतप्रधान आणि अ. भा. हिंदुमहासभेच्या वार्षिक अधिवेशनाचे लागोपाठ तीन वर्षे अध्यक्ष अशा विविध उच्च पदांवरून त्यांनी देशाची बहुमोल सेवा केलेली आहे. आता वार्धक्यामुळे प्रत्यक्ष धकाधकीच्या राजकारणातून ते जरी दूर असले तरी देशाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर वृत्तपत्राद्वारे आपल्या निर्भीड

शैलीने आपले विचार मधून मधून ते प्रकट करतातच. त्यांचे विविध कर्तृत्व किती प्रभावशाली आहे हे मी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने वाचकांच्या निदर्शनास आणून देण्याच्या इच्छेने हा लेख लिहीत आहे.

## दूरदृष्टी कोणाची ?

या समयी एका प्रसंगाचा उल्लेख करणे मला अवश्य वाटते. नागपूरचे एक कट्टर हिंदुसभा पुढारी कै. डॉ. ल. वा. परांजपे यांच्या छायाचित्राच्या अनावरण प्रसंगी श्री. बाबासाहेब खापर्डे, यांचे मुख्य पाहुणे म्हणून मोठे मार्मिक भाषण झाले. त्यात नागपूरच्या कर्त्या पुरुषांचे गुणगान गाताना बाबासाहेबांनी डॉ. खरे यांच्या राजकीय दूरदृष्टीचा उल्लेख केला. ते म्हणाले, ' १९३७ साली जुन्या मध्यप्रदेश सरकारने मान्य केलेल्या धोरणानुसार महात्मा गांधींच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या वर्धेच्या ऋॅडॉक हायस्कूलमध्ये रायफल क्लब काढण्याची परवानगी दिली होती. पण अहिंसा व्रत धारण केलेल्या महात्माजींना व त्यांच्या प्रभावळीतील बड्या पुढाऱ्यांना डॉ. खरे यांचे ते कृत्य आवडले नाही. अर्थातच डॉ. खरे यांच्या व्यतिरिक्त पं. गोविंद वल्लभ पंत, श्रीकृष्णसिंह, बाळासाहेब खेर आदी इतर निरनिराळ्या प्रांताच्या कांग्रेस मुख्य मंत्र्यांची त्यावेळी, व पुढेही १९६२ पर्यंत यशवंतराव चव्हाण, पं. रविशंकर शुक्ल, संपूर्णानंद या प्रमुख मंत्र्यांचीही असे रायफल क्लब काढण्याची हिंमत झाली नाही. पण १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केल्यावर मात्र भारताचे पंतप्रधान पं. नेहरूंपासून तो त्यांच्या छोट्यामोठ्या अनुयायांच्या तोंडी आता रायफल क्लबची भाषा ऐकू येऊ लागली आहे. यावरून देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अधिक दूरदृष्टी कोणाची ? नेहरू व त्यांचे अनुयायी यांची की डॉ. खरे यांची ? '

श्रीमान बाबासाहेबांच्या भाषणाचा हा महत्त्वाचा भाग नागपूरच्या वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाल्यावर डॉ. खरे यांचा चरित्रकार म्हणून माझ्या डोळ्यासमोर त्यांच्या राजकीय जीवनाचा समग्र चित्रपट उभा राहिला. तात्काळ मला दिसून आले की, बाबासाहेबांनी वर्णन केलेल्या घटनेची री ओढून तशा इतर अनेक घटना डॉ. खरे यांच्या राजकीय जीवनातून दाखवून देता येतील.

## सिव्हिक गार्ड बिल

देशरक्षणाच्या दृष्टीने व जातीय दंग्यांना आळा बसावा म्हणून मध्य-मध्यप्रदेशाचे मुख्य मंत्री असताना डॉ. खरे यांनी १९३८ मध्ये म्हणजे त्यांच्या पदच्युतीच्या दोन तीन महिने अगोदर ' सिव्हिक गार्ड ' नावाचे एक बिल तयार केले होते. या बिलाचा संपूर्ण मसुदा डॉक्टरसाहेबांचे त्यावेळचे मित्र श्री. माधवराव दातार व श्री. एकनाथराव पटवर्धन यांनी डॉक्टरसाहेबांच्या

पदच्युतीनंतर प्रसिद्ध केलेल्या ‘ डॉ. खरे यांची भाषणे व निवेदने ’ या इंग्रजी पुस्तकात प्रसिद्ध झाला आहे. या बिलाला डॉ. खरे यांनी त्यावेळच्या गव्हर्नराची तोंडी संमतीही घेतली होती. या बिलान्वये प्रत्येक जिल्ह्यात दोन हजार होमगार्ड जय्यत तयार ठेवण्याची जबाबदारी त्या त्या जिल्ह्यातील म्युनिसिपालिट्या व नोटीफाइड एरिया कमेटीज यांच्यावर सोपविण्यात आली होती. या बिलाला कांग्रेस श्रेष्ठींची संमती घेण्याकरिता डॉक्टरसाहेब १९३८ च्या मे महिन्यात मुंबईस गेले होते. पण त्यावेळी त्यांच्या पदच्युतीच्या कारस्थानात मग्न असलेल्या कांग्रेसश्रेष्ठींना या बिलाचे महत्त्व वाटले नाही. अहिंसेचे कंकण बांधलेल्या कांग्रेसश्रेष्ठींनी त्यावेळी डॉ. खरे यांच्या लष्कर उभारणीच्या उपक्रमाला पाठिंबा दिला नाही. पुढे १९३८ च्या जुलैमध्ये त्यांना पदच्युत करण्यात आले व त्याबरोबर त्यांचे हे बिल बारगळले, हे सांगावयास नकोच. पण काळ हा मोठा विचित्र आहे. तो कोणत्या वेळी कोणाचा कसा सूड घेईल हे सांगणे कठीण आहे. आता १९६२ मध्ये चीनच्या आक्रमणानंतर त्याने जो आपल्याला धक्का दिला तेव्हा मात्र पंतप्रधान नेहरूंपासून तो यच्चयावत सर्व लहानथोर कांग्रेसवाल्यांपर्यंत सर्वांचे डोळे लख्ख उघडले आणि जो तो आता होमगार्ड होमगार्ड म्हणून प्रचार करू लागला. यावरून डोळ्यापुढे असा प्रश्न उभा राहतो की दूरदृष्टी कोणाची ? नेहरू व त्यांच्या अनुयायांची की डॉ. खरे यांची ? वास्तविक त्यावेळी देश परतंत्र होता आणि तशा परिस्थितीत डॉ. खरे यांनी ही धडाडी दाखविली. पण त्यांच्या ह्या धडाडीबद्दल त्यांना बक्षिस काय मिळाले म्हणाल तर पदच्युती–त्यांचे कार्य नष्ट करणे.

## मेवो बंडाचा बीमोड

१९४८ मध्ये हैद्राबादच्या निजामाने घटना समितीत असलेला आपला प्रतिनिधी काढून घेतला व त्याला स्वतंत्र होण्याची वा पाकिस्तानला मिळण्याची स्वप्ने पडू लागली. हैद्राबादेत मुस्लीम रझाकारांची रक्तपात करणारी चळवळ सुरू झाली. त्यानंतर १९४८ च्या सप्टेंबर महिन्यात, महात्मा गांधी आणि बॅ. जिना यांच्या मृत्यूनंतर सरदार पटेलांनी हैद्राबादमध्ये भारतीय फौज घुसवून रझाकारांच्या बंडाचा बीमोड केला आणि निजामाला ताळयावर आणले. याबद्दल सरदार पटेलांची प्रशंसा होते आणि ती रास्तही आहे. पण असे करण्यात सरदार पटेलांनी डॉ. खरे यांचेच अनुकरण केले असे मी म्हणेन. कसे ते पहा. १९४८ च्या हैद्राबादच्या कारवाईच्या बरोबर एक वर्ष अगोदर म्हणजे १९४७ च्या जुलै ऑगस्ट सप्टेंबरमध्ये डॉ. खरे हे अलवर राज्याचे पंतप्रधान असताना त्या राज्याच्या आणि जवळच्या प्रदेशातील मुसलमानांनी आणि मेवो मुसलमानांनी जेव्हा मेवास्तान निर्माण करून तो संबंध टापू पाकिस्तानात घालण्याकरिता असेच

रक्तपात करणारे बंड उभारले, तेव्हा डॉ. खरे यांनीही अल्वर राज्याच्या फौजेचा उपयोग करून त्या बंडाचा बीमोड केला आणि अल्वर राज्य भारतात सामील करण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा केली. पण ज्या सरदारांचा हैद्राबादचे बंड मोडण्याबद्दल उदोउदो होतो, त्याच सरदारांनी डॉ. खरे यांनी अल्वरची फौज वापरून मेवो मुस्लीमचे बंड मोडले, याबद्दल डॉ. खरे यांची चौकशी केली. केवढे हे आश्चर्य ! सरदारांनी हैदराबादेत रझाकारांवर ज्या गोळ्या झाडल्या त्या काय तूपसाखरेच्या होत्या आणि डॉ. खरे यांनी अल्वरचे बंड मोडण्यासाठी ज्या गोळ्या झाडल्या त्याच फक्त शिशाच्या होत्या काय ?

## शुद्धीकरण कार्य

गोव्यामध्ये मसूरकर महाराजांनी काही वर्षांपूर्वी १० हजार ख्रिश्चन गावड्यांची शुद्धी करून त्यांना परत हिंदू धर्मात घेतले. भारताच्या एकात्मतेसाठी आणि दृढी-करणासाठी अशा कार्यांची जरूरी आहे. आपले सध्याचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांनी नुकतेच किर्लोस्कर मासिकाच्या याच महिन्याच्या अंकात जाहीर रीतीने असे उद्गार काढले आहेत की, ज्याप्रमाणे जुन्या काळी हिंदू लोकांनी शक, हूण, ग्रीक लोकांना आत्मसात करून आपल्या समाजात पचवून टाकले, त्याप्रमाणे हल्लीच्या काळी हिंदूंनी ख्रिश्चन, मुसलमान इत्यादी समाजांना प्रेमाने आत्मसात करावे. राधाकृष्णन्–सारख्या तत्वज्ञाच्या या उद्गारांमुळे मसुरकर महाराजांनी गोव्यात केलेल्या शुद्धिकार्यांचे महत्व पटते. त्याबद्दल मसूरकर महाराज गौरवास पात्र आहेत. पण डॉ. खरे यांच्या अशाच प्रकारच्या महत्वाच्या कार्यांची उपेक्षा होते. ते अल्वर राज्याचे पंतप्रधान असताना तेथील हिंदूंनी ५०,००० मुसलमानांना शुद्ध करून हिंदु समाजात मिळविले आणि यामुळे हिंदु समाजाचे दृढीकरण झाले. शुद्धकृत मुसलमानांपैकी काही लोकांना आनंद झाला असलाच पाहिजे. कारण त्यांपैकी कांहींनी त्यावेळी असे उद्गार काढले म्हणतात की आम्ही जनमेजयाचे वंशज आहोत. तेव्हा आम्ही पुन्हा हिंदु धर्मात आलो हे चांगलेच झाले.

## ठोशाचे उत्तर

डॉ. खरे हे पार्लमेंटचे सदस्य असताना श्री. सी. सी. विश्वास हे केंद्रीय कायदे आणि अल्पसंख्याक मंत्री होते. पाकिस्तानांतून येणाऱ्या हिंदु निर्वासितांबद्दल एकदा ते बोलत होते. ते म्हणाले की, या बाबतीत पाकिस्तानशी आम्ही अनेक वेळा अनेक परीने पत्रव्यवहार केला. पण पाकिस्तानकडून काही साद्च येत नाही, आता आम्ही काय करावे ? कोणी यावर मार्ग सुचवील काय ? त्याबरोबर डॉ. खरे यांनी आपली मूठ वळून ती हवेत उंच केली. त्यामुळे विश्वास जरा गडबडले. परंतु लगेच नेहरू त्यांच्या मदतीला धावले व

म्हणाले, ' डॉ. खरे यांनी सुचविलेला बळाचा मार्ग आम्ही कधी उपयोगात आणणार नाही. डॉ. खरे हे लियाकत अलीच्या पंथाचे आहेत.' पण पुढे टीचभर गोवा घेण्याकरिता बळाचा मार्ग उपयोगात आणावाच लागला आणि त्या बळात चीनशी दोन हात करतांना भारत कमी पडला म्हणून 'चाऊमाऊ पत्रावळीचे पाणी पिऊ' असे करून कान उपटून घ्यावे लागले.

## राजबंदींचे प्राणरक्षण

१९४५-४६ मध्ये मलायात सुभाषचंद्र बोस यांच्या स्वारीला मदत केली म्हणून जे शेकडो राजबंदी फासावर लटकणार होते, त्या सर्वांचे प्राण डॉ. खरे हे त्यावेळी परतंत्र हिंदुस्थान सरकारचे कार्यमंत्री असताना त्यांनी वाचविले. याच कार्यांचे वर्णन केसरीचे भूतपूर्व संपादक कै. तात्यासाहेब करंदीकर यांनी 'अद्‌भुत' म्हणून केले होते. पण पुढे १९४९ च्या मे महिन्यात पं. नेहरू हे स्वतंत्र हिंदुस्थान सरकारचे पंतप्रधान असताना त्यावेळच्या एका एस. आर. गणपती नावाच्या एकाच राजबंद्याचे प्राण वाचवू शकले नाहीत. त्याला फाशी झाली. त्याचा अपराध कोणता म्हणाल तर त्याने बिगरपरवाना शस्त्रे जवळ बाळगली होती.

१९६० मध्ये दमास्कस येथे पं. नेहरूंनी जे भाषण केले त्यात दक्षिण आफ्रिकेतील वर्णविद्वेषामुळे तेथील हिंदी रहिवाशांवर जो अन्याय होतो त्याच्या प्रतिकारार्थ आम्ही १२ वर्षांपूर्वी जशास तसेचा कायदा करून प्रतिकार केला असे सांगितले. १२ वर्षांपूर्वी म्हणजे १९४८ साल. म्हणजेच पं. नेहरूंच्या राजवटीत ही गोष्ट घडली असे होते. पण ही गोष्ट १९४४-४५ साली डॉ. खरे जेव्हा व्हाइसरायचे कायदेमंत्री होते तेव्हा घडली. म्हणून पं. नेहरूंच्या या विधानामुळे डॉ. खरे यांचे श्रेय हिरावले जाते. त्यामुळे नेहरूंनी आपले उद्‌गार दुरुस्त करावे म्हणून डॉ. खरे यांनी त्यांना एक साधे पत्र पाठवून विनंती केली. पण नेहरूंनी त्याला दाद दिली नाही. म्हणून डॉक्टरसाहेबांनी वकिला-मार्फत त्यांना नोटीस पाठविली. तरी नेहरू गप्पच बसले. म्हणून शेवटी डॉ. खरे यांनी नेहरूविरुद्ध दिवाणी कोर्टात दावा करून त्यांना आपले म्हणणे मान्य करावयास भाग पाडले. कोर्टाला सादर केलेल्या निवेदनात नेहरूंनी अशी स्पष्ट कबुलीही दिली आहे की, द. आफ्रिकेविरुद्ध लागू केलेली दंडयोजना हे डॉ. खरे यांचेच कार्य आहे. या कार्याशी माझा किंवा माझ्या पक्षाचा म्हणजे कांग्रेसचा काही संबंध नाही. म्हणजे आम्ही त्या बाबतीत काहीच केले नाही.

## अनुल्लेखाचे बक्षीस

इतकी विविध व दूरगामी परिणाम करणारी राजकीय कार्ये डॉ. खरे यांनी केली असताना १३ मार्च १९६३ च्या नागपूर येथील एका दैनिकात

महाराष्ट्रातील राजकारण आणि राज्यकारभारात निष्णात अशा लोकांची जी यादी दिली आहे त्या यादीत रानडे, टिळक, गोखले, केळकर, मुंजे, सावरकर, अणे, आंबेडकर, गाडगीळ यांची नावे आहेत. पण डॉ. खरे व नरकेसरी बॅ. अभ्यंकर यांची नावे मात्र कटाक्षाने वगळली आहेत. तरी बरे की हे दोघेही या दैनिकाच्या मूळच्या साप्ताहिक स्वरूपाचे संस्थापक होत. त्या दैनिकाची व त्याच्या संपादक चालकांची केवढी ही कृतज्ञता! या कृतज्ञतेबद्दल यांचा गौरवच केला पाहिजे!! या दैनिकात ही जी यादी आली आहे, त्या सर्व महानुभावांबद्दल माझ्या मनात सारखाच आदर आहे. पण त्या दैनिकाने वेळच आणली म्हणून थोडे पृथःकरण करणे भाग आहे. लो. ना. अणे हे व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे इंडियन ओव्हरसीज या खात्याचे १९४१ च्या ऑक्टोबरपासून ते १९४३ च्या फेब्रुवारीपर्यंत म्हणजे १६ महिने सदस्य होते. या दीर्घ काळात द. आफ्रिकेतील भारतीयांविरुद्ध चालू असलेल्या वर्णविद्वेषाच्या धोरणाविरुद्ध त्यांनी काहीही केले नाही. पण त्यांचे नाव या दैनिकाच्या राज्यकारभारपटूंच्या यादीत आहे. याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. पण डॉ. खरे यांनी लोकनायकांनी सोडलेल्या खात्याचा चार्ज १९४३ च्या मे महिन्यात घेतला आणि दोन महिन्यातच म्हणजे १९४३ च्या जुलैमध्ये द. आफ्रिकेच्या विरुद्ध जशास तसे कायदा पास करून घेतला व ४ नोव्हेंबर १९४४ या रोजी तो कायदा त्या देशाच्या विरुद्ध लागू केला, असे खास गॅझेट काढून जाहीर केले. खरे म्हणजे या दिवशी परतंत्र हिंदुस्थानचे स्वातंत्र्यपथावर पहिले पाऊल पडले. या गोष्टीचा गौरव प्रसिद्ध राजकारणी लंकासुंदरम् यांनी आपल्या 'इंडिया इन वर्ल्ड अफेअर्स' या ग्रंथात मुक्तकंठाने केला आहे. यानंतर लौकरच डॉ. खरे यांनी दक्षिण आफ्रिकेशी असलेले राजनैतिक आणि आर्थिक संबंध तोडले व त्या देशाविरुद्ध युनोमध्ये फिर्याद दाखल करून हिंदुस्थानचे दुःख जगाच्या वेशीवर टांगले. इतकेच करून डॉक्टरसाहेब थांबले नाहीत तर त्यांनी सेक्रेटरी ऑफ स्टेट पावेतो भांडून आपल्या खात्याचे इंडियन ओव्हरसीज हे क्षुद्र नाव बदलून त्याला कामनवेल्थ रिलेशन्स हे प्रतिष्ठित नाव प्राप्त करून घेऊन आपल्या खात्याला परराष्ट्रीय राजकारणाचा दर्जा प्राप्त करून घेतला व अमेरिकेशी भांडून तेथे स्थायिक झालेले हिंदी लोक जे तेथील कायद्याप्रमाणे तेथील नागरिकत्वाच्या अधिकाराला पात्र नव्हते, त्यांना पात्रता मिळवून दिली. हे कार्य करणारे डॉ. खरे हे सदर दैनिक आणि त्याचे संपादक यांच्या मताप्रमाणे राजकारणपटु नाहीत. या त्यांच्या उपेक्षेमुळे त्यांचा चरित्रकार या नात्याने मला जे दुःख होते, तेच मी व्यक्त केले आहे.

हे दैनिक ज्यांचे स्मारक म्हणून चालविले जात आहे, आणि ज्यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी व राजकारणासाठी आपल्या जीवनाचा होम केला, त्या कै. नरकेसरी अभ्यंकरांचेही नाव या दैनिकाच्या यादीत येऊ नये, याबद्दल त्याला काय म्हणावे तेच समजत नाही !

शिवराज प्रकाशन ( महाराष्ट्राच्या ) विरुद्ध दाखल केलेल्या दिवाणी दाव्यात जोशीबुवांना न्याय मिळाल्याबद्दल नागपूरच्या महापौरांचे अभिनंदन पर पत्र.

श्री. ज. रा जोशी २८ जून १९६३

यांना स. न. वि. वि.

आपला बऱ्याच दिवसांपासून चाललेल्या खटल्याचा निकाल आपल्याकडून लागला हे वाचून फार आनंद झाला. आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो.

आपणासारखा अविरत कष्टाडकष्ट करणाऱ्या पत्रकारास न्यायालयातर्फे योग्य तो निवाडा प्राप्त झाला ही त्या परमपूज्य संत एकनाथ स्वामींचीच कृपा समजली पाहिजे. सध्याचे व्यवहारी जगात आपणासारखे शालीन पत्रकार उपेक्षिलेच जात आहेत.

अनेक शुभेच्छेसह,

**श्री. ज. रा. जोशी**
दै. ' महाराष्ट्र ' कार्यालय
महाल, नागपूर

नम्र
**त्रि. गो. देशमुख**

## अन्य चहात्यांकडून जोशीबुवांचा गुणगौरव

जोशीबुवांनी जरी माझी प्रशंसा करणारे लेख प्रसिद्धिले असले तरी त्याचे आश्चर्य वाटावयास नको. कारण त्यांना माझ्याबद्दल सर्व माहिती आहे व ते माझे चरित्रकारही आहेत. पण मी मात्र या प्रकरणात जोशीबुवांबद्दल प्रशंसोद्‌गार न काढण्याचे ठरविले आहे. कारण मी जर प्रशंसोद्‌गार काढले तर ते ' परस्परं प्रशंसंति ' या सदरात पडेल व उपहासाला पात्र होऊ शकेल. असे जरी असले तरी या पुस्तकाच्या वाचकांच्या माहितीसाठी जोशीबुवांबद्दल त्यांच्या काही अन्य चहात्यांनी काय लिहिले आहे, ते या पुस्तकात उद्‌धृत करणे समुचित होईल. प्रा. श्री. भा. वर्णेकर यांनी ' पुरुषार्थ ' मासिकाच्या १९५९ च्या मे महिन्याच्या अंकात जोशीबुवांबद्दल खालील लेख लिहिला.

### खरे-केदार चरित्रकार

## श्री. ज. रा. जोशी यांचा परिचय

नागपूरच्या महाराष्ट्राचे उपसंपादक श्री. जगन्नाथ रामचंद्र जोशी यांनी लिहिलेल्या डॉ. केदार यांच्या चरित्रग्रंथाला, नागपूर विश्वविद्यालयाने १९५९ च्या दीक्षांत महोत्सवात १९५८ चे वाङ्मयीन पारितोषिक व सुवर्णपदक देऊन जो गौरव केला तो अत्यंत समुचित होय. उत्कृष्ट चरित्रकार म्हणून श्री. जगन्नाथराव जोशी यांची ओळख त्यांच्या खरे चरित्राने मराठी साहित्यिकांना यापूर्वीच झालेली आहे. तथापि, ही ओळख पटण्यापूर्वीचे त्यांच्या जीवनातील चढउतार वाचकांना विशेष माहीत नसल्याने ते निवेदन करणे अत्यंत आवश्यक वाटते.

विदर्भातील श्री. बालाजीच्या यात्रेचे ठिकाण म्हणून पंढरपूर इतकेच प्रसिद्ध असलेले देऊळगावराजा ( जि. बुलढाणा ) येथे जगन्नाथरावांचा जन्म २७ सप्टेंबर १९०६ रोजी झाला ( भाद्रपद शु. ८, बुधवार ). त्यांचे प्राथमिक ६ वर्षांचे ( व्हर्न्याक्युलर फायनल ) शिक्षण येथेच झाले. त्यानंतर पुढील इंग्रजी शिक्षण नाशिकच्या अनाथ विद्यार्थी गृहात राहून व मधुकरी मागून करण्यासाठी श्री. जोशी तेथे गेले; पण तेथे राहण्याचे न जमल्यामुळे नाशिकहून ते नागपुरास आले. नागपूरचे विख्यात साहित्यिक—तुलसीरामायणाचे प्रथम मराठी भाषांतरकार—श्रीमंत यादवरावजी जामदार ( जहागिरदार ) यांच्या घरी राहून शिक्षण करण्याचे भाग्य या संकटकाळी श्री. जोशी यांना लाभले. परमपूजनीय सरसंघचालक श्री. गोळवलकर गुरुजी हेही त्यावेळी (१९१८–२५) त्याच जामदारांच्या वाड्यात राहून नीलसिटी हायस्कुलात आपले शिक्षण करीत होते. प. पू. गुरुजींच्या तत्कालीन समवयस्क मित्रमंडळीत श्री. जोशी हे सर्वात अधिक निकटचे मित्र होते. श्री. गुरुजींच्या बालमैत्रीतील अनेक आठवणी श्री. जोशी हे मोठ्या आनंदाने व अभिमानाने चटकदारपणे रंगवून सांगतात. श्री. गुरुजी हे आज अखिल भारताचे मान्यवर नेते म्हणून असंख्य कामात व्यग्र असले तरी त्यांना आपल्या या बालमित्राची नित्य आठवण असते. श्री. जोशी यांनी आयोजिलेल्या डॉ. खरे यांच्या अमृत-महोत्सव प्रसंगी भाषण करतांना प. पू. गुरुजींनी या आपल्या मैत्रीची आठवण श्रोत्यांना करून दिली होती.

आर्थिक व इतर अडचणींमुळे श्री. जोशी यांना मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण संपविणे अशक्य झाले. तथापि वाङ्मयीन व सार्वजनिक कार्याकडे त्यांचा विशेष ओढा असल्याने ते त्यामध्ये विशेष आस्थेने समरस होऊ लागले. सीताबर्डी

सार्वजनिक गणेश उत्सवमंडळाच्या प्रदर्शनाचे कार्यवाह, 'प्रगति' मासिकाचे संपादक, प्रा. या. मु. पाठक यांच्या 'विहंगम' मासिकाचे प्रबंध-संपादक व इतर कित्येक नियतकालिकांचे स्तम्भलेखक या नात्याने श्री. जोशी महाशयांची लोकसेवा अविरत चालू होती. १९३५ साली विहंगम बंद पडल्यावर त्यावेळच्या द्वि साप्ताहिक महाराष्ट्रात उपसंपादक म्हणून कै. दादासाहेब ओगले यांनी त्यांना नियुक्त केले. गेले पावशतक श्री. जोशी हे महाराष्ट्रात राहून आपल्या स्वभावानुसार जनतेचे व मराठी साहित्याचे सेवाकार्य करीत आहेत.

दि. २६ जानेवारीच्या गणराज्यदिनी डॉ. खरे यांनी आपल्या निवासस्थानी आचार्य प्र. के. अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली नागपुरातील गण्यमान्य साहित्यिकांच्या मेळाव्यात श्री. जोशी यांचा फार मोठा सत्कार केला. त्याचप्रमाणे दि. ११-२-५९ रोजी येथील विदर्भ साहित्य संघानेही त्यांचा गौरव केला. अशा रीतीने उत्कृष्ट साहित्यसेवक म्हणून श्री. जगन्नाथरावांचा परिचय मराठी जनतेला झालेला आहे.

महाराष्ट्रातील अखिल भारतीय कीर्तीच्या राजकीय कार्यकर्त्यांमध्ये कडव्या बाणेदारपणाने व प्रसंगविशेषी आपल्या लोकप्रियतेला बाधा आणणाऱ्या सडेतोड सत्यवक्तृत्वाने विशेष गाजलेले डॉ. ना. भा. खरे यांच्या विविध घटनापूर्ण चरित्राचे दोन भक्कम खंड ( पहिला खंड ५०० पाने व दुसरा खंड ५०० पाने क्राऊन ) एकामागून एक प्रकाशात आणून श्री. जगन्नाथराव जोशी महाशयांनी आपल्या श्रद्धेय चरित्रनायकालाच नव्हे तर अर्वाचीन काळातील ऐतिहासिक घटनांबद्दल मूलग्राही जिज्ञासा बाळगणाऱ्या सर्व वाचकांना नित्याचे ऋणी करून ठेवले आहे. भारताच्या आधुनिक राजकीय घटनांचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, पं. जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, या सारख्या नामवंत लोकाग्रणींच्या चरित्रग्रंथांना जे महत्त्व आहे, तेच महत्त्व डॉ. खरे यांच्या चरित्रालाही आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. एक उत्कृष्ट प्राणाचार्य, नागपूर प्रांतिक कांग्रेसचे बिनीचे कार्यकर्ते, मध्यप्रदेशाच्या पहिल्या कांग्रेस मंत्रिमंडळाचे मुख्य मंत्री, प्रत्यक्ष महात्मा गांधींच्या वर्तनातील तत्त्वच्युती जगापुढे कंठरवाने सांगणारे गांधीविरोधी, व्हाइसरायच्या कार्यकारी मंडळाचे तेजस्वी सभासद, अल्वरचे पंतप्रधान, हिंदुमहासभेचे संकटकालीन अध्यक्ष, या व्यतिरिक्त नागपूर प्रांतातील व शहरातील अनेक सामाजिक संघटनांचे आधारस्तम्भ इत्यादी अनेक दृष्टींनी डॉ. खरे यांचे संपूर्ण चरित्र मोठे अभ्यसनीय आहे. श्री. जगन्नाथराव जोशी व डॉ. खरे यांचे ऋणानुबंध असे विलक्षण आहेत की, डॉ. खरे यांचे अधिकृत व सप्रमाण

चरित्र लिहिण्यास अखिल महाराष्ट्रात तेच एकमात्र अधिकारी व्हावेत. श्री. जोशी लिखित डॉ. खरे यांच्या चरित्राचे दोन्ही खंड अनेक कारणास्तव इतके महत्त्वाचे आहेत की, हिंदी-इंग्रजीसारख्या अतिप्रचलित सार्वत्रिक भाषांतून त्याच्या भाषांतरित आवृत्त्या लवकर प्रकाशित व्हाव्यात.

डॉ. खरे यांच्या जीवनाप्रमाणेच नागपूरचे विख्यात विधिज्ञ व नागपूर विश्वविद्यालयाचे अद्वितीय कुलगुरु डॉ. केदार यांच्याही जीवनाशी श्री. जोशी यांचा निकट संबंध आला. डॉ. केदारांचे जीवन डॉ. खरे यांच्या जीवनासारखेच अष्टपैलू! मूलग्राही व सर्वंकष पाण्डित्य हा केदारसाहेबांच्या व्यक्तित्वातील विशेष गुण. त्याला त्यांच्या धडाडीच्या कर्तृत्वाची जोड लाभल्यामुळे विशेष महत्त्व आले होते. वकिलीच्या व विविध सार्वजनिक कामांच्या जंजाळातून मन मुक्त करून वैदिक वाङ्मय, कालिदास, नाट्यवाङ्मय, यासारख्या पण्डितगम्य विषयांमध्ये चिन्तनरत होण्याची अलभ्य शक्ती डॉ. केदारांच्या ठिकाणी होती. अशा पाण्डित्यसम्पन्न कार्यकर्त्यांच्या वैचारिक जीवनाचे संपूर्ण आकलन करणे मोठे कठीण; पण श्री. जगन्नाथराव जोशी महाशयांनी आपल्या संपादकीय कामातून व सांसारिक दगदगीतून वेळ काढून तेही कार्य मोठ्या कौशल्याने करून दाखविले.

नागपूर-वऱ्हाड प्रांतात गेल्या पाऊणशे वर्षांत असे अनेक थोर पुरुष होऊन गेले आहेत की, ज्यांच्या कर्तृत्वपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा परिचय अखंड ( संयुक्त नव्हे ) महाराष्ट्रास होणे अत्यंत आवश्यक आहे. नागविदर्भाचा मराठी समाज पुणे-मुंबईच्या समाजाच्या तुलनेने फारच मागासलेला आहे असा विचित्र ग्रह पुणे-मुंबईकडे फार मोठ्या प्रमाणात पसरला असल्याची सार्वत्रिक बोलवा आहे. हा ग्रह पसरण्याची इतर काय वाटेल ती कारणे असोत, आमच्या मते नाग-विदर्भातील गेल्या पाऊणशे वर्षातील विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजविणाऱ्या अनेक थोर पुरुषांच्या जीवनाचा व्हावा तसा परिचय अखंड महाराष्ट्राला झालेला नाही, हे एक प्रमुख कारण आहे. लोकमान्य टिळकांचे उजवे-डावे हात म्हणून गाजलेल्या कार्यकर्त्यांची, किंवा डॉ. मुंजे, अभ्यंकर यांसारख्या अतिरथी महारथींची सविस्तर व साधार चरित्रे नाग-विदर्भातील साहित्यिकांनी अद्यापि लिहिलेली नाहीत. नागविदर्भातील साहित्यिकांतील हा दोष श्री. जगन्नाथराव जोशी यांनी प्रथम दूर केलेला आहे, हे विसरून चालणार नाही. त्यांचे अनुकरण करून नागपूर विदर्भातील लेखकवर्ग स्वतःला आदरणीय वाटणाऱ्या निरनिराळ्या क्षेत्रातील वैदर्भीय लोकाग्रणींची उत्कृष्ट चरित्रे अखंड महाराष्ट्रांतील जनतेपुढे प्रकाशात आणतील तर पुणे-मुंबईकडील मंडळीच्या मनातील विपरीत ग्रह दूर होण्यास फारसा

अवधी लागणार नाही. महाराष्ट्र व विदर्भ यांचे भावनात्मक ऐक्य घडवून आणण्याचे कार्य केवळ काही सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या करून होणार नाही. त्यासाठी श्री. जोशी यांच्याप्रमाणे विधायक कार्य करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

श्री. जगन्नाथरावांनी आजवर निर्माण केलेले चरित्रग्रंथलेखनाचे कार्य नितांत प्रशंसनीय असले तरी त्यांच्यापासून अशाच प्रकारच्या कार्याची अपेक्षा करणे अनुचित होणार नाही. आजवर त्यांनी ज्या तऱ्हेने नागपूर विदर्भातील दोन थोर व्यक्तींचा परिचय महाराष्ट्रास करून दिला तसा आणखीही काही प्रमुख व्यक्तींचा परिचय करून द्यावा, एवढीच आमची अपेक्षा आहे.

मुंबईच्या 'आलमगीर' साप्ताहिकाने ता. ७ जुलै १९६३ च्या अंकात 'परिचित अपरिचित' या सदराखाली जोशीबुवांबद्दल लिहिलेला लेख येथे देतो—

नागपूरचे एक जुने व अनुभवी वृत्तपत्रकार आणि महाराष्ट्र दैनिकाचे सहसंपादक श्री. जगन्नाथ रामचंद्र जोशी हे आघाडीवर राहून चमकणारे पत्रकार म्हणून गाजावाजा झालेले गृहस्थ नसले तरी ही उणीव डॉ. खरे चरित्रकार हे बिरुद त्यांच्यामागे लागल्यामुळे भरून निघालेली आहे. डॉ. खरे यांचे विस्तृत चरित्र दोन खंडात लिहून प्रसिद्ध केल्यानंतर त्यांनी इतरही लोकनेत्यांचे अनेक सरस चरित्रग्रंथ लिहून साहित्यसेवा करण्याचा उपक्रम आरंभला व त्याबद्दल त्यांचा जाहीर गौरवही झाला. पण अशा प्रकारे स्वकार्यरत असणाऱ्या सज्जनांवरही हितशत्रूंच्या रोषाला बळी पडण्याची आपत्ती ओढवत नाही असे नाही आणि महाराष्ट्र पत्रातील त्यांच्या ३० वर्षांच्या सेवेची बूज न करता काही तरी खुसपट काढून त्यांना नोकरीवरून तडकाफडकी बडतर्फ करण्यात आल्यामुळे तशा आपत्तीला श्री. जोशी यांनाही तोंड देणे भाग पडले. तथापी ह्या आपत्तीविरुद्ध ते गेली चार वर्षे मोठ्या चिकाटीने झगडत राहिले आणि अखेरीस त्यांच्यावरील अन्याय ही सामूहिक औद्योगिक कलहाची बाब ठरून न्यायालयाने त्यांना बडतर्फ करणाऱ्या महाराष्ट्र पत्र चालविणाऱ्या कंपनीच्या मॅनेजिंग एजंटचे कृत्य दुष्टबुद्धीचे, लहरीपणाचे व सूडबुद्धीचे होते असाही शेरा मारण्यास कोर्ट विसरले नाही. श्री. जगन्नाथराव जोशी हे गेल्या आठवड्यात प्रकाशात चमकले ते याच नव्या झळाळीचा लाभ त्यांना झाल्यामुळे व त्याबद्दल आम्ही त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो.

वास्तविक श्री. जोशी यांना पुनः नोकरीवर घेणेही चालकांना भाग पडले असते. पण त्यांचे ५७ वर्षांचे वय आणि जिथे दीर्घकाळ सेवा केली तिथेच विषादमय वातावरणात पुनः त्यांनी काम करणे त्यांनाच सुखकारक होणार

नाही या कल्पनेने त्यांना पुनः नोकरीवर न घेता त्यांना ३५०० रुपयांची नुकसानभरपाई देण्याचा हुकूम कोर्टाने दिला. त्याखेरीज इतरही येणे त्यांना आता मिळणार आहे व युनियनलाही खर्चादाखल २५० रुपये देण्याचा हुकूम झाला आहे. श्री. जोशी यांच्या वतीने डॉ. य. खु. देशपांडे, श्री. पु. य. देशपांडे, प्रा. सुरेश डोळके, आणि श्री. मा. ज. कानेटकर यांच्या साक्षी झाल्या व नागपूर टाइम्स, हितवाद, नवभारत या पत्रांच्या संपादकीय खात्यातील मंडळींनीही,-एवढेच नव्हे तर महाराष्ट्र संस्थेमधल्या त्यांच्या सहकाऱ्यांनीही श्री. जोशी यांचीच बाजू उचलून धरली. नागपूरच्या पत्रसृष्टीत श्री. जोशी यांच्याबद्दल प्रेमादराची भावना किती मोठ्या प्रमाणात वसत आहे याचाच पुरावा त्यामुळे पुढे आला आहे. त्यांच्या साहित्यकार्यविषयक लौकिकापेक्षाही या विजयाचे महत्व विशेष वाटते, कारण त्यामुळे श्री. जोशी यांचे अजातशत्रुत्वही प्रकट झाले आहे. एखाद्या खंद्या लेखकाचे हे वैशिष्ट्य विलोभनीय नाही असे कोण म्हणेल ? पुनः एकवार अभिनंदन.

शेवटी ता. १८ जानेवारी १९६२ च्या 'तरुण भारता'त प्रा. सुरेश म. डोळके यांनी जोशीबुवांबद्दल जो विस्तृत लेख लिहिला आहे तोही येथे देतो.

## खरे-चरित्रकार जोशी

लेखक—प्रा. **सुरेश म. डोळके**, नागपूर

श्री. जगन्नाथ रामचंद्र जोशी हे 'खरे-चरित्रकार जोशी' या नात्याने नागपूरकरांना गेल्या दीड तपापासून परिचित आहेत. डॉ. खरे यांच्या धीरगंभीर व युयुत्सु जीवनाशी श्री. जोशी हे इतके समरस झालेले आहेत, की डॉ. खरे यांचे चरित्रकार हे त्यांचे केवळ एक वस्तुनिष्ठ नाते न राहता, 'खरे-चरित्रकार' हे त्यांचे ऐक आत्मनिष्ठ व यथार्थ असे विशेषणच होऊन बसले आहे. श्री. जोशी यांनी 'महाराष्ट्रासारख्या प्रसिद्ध वृत्तपत्रात सुमारे २५ वर्षे उपसंपादक म्हणून काम केलेले असले, तरी त्यांचा पिंड हा खरा साहित्यिकाचा आहे आणि म्हणूनच, वृत्तपत्रात उपसंपादकाचे काम करताना तारांची भाषांतरे, सभा-संमेलनाचे वृत्तांत किंवा बातमी-पत्रांचे संपादन अशा तात्कालिक व तथाकथित साहित्यनिर्मितीवरच समाधान न मानता ते चरित्रवाङ्मयाकडे वळले व डॉ. खरे, डॉ. केदार इत्यादी धुरीणांची विस्तृत व विश्वसनीय चरित्रे लिहून त्यांनी विदर्भातल्या चरित्रलेखकात मानाचे स्थान प्राप्त करून घेतले. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचा सन्मान्य अपवाद सोडला तर पदवी किंवा पांडित्य यांपैकी काहीही पाठीशी नसताना, वृत्तपत्राचा व्याप

संभाळून, स्वतंत्र ग्रंथनिर्मिती करणारे श्री. जोशी हे विदर्भातील एकमेव ग्रंथकार आहेत.

## देऊळगावराजाचे वतनदार जोशी

श्री. जोशी यांचा जन्म देऊळगाव राजा (जि. बुलढाणा) येथे २७ सप्टेंबर १९०६ रोजी झाला. देऊळगाव हे यात्रेचे ठिकाण म्हणून पंढरपुराइतकेच प्रसिद्ध आहे. लखुजी जाधवाचे नातू राजे जगदेवराव यांनी देवळी या मूळच्या खेडेगावात 'पेठ' वसवून आपल्या जाधवराईची सूत्रे सिंदखेडवरून देऊळगावराजाला आणली व देऊळगावराजा हाच आपल्या पराक्रमी राजकारणाचा केन्द्रबिंदु ठरविला. देऊळगावराजाला आल्यावर जगदेवरावांनी तिथे (इ. स. १६८५–९० च्या सुमारास) बालाजीचे देऊळ उभारले व त्याची यात्राही सुरू केली. त्याच देऊळगावराजाचे श्री. जोशी हे वतनदार जोशी आहेत.

## जामदारांच्या घरी राहण्याचे भाग्य

श्री. जोशी यांचे मराठी सहा इयत्तेपर्यंतचे शिक्षण देऊळगावराजा येथेच झाले. त्यानंतर १९१८ साली त्यांना पुढील शिक्षणाकरिता त्यांचे वडील बंधु श्री. रंगनाथराव यांनी नागपूरला आणले. पण, त्यांच्या राहण्याची वगैरे व्यवस्था न जुळल्यामुळे त्यांच्या बंधूंनी त्यांना नाशिक येथे नुकत्याच सुरू झालेल्या 'अनाथ विद्यार्थी गृहा'त पाठविले. तिथे श्री. जोशी यांनी मधुकरी मागून इंग्रजी शिक्षण घेण्यास प्रारंभ केला. पण एक महिन्यातच ते अनाथ विद्यार्थी गृह बंद पडले, व नाशिकला राहण्याची सोय न जमल्यामुळे श्री. जोशी नागपूरला परत आले. नागपूरला आल्यावर त्यांना येथील विख्यात साहित्यिक व तुलसीरामायणाचे आद्य मराठी भाषांतरकार श्रीमंत यादवरावजी जामदार यांच्या घरी राहून विद्याभ्यास करण्याचे भाग्य लाभले. यादवरावजींचे निकटचे नातलग श्री. मधुकरराव गोळवलकर (गोळवलकर गुरुजी) हेही त्यावेळी जामदारांच्या वाड्यात राहून नील सिटी हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होते. प. पू. गुरुजींच्या तत्कालीन समवयस्क मित्रमंडळीत श्री. जोशी हे त्यांचे सर्वांत निकटचे मित्र होते. गुरुजींना आपल्या या बालमित्राची सदैव आठवण असते, किंबहुना, डॉ. खरे यांच्या अमृत महोत्सवप्रसंगी भाषण करतांना गुरुजींनी आपल्या या बालमैत्रीची आठवण श्रोत्यांना जाहीरपणे करून दिली होती.

## 'महाराष्ट्र'त प्रवेश

श्रीमंत जामदारांच्या घरी राहून श्री. जोशी हे नील सिटी हायस्कुलात शिक्षण घेत होते. पण आर्थिक व इतर अडचणींमुळे त्यांना मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होता आले नाही. पुन्हा 'पुढे काय ?' हा प्रश्न त्यांच्यापुढे दत्त म्हणून

उभा राहिला. पण देऊळगावराजाच्या जोशी घराण्यात जन्म झाल्यामुळे व यादवरावजी जामदार यांच्या धार्मिक घराण्यात विद्यार्जनाचा काळ गेल्यामुळे श्री. जोशी यांच्यातील धार्मिक वृत्तीच्या बाळकडूचा परिपोष झाला. पुढे हिस्लॉप कालेजातील मराठीचे विद्वान प्राध्यापक व संतसाहित्याचे व्यासंगी अभ्यासक डॉ. शं. दा. पेंडसे यांच्याशी त्यांचा परिचय झाला व डॉ. पेंडसे यांच्या शिफारसीने श्री. जोशी यांना 'ऑल इंडिया रिपोर्टर' मध्ये नोकरी मिळाली. तिथे ५ महिने काम केल्यावर, नंतरची दीडदोन वर्षे त्यांनी कधी नोकरी तर कधी स्वतंत्र व्यवसाय करण्यात घालविली. तथापि, वाङ्मयीन व सार्वजनिक कार्य करण्याची हौस त्यांना पूर्वीपासूनच असल्यामुळे त्यांनी चरक-शाखीय ब्राह्मण विद्यार्थी-संघातर्फे निघत असलेल्या 'प्रगति' मासिकाचे संपादकत्व स्वीकारले. त्यांनी एक वर्ष भर 'प्रगती'चे संपादन इतक्या उत्कृष्ट रीतीने केले, की त्यावेळी नागपुरास लवकरच निघणार असलेल्या 'विहंगम' मासिकाचे संपादक व महाराष्ट्राचे ख्यातनाम कवि श्री. या. मु. पाठक यांनी आपला एक कार्यालयीन मदतगार म्हणून श्री. जोशी यांची १९३२ साली, 'विहंगमा'च्या अगदी पहिल्या अंकापासून, नियुक्ति केली. १९३५ साली विहंगम बंद पडण्याच्या सुमारास श्री. जोशी यांचे एक जिव्हाळ्याचे मित्र प्रा. भ. श्री. पंडित यांनी 'महाराष्ट्रा'च्या संपादक मंडळातील प्रमुख सदस्य श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या मध्यस्थीने श्री. जोशी यांना 'महाराष्ट्र' या द्विसाप्ताहिकात नोकरी मिळवून दिली. जानेवारी १९३५ पासून मार्च १९५९ पर्यंत श्री. जोशी हे महाराष्ट्रा'च्या संपादकीय खात्यात काम करीत होते. १९३८ साली भारतात गाजलेल्या 'खरे-प्रकरणा'चे जे रिपोर्टिंग श्री. जोशी यांनी केले, त्याच्या उत्कृष्टत्वामुळे 'महाराष्ट्रा'चे मुख्य संपादक श्री. दादासाहेब ओगले यांचीही मर्जी त्यांना संपादन करता आली. किंबहुना, या उत्कृष्ट रिपोर्टिंगमुळेच श्री. जोशी यांच्यावर डॉ. खरे यांचे चरित्र लिहिण्याची कामगिरी श्री. माडखोलकर यांनी पुढे सोपविली, असे म्हटले पाहिजे.

## खरे-चरित्र लिहिण्याची सूचना

१९४२ च्या सुरुवातीस डॉ. खरे यांच्या चाहत्यांनी नागपूर येथील टिळक विद्यालयात एक सभा बोलावून, डॉ. खरे यांचा ६२ वा वाढदिवस जाहीर रीतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला. या वाढदिवसप्रसंगी डॉ. खरे यांचे एक छोटेसे चरित्रही प्रकाशित करावे असे सभेने ठरविले; व हे चरित्र लिहिण्याची कामगिरी सर्वांनी श्री. माडखोलकर यांच्यावर सोपविली. पण श्री. माडखोलकर यांनी, डॉ. खरे व श्री. जोशी यांचे जिव्हाळ्याचे संबंध लक्षात घेऊन, हे काम श्री. जोशी यांचेवर सोपवावे अशी

लगेच सूचना केली व स्वतः श्री. जोशी यांना या कामात सर्वतोपरी मार्गदर्शन करण्याचे मान्य केले.

## ‘खरे–चरित्रा’तील जिव्हाळा

श्री. जोशी यांनी वर्षभर परिश्रम करून डॉ. खरे यांचे, ते व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य होईपर्यंतचे चरित्र लिहून काढले व त्याचा प्रकाशन व समर्पण समारंभ ५ ऑगस्ट १९४३ रोजी, डॉ. खरे हे व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य असताना, दिल्लीस घडवून आणला. माडखोलकरांनी डॉ. खरे यांचे चरित्र लिहिण्याची कामगिरी श्री. जोशी यांच्यावर सोपविली व चरित्र–लेखनात त्यांना मार्गदर्शन केले हे तर श्री. जोशी यांच्या खरे-चरित्राचे एक कारण होतेच, पण त्यापेक्षाही डॉ. खरे यांचे चरित्र लिहिण्यास श्री. जोशी हे का प्रवृत्त झाले व हे चरित्र त्यांच्या लेखणीतून इतक्या जिव्हाळ्याने व घरगुती गोडव्याने का उतरले, याचे आणखीही एक महत्त्वाचे कारण आहे. ते असे : श्री. जोशी हे १९३८ साली जिवावरच्या दुखण्याने आजारी असताना डॉ. खरे यांनी आपल्या औषधोपचारांनी त्यांना जीवदान दिले. श्री. जोशी हे त्या आजारातून उठले. प त्या आजारात डॉ. खरे यांनी त्यांना केलेल्या निरपेक्ष व घरगुती जिव्‍ याच्या औषधोपचाराचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. एक निष्णात धन्वंतरी हा डॉ. खरे यांचा लौकिक प्रांतात व प्रांताबाहेरही गाजत होता; पण, श्री. जोशी यांना या आजारात डॉ. खरे यांच्यातला ‘माणूस’ अनुभवास आला. या माणुसकीने ते प्रभावित झाले व या प्रभावानेच त्यांनी लिहिलेले डॉ. खरे यांचे चरित्र उजळून निघालेले आहे. डॉ. खरे यांच्या चरित्रात श्री. जोशी यांच्या हृदयीचा जिव्हाळा आहे, भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात अहमहमिकेने भाग घेणाऱ्या एका देशभक्ताचे सहृदय जीवनदर्शन आहे व आपल्याला जीवनदान देणाऱ्या धन्वंतरीबद्दलची कृतज्ञताही आहे. श्री. जोशी यांनी याच पद्धतीने डॉ. केदारांचेही विस्तृत चरित्र लिहिले आहे. पण, डॉ. खरे यांच्या चरित्रात केवळ वस्तुनिष्ठ दृष्टीचे जोशी दिसत नाहीत, तर चरित्रनायकाच्या धीरगंभीर व युयत्सु जीवनाशी, व विशेषतः त्याच्यातल्या संजीवक माणुसकीशी, समरस झालेले जोशीबुवा दिसतात. “ ‘खरे–चरित्रकार’ हे श्री. जोशी यांचे केवळ एक वस्तुनिष्ठ नाते न राहता, ‘खरे–चरित्रकार’ हे त्यांचे एक आत्मनिष्ठ व यथार्थ असे विशेषणच होऊन बसले आहे” असे जे मी सुरुवातीला म्हटले, ते याच अर्थाने.

श्री. जोशी यांनी लिहिलेल्या डॉ. खरे यांच्या चरित्रात इतर वाङ्मयीन गुण काय असतील ते असोत, पण हृदीचा जिव्हाळा मात्र भरपूर आहे. चरित्र-

नायकाबद्दल चरित्रकाराच्या ठिकाणी आत्मीयतेची भावना असल्याशिवाय चरित्रकार त्याच्या व्यक्तित्वाशी समरस कसा होऊ शकेल ? आणि त्याच्या अंतरंगात शिरून त्याच्या मनाचे अंतरंग तरी त्याला उलगडून कसे दाखविता येईल ? व ते दाखविता आल्याशिवाय चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचे सहृदय चित्रण तरी तो कसा करू शकेल ?

## खरे-चरित्राच्या दुसऱ्या भागाचे अनन्य वैशिष्ट्य

ज्या दिवशी श्री. जोशी यांनी खरे चरित्राचा पहिला भाग दिल्ली येथे प्रकाशित केला, त्याच दिवशी रात्री श्री. ए. श्री. पटवर्धन व श्री. माधवराव दातार यांच्याशी गप्पागोष्टी करतांना डॉ. खरे यांच्या व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळातील उज्वल कामगिरीचे मूल्यमापन केल्याशिवाय डॉ. खरे यांच्या चरित्राला पूर्णता यावयाची नाही, असे श्री. पटवर्धन व दातार म्हणाले. व त्यामुळे श्री. जोशी यांनी त्याचवेळी डॉ. खरे यांच्या चरित्राचा दुसराही भाग लिहिण्याचा संकल्प सोडला. डॉ. खरे यांच्या चरित्राचा हा दुसरा भाग श्री. जोशी यांनी २५ डिसेंबर १९४९ रोजी कलकत्ता येथे हिंदुमहासभेच्या अधिवेशनप्रसंगी प्रकाशित केला. डॉ. खरे यांच्या चरित्राच्या दुसऱ्या भागाचे महत्त्व ऐतिहासिक दृष्टीने विशेष आहे. विशेषतः १९४३ ते १९४९ या कालखंडात भारताच्या राजकारणात गाजलेल्या अनेक महत्त्वाच्या घटनांशी व व्यक्तींशी डॉ. खरे यांचा जो संबंध आला, तो अधिकृतपणे व्यक्त करणारा अस्सल पत्रव्यवहार, हे या ग्रंथाचे अनन्य वैशिष्ट्य आहे. या कालातील भारतीय राजकारणातील अंतप्रवाहांच्या इतिहासाला, प्रस्तुत ग्रंथातील पत्रव्यवहार विचारात घेतल्याशिवाय पूर्णता यावयाची नाही.

## केदारचरित्राची कामगिरी

डॉ. खरे यांच्या चरित्राचे दोन भाग लिहून प्रसिद्ध केल्यामुळे चरित्रकार म्हणून श्री. जोशी यांचा लौकिक मध्यप्रांतात लवकरच दरवळला. डॉ. खरे यांचे एक स्नेही व खरे-चरित्राच्या पहिल्या भागाचे प्रस्तावनाकार या नात्यांनी डॉ. केदार यांच्याशी श्री. जोशीचा निकट संबंध आला व डॉ. केदार यांच्या निधड्या व पराक्रमी जीवनाकडे श्री. जोशी हे आकर्षिले गेले. हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठातील 'वंदेमातरम् प्रकरणा'तील विद्यार्थ्यांना डॉ. केदार यांनी, ते नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू असताना, नागपूर विद्यापीठात ज्या धडाडीने प्रवेश दिला, त्यामुळे श्री. जोशी हेही केदारांच्या कर्तृत्वाने भारावून गेले. डॉ. केदारांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी श्रीमती माईसाहेब केदार यांनी आपल्या पतीच्या जीवनातील काही प्रसंग लिहून ते 'वेचलेले मणी' या नावाने

प्रसिद्ध केले. या पुस्तकाच्या 'पुरस्कारा'त डॉ. कोलते यांनी व प्रकाशन-समारंभाच्या वेळी अध्यक्षीय भाषण करताना श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी, डॉ. केदार यांचे एक विस्तृत चरित्र लिहिण्यात यावे, अशी सूचना केली, व हे चरित्र श्री. जोशी यांच्याकडून लिहवून घेण्यात यावे, असेही डॉ. कोलते यांनी माईंना सुचविले. त्याप्रमाणे वर्ष दीड वर्ष परिश्रम करून श्री. जोशी यांनी, संपादकीय कामातून व सांसारिक दगदगीतून वेळ काढून, डॉ. केदार यांचे विस्तृत चरित्र लिहिले. नानासाहेब केदारासारख्या बहुरंगी व्यक्तित्व असलेल्या चरित्रनायकाची अधिकृत व सर्वस्पर्शी माहिती जुळविणे हे काम फार जिकिरीचे व कष्टाचे होते. पण श्री. जोशी यांनी आपल्या केदार-चरित्रातून ही अवघड कामगिरी मोठ्या साक्षेपाने व यशस्वी रीतीने पार पाडली आहे प्रस्तुत चरित्र-ग्रंथाच्या रूपाने नागपूर प्रांताच्या गेल्या तीस वर्षांच्या सार्वजनिक जीवनाचा चित्रपट वाचकांच्या डोळ्यापुढे उभा करण्यात श्री. जोशी यांनी चांगलेच यश मिळविले आहे.

## चरित्र-लेखक म्हणून गौरव

श्री. जोशी यांनी लिहिलेल्या 'केदार चरित्रा'चा नागपूरच्या साहित्यिक जगात बराच गौरव झाला. नागपूर विद्यापीठाने या ग्रंथाला १९५८ चे 'ना. के. बेहरे वाङ्मयीन पारितोषिक' व सुवर्णपदक देऊन त्याचा गौरव केला. या बहुमानाबद्दल डॉ. खरे यांनी २६ जानेवारी १९५९ रोजी आपल्या बंगल्यावर नागपुरातील अग्रगण्य साहित्यिकांच्या मेळाव्यात आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली श्री. जोशी यांचा फार मोठा सत्कार केला. विदर्भ साहित्य संघानेही ११ फेब्रुवारी १९५९ रोजी डॉ. य. खु. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे जाहीर अभिनंदन केले. श्री. जोशी यांची जन्मभूमि असलेल्या देऊळगावराजा येथील नागरिकांनीही मानपत्र व थैली अर्पण करून श्री. जोशी यांचा सन्मान केला.

## नोकरीतून दूर व्हावे लागले

पण त्यानंतर श्री. जोशी यांना 'महाराष्ट्र'तील आपल्या चोवीस वर्षांच्या नोकरीतून दूर व्हावे लागले. जोशीबुवांवरील ही आपत्ती एवढी जबरदस्त ठरली की, त्यांच्या हितचिंतकांना 'ज. रा. जोशी सहाय्यक निधि' उभारून त्यांना मदत करावी लागली. या बाबतीत डॉ. खरे यांचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. डॉ. खरे यांचे हृदय किती विशाल व उदार आहे, याचा जोशीबुवांना यावेळी पुन्हा प्रत्यय आला. डॉ. खरे यांनी या आपत्तीत मायेने मदत केली नसती, तर जोशीबुवांना आपले कुटुंब चालविणे अशक्यप्राय झाले असते.

या आपत्प्रसंगी महाराष्ट्र राज्य सरकार व टिळक स्मारक फंड यांनीही अनुदान देऊन श्री. जोशी यांच्या वृत्तपत्रीय आणि वाङ्मयीन कर्तृत्वाची बूज राखली.

## ‘ पुराणिक चरित्रा ’चा जन्म

अशा प्रतिकूल परिस्थितीतही श्री. जोशी स्वस्थ बसले नाहीत. या कालात त्यांनी लिहिलेले न्यायमूर्ति पुराणिक यांचे चरित्र लवकरच ( दि. २२ जानेवारी १९६२ रोजी ) प्रकाशित होणार आहे. डॉ. खरे यांच्या चरित्राचे दोन भाग व डॉ. केदार यांचे विस्तृत चरित्र लिहून श्री. जोशी यांनी विदर्भातील एक प्रमुख चरित्रकार म्हणून लौकिक मिळविला होता. त्यामुळे त्यांचे एक हितचिंतक श्री. पु. य. देशपांडे यांनी त्यांना न्या. मू. काकासाहेब पुराणिक व न्या. मू. भवानीशंकर नियोगी यांची चरित्रे लिहिण्याची सूचना केली. या सूचनेतूनच श्री. जोशी यांचे ‘ पुराणिक चरित्र ’ जन्मास आले आहे. श्री. जोशी यांनी डॉ. खरे व डॉ. केदार यांची चरित्रे लिहून विदर्भातल्या गेल्या ३० वर्षांच्या राजकीय व सामाजिक इतिहासावर प्रकाशझोत टाकला आहे. त्यांचे ‘ पुराणिक चरित्र ’ही विदर्भातल्या व विशेषतः नागपुरातल्या सामाजिक जीवनातील काही पैलूंवर अधिक प्रकाश टाकण्यास समर्थ ठरेल व जुन्या मध्यप्रदेशाच्या गेल्या तीस वर्षांच्या इतिहासाच्या अभ्यासकांना ते जसे उपयुक्त, तसेच समाजजीवनाच्या जिज्ञासूंनाही ते उपकारकच ठरेल, असा विश्वास व्यक्त करून, त्यांनी संकल्पिलेल्या ‘ नियोगी चरित्रा ’कडे आणि देऊळगावराजा येथील जाधवांच्या इतिहासाकडे वळावे, अशी सूचना करतो.

जोशीबुवांबद्दल व त्यांच्या कार्याबद्दल मला आलेली काही मोठ्या लोकांची म्हणजे राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेन्द्रप्रसाद व राज्यपाल श्रीप्रकाश यांची पत्रेही येथे देतो.

## मुंबईचे राज्यपाल श्रीप्रकाश यांचे पत्र

( Chikalda )
Bombay Govenor's Camp,
February 23, 1960.

My dear Khare,

I thank you for your kind letter of February 18th regarding Shri J. R. Joshi. As previously desired by you, I drew the attention of Shri Tirpude our Minister for Social Welfare, to the case. I am sorry to say that I have drawn a blank.

I have no doubt that Mr. Joshi is worthy of assistance and encouragement since you speak so

highly of him. You will, however, please know my limitations, and excuse me for my inability to have done anything for him.

You will remember your kindly giving me a copy of your autobiogrcphy. I have been looking into it with much interest.

Thanking you for writing to me, and with kind regards and many memories of old days,

I am
yours sincerely
(sd) Sri Prakasa

Dr. N. B. Khare, B. A. M. D.
consulting Physician,
Nagpur

President's Secretariat
Rashtrapati Bhavan
New Delhi-4
July 20, 1960
Asadha 29, 1882 ( Saka )

Dear Sir,

The President had sent the book 'Kedar Charitra' by shri. J. R. Joshi to the Education Minister. The Ministry after examining the position intimated that they were not able to give assistance to the author under the scheme of Development of Regional Languages, because the book has already been published. The Education Ministry, however, sent the book to the Indian Council for Cultural Relations which purchases such books for distribution to Indians abroad.

The Secretary of the Indian Council for Cultural Relations has written to say that as the number of Marathi speaking Indians settled abroad is not very much, they would be purchasing initially 25 copies of the book 'Dr. Kedar Charitra.' He also says that, it may be possible for him to purchase more copies later. Shri J. R. Joshi may kindly be informed.

The Secretary of the Indian Council for Cultural Relations is Shri Inam Rahman, Pataudi House.

Yours Sincerely,
(sd) **Vishwanath Verma,**
Addl. Private S cretary

Dr. N. B. Khare,
Nagpur

Telephone : 45492
43205

**Indian Council for Cultural Relations**

No. 75004

Pataudi House,
New Delhi ,
8th August, 1960

Dear Ms. Joshi,

You will be glad to know that we have decided to purchase 25 copies of your book 'Dr. Kedar Charitra' for our presentation purpose abroad. I have written to your publisher accordingly, the copy of which I enclose herewith.

Encl. 1

Yours Sincerely,
**B. Mitter,**
(Mrs. B. Mitter)
Librarian

Shri Jagannath Ramachandra Joshi,
Asstt. Editor, Maharashtra,
Nagpur.

## जोशीबुवांनी जपून ठेवलेली माझी पत्रे

जोशीबुवांना काही महत्त्वाच्या प्रसंगी मी पत्रे पाठविली आहेत. त्या पत्रांच्या स्थळप्रती मी ठेवल्या नव्हत्या. पण जोशीबुवांनी ती माझी पत्रे जपून ठेवली होती. ती पत्रे महत्त्वाची आहेत. म्हणून ती एकामागून एक येथे देऊन हे लांबलेले प्रकरण संपवितो.

पहिले पत्र अल्वर येथून ता. ५ जुलै १९४७ या रोजी पाठविले आहे. ते इंग्रजी आहे. त्याच्यामध्ये कॉमनवेल्थबद्दलचा उल्लेख आहे. ते असे—

Alwar, Rajputana
y 1947

My dear Joshi,

I have just received your letter dated 30th June. You have mentioned in your letter that Madkholkar sent you a letter to Alwar containing some valuable suggestions. Parik tells me that they have been redirected to your address at Nagpur. I have not seen them.

I have noted what you say about Mr. Banhatti.

I have enclosed herewith two cuttings from the Hindustan Times dated 4th July, 1947. They discuss

the change of name from Dominion Office to Common Wealth Relations Office in England and have praised the Government of India for it. As you know this was done in my time in 1944 when the name of my department of Indians Over-Seas was changed to Common Wealth Relations as a result of my fight with the Commerce Member and Viceroy. I may now tell you that it was openly discussed at that time, when I was in office, that the then British Government had decided to confer Dominion status on India and there was a talk of exchanging High Commissioners between Britain and India, Australia and India and Canada and India. So it is evident from this that this Dominion Status at that time would have been conferred on India as a whole without any Pakistan but British Government was shy of doing so when we were in office. They wanted at that time to rope in the Congress and make the Congress accept, in which they have succeeded beyond all expectations with the result that there is not now one but two dominions and the country stands divided. This is entirely due to the Congress stupidity and desire to stick to office at any cost. They have given up both the principles viz. unity and independance of India and have sold their soul for a mess of pottage.

yours Sincerely
sd/ **N. B. Khare**

दुसरे पत्रही अल्वरहूनच ता. ११ जुलै १९४७ मध्ये पाठविले आहे. तेही इंग्रजीमध्ये आहे व पुढे दिल्लीत भरलेल्या हिंदु कन्व्हेन्शनबद्दल व श्रीवर्धन येथील श्रीमंत पेशवेमंदिराबद्दल आहे.

Alwar, Rajputana
11th July 1947

My dear Joshi,

Your letter to hand just now. I am getting 'Maharashtra' regularly and I have also read the cutting of 16th June which you so kindly sent. Thanks for the same. I have also read the letter of Madkholkar addressed to you which I am enclosing herewith.

I read the leading article of 'Maharashtra' dated the 9th July and I congratulate the Maharsshtra for its policy of favouring Hindu nation after unfortunate division of India. As you know I always think on the same lines after the division and you must have read my interview given to the API on the 27th or 28th June. I am not sitting quiet after that. I have drafted a 12 point programme for the Hindu Nation in English and in Hindi, and I am enclosing herewith an English copy for your information only and not for publication just now, because I intend to distribute it to all News Agencies in Delhi and other newspapers and also to members of constituent assembly on the 14th instant. After that you can publish it. The other signatory who has signed the appeal to the Hindus with me is one Mr. M. C. Sharma. We intend to hold a Hindu convention on the 26th of July and he is helping me in this endeavour because he stays in Delhi.

I am leaving this place for Delhi, day after tomorrow and my Delhi address is 11 Canning lane, New Delhi.

Don't you think this will be a bomb-shell to the constituent assembly and to the Muslims all over India? Time has come when we must catch the bull by the horn.

Yours Sincerely
sd/ N. B. Khare

P. S.

(1) One Dandekar from Shrivardhan (Kokan) will send an appeal for श्रीमंत पेशवे मंदिर there; please see that this is given publicity in 'Maharashtra'.

(2) I am enclosing herewith an original letter received from a Punjabi Hindu from Jhelum district. This is a sample of numerous letters like this I am receiving.

sd/ N. B. K.

तिसरे पत्रही अल्वरहूनच इंग्रजीत ता. १३ ऑगस्ट १९४७ रोजी पाठविले आहे. ते अल्वर येथे चालू असलेल्या मुसलमानांच्या बंडाबद्दल आहे. ते असे—

Alwar, Rajputana
13th August 1947

My dear Joshi,

Yours of the 31st July to hand. I could not reply to you earlier as I was and still am very busy in the task of quelling the rebellion of the Muslims against the Alwar State. Practically war is going on. I am doing my best to maintain law and order with equal fairness and justice to all communities. The trouble flared up by an incident of killing of a cow in a Hindu temple and murder of the priest. Naturally the Hindus got inflamed and followed and excelled Bihar. It is said the Shuddhi Sangathan walas have converted about 10 to 12 thousand Muslims to Hinduism.

On account of the crisis in the state, His Highness the Maharaja and I both of us could not attend the All India Hindu Convention. The Maharaja of Alwar who was to have inaugurated the Convention sent his inaugural address written in Hindi and it was read by an officer of the state. The Convention was attended by the Maharajas of Bharatpur, Mandi and Faridkot and was presided over by Savarkar.

The invasion of Delhi in 1734 by Bajirao I was described to me orally by Prof. Potdar the historian. He told me that he has gathered the information from the original documents. You can get the whole thing cleared or authenticated by writing to him.

Yours Sincerely
Sd / N. B. Khare

चौथे पत्र नवी दिल्लीहून ता. २०-११-५३ रोजी पाठविले आहे. ते मराठीत आहे व त्यासोबत अलिगड मुस्लीम कन्हेशनबद्दल ता. १६ नोव्हेंबर १९५३ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया'त प्रसिद्ध झालेल्या माझ्या इंग्रजी वक्तव्याचे कात्रण आहे व त्या वक्तव्याबद्दल प्रसंगोद्‌गार काढणारे बंगाल प्रांतिक हिंदुसभेचे जनरल सेक्रेटरी श्री. नित्यनारायण बॅनर्जी यांनी ता. १७ नोव्हेंबर १९५३ रोजी मला पाठविलेले इंग्रजी पत्र आहे. हे सर्व खाली देतो.

हिन्दू सभा भवन, रीडिंग रोड
न्यू दिल्ली
२०-११-५३

श्री. जोशीबुवा यांस सप्रेम नमस्कार

अलिगड मुसलिम कन्व्हेन्शन बद्दल माझे "Times of India"त प्रसिद्ध झालेले Statement असलेले माझे पत्र तुम्हाला मिळाले असेलच. त्या स्टेटमेंटबद्दल मला पुष्कळच अभिनंदनार्थ पत्रे आली आहेत. त्यातील बंगाल हिन्दुमहासभेच्या पत्राची नक्कल या पत्रासोबत पाठविली आहे. याशिवाय माझ्या स्टेटमेंट नंतरच येथील महत्वाचे प्रेस जागे झाले व काहींनी अलीगड घटनेवर अग्रलेख लिहिले. त्याची Cuttings ही मी "Times of India" च्या सोबत पाठविली आहेत. सारांश या बाबतीत All Indie Lead दिला हा माझा दावा आहे.

ना. भा. खरे

Copy of the letter dated 17th Nov. 1953, addressed to Shri N. B. Khare, M. P. by Shri Nitya Narayan Banerjee, General Secretary, Bengal Pro. Hindu Sabha.

Your statement regarding the Muslim conference at Aligarh has been given very good publicity in the leading papers of Bengal. I enclose a cutting. Such timely statements are very much appreciated by the Mahasabhaites of Bengal.

Times of India, 16-11-53

Dr. N. B. Khare, M. P., Vice President of the All-India Hindu Mahasabha, has in a statement issued on Sunday declared that the convention of Indian

Muslims held recently at Ailgarh showed that the old activities of the Muslim League were being revived in India. "This is a sinister design and should be checked as a treasonable activity" be urged.

Dr. Khare said, "It is common knowledge that the seeds of Muslim separatism were first sown in Aligarh and that they germinated into a big tree of Pakistan. It was hoped that the establishment of Pakistan would give a quietus to this separatist mentality. But this hope has been proving false and Indian Muslims are again at their old game of pre-Pakistan days. It is significant that Aligarh has again been chosen the venue for the revival of the old activities.

"Although this convention should have been an eye-opener to all non-Muslims in India it is unfortunate that the press, by and large, has failed to notice it and has thus neglected its duty. But the Pakistan press has given good publicity to the resolutions passed and speeches delivered at the convention.

## New Organisation

"It appears at the convention a new organisation called the All India Muslim Jamiat, has been formed. The Pakistan press has welcomed it as the first revolutionary step taken by the Indian Muslims to fight the political, economic and religious slaughter of Muslims in India".

"Frankly speaking, there was no necessity for holding such a convention, because on account of our rampant secularism, a policy of appeasement of Muslims is sedulously pursued by the Government of India. As a proof of this, I may state that recently a prominent leader of Pakistan, Mian Iftikharuddin, has openly stated that India is more Islamic than Pakistan itself. Muslim newspapers in India, while they welcomed the convention, had no word of condemnation for the decision to make Pakistan an Islamic Republic, in which no non-Muslim could be the head of State.

**Pak Decision**

"The Pakistan Constituent Assembly has also proposed that no laws could be passed in Pakistan which were against the directions given in the Holy Quran and Sunnah. It has not only rejected the plea of the Hindus in favour of their personal laws but has also agreed to a proposal to establish a Government department for proselytisation. That shows how miserable will be the fate of the Hindus left over in Pakistan, especially in East Bengal, where about 80 or 90 lakhs of them are still left."

"It is also significant that this convention has not said a word about the obnoxious treatment meted out to non-Muslims in Pakistan. This shows how prejudiced is the mind of the convention."

The statement urged upon the Union Government to take courage in both hands and adopt a policy of reciprocity towards Pakistan or in the alternative bring about a peaceful and complete exchange of population.

पाचवे पत्र ता. १५-११-५४ रोजी नवी दिल्लीवरूनच पाठविलेले आहे. ते मराठीत आहे व त्याला 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या १४-११-५४ च्या अंकात प्रसिद्ध झालेली गांधीजींची एक जुनी मुलाखत जोडलेली आहे. त्यावरून गांधीजी हे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय होण्याचे स्वप्न पहात होते हे दिसून येईल. ते पत्र येथे देतो—

नवी दिल्ली,
दि. १५-११-५४

श्री. जोशी यास स. न. वि. वि.

सोबत Times of India चे Cutting पाठवीत आहे. त्याच्यावरून मी पास केलेला Indian Reciprocity Act १९४६ मधे कसा लागू केला होता हे महात्मा गांधीच्या मुलाखतीवरून दिसून येईल. व महात्मा गांधी Viceroy होण्याचे स्वप्न पहात होते हेही या मुलाकतीवरून कळून येईल व त्यावरून त्यांची स्वातंत्र्याची कल्पना किती कोती होती ( Viceroy म्हणजे British Emperor च्या माताहत ) हेही कळून येईल. गांधी खरे मुलाखतीच्या वेळी मी स्वदेशी Viceroy म्हणून त्यांची टिंगल केली, तीही किती उचित होती हेही दिसून येईल.

नियोगी मिशनरी कमिटीने प्रश्नावली प्रसिद्ध केली आहे. तिच्या उत्तरासाठी हिन्दुसभेने Memorandum दाखल करावयाचे आहे. त्याकरता मी एक Press-Cutting श्री. अमरेन्द्र गाडगीळ याजजवळ मागेच दिले आहे. त्याचा उपयोग होईल. त्यास भेटावे. या बाबतीत श्री. चलपे वकीलही तुम्हास भेटतील. उत्तर यावे. सर्व कुशल.

**ना. भा. खरे**

ता. क. शिवाय Quit-India च्या वेळी गांधीची Policy इंग्रजाशी Non-Embarassment ची होती हे गांधीच्याच या मुलाखतीवरून दिसून येईल.

**ना. भा. खरे**

### An Interview

When the last war was going on, an American journalist met Mahatma Gandhi and tried to win his sympathy for the Allies. *Gandhiji being fully concious of his non-embarrassment policy, said,* "My point is that all the things that are happening are not happening at the invitation or wish of the Indians. Hundreds, if not thousands, on their way perished without food and drink and wretched discrimination stared those miserable people in the face. One route for the Whites, another for the Blacks. Provision and shelter for the Whites, none for the Blacks. And discrimination even on their arrival in India !"

In 1946, when Mr. Louis Fischer appealed to the internationalist in Mahatma Gandhi, saying: " The growing anti-White feeling here is bad. *In the Taj Mahal Hotel they have put up a notice 'South Africans not admitted.'* I do not like it." Gandhiji said: " Today the White man rules in India, so if Taj Mahal has the *gumption* to put up that notice, it is a feather in its cap."

Mr. Fischer pleaded: " That is what any nationalist will say."

Gandhiji retorted : "Then I will be a nationalist for once. They have no right to be here if they don't deal with Indians on terms of equality...... *When I shall be the Viceroy of India*, I will then invite the South African White visitors to my hut and say to them, 'You have ground down my people to powder : but we will not copy you. We will give you more than you deserve. We won't lynch you as you do in South Africa; and thus shame them into doing right. If one Englishman is killed, a whole village is razed to the ground as a reprisal. What vindictiveness !"

—Times of India, 14-11-54.

सहावे पत्र ता. २६–७–५६ रोजी नवी दिल्लीवरूनच पाठविलेले आहे. ते मराठीत असून नियोगी रिपोर्टाबद्दल आहे व त्याला दिल्लीच्या 'हिंदुस्थान–टाइम्स'मध्ये प्रसिद्ध झालेल्या नियोगी रिपोर्टाबद्दलच्या माझ्या इंग्रजी वक्तव्याचे कात्रण आहे. ते खाली देतो.

नवी दिल्ली, २६–७–५६

श्री. ज. रा. जोशी यास स. न. वि.

नियोगी कमिटीचा अहवाल अपेक्षेपेक्षा सरस निघाला. ख्रिश्चन लोकांना वाईट वाटले. मुंबईचा कार्डिनल ( पाद्री ) ग्रेशियस व नागपूरचा एफ्. जे. यूस्टेशिअस यांची निवेदने त्या संबंधात नागपूर टाईम्सने छापली आहेत. ग्रेशियसला मी उत्तर दिले होते ते येथील पत्रात प्रसिद्धिले आहे. सोबत हिंदुस्थान टाईम्समधले कात्रण आहे. हे निवेदन मी पोस्टाने नागपूर टाईम्सकडे पाठविले होते. पण ते बहुतेक Black–out झाले. असा आहे आमच्या पत्रांचा खाक्या. ही पत्रे ख्रिश्चन आहेत काय ? तुम्ही सहज P. Y. Deshpande यांस हे पत्र दाखवावे.

**ना. भा. खरे**

## KHARE REPLIES TO GRACIAS

### Niyogi Report on Missionary Work

"The anti–Indian political intentions of foreign missions can be easily read by even one who runs; witness the insult offered to our Prime Minister, in N–E. F. A., the demand for Jharkhand and the wide-

spread destruction of Hindu temples in Travancore, where there is a large Christian community," says Dr. N. B. Khare, vice-president, All-India Hindu Mahasabha, in a rejoinder to Cardinal Gracias.

Dr. Khare says : "Hindu nationalists have always firmly held the view that in the peculiar circumstances obtaining in India, conversion of a Hindu to Islam or Christianity generally results in the undermining of his loyalty to the country. Establishment of Pakistan, an Islamic State before our very eyes, substantiates this Hindu nationalist view with regard to Islam; and the findings of the Madhya Pradesh Government's Christian Missionary Activities Inquiry Committee not only substantiate this Hindu nationalist view with regard to Christianity but also goes much farther.

"The Committee, headed by Mr. Justice M. B. Niyogi, former Chief Justice of the Nagpur High Court well known througout the country for his impartiality and integrity, and which included a Christian, says : 'Evangelization in India appears to be part of the uniform world policy to revive Christendom for re-establishing Western supremacy and the objective is to create Christian minority with a view to disrupting the solidarity of the non-Christians, with ulterior motives. It is fraught with danger to security of the State."

### Gracias' views

"Cardinal Gracias of Bombay is naturally very much upset by this finding of the Committee and in a statement describes this finding as a 'sweeping remark.' While doing so he ignores the fact that the Committee was headed by a reputed ex-Chief Justice of the Nagpur High Court, and the proceedings before the Committee were conducted in a thoroughly judicial manner, in as much as witnesses of both sides were examined and cross-examined by counsels just like in a court of law. Cardinal Gracias has the temerity to say that the conclusions arrived at in a strictly judicial manner 'must be proved.' He has also declared his

intention to inaugurate a one-sided body of Catholic Christians to collect facts and figures with a view to disproving the findings of the Niyogi Committee and allay misapprehensions in the public mind about the Church and its activities. His naivete to believe that the findings or his one-sided committee will be believed by the public at large, in preference to those of the judicial and impartial Niyogi Committee, is indeed admirable.

"Cardinal Gracias expresses the fear that the Christian community will now be faced with certain restrictions imposed by the Government. I may assure him that his fear is groundless because our Govrnment is not like the Governments of China and Burma, both of which have realised the evil motives in evangelization on account of the anti-State activities of Christian groups like Karens in Burma."

सातवे पत्र १३ ऑगस्ट १९५६ रोजी नवी दिल्ली येथून पाठविण्यात आलेले आहे. तेही मराठीत आहे. हे पत्र खालीलप्रमाणे:—

श्री

नवी दिल्ली, १३-८-५६

स. न. वि. वि.

तुमचे ता. ९-८-५६ चे सविस्तर पत्र पोचले. व त्याबरोबर पाठविलेले तरुणभारतचे कात्रणही मिळाले व महाराष्ट्राचा अंक ही मिळाला. श्री. पु. य. देशपांडे याचा लेख मी वाचला. समतोल आहे. जिनाबद्दलच्या लिखाणाशी मी तंतोतंत सहमत आहे. कारण १९२० कांग्रेसमधे नागपूर येथे जिनाला मिळालेली वागणूक मी पाहिलेली आहे. श्री. देशपांडे यांनाही मी पत्र लिहिणार आहे. माझे कडे श्री. ग. म. जोशी याजकडून उत्तरार्धाच्या ३ प्रती आल्या. त्यातील १ चांगली प्रत मी श्री. चिन्तामणराव देशमुख यांजकडे भेट पाठविली. दोन प्रतींचे पार्सलचा डिंक चिकटल्यामुळे मुखपृष्ठ खराब झाले आहे. आणखी प्रती मजकडे येणार आहेत त्या आल्या म्हणजे श्री. बाळ शास्त्री यांस एक प्रत अवश्य भेट देईन असे त्यांस कळवावे.

## तीन पत्रे दिल्लीच्या नॅशनल आर्काइव्ज खात्यात दाखल

जोशीबुवांना मी पाठविलेली ही पत्रे त्यांनी जपून ठेवली होती. ती त्यांनी मला या पुस्तकात समावेश करण्याकरिता आणून दिली. त्यातील ता. ५-७-४७,

ता. ११-७-४७ व ता. १३-८-४७ या तारखांची तीन मूळ इंग्रजी पत्रे ऐतिहासिक महत्त्वाची वाटल्यावरून दिल्ली येथील केंद्र सरकारच्या नॅशनल आर्काइव्ज खात्यात आज ता. ५-८-६३ रोजी दाखल केली आहेत. त्या पत्रांची त्या खात्याकडून आलेली पावती जोशीबुवांजवळ आहे.

## अखेर मीच 'खरा' ठरलो

तसेच आज ता. ५-८-६३ रोजी (श्रावणी पौर्णिमा) या पुस्तकाचे लेखन समाप्त झाले. याच सुमारास कांग्रेसचे अध्यक्ष श्री. संजीवय्या यांनी उघड उघड वर्तमानपत्रात कांग्रेसविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप केले. ते म्हणाले, १९४७ साली जे कफल्लक होते ते आज लक्षाधीश, कोट्याधीश झालेले दिसत आहेत. योगायोग असा की मीही अल्वर राज्यातर्फे घटना समितीचा (पार्लमेंट) सदस्य असताना १९४७ सालीच पार्लमेंटात केलेल्या माझ्या एका भाषणात कांग्रेसवर पुराव्यासकट भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. माझ्या त्या भाषणाला उत्तर देत असताना नेहरूंनी त्या भाषणाचे 'अर्थशून्य बडबड' असे वर्णन करून बोळवण केली. हेच आरोप कांग्रेसवर मी तेव्हापासून आजतागायतपावेतो करीत आलो आहे. पण कांग्रेसवाले आपसात कुजबुजत असताना मी वेड्यासारखी बडबड करीत आहे असे म्हणत असत. पण आता कांग्रेसचे अध्यक्ष संजीवय्या यांनीही माझ्या आरोपांचे समर्थन केले आहे. त्यांना नावे ठेवण्याची कांग्रेसवाल्यांची, व नेहरूंची व इतरांचीही छाती नाही. कांग्रेसचे अध्यक्ष संजीवय्या यांनी केलेल्या समर्थनामुळे मी 'खरा' ठरलो व मला कृतकृत्यता वाटली. त्याचे स्मरणचिन्ह म्हणून मी आज ता. ५-८-६३ रोजी 'रागीट उच्चभ्रू' (Angry aristocrat) व आपले स्वतःचे वर्णन जाहीरपणे 'पंतप्रधानापेक्षाही काही तरी अधिक' असे करणाऱ्या पं. नेहरूंना माझ्या इंग्रजी आत्मचरित्राची एक प्रत (कोऱ्या पानावर या गोष्टीचा उल्लेख करून) भेट म्हणून पाठविली आहे. या घटनेची नोंदही या पुस्तकाचे लेखन समाप्त करताना येथे करून ठेवतो.

## माझा विजय झाला आता विराम घेतो

मी या पुस्तकाच्या लेखनात व्यग्र असल्यामुळे आज दोन तीन महिने माझे नेहरू व कांग्रेसवरील टीका करण्याचे काम थंडावले आहे. असे का ? अशी पृच्छा मला अनेकांनी पत्रे पाठवून केली आहे. त्या सर्वांना माझे जाहीर उत्तर असे आहे की, कांग्रेसचे अध्यक्ष संजीवय्या व इतर बरेच प्रमुख कांग्रेसवाले यांनी जाहीरपणे माझे कार्य उचलले आहे. हा माझा विजय आहे. आता लेखणी शिणविण्याचे मला काही प्रयोजन नाही. म्हणून येथेच विराम घेतो.

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .. .................... वि: ....................
क्रमांक ........................ नों: वि: ..................

## प्रकरण १० वे

# काकासाहेब व पुतण्या

मागील म्हणजे नववे प्रकरण लिहून मी पुस्तकाचे लिखाण समाप्त करून विराम घेण्याचे ठरविले होते. पण सदुसष्ट वर्षांच्या न. वि. उर्फ काकासाहेब गाडगिळांनी त्यांच्या ब्यायशी वर्षांच्या पुतण्याला पुन्हा एक प्रकरण लिहिण्यास भाग पाडले. खडकवासल्याच्या बाबतीत प्रकरण अंगाशी आले असतानाही त्यांनी १९४६ मधे झालेल्या मावळणकरांच्या स्पीकरच्या निवडणुकीतील यशाबाबत पुन्हा लटेगंगारामपणा केला.

मी व्हाइसरॉयच्या कौन्सिलचा सदस्य असताना माझ्याकडून जी महत्त्वाची कार्ये झाली त्यातील तीन कार्यांची माहिती अशी:—**१९४४** नोव्हेंबर पासून तो १९४६ च्या जून अखेर दक्षिण आफ्रिकेच्या वर्णविद्वेषाच्या धोरणाविरुद्ध हिंदुस्थान सरकारने दंडयोजना अमलात आणली. १९४४ च्या नोव्हेंबरमध्ये हिंदुस्थान सरकारने दक्षिण आफ्रिकेच्या विरुद्ध 'जशास तसे' कायदा लागू केला व १९४६ च्या पहिल्या सहामाहीत दक्षिण आफ्रिकेशी राजकीय संबंध तोडले, आर्थिक बहिष्कार पुकारला आणि शेवटी यु एन ओपुढे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध फिर्याद दाखल केली. १९४५ च्या मे महिन्यात पुण्याजवळ खडकवासला येथे नॅशनल डिफेन्स अॅकेडमी स्थापन करण्याचा **निर्णय** घेण्यात आला. १९४६ च्या पहिल्या तिमाहीत त्यावेळच्या केंद्रीय असेंब्लीचे स्पीकर म्हणून मावळणकर **दोनच** मतांनी निवडून आले. हा सामना मोठा अटीतटीचा होता. मावळणकर हे कांग्रेसतर्फेचे उमेदवार होते व त्यांचे प्रतिस्पर्धी सर कावसजी जहांगीर यांना हिंदुस्थान सरकार व मुस्लिम लीग यांचा पाठिंबा होता. मावळणकरांचा जो विजय झाला तो कावसजी जहांगीर यांना पडणारी सरकारपक्षाची दोन मते मी पलटवून ती मावळणकरांना प्राप्त करून दिली म्हणूनच झाला. **हे श्रेय केवळ माझे एकट्याचेच आहे. त्यात कोणीही भागीदार नाही.**

माझे श्रेय माझ्याकडून हिरावून घेण्याचा प्रयत्न पंतप्रधान पं. नेहरूंनी १९६० मध्ये दमास्कस येथे केला. तेथे एक पत्रपरिषद घेऊन त्यांनी असे विधान केले की, **बारा वर्षांपूर्वी** आम्ही दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कारवाई केली. या विधानात त्यांनी माझे नावही घेतले नाही व माझ्याविरुद्ध काही आक्षेपही घेतला नाही. पण चुकीच्या कालगणनेमुळे माझे श्रेय आपोआप हिरावले गेले. पं. नेहरूंना मी पत्रे पाठवून

चूक सुधारण्याची विनंती केली. पण ते पडले ' पंतप्रधानापेक्षाही काही तरी अधिक!' म्हणून त्यांनी माझ्या पत्रांची उपेक्षा केली तेव्हा मी त्यांच्या या घमंड रोगाला जमालगोट्याची मात्रा दिली. म्हणजे त्यांना सरकारी दिवाणी कोर्टात खेचले. ही मात्रा लागू पडली. त्या कोर्टापुढे सादर केलेल्या आपल्या कैफियतीत पं. नेहरूंनी दक्षिण आफ्रिकेच्या विरुद्ध केलेल्या सर्व कारवाईंचे माझे श्रेय मला दिले. म्हणून मी आपला दिवाणी दावा काढून घेतला. पण हिंदुस्थानचा बहुसंख्य वर्तमानपत्रकार नेहरूंचा खुशामती! म्हणून कोर्टात झालेल्या कारवाईचे वर्तमान देऊन मी एक लहानशी इंग्रजी पुस्तिका ' खरे व्हर्सस नेहरू ' या नावाची प्रसिद्ध केली.

काकासाहेब गाडगिळांनीही आपले पूज्य पुढारी पं. नेहरू यांचेच तंतोतंत अनुकरण केले. ते नागपूरला आले असताना त्यांनी १० सप्टेंबर १९६३ रोजी केलेल्या एका जाहीर भाषणात माझे नावही न घेता व माझ्यावर कोणताही आक्षेप न करता १९४६ मध्ये स्पीकरच्या निवडणुकीत मावळणकरांचा जो विजय झाला त्याचे श्रेय आपल्या स्वतःकडे घेतले व त्याचे कारण दोन मुसलमानांनी आपल्या सांगण्यावरून मावळणकरांना मते दिली हे सांगितले. या त्यांच्या ' बीचमें मेरा चांदभाई ' विधानाने माझे श्रेय आपोआप हिरावले गेले. म्हणून मी ता. ११-९-६३ या रोजी काकासाहेब गाडगिळांना एक पत्र पाठविले. त्यांतील पुढील महत्त्वाचा मजकूर येथे देतो.

" हिंदुस्थान सरकारने मी (त्याचा) सदस्य असताना १९४५ च्या मे महिन्यात खडकवासला येथे नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी स्थापन करण्याचा **निर्णय** घेतला. त्याचे बरेचसे श्रेय मला आहे. या गोष्टीची स्पष्ट हकीकत माझ्या मराठी चरित्रात श्री. ज. रा. जोशी यांनी दिली आहे. असे असताना १९५५ च्या जानेवारी महिन्यात पुण्याच्या ' केसरी 'ने तो निर्णय घेण्याचे श्रेय तुम्हाला दिले. केसरीचीच ' री ' नागपूरच्या ' तरुण-भारता 'ने ओढली. त्यामुळे मी व माझे चरित्रकार श्री. ज. रा. जोशी हे खोटे पडले. म्हणून त्यावेळेचे इन्फर्मेशन मिनिस्टर डॉ. बाळकृष्ण केसकर यांना पत्र लिहून खडकवासल्याबद्दल अधिकृत खुलासा मागितला. डॉ. केसकरांच्या उत्तराने माझे समर्थन केले. त्यामुळे केसरीला आणि तरुण-भारतालाहि खडकवासल्याचा निर्णय घेण्याचे श्रेय तुम्हाला देण्याची चूक दुरुस्त करावी लागली.

माझे चरित्रकार श्री. ज. रा. जोशी यांनीही तुम्हाला ता. १५ फेब्रुवारी १९५५ रोजी ( हे पत्र पाठविल्याचा पोस्टाचा दाखला अजून श्री. जोशी यांचे जवळ आहे. तो मी प्रत्यक्ष पाहिला आहे.) पत्र पाठवून खडकवासल्याबद्दल तुमचे काय म्हणणे आहे हे विचारले. त्यामुळे तुम्ही मोठ्या अडचणीत पडलात. कारण तुम्हाला खरे सांगणे आणि खोटे बोलणे हे दोन्हीही अशक्य झाले. म्हणून

तुम्ही सब्रसे भली चूप हा मार्ग स्वीकारला. दुसऱ्याचे श्रेय उपटण्याच्या या असफल प्रयत्नाबद्दल आचार्य अत्रे यांनी 'नवयुग' साप्ताहिकात ( ८ जुलै १९५६ ) तुमची खूब रेवडी उडविली.

पण तुम्ही निर्ढावलेले दिसता. कारण काल म्हणजे ता. १० सप्टेंबर १९६३ रोजी तुम्ही नागपूरला केलेल्या एका जाहीर भाषणात १९४६ मध्ये मावळणकर त्या वेळच्या केंद्रीय असेंब्लीचे स्पीकर म्हणून निवडून आले त्याचे श्रेय स्वतःकडे घेतले आहे व दोन मुसलमानांनी माळवणकरांना मते दिली असे सांगून मुसलमान समाजाची भलामण केली आहे. तुम्हाला मी माझ्या इंग्रजी आत्म-चरित्राची एक प्रत सप्रेम भेट म्हणून दिलेलीच आहे. त्या पुस्तकाची २४८ ते २५२ ही पाने तुम्ही वाचा म्हणजे तुम्हाला सत्य हकीकत कळून येईल.

ज्या दिवशी मावळणकरांचे इलेक्शन झाले त्या दिवशी सकाळी ज्यांना मावळणकरांच्या इलेक्शनमध्ये व्होट होते अशा तीन माणसांकडे मी गेलो. त्यापैकी एक सर आर्देशीर दलाल हे होत. हे हिंदुस्थान सरकारचे सदस्य व माझे सहकारी होते. त्यांना मी परिस्थितीची कल्पना दिली. त्यांनी मला स्पष्ट सांगितले की मी सर कावसजी जहांगीरला व्होट देणार नाही. पण मावळणकरांनाही देणार नाही. म्हणजे मी न्यूट्रल राहीन. त्याप्रमाणे ते उघडपणे न्यूट्रल राहिले.

काकासाहेबांना लिहिलेल्या या पत्रात आणखी ज्या दोन व्यक्तीकडे मी गेलो असे कळवले आहे त्या व्यक्ती म्हणजे दोन उच्च हिंदु सरकारी अधिकारी. त्यांची नांवे मी काकासाहेबांना पत्रात कळविली आहेत. पण दुसरे पत्र पाठवून ही नावे त्यांनी गुप्त ठेवावी अशी मी त्यांना विनंती केली आहे. या दोन हिंदु सरकारी उच्च अधिकाऱ्यांना मावळणकरांच्या कावसजी जहांगिरांशी होणाऱ्या अटीतटीच्या सामन्याची कल्पना दिली व त्यांनी आपले व्होट मावळणकरांना द्यावे अशी विनंती केली. त्या दोघांनी मला वचन दिले की आम्ही मावळकरांनाच व्होट देऊ. म्हणूनच मावळणकर निवडून आले. तथाकथित मुसलमानांच्या मताने किंवा काकासाहेब गाडगिळांच्या खटपटीने नव्हे, हे काकासाहेबांनी लक्षात ठेवावे. ज्या दिवशी व्हाईसराय कौन्सिलने या निवडणुकीचा विचार केला, त्या दिवशी बीजगणिताच्या भाषेत मतांची स्थिति अशी होती. मावळणकर=क्ष व कावसजी जहांगीर=क्ष+३. मी एक मत तटस्थ ठेवले व कावसजी जहांगीरची दोन मते पलटवली म्हणून स्थिति अशी झाली. कावसजी जहांगीर=क्ष व मावळणकर=क्ष+२. तेव्हा काकासाहेबांच्या खटपटीला काही अर्थ नाही.

काकासाहेबांनी नागपुरात आपल्या जाहीर भाषणात मावळणकरांच्या विजया-बद्दल असे विपर्यस्त विधान केल्यामुळे त्या दोन उच्च अधिकाऱ्यांपैकी एकाला मी

पत्र लिहिले व त्या इलेक्शनच्या घटनेचे स्मरण दिले. त्याचे अत्यंत जिव्हाळ्याचे २० सप्टेंबर १९६३ या तारखेचे पत्र मला आले आहे. त्यातील संबंधित उतारा मी येथे देतो. त्यावरून जनतेची खात्री होईल यात शंका नाही व काकासाहेबांचीही खात्री होईल अशी आशा वाटते. तो असा—

"The whole Delhi world and subsequently, the Indian political world—knew at the time about your contribution in the matter and any one who questions or challenges it, must be donig so through sheer malice. The replies you have had from journalists, persons associated with the Assembly etc. (quoted in your autobiography) to your note are ample evidence of that fact. In fact it is now a matter of history."

मी जे काकासाहेबांना ता. ११ सप्टेंबर १९६३ रोजी पत्र लिहिले त्याचे त्यांनी ता. १५ सप्टेंबर १९६३ रोजी उत्तर पाठविले. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. ते पत्र असे.

४१९ शनवार, पुणे २, १५–९–६३


॥ श्री ॥

वि. वि. ११–९–६३ चे पत्र मिळाले.


मी जे सांगितले त्यात तुमचा उल्लेख केला नाही. मी जे केले व जे मला सत्य म्हणून माहीत होते तेच सांगितले. त्यात तुमच्यावर आक्षेप नव्हता. पण तुम्हाला पत्र लिहिण्यास कारण मिळाले हेही काही कमी नाही. खडकवासला योजना १९४७ च्या मार्च महिन्यात विचारार्थ Standing Finance कमेटीपुढे आली होती व लियाकतअली अर्थ सदस्य म्हणून तिचे अध्यक्ष होते व त्यांचा विचार ही अकॅडमी पंजाबमध्ये नेण्याचा विचार चर्चेच्या वेळी सांगितला. माझ्या सूचनेवरून तो विषय पुढे ढकलला गेला. पुढेही मंत्रिमंडळात पैशासाठी भांडावे लागले. अत्रे व मी यात कोण खरे हे ज्याने त्याने ठरवावे.

आपला

(सही मोडीत) न. वि. गाडगीळ



१०. काकासाहेब व पुतण्या



श्री. ज. रा. जोशी यांनी माझ्या मराठी चरित्राचा दुसरा भाग १९५० मध्ये प्रसिद्धिला. त्यात पान २०७ ते २०९ वर मावळणकर १९४६ मध्ये त्यावेळच्या केंद्रीय असेंब्लीचे स्पीकर म्हणून कसे निवडून आले याची तपशीलवार हकीकत दिली आहे. तशीच हकीकत मी १९५५ मध्ये 'माझी गेली बारा वर्षे' या माझ्या मराठी आत्मचरित्रात दिलेली आहे व तशीच हकीकत मी १९५९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या माझ्या इंग्रजी आत्मचरित्रात पान २४८ ते २५२ वर दिलेली आहे. हे पुस्तक श्री गाडगिळांना भेट म्हणून दिले आहे. त्या पुस्तकात १३ जानेवारी १९५४ या तारखेला त्या वेळचे 'हिंदुस्थान–टाइम्स' चे श्री. दुर्गादास व त्या वेळचे लोकसभेचे सेक्रेटरी श्री. एम्. एन्. कौल ( हे १९४६ मध्येही केंद्रीय असेंब्लीचे सेक्रेटरी होते ) या दोघांच्या पत्रांचा उल्लेख आहे व १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात खुद्द श्री. मावळकरांनी मला पाठविलेल्या पत्राचाही उल्लेख आहे. त्यावरून असे दिसून येईल की, मी त्यांना मावळणकरांच्या निवडणुकीसंबंधी जी हकीकत कळविली होती ती त्यांना पटली. अर्थात् त्या हकीकतीत मावळणकरांना मते देणाऱ्या दोन उच्च हिंदु अधिकाऱ्यांचा नामनिर्देश नव्हता. काकासाहेबांनी मला १५-९-६३ या रोजी लिहिलेल्या पत्रात आपला आग्रह कायम ठेवला आहे. तो सुद्धा सरदार

पटेल, मावळणकर, शरच्चंद्र बोस व पुरुषोत्तम बळवंत गोळे ( शेवटचे दोघे मावळणकरांना मदत करण्याची विनंती करण्यासाठी निवडणुकीच्या आदल्या दिवशी मध्यरात्री माझ्याकडे आले होते. ) या सर्व संबंधित व्यक्तींच्या मृत्यूनंतर. ही सर्व हकीकत वाचून व कांग्रेसी मुसलमानही कसा ' लीगी ' असतो याचा २ सप्टेंबर १९६३ रोजी मालेगाव मुक्कामी गणपति विसर्जनाच्या वेळी आलेला पुनःप्रत्यय लक्षात घेऊन मावळणकरांना जी दोन निर्णायक मते पडली ती मुसलमानांची होती किंवा दोन उच्च हिंदु अधिकाऱ्यांची होती हे जनतेनेच आपल्या मनाशी ठरवावे.

गाडगिळांच्या १५-९-६३ च्या पत्रात खडकवासल्याबद्दल जो उल्लेख आहे त्यावरून मी माझ्या पुस्तकात जाहीर केल्याप्रमाणे १९४५ च्या मे महिन्यात त्या वेळच्या माझ्या मुसलमान सहकाऱ्याने ते विद्यालय पंजाबात स्थापन करण्याचा आग्रह धरला असला पाहिजे हे सिद्ध होते. १९४७ च्या मार्च महिन्यात Standing Finance कमेटीपुढे गाडगिळांनी खडकवासल्याचे समर्थन केले नाही. तो विषय पुढे ढकलला इतकेच. यावरून तो निर्णय घेण्यात त्यांचा काहीही हात नाही, हे आपोआपच सिद्ध होते. म्हणून गाडगीळ खरे की अत्रे खरे हे ता. ८ जुलै १९५६ च्या ' नवयुगा 'तील ' खडकवासला सैनिकी विद्यालय ' या शीर्षकाचा लेख वाचून काकासाहेब गाडगिळांनीच काय ते ठरवावे. त्याकरिता तो लेख येथे देतो.

' नवयुग '
दि. ८ जुलै १९५६

## डॉ. खरे यांनी केलेला रहस्यस्फोट
# खडकवासला सैनिक विद्यालय
### डॉ. खरे यांचे श्रेय उपटण्याचा काका गाडगीळांचा डाव

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी सुदानला मदत केल्याबद्दल त्या देशाने हिंदुस्थान सरकारला एक लाख पौंडांची देणगी दिली होती. या देणगीचा विनियोग दुसऱ्या महायुद्धाच्या स्मारकाकडे करावा असे हिंदुस्थान सरकारने ठरविले व या स्मारकाची योजना आणि त्याचे स्थान हे निश्चित करण्याकरिता एक समिति नियुक्त केली. या समितीमध्ये हिंदुस्थान सरकारचेच सात सदस्य होते. त्यात मीही एक सदस्य होतो. या समितीचे अध्यक्ष हिंदुस्थानचे त्यावेळचे सरसेनापती सर क्लॉड ऑचिनलेक हे होते. या कमिटीने असा निर्णय घेतला की, या स्मारकाप्रीत्यर्थ हिंदुस्थानात एक लष्करी विद्यालय स्थापन करावे व त्या ठिकाणी भूदल, नौदल आणि वायुदल यांमधील अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यात यावे. या समितीचा हा निर्णय हिंदुस्थान सरकारने मान्य केल्यावर हे विद्यालय

कुठे स्थापावे हे ठरविण्याकरिता त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल हे दौऱ्यावर निघाले. त्यांच्यापुढे अनेक स्थळांबद्दल सूचना आल्या होत्या. त्यांमध्ये पुण्याजवळील खडकवासला ह्या ठिकाणाचेही नाव होते. व्हाइसरॉय दौऱ्यावर निघण्यापूर्वी मी त्यांना भेटलो आणि सिंहगडाच्या पायथ्याशी असलेले पुण्याजवळील खडकवासला हेच ठिकाण या लष्करी विद्यालयाकरिता सर्वतोपरी योग्य आहे असे सुचविले. मी त्यांना सिंहगडाचा स्फूर्तिदायक इतिहास सांगितला. तेव्हा व्हाइसरॉयने पुढील वाक्य उच्चारले, "Oh, that place where a man is alleged to have climbed a fort in the dark with the help of a lizard." "ज्या ठिकाणी अंधारामध्ये एक मनुष्य घोरपडीच्या सहाय्याने किल्ला चढून गेला असे म्हणतात तेच ठिकाण ना?" मी म्हणालो, "होय तेच ठिकाण. त्या ठिकाणचा इतिहास आम्हा मराठ्यांनाच काय सर्व हिंदुस्थानला स्फूर्तिदायक आहे."

## हे पंजाबी, हे मराठे

लॉर्ड वेव्हेल हे दौऱ्यावरून परत आल्यावर त्यांनी एका भेटीत मला सांगितले की, मी खडकवासल्याच्या हवापाण्याने आणि तेथील विशिष्ट भौगोलिक परिस्थितीने ( Terrain ) प्रभावित झालो आहे. व्हाइसरॉयचा रिपोर्ट समितीपुढे आल्यावर समितीने खडकवासला हेच ठिकाण कायम केले. पण हिंदुस्थान सरकारच्या प्रांतीय भावनेने पछाडलेल्या काही सदस्यांना हा निर्णय आवडला नाही. व्हाइसरॉय आणि सर सेनापति यांना हे सदस्य काय बोलू शकणार? पण मी महाराष्ट्रीय म्हणून त्यांनी अनौपचारिक चर्चेत मला छेडले. सर फिरोजखान नून हे पंजाबी मुसलमान आणि सर जोगेंद्रसिंह हे शीख, यांचे सख्य म्हणजे अहिनकुलवत्! पण या प्रश्नावर ते एक झाले आणि 'Punjab is a sword arm of India' 'पंजाब हा हिंदी सैन्याचा पाठीचा कणा आहे' असे म्हणून ते विद्यालय पंजाबातच स्थापन व्हावयास पाहिजे असे सुचविले. त्याबरोबर महायुद्धात नुकत्याच घडलेल्या एका घटनेचा दाखला देऊन मी त्या दोघांना गप्प केले. ती घटना म्हणजे महायुद्धामध्ये आफ्रिकेतील एरिट्रिया देशाची समुद्रसपाटीपासून आठ हजार फूट उंच असलेली राजधानी अस्मारा, येथे मराठा पलटणीने केलेला पराक्रम. हे उंच ठिकाण इटलीपासून जिंकून घेण्याकरिता ब्रिटिशांनी पंजाबी आणि शीख पलटणी पाठविल्या. पण त्या पलटणींनी कच खाल्ली आणि ते ठिकाण सर न करताच त्या पंजाबी आणि शीख पलटणी माघारी परत आल्या. यानंतर ते ठिकाण सर करण्याकरिता मराठा पलटणीची योजना झाली. या मराठा सैनिकांनी जोराची मुसंडी मारून घनघोर पराक्रम केला आणि पहाडी युद्धात अप्रतिम कौशल्य दाखवून तेथून

इटालियनांना हाकलून अस्मारा हे उंच ठिकाण हस्तगत केले आणि 'मरहट्टा मरेगा जब्रही हटेगा' ह्या म्हणीला सार्थ केले. ही हकीकत मी पुढे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनाही सांगितली.

## ज्यांनी मोगलांचा उच्छेद केला ते बिनलढाऊ

हे सैनिकी विद्यालय पुण्याजवळ खडकवासला येथे स्थापन करण्याची माझी सूचना यशस्वी झाली हे पाहून व्यापारसदस्य सर अझीझुल हक्क हे माझ्यावर फार चिडले. हे बंगाली मुसलमान होते. आणि बंगाल प्रांताला आज पावेतो सैन्यापासून फार दूर ठेवण्यात आले म्हणून हे सैनिकी विद्यालय बंगालमध्ये स्थापन व्हावे असे त्यांचे मत होते. त्यांनी सर सेनापति सर क्लॉड ऑचिनलेक त्यांच्यासमोर माझ्याशी भांडायला सुरवात केली. मी मराठा ब्राम्हण. तेव्हा त्यांनी माझ्या जातीलाच दोष देण्यात सुरुवात केली. ते म्हणाले, "मराठा ब्राम्हण ही कांही लढाऊ जात नव्हे. ती जात भांडखोर आहे." (हे सर अझिझुल हक्क आणि व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्याशी ऑस्ट्रेलिया येथे हायकमिशनर नेमण्याच्या अधिकाराबद्दल मी भांडलो होतो आणि ते भांडण सेक्रेटरी ऑफ स्टेटपर्यंत जाऊन त्यात मी विजयी झालो होतो हे मागच्या प्रकरणावरून वाचकांच्या लक्षात येईलच.) त्यावर सर सेनापति ऑचिनलेक म्हणाले की, "आता आम्ही लढाऊ व बिनलढाऊ असा भेद करीत नाही, आणि या विद्यालयात तो भेद पाळला जाणार नाही." यावर मी म्हणालो, "असे करणे ठीकच आहे. पण ह्या तुमच्या निर्णयाबद्दल मला अजून संशय वाटतो. कारण नुकताच या लढाईमध्ये नागपूर येथे तीन चार शिक्षित मराठी ब्राम्हणांनी पलटणीमध्ये साधा शिपाई म्हणून भरती होण्याचा प्रयत्न केला होता. पण मराठा ब्राम्हण ही लढाऊ जात नाही म्हणून त्यांना नकार देण्यात आला. त्यानंतर त्यांपैकी एक दोघे माझ्याकडे आले आणि मला आश्चर्य वाटले की, हिंदुस्थान सरकार रंगरूटासाठी घसा फोडीत आहे अशा स्थितीत या स्वतःच रंगरूट होण्यासाठी गेलेल्या लोकांना नकार मिळतो याचा अर्थ काय ? या अन्यायाची दाद लावण्याकरिता मी मध्यप्रदेशाचे त्या वेळचे गव्हर्नर सर हेन्री ट्वायनॅम यांना पत्र लिहिले की, 'मराठा ब्राम्हण तुम्हाला अन्य कोणत्या कारणास्तव रंगरूट म्हणून नको असेल तर त्या कारणात शिरण्याची माझी इच्छा नाही; पण तो लढाऊ नाही हे म्हणणे मात्र इतिहासाच्या विरुद्ध आहे. म्हणून जर हिंदुस्थान सरकारच्या या सैनिकी धोरणात तुम्हाला हस्तक्षेप करता आला तर तुम्ही हा अन्याय अवश्य दूर करावा अशी माझी विनंती आहे.' या पत्राचा परिणाम झाला आणि त्या मराठा ब्राम्हण तरुणांच्या घरी जाऊन त्यांची सैन्यात भरती करण्यात आली. म्हणून मी मघाशी म्हणालो की, तुमच्या या बदललेल्या निर्णयाबद्दल मला अजून संशय आहे."

## मुंबई सरकारची अनास्था

अशा सर्व भानगडीनंतर हिंदुस्थान सरकारने १९४५ च्या मे महिन्यात असा निर्णय घेतला की, हे सैनिकी विद्यालय पुण्याजवळ खडकवासला येथेच स्थापन करावे आणि ते स्थापन झाले म्हणजे सर्व प्रकारचे सर्व सैनिकी शिक्षण त्या एकाच ठिकाणी द्यावे आणि अन्य ठिकाणी असलेल्या लहान लहान लष्करी शिक्षण संस्था बंद कराव्या. हा निर्णय घेतल्यानंतर तसे हिंदुस्थान सरकारने नेहमीच्या पद्धतीप्रमाणे जाहीरही केले होते. जुलै १९४६ मध्ये मी मेंबर असलेले हिंदुस्थान सरकार निवृत्त झाले आणि पुढे सप्टेंबर २, १९४६ या रोजी नेहरूप्रमुख हिंदुस्थान सरकारची निर्मिती झाली. पुढे या विद्यालयाबद्दल काही हालचाल ऐकू आली नाही. पण वर्तमानपत्रात असे मात्र प्रसिद्ध झाले होते की, मुंबईचे कांग्रेस पक्षाचे खेर सरकार आपल्या राज्यात हे विद्यालय असावे याबद्दल फारसे उत्सुक नाही, म्हणून खडकवासल्याजवळ जमीन हस्तगत करून त्या विद्यालयासाठी ती देण्यासही ते फारसे उत्सुक नाही. वर्तमानपत्रातील ही बातमी वाचून त्यावेळचे संयुक्त पंजाबचे ( अजून पाकिस्तान झाले नव्हते ) मुख्यमंत्री खिजर हयातखान यांनी असे जाहीर केले की, मुंबई सरकार जर या लष्करी विद्यालयाबद्दल फारसे उत्सुक नसले तर हिंदुस्थान सरकारने आपला निर्णय बदलून ते लष्करी विद्यालय पंजाबात स्थापन करण्याचे ठरवावे. म्हणजे मी त्या विद्यालयाकरिता पंजाबात हवी तेथे व हवी तेवढी जमीन फुकट देईन. या साली मी नागपूरला आपला धंदा पुन्हा सुरू केला होता. वर्तमानपत्रातल्या या बातम्या वाचून मी फार अस्वस्थ झालो. मला वाटले की एवढी भांडाभांडी करून खडकवासला येथे लष्करी विद्यालय स्थापून पुण्याचे वैभव वाढविण्याचा जो निर्णय घेण्यात आला होता, तो खेर मंत्रिमंडळाच्या अहिंसक मूर्खपणामुळे बदलणार काय ? पण स्वस्थ बसण्यापलिकडे या बाबतीत मी त्यावेळी काय करू शकत होतो ? पण सुदैवाने तसे झाले नाही. अखेर १९४९ च्या दसऱ्याच्या सुमारास प्रधानमंत्री पं. नेहरू यांच्या हस्ते खडकवासला येथे या लष्करी विद्यालयाची कोणशिला बसविण्यात आली. तेव्हा मला फारच समाधान झाले आणि हिंदुस्थान सरकारला मी मनातून धन्यवाद दिले. खडकवासल्याच्या या हकीकतीबद्दल एक लांबलचक लेख माझे मित्र आणि चरित्रकार व नागपूरच्या 'महाराष्ट्र' दैनिकाचे एक उपसंपादक श्री. जगन्नाथ रामचंद्र जोशी यांनी ११ नोव्हेंबर १९४९ या दिवशीच्या पुण्याच्या 'केसरी'च्या अंकात प्रसिद्ध करून महाराष्ट्रीय जनतेला या विद्यालयाच्या बाबतीतील माझ्या कार्यांची ओळख करून दिली होती !

## केसरीतील लेख

या विद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन १९५५ च्या जानेवारी महिन्यात मुंबईचे मुख्यमंत्री श्री. मुरारजीभाई देसाई यांच्या हस्ते त्या

विद्यालयाचे उद्‌घाटन झाले. या उद्‌घाटन समारंभाचे वर्णन करताना 'केसरी'-च्या खास प्रतिनिधीचा जो विस्तृत लेख त्या पत्रात दिनांक ११ जानेवारी १९५५ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता, त्या लेखात 'केसरी'च्या त्या खास प्रतिनिधीने हे लष्करी विद्यालय खडकवासला येथे स्थापन करण्याचा निर्णय घेण्याचे श्रेय पुण्याचे श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांनाच दिले होते. 'केसरी'चा हा ११ जानेवारी १९५५ चा अंक वाचून श्री. जगन्नाथराव जोशी माझ्याकडे आले आणि श्री. गाडगिळांबद्दलचे चुकीचे विधान त्यांनी मला दाखविले. ते पाहून मी हसलो आणि माझे मित्र श्री. जोशीबुवा यांना मी म्हणालो, "जाऊ द्या हो, इतके काय तुम्ही त्याबद्दल लावून घेता ? या ऋणानुबंधाच्या गोष्टी आहेत. 'केसरी'चा खास प्रतिनिधी पुण्याचा आणि श्री. न. वि. गाडगीळही पुण्याचेच, तेव्हा त्याने दिली असेल बात ठोकून ! अहो जोशीबुवा, संस्कृतामध्ये याबद्दल एक श्लोकच आहे. तो असा :

अपात्रे पात्रता बुद्धिः पात्रे बुद्धिरपात्रता ।
ऋणानुबंधरूपेण दातुरुत्पद्यते मतिः ॥ "

## पण मी खोटा ठरतो

पण जोशीबुवांचे काही या माझ्या विनोदाने समाधान झाले नाही. ते म्हणाले, "तुम्ही आम्हाला व्हाइसरॉयच्या कौन्सिलातील आतील घटनांची माहिती सांगितली. त्यावरून मी तुमचे चरित्र लिहिले आणि या चरित्रात खडकवासला येथे सैनिकी विद्यालय उभारण्याचा हिंदुस्थान सरकारने जो निर्णय घेतला त्याचे श्रेय मी तुम्हासच दिले. आणि 'केसरी'तील हा लेख तर ते सर्व श्रेय काकासाहेब गाडगिळांचे आहे असे म्हणतो. त्यामुळे मी खोटा पडतो." तेव्हा मी त्यांना म्हणालो, "मग साधी गोष्ट आहे. तुम्ही 'केसरी'ला एक लेख लिहून त्याने केलेल्या चुकीची दुरुस्ती करा म्हणजे झाले." याप्रमाणे श्री. जगन्नाथराव जोशी यांनी त्याप्रमाणे लेख लिहून दि. १३ जानेवारी १९५५ रोजी 'केसरी'च्या संपादकाकडे प्रसिद्धीकरिता पाठविला. पण काय आश्चर्य ! तो लेख प्रसिद्ध न होता 'केसरी'चे संपादक श्री. जयंतराव यांच्याकडून ता. १७ जानेवारी १९५५ च्या रोजी 'स्थलाभावास्तव प्रसिद्ध करता येत नाही' म्हणून श्री. जोशी यांच्याकडे त्यांचा लेख साभार परत आला.

## हा कट तर नाही ?

तेव्हा चरित्रकार जोशीबुवा यांना मी अशी विनंती केली की, त्यांनी 'केसरी'ने नाकारलेला तो १३ जानेवारी १९५५ चा लेख नागपूरच्या 'तरुण भारत' आणि 'महाराष्ट्र' मध्ये प्रसिद्ध करावा. त्याप्रमाणे जोशीबुवांनी त्या पत्रांच्या मुख्य संपादकांना विनंती केली. 'तरुण भारता'चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे जोशीबुवांचे 'महाराष्ट्र' वर्तमानपत्रातील एकेकाळचे सहकारी

आणि मित्र असूनही त्यांनी जोशीबुवांची, त्यांचा लेख 'तरुण भारता'त प्रसिद्ध करण्याची विनंती अमान्य केली. त्याचप्रमाणे ज्या 'महाराष्ट्र' वर्तमानपत्रामध्ये जोशीबुवा हे आज २० वर्षांपासून संपादक मंडळावर आहेत, त्याचे मुख्य संपादक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनीही एका सहकाऱ्याची अल्पशी विनंती अमान्य केली. जोशीबुवांनी मला जेव्हा ही गोष्ट सांगितली तेव्हा मला भय वाटले की, आपल्या कीर्तीचा अपहार करून आपला नैतिक मृत्यू घडवून आणण्याचा एकादा वर्तमानपत्री कट तर झाला नाही ना! माडखोलकर नुसता जोशीबुवांना नकार देऊनच थांबले नाहीत तर दुसऱ्याच दिवशी दिल्लीहून आलेली ताजी बातमी म्हणून खडकवासला येथे सैनिकी विद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्याचे श्रेय त्यांनी श्री. गाडगिळांनाच देऊन टाकले, तेव्हा मला अत्यंत आश्चर्य वाटले. कारण श्री. माडखोलकरांना व्यक्तिशः माझ्याकडून या खडकवासला विद्यालय प्रकरणाची सर्व माहिती झालेली होती.

माडखोलकरांची ही वृत्ती पाहून क्षणभर माझा मनुष्यस्वभावावरचा विश्वासच डळमळला. मी जोशीबुवांना सांगितले की, त्यांनी तो 'केसरी'ने नाकारलेला लेख दुसऱ्या वर्तमानपत्राकडेही पाठवावा. त्याप्रमाणे तो पाठविला गेला आणि पुण्याचे दैनिक 'भारत', दैनिक 'काळ' आणि मुंबईचे साप्ताहिक 'हिंदु' व नागपूरचे इंग्रजी दैनिक 'हितवाद' व 'नागपूर-टाइम्स' यांनी तो मोठ्या तत्परतेने प्रसिद्ध केला.

ज्या न. वि. गाडगीळ यांच्या नावासाठी 'केसरी'च्या खास प्रतिनिधीने आपला लेख त्या पत्रात प्रसिद्ध करून गैरसमज पसरविला त्या श्री. गाडगिळांकडूनही काही तरी अधिकृत खुलासा व्हावा म्हणून मी श्री. जोशीबुवांस सुचविले की, त्यांनी स्थानिक 'हितवाद' या इंग्रजी दैनिकात प्रसिद्ध झालेल्या आपल्या लेखाचे कात्रण श्री. गाडगीळ यांच्याकडे पाठवावे, म्हणजे त्यांनी जर खडकवासला येथे सैनिकी विद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात काही कामगिरी केली असेल तर ते खुलासा करतील. श्री. जोशीबुवांनी माझ्या सूचनेप्रमाणे श्री. गाडगिळांना त्या लेखाचे कात्रण पाठविले. पण श्री. गाडगीळ यांनी त्या बाबतीत 'सोमवार'च पाळला, म्हणजे मौन धरले. श्री. गाडगीळ यांना असे करणे सोयीचे असेल. पण मला नव्हते.

## श्री. केसकरांचे स्पष्टीकरण

म्हणून मी 'केसरी'ने निर्माण केलेल्या या भुताला कायमचे गाडण्यासाठी पंचाक्षऱ्याकडे धाव घेतली. म्हणजे भारत सरकारचे सध्याचे वार्तामंत्री श्री. डॉ. बाळकृष्ण केसकर यांना पत्र लिहून या खडसवासला सैनिकी विद्यालयाच्या निर्मितीबद्दल हिंदुस्थान सरकारची अधिकृत माहिती मागविली. डॉ. केसकर यांनी माझ्या पत्राची तात्काळ दखल घेऊन अशी अधिकृत माहिती

देणारे एक लांबलचक पत्र मला पाठविले. ते मी श्री. जोशीबुवा यांना दाखविले. ते पत्र पाहून जोशीबुवांचा आनंद गगनात मावेना. ते मोठ्या हर्षाने मला म्हणाले, " डॉक्टरसाहेब माझे काम झाले. आता मी कोणालाही भिणार नाही. हा भारत सरकारचा अधिकृत खुलासा म्हणजे मला खोटे पाडणारांना अधिकृत उत्तरच होय. मी आताच्या आता ह्या अधिकृत खुलाशाच्या आधारावर पुन्हा एक स्पष्टीकरणात्मक लेख लिहून ज्या ' तरुण भारत ' पत्राने माझा ' केसरी ' कडून परत आलेला लेख छापण्याचे नाकारले इतकेच नव्हे तर ' केसरी ' चे समर्थन होईल असा एक लेख दुसऱ्याच दिवशीच्या ' तरुण भारता 'त लिहिला, त्या ' तरुण भारता 'ला आता हे अधिकृत स्पष्टीकरण प्रसिद्ध करा अशी विनंती करतो. " यानंतर मी फेब्रुवारी १९५५ च्या शेवटल्या आठवड्यात सुरू होणाऱ्या लोकसभेच्या अधिवेशनाला हजर राहण्यासाठी दिल्लीला गेलो. श्री. जोशीबुवांनी वर सांगितल्याप्रमाणे स्पष्टीकरणात्मक लेख लिहून ' तरुण भारता '-कडे पाठविला, आणि तो मात्र त्या पत्राने ता. २४ फेब्रुवारी १९५५ या दिवशी प्रसिद्ध केला. तो असा :

## खडकवासला सैनिकी विद्यापीठ अधिकृत स्पष्टीकरण

महाराष्ट्रातील काही मराठी वृत्तपत्रात ' सैनिकी विद्यापीठ ' हे खडकवासला येथे स्थापन करण्याचे कोणी आणि केव्हा ठरविले याबद्दल अलीकडे इतिहासाच्या सत्यतेला विसंगत आणि लोकांची दिशाभूल करणारी माहिती प्रसिद्ध झाली असून त्या पत्रांनी खडकवासला येथे हे सैनिकी विद्यापीठ स्थापन करण्याचे श्रेय श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांना दिले आहे. हा वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. म्हणून मी डॉ. खरे यांना हिंदुस्थान सरकारकडून खरी माहिती मिळविण्याची विनंति केली. भारत सरकारकडून डॉ. साहेबांना जे उत्तर आले आहे ते मी पाहिले असून त्यातील वरील वादग्रस्त मुद्याबद्दलचाच भाग मी जशाचा तसाच खाली उद्धृत करीत आहे. त्यावरून सत्यपरिस्थितीबद्दल लोकांची खात्री होईल. तो भाग असा—

हिंदुस्थान सरकारने मे १९४५ मध्ये एक समिती नेमली आणि त्या समितीकडे भूदल, नाविक दल आणि वायुदल यांतील अधिकाऱ्यांच्या शिक्षणाचा प्रबंध करण्यास मिलिटरी ॲकॅडमी स्थापन करण्याची योजना विचाराकरिता सोपवली. या समितीने जो निर्णय घेतला त्यातील पहिलेच कलम असे आहे—

" पुण्याजवळ खडकवासला येथे आर्. आय्. एन्., आर्. ए. एफ्., आणि इंडियन आर्मी यांच्या कॅडेटसच्या एकत्र शिक्षणाकरिता ' नॅशनल वॉर ॲकॅडमी ' स्थापन करावी. "

डॉ. खरे यांनी व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीवरील आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा ३ जुलै १९४६ रोजी दिला. अर्थात् १९४५ च्या मे

दा. क. 93696

महिन्यात ते हिंदुस्थान सरकारात होते. श्री. काकासाहेब गाडगीळ त्यावेळी त्या सरकारात नव्हते. अर्थात् खडकवासला हे स्थान निवडण्याच्या बाबतीत त्यांचा कोणत्याही तऱ्हेचा संबंध येत नाही म्हणून ते स्थान निवडण्याचे श्रेयही त्यांच्याकडे जात नाही." **जगन्नाथ रामचंद्र जोशी**, नागपूर.

जोशीबुवांचे हे स्पष्टीकरणात्मक पत्र अगत्याने 'तरुण भारता'त तात्काळ प्रसिद्ध केल्याबद्दल त्याचे संपादक व माझे मित्र श्री. माडखोलकर यांस मी अंतःकरणपूर्वक धन्यवाद देतो.

## जोशीबुवांवर असत्य लिखाणाचा कलंक लागला नाही

'केसरी'च्या खास प्रतिनिधीचा दिनांक ११ जानेवारी १९५५ रोजी खडकवासल्याबद्दल दिशाभूल करणारा लेख जो त्या पत्रात प्रसिद्ध झाला त्याने शेवटी काय साधले ? आणि 'केसरी'च्या संपादकाने प्रारंभीच गैरसमज दूर करण्याचे नाकारूनही काय मिळविले ? माझी प्रतिष्ठा घटली नाहीच आणि काकासाहेब गाडगिळांची प्रतिष्ठा वाढली की घटली हे मला सांगता येत नाही. हा सर्व वेळ शाई आणि कागद यांचा अपव्ययच झाला नाही काय ? या सर्व निरर्थक आणि भयंकर खटाटोपामुळे मला शेक्सपिअरच्या "Much ado about nothing" या Comedy ची आठवण होते आणि माझे मित्र व चरित्रकार श्री. जगन्नाथ रामचंद्र उर्फ जोशीबुवा यांच्यावर असत्य लिखाणाचा कलंक लागला नाही, याबद्दल मला मनापासून आनंद होतो.

हे खडकवासला प्रकरण येथे संपले.

'केसरी'ने ता. ११ जानेवारी १९५५ च्या अंकात खडकवासल्याजवळ लष्करी विद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्याचे श्रेय श्री. काकासाहेब गाडगिळांना दिले. या चुकीच्या माहितीचा प्रतिवाद जर काकासाहेबांनी तत्परतेने प्रसिद्ध केला असता तर त्यांची सत्यप्रीती उठून दिसली असती. त्याचप्रमाणे श्री. ज. रा. जोशी यांनी काकासाहेबांना ता. १५ फेब्रुवारी १९५५ रोजी पत्र पाठवून खडकवासल्यासंबंधी खुलासा मागितला होता, तो जर त्यांनी जोशीबुवांना पत्र पाठवून किंवा जाहीर रीतीने केला असता तर त्यांना सत्याची चाड आहे हे जगाला दिसले असते. त्यांनी खडकवासल्याची घटना घडल्यानंतर १८ वर्षांनी अथवा त्या घटनेशी त्यांचा संबंध आल्यानंतर १६ वर्षांनी ता. १९ सप्टेंबर १९६३ चे पत्र मला पाठवून खडकवासल्याबद्दल खुलासा केला आहे. हा खुलासा इतक्या उशीराने केल्यामुळे त्यांची सत्य परिस्थिती उघड करण्याबद्दलची अनास्था, अनिच्छा किंवा बेफिकिरीच सिद्ध होते, असे म्हटले तर काय चूक होईल ?

[ **समाप्त** ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

REFBK-0013817
REFBK-0013817